म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक बाळाजी विठ्ठल गावस्कर

सन १९

पुस्तकाचें नांव वैदीक संस्कार ग्रंथ

२६

धाम

॥ ॐ नमो जगदीश्वराय ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे सन १८..

# वेदोक्त संस्कार प्रकाश.

हा ग्रंथ

वेद व तदाधार भूत आश्वलायन, पारस्कर व गोभिलीय गृह्य सूत्रादि आद्य, सर्व मान्य सत्य शास्त्रांच्या आधारें,

मंत्रार्थ व प्रमाण सहीत

## पंडित बाळाजी विठ्ठल गांवस्कर.

यांणीं तयार करून,

लोक कल्याणार्थ छापून प्रसिद्ध केला.

मुंबई:
इंडियन प्रिंटिंग छापखान्यांत छापिला.
व तेथें तो विकत मिळेल.

विक्रम संवत १९३८. शालिवाहन शक १८०३.

किंमत २॥. रुपये.

## विक्रीस तयार.

याच ग्रंथ कर्त्यांनीं केलेलें पुस्तक "अहिंसा धर्म प्रकाश" किंमत १ रुपया, टपाल एक आणा; 'मुंबई इन्डियन प्रिन्टिंग प्रेस' म्यानेजर यांजकडे मिळेल. त्या पुस्तकांत सृष्टिजन्य शास्त्र व वेदादि मान्य ग्रंथ व जगांतील अनेक धर्म व मतें यांच्या आधारें मनुष्यमात्रानें हिंसा किंवा मांस भक्षण करूं नये हें सिद्ध केलें आहे. व शिवाय भ्रष्ट देवी उपासना (वाममार्ग) व हिंसा यज्ञ यांचें खंडण व लोकांच्या संषयांचें प्रश्नोत्तर रूपानें छेदन व अनार्य वेदोत्पत्तीचें दिग्दर्शन केलें आहे.

प्राचीन कालीं अनार्य लोकांस दक्षिण प्रदेशीं
वेदोक्त धर्म प्रवृत्ति होण्याकरितां श्रेष्ठ
परोपकारी ऋषिजन आर्याव-
र्तांतून आर्यकांत वास्तव्य
करून सदुपदेश
करीत,
तत्संबंधी
सांप्रत त्यांच्या कुळांत एकच मासला,

वे. रा. रा. आत्माराम बापू दळवी. आ. दी.

यांच्याठायीं पाहून
त्यांस हा ग्रंथ,

कर्ता,—

**पंडित बाळाजी विठ्ठल गांवस्कर.**

यांणीं
सानंदाश्चर्य पूर्वक
परमप्रीति भावानें
अर्पण केला आहे.

# उपोद्घात.

—०००—

या सृष्टींतील कोणत्या एखाद्या सृष्ट पदार्थाला उत्तम स्थितींत आणणें या कृतीचा अर्थ संस्कार. ( सं=उत्तम. कृ,–कार=कृति. ) त्या प्रमाणें मनुष्य प्राण्याला उत्तम स्थिति प्राप्त व्हावी; अर्थात् या जगतांतील मानवी प्राण्याचें जीवित्व आमरणान्त निरोगी, सदृढ, सतेज, दीर्घायु, निर्भय राहून व त्यांस उत्तम ज्ञान व गुण प्राप्त होऊन त्यांनीं निर्विघ्नपणें व सुखानें व्यवहार व परमार्थ साधावे ह्मणून वेदानें विवाहादि षोडश ( १६ ) संस्कार ( सम्यक्- नियमित आचार ) लावून दिले आहेत. त्या सर्वांचें स्पष्टीकरण प्रत्येक वेदाच्या गृह्य सूत्रादि ग्रंथांत चांगल्या रीतीनें केलें आहे. व त्याच प्रमाणें प्राचीन कालीन आर्य लोक सर्व कर्मे आचरीत होते, ह्मणूनच कलाकौशल्यादि विद्येंत ते अप्रतीम व अजिंक्य, व शरीरानें निरोगी, सदृढ, सतेज व दीर्घायुषी असे असत; व उत्तम ज्ञान व सद्गुण प्राप्त होऊन, निर्विघ्नपणें व्यवहारीक व पारमार्थीक धर्म आचरून आनंदावस्थेंत राहत असत. परंतु हळू हळू तीं सत्य व हितकारक कर्तव्य कर्मे, जीं गरीबा पासून तों श्रीमंतापर्यंत एक सारख्या रीतीनें होण्या जोगतीं अशीं स्वल्प होतीं, तीं पुढें अज्ञान व पक्षपात या दोषानें बदलून व त्यांचें रूपांतर करून त्यांजवर वेद विरुद्ध व निषिद्ध- मनोकल्पित दुर्घट रचना स्वार्थाकरितां करण्यांत आली; व लोक हिताचे जागीं आत्म हितच वाढलें; त्या मुळें आपले वेदोक्त धर्मी आर्य लोक हलीं अगदीं ज्ञान, धर्म व कर्म भ्रष्ट होऊन

गेलेले आहेत. व तसा प्रकार होण्याचें मुख्य कारण मात्र एवढेंच आहे तें हें कीं, पुरोहित व यजमान या उभयतांनीं परस्पर—एकमेकाचें हित इच्छिण्याची व संरक्षण करण्याची श्रद्धा सोडिली. व त्यामुळें उभय पक्ष अशा दुर्घट स्थितीस येऊन पोंचले व कर्म भ्रष्ट झाले; यांत उभय पक्षीं कोणाचाच अपराध काढतां येत नाहीं. ज्या प्रमाणें पुरोहितानें यजमानाचें हित इच्छिण्याची श्रद्धा सोडिली, तद्वत् दुसऱ्या पक्षीं यजमानानें त्याचें प्रतिपालन करण्याचे उत्तम नियम व भक्ति सोडिली. व जसजशी ती सुटत गेली, तसतशी पुरोहित लोकांची स्थिति खराब होऊं लागली व निर्वाहाची पंचाइति होऊन गेली. त्या मुळें त्यांनीं पुढें यजमानापासून धन काढण्या करितां व त्या धनावर आपला निर्वाह चालविण्या करितां नाना प्रकारच्या युक्ति रचून धर्म निर्णयादि सिंधु; गागा, नारायणादि भट्टचा; काल माधव वगैरे नवीन ग्रंथ वाढविले. या रीतीनें सत्य कर्माचा सर्व घोंटाळा होऊन गेला. आणि त्याच्या बदली सांप्रत असत्य कर्माचा तमाम पसारा चालू झाला आहे. त्या मुळें शारीर बळ व बुद्धि बळ वृद्धिंगत होण्याचें मुख्य साधन जें वेदोक्त संस्कार कर्माचरण, तें बंद होऊन त्या दोहोंची हानी झाली आहे; व उत्तरोत्तर अधिकाधिक होतहि आहे. तस्मात् पुढें अशी निकृष्ट अवस्था नाहींसी होऊन पूर्व स्थिति प्राप्त व्हावी, याकरितां सर्वांनीं सावध होऊन पुढें सत्य मार्गानें वर्तण्यास व वर्तविण्यास प्रयत्न करणें हें योग्य होय. व त्या करितां त्यांनीं मुळच्या सत्य व हितकारक कर्तव्य कर्माचा स्वीकार केला पाहिजे. शिवाय यजमान लोकांनीं त्यांत एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही

कीं, जो कोणी पुरोहित यजमानाचें हित इच्छून हें वेद प्रणीत सत्य कर्माचरण करवितो, त्यास तन, मन, धनानें यथा शक्ति सदा प्रसन्न ठेविला पाहिजे; अर्थात् अन्न वस्त्रादिकानें त्याचें बरोबर प्रतिपालन करणें योग्य होय. व त्याच प्रमाणें पुरोहितानेंहि यजमानाचें हित इच्छून, त्याला सत्य कर्म करण्याचा बोध करावा; हा त्याचा मुख्य धर्म होय; व त्यांत त्यानें मर्यादे बाहेर लोभ करणें हें त्यास योग्य नाहीं. अर्थात् उभय पक्षांनीं परस्पर हित साधक व्हावें. व प्रत्येक कार्याच्या बदली देण्या घेण्याचा कांहीं यथा शक्ति नियम ठेवावा. आणि त्यांत यजमानाच्या स्थितीवर किंचित् ध्यान ठेवणें हा पुरोहिताचा पण धर्म होय. तात्पर्य देणें घेणें हें कार्या अंतीं यथाशक्ति असावें.

हे मूळ सत्य संस्कार ग्रंथ सर्व संस्कृत लिपींत लिहिले आहेत. पण संस्कृत भाषेचा अभ्यास सुटून गेल्यामुळें, व ते प्राचीन ग्रंथ पैसा खर्चून जिकडे तिकडे मिळूं शकतहि नाहींत, या मुळें त्यांचें सत्य ज्ञान लोकांस प्राप्त होणें मोठें दुर्घट झालें आहे, हें पाहून हा ग्रंथ प्राकृत भाषेंत करण्यांत आला आहे. तो अशा हेतूनें कीं, लोकांस या आवश्यक व योग्य संस्कार संबंधी पूर्ण ज्ञान व विचार प्राप्त व्हावें, व तेणेंकरून त्यांस यथायोग्य धर्मोक्त व्यवस्था आपल्या हस्तानें स्वतंत्रपणें करतां व करवितां यावी; व ते संस्कार करण्यांत हेतु काय आहे, व ते संस्कार कोणत्या रीतीनें व कोणत्या विधीनें झाले पाहिजेत, हें सर्व समजल्या पासून पुरोहिताला ते संस्कार करविण्यास व यजमानाला करण्यास ठीक पडेल.

या ग्रंथांत प्रथम पृष्ठ १–२२ पर्यंत "सामान्य संस्कार

विधि" लिहिला आहे; त्यांत ईश्वरोपासना, यज्ञ कुंड, होम द्रव्य, आहुती विधि व प्रमाण, सामान्य होमाहुती, मंत्र पठण, वाम देव्य गान व स्थान व कालमान यांचें विवेचन केलें आहे. त्यांचा सर्व संस्कारांत थोडा बहुत उपयोग घडलेला आहे. तस्मात् तो सामान्य संस्कार प्रथम वाचून त्यांतील दर्शविलेला विधि व मंत्रांचा अर्थ चांगल्या प्रकारें ध्यानीं आणावा. ह्मणजे तेणेंकरून कार्य कर्त्याला व कार्य करविणाऱ्याला संस्कार विधि करण्यास व करविण्यास सुगम पडेल. विवाहादि १५ संस्कार या भागांत अनुक्रमें लिहिले आहेत. व सोळावा अंत्येष्टि—मृतक संस्कार पृथक् पुस्तकांत छापून प्रसिद्ध केला आहे, कीं जेणेंकरून तो स्मशान भूमींत लोकांला घेऊन जाण्यास सुगम व सोईवार पडेल.

हे १५ संस्कार संपल्यावर पुढें—शेवटीं वेद व शतपथ ब्राह्मणादि आर्ष ग्रंथांचीं मूळ वचनें प्रमाणार्थ दिलीं आहेत. व नंतर सरशेवटीं संस्कारांत आलेल्या मंत्रांचा अर्थ संक्षिप्त रीतीनें दर्शविला आहे.

या प्रमाणें या ग्रंथाची रचना केली आहे. आतां विशेष सांगण्याचें एवढेंच आहे तें हें कीं,—जो जो पदार्थ चांगला केला जातो, तो तो उत्तम, पूज्य व ग्राह्य असा लोकांत दिसून येतो व हें "चक्षुर्वै सत्यं" होय. तस्मात् उत्तम संतति होण्याचा हेतु धरून, सर्व लोकांनीं हे कर्तव्य वेदोक्त संस्कार अवश्य स्वीकारावे हें उचित होय. संतति उत्तम उत्पन्न झाल्यानें व त्यांस सुशिक्षा, विद्याध्ययन, ब्रह्मचर्य व सत्संग इत्यादि नियमित सदाचरणीं वागवून त्यांचा यथोक्त कालीं विवाह केल्यानें मानव प्राणी ( स्त्री पुरुष ) शारीरिक व मानसीक स्थितीमध्यें ( अर्थात् शारीर बळ व बुद्धिबळ यांत )

सर्वोत्कृष्ट सदृढ होत असतो. तस्मात् सर्व सज्जन लोकांनीं योग्य धर्मोक्त प्रकारें अनुष्ठान (आचरण) करून मानवी प्राण्याला या वेदोक्त धर्म प्रतिपादित ग्रंथावरून अत्यन्त लाभ करवावा, अशी वेदाची हितकारक आज्ञा आहे. ती मनोभावें पाळण्याची बुद्धि, सर्वांतर्यामी परमात्मा सर्व जनांला देवो: अशी परमात्म्याकडे प्रार्थना आहे, ती त्याच्या कृपेनें सिद्धीस जावो.

मुंबई; मिति-शुद्ध १, माघ मास, उदगयन, शालिवाहन शक १८०३. } पं. बा. वि. गांवस्कर.

---

## अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| सामान्य संस्कार विधि...... | १ | चूडाकरण सं० विधि...... | १०७ |
| विवाह संस्कार विधि........ | २३ | कर्णवेध संस्कार विधि...... | ११२ |
| गर्भाधान संस्कार विधि..... | ६० | उपनयन संस्कार विधि..... | ११४ |
| गृहाश्रम संस्कार विधि....... | ६९ | वेदारंभ संस्कार विधि..... | १२१ |
| पुंसवन संस्कार विधि....... | ८२ | समावर्तन संस्कार विधि.... | १३४ |
| सीमन्तोन्नयन सं० विधि..... | ८६ | वानप्रस्थ संन्यासाश्रम संस्कार विधि......... | १४० |
| जातकर्म संस्कार विधि ..... | ९१ | संस्कार प्रमाणार्थ मूळ वचनें............... | १४३ |
| नामकरण संस्कार विधि..... | ९७ | संस्कार मंत्रार्थ... ....... | १६० |
| निष्क्रमण संस्कार विधि.... | १०१ | | |
| अन्नप्राशन सं० विधि.... | १०४ | | |


---


हा ग्रंथ खालील ठिकाणींहि विकत मिळेल.

वेंगुर्लें-रा. रा. गंगाधर यशवंत प्रभु गाडेकर.

कुमठें-रा. रा. बाबूराव महादेव हळकर.

# वेदोक्त संस्कार प्रकाश.

## सामान्य संस्कार विधि.

### १ ईश्वरोपासना.

गर्भाधानादि प्रत्येक शुभ संस्कार विधीच्या आरंभीं व शेवटीं उत्पन्न मात्र गणनीय पदार्थांचा धनी जो गणपति —सर्व शक्तिमान जगन्नियंता, परमात्मा—त्या परमात्म्याची, कार्य सिध्यर्थ, स्तुति, प्रार्थना व उपासना वेदोक्त मंत्रांनीं करावी; ते मंत्र:—

"ॐ भूर्भुवः स्वः"

हीं प्रणव आणि व्याहृती प्रत्येक वेदोक्त मंत्राच्या प्रारंभीं उच्चारून मंत्र ह्मणावे.

### ॥ ऋग्वेद ॥

॥ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् ।
होतारं रत्नधातमम् ॥ १ ॥

॥ तमीशानं जगतस्तस्थुषस्पतिं धियंजिन्वम-
वसे हूमहे वयं । पूषा नो यथा वेदसामसद्-
वृधे रक्षिता पायुरदब्धः स्वस्तये ॥ २ ॥

॥ नमो दिवे बृहते रोदसीभ्यां मित्राय वोचं
वरुणाय मीळ्हुषे सुमृळीकाय मीळ्हुषे । इंद्र
मग्निमुप स्तुहि द्युक्षमर्यमणं भगं । ज्योग्जीवं
तःप्रजया सचेमहि सोमस्योती सचेमहि ॥३॥

॥ गणानां त्वा गणपतिं हवामहे । कविं कवीनाम्
मुपमश्रवस्तमं । ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मण
स्पत । आनः शृण्वन्नूतिभिः सीद सादनं ॥४॥

॥ स्वस्ति नो मिमीतामश्विना भगः । स्वस्ति दे
व्यदितिरनर्वणः । स्वस्ति पूषा असुरो दधा
तु नः । स्वस्ति द्यावापृथिवी सुचेतुना ॥५॥

॥ स्वस्ति मित्रावरुणा स्वस्ति पथ्ये रेवति । स्व
स्ति नइंद्रश्चाग्निश्च स्वस्तिनोअदिते कृधि ॥६॥

॥ स्वस्तये वायुमुप ब्रवामहै । सोमं स्वस्ति
भुवनस्य यस्पतिः । बृहस्पतिं सर्वगणं स्व
स्तये । स्वस्तय आदित्यासो भवंतु नः ॥७॥

॥ शं नो भव चक्षसा शं नो अन्हा । शं भानुना शं
हिमा शं घृणेन । यथा शमध्वंछमसद्दुरोण
तत्सूर्य द्रविणं धेहि चित्रं ॥ ८ ॥

॥ शं नो द्यावापृथिवी पूर्वहूतौ । शमंतरिक्षं दृ

शर्यं नो अस्तु । शं न ओषधीर्वनिनो भवंतु ।
शं नो रजसस्पतिरस्तु जिष्णुः ॥ ९ ॥

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ॥ १० ॥

## ॥ यजुर्वेद ॥

॥ इषे त्वोर्ज्जे त्वा वायवं स्थ देवो वः सविता प्रार्पयतु श्रेष्ठतमाय कर्मण आप्यायध्वमघ्न्या इन्द्राय भागं प्रजावतीरनमीवा अयक्ष्मा मा वस्तेन ईशत माघशंऽसो ध्रुवा अस्मिन् गोपतौ स्यात बह्वीर्यजमानस्य पशून्पाहि ॥ १ ॥

॥ नमो हिरण्यबाहवे सेनान्ये, दिशांच पतये नमो, नमो वृक्षेभ्यो हरिकेशेभ्यः, पशूनां पतये नमो, नमः शष्पिंजराय त्विषीमते, पथीनां पतये नमो, नमो हरिकेशायोपवीतिने, पुष्टानां पतये नमः ॥ २ ॥

॥ नमो गणेभ्यो, गणपतिभ्यश्च वो नमो, नमो व्राते भ्यो, व्रातपतिभ्यश्च वो नमो, नमो गृत्सेभ्यो, गृत्सपतिभ्यश्च वो नमो, नमो विरूपेभ्यो, विश्वरूपेभ्यश्च वो नमः ॥ ३ ॥

॥ नमः शंभवाय च, मयोभवाय च, नमः शंकराय च, मयस्कराय च, नमः शिवाय च, शिवतराय च ॥ ४॥

॥ ऋचं वाचं प्रपद्ये मनो यजुः प्रपद्ये साम प्राणं प्रपद्ये चक्षुः श्रोत्रं प्रपद्ये । वागोजः सहौजो मयि प्राणापानौ ॥ ५ ॥

॥ द्यौः शांतिरंतरिक्ष ँ शांतिः पृथिवी शांतिराप शांतिरोषधयः शांतिः । वनस्पतयः शांतिर्विश्वे देवाः शांतिर्ब्रह्म शांतिः सर्व ँ शांतिः शांतिरेव शांतिः सा मा शांतिरेधि ॥ ६ ॥

॥ अहानि शं भवन्तु नः श ँ रात्रीः प्रति धीयताम् । शंन इंद्राग्नी भवतामवोभिः शं न इन्द्रावरुणा रातहव्या । शं न इन्द्रापूषणा वाजसातौ शमिन्द्रासोमा सुविताय शं योः ॥ ७ ॥

॥ दृते दृ ँ ह मा मित्रस्य मा चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षंतां । मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे । मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ॥ ८ ॥

॥ यतो यतः समीहसे ततो नोऽअभयं कुरु । शं नः कुरु प्रजाभ्योऽभयं नः पशुभ्यः ॥ ९ ॥

॥ हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
यो ऽसावादित्ये पुरुषः सो ऽसावहम् ।
ओ३म् खं ब्रह्म ॥ १० ॥

## ॥ सामवेद ॥

॥ अग्न आ याहि वीतये गृणानो हव्यदातये ।
निहोता सत्सि बर्हिषि ॥ १ ॥

॥ स नः पवस्व शं गवे शं जनाय शमर्वते ।
शं राजन्नोषधीभ्यः ॥ २ ॥

॥ स्वायुधः पवते देव इंदुरशस्तिहा वृजना रक्षमाणः । पिता देवानां जनिता सुदक्षो विष्टंभो दिवो धरुणः पृथिव्याः ॥ ३ ॥

॥ न त्वावा अन्यो दिव्यो न पार्थिवो न जातो न जनिष्यते । अश्वायंतो मघवंनिंद्र वाजिनो गव्यंतस्त्वा हवामहे ॥ ४ ॥

॥ त्वं हि नः पिता वसो त्वं माता शतक्रतो बभूविथ । अथा ते सुम्नमीमहे ॥ ५ ॥

॥ त्वं वरुण उत मित्रो अग्ने त्वां वर्धंति मतिभिर्वसिष्ठाः । त्वे वसु सुषणनानि संतु यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ६ ॥

॥ यंत इन्द्र भयामहे ततो नो अभयं कृधि । मघ-
वञ्छग्धि तव तन्न ऊतये विद्विषो विमृधो जहि ॥७।

॥ त्वं॑ हि राधसस्पते राधसो महः क्षयस्यां-
सि विधर्ता । तं त्वा वयं मघवन्निंद्र गिर्व-
णः सुतावंतो हवामहे ॥ ८ ॥

॥ भद्रं कर्णेभिः श्रिणुयाम देवा भद्रं पश्येमा-
क्षभिर्यजत्राः । स्थिरैरंगैस्तुष्टुवां ं सस्तनूभि-
र्व्यशेमहि देवहितं यदायुः ॥ ९ ॥

॥ स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः स्वस्ति नः पूषा
विश्ववेदाः । स्वस्ति नस्ताक्ष्र्यो अरिष्टनेमिः
स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ।
ओ३म् । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥१०॥

## ॥ अथर्व वेद ॥

॥ ये त्रिषप्ताः परियन्ति विश्वा रूपाणि बिभ्रतः।
वाचस्पतिर्बला तेषां तन्वो अद्य दधातुमे ॥१॥
शान्तानि पूर्व रूपाणि शान्तं नो अस्तु कृ-
ताकृतम् । शान्तं भूतं च भव्यं च सर्वमेव
शमस्तु नः ॥ २ ॥

॥ इयं या परमेष्ठिनी वाग्देवी ब्रह्म संशिता ।

यथैव संसृजे घोरं तथैव शान्तिरस्तु नः ॥३॥

॥ इदं यत्परमेष्ठिनं मनो वा ब्रह्म संशितम् । येनैव संसृजे घोरं तेनैव शान्तिरस्तु नः ॥ ४ ॥

॥ इमानि यानि पंचेन्द्रियाणि मनः षष्ठानि मे हृदि ब्रह्मणा संशितानि। यैरेव संसृजे घोरं तैरेव शान्तिरस्तु नः ॥ ५ ॥

॥ शंनो ग्रहाश्चान्द्रमसाःशमादित्याश्च राहुणा । शंनो मृत्युर्धूमकेतुः शं रुद्रास्तिग्मतेजसः ॥६॥

॥ शं रुद्राः शं वसवः शमादित्याः शमग्नयः । शंनो महऋषयोदेवाः शं देवीःशंबृहस्पतिः ॥७॥

॥ पृथिवी शान्तिरन्तरिक्षं शान्तिर्द्यौः शान्तिरापः शान्तिरोषधयः शान्तिर्वनस्पतयःशान्तिर्विश्वे मे देवाः शान्तिः सर्वे मे देवाः शान्तिः शान्तिः शान्तिभिः । ताभिः शान्तिभिःसर्वशान्तिभिः शमयाम्यहं यदिह घोरं यदिह क्रूरं यदिह पापं तच्छान्तं तच्छिवं सर्वमेव शमस्तु नः ॥ ८ ॥

॥ पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् । बुध्येम शरदःशतम् । रोहेम शरदः शतम् ।

पुष्येम शरदः शतम् । भवेम शरदः शतम्
भूषेम शरदः शतं । भूयसीः शरदः शतात् ॥९॥
॥ पनाय्यं तदश्विना कृतं वां वृषभो दिवो रज-
सः पृथिव्याः । सहस्रं शंसा उत ये गविष्टौ
सर्वाँ इत्ताँ उप याता पिबध्यै ॥१०॥

---

## २ यज्ञ कुंड व द्रव्याहुती प्रमाण.

स्व पर कल्याणार्थ आहुतीद्वारा ईश्वरोपासना करावी; एतदर्थ चंदनादि सुगंधीक व रोग नाशक द्रव्यांच्या आहुती यज्ञ कुंडांत द्यावयाच्या, त्या यज्ञ कुंडाचें, द्रव्यांचें व आहुतीचें मान, व आहुतीचा विधि:—

**यज्ञकुंड** :—मंडपांत किंवा घरांत स्वच्छ, हवाशीर, प्रकाशयुक्त, लांब रुंद, अशा विस्तीर्ण, सपाट भू पृष्ठ भागावर २४ अंगुळें सम चौरस (ह्मणजे चारी बाजू २४।२४ अंगुळें लांब) जमीन घेऊन, तिच्या चारी बाजूस ९ अंगुळें उंच, व चार (४) अंगुळें रुंद अशी एक मेखला (पायरी) सभंवती (भिंतीसारखी) चिकण मातीची बांधावी. पुढें या पायरी खालीं बाहेरून चार अंगुळांवर, तीन (३) अंगुळें रुंदीची दुसरी पायरी बांधावी. व तदनंतर या पायरी खालीं तीन अंगुळांवर, दोन (२) अंगुळे रुंदीची अर्थात भू पृष्ठ भागावर दोन अंगुळें उंचीची तिसरी पायरी बांधावी. याप्रमाणें भू पृष्ठभागावर ९ अंगुळें खोलीचें २४ अंगुळें सम चौरस कुंड—बाहेरून सभंवती भू पृष्ठ भागापासून वर अनुक्रमें २,३,४

अंगुळें अशा समान उंची रुंदीच्या चारी बाजूस तीन तीन पायऱ्या असलेलें–असें विवाह, उपनयन, समावर्तन अशा समयीं योजावें.* पुंसवनादि अन्य मंगल संस्कारांत जें कुंड योजावयाचें– तें वरील विवाह यज्ञ कुंडाप्रमाणेंच असावें, परंतु भेद एवढाच कीं, २४ अंगुळें चौरस जमीन घ्यावी ह्मणून जें वर सांगितलें आहे, त्या २४ अंगुळांऐवजीं १२ अंगुळें चौरस जमीन घेऊन तिच्या सभोंवती पूर्वोक्त रीत्या बाहेरून ३।३ पायऱ्या–भू पृष्ठभागापासून अनुक्रमें २।३।४ अंगुळें अशा समान उंची रुंदीच्या बांधाव्या.

हीं यज्ञ कुंडे मंडपांत किंवा घरांत अशा ठिकाणीं असावीं कीं, वधूवरादि कार्य कर्त्याला त्या कुंडासन्निध पूर्वेस तोंड करून बसण्यास, व त्या कार्य कर्त्यापुढें व बाजूस कार्यार्थ येणाऱ्या लोकांला बसण्यास विस्तीर्ण जागा राहील.

**होमद्रव्य**– यांत **इंधन** व **आहुती** अशीं दोन द्रव्यें असतात. **इंधन द्रव्य** ह्मणजे यज्ञाग्नि सिध्यर्थ उपयुक्त काष्ठें व तृण. काष्ठें योजावयाचीं तीं यज्ञीय वृक्षांचीं असावीं; ते यज्ञीय वृक्ष–चंदन, पळस व खैर हे मुख्य होत. या वृक्षांच्या अभावीं बेहडा, लोध्र, हिंगणबेट, नीव, निंब, बाहाबा, निवडुंग, चिकाडादि चिकाळ वृक्ष, सांवर, दिंडा,

---

* ह्या यज्ञ कुंडार्थ जो भू पृष्ठ भाग घ्यावयाचा, तो मंडपांतील किंवा घरांतील ह्मणजे ज्या ठिकाणीं यज्ञ कुंड बांधावयाचें, तेथील मूळ भू पृष्ठ भागावर ५४ अंगुळें सम चौरस व ६ अंगुळें उंच असा असावा, ह्मणजे ५४ अंगुळें लांब ५४ अंगुळें रुंद व ६ अंगुळें उंच, असा मृत्तीकेचा चौक मूळ भू पृष्ठावर तयार करून त्यावर हीं कुंडे मध्यभागीं बांधावीं.

कवटी, कांचन भोंकर हे वृक्ष सोडून बाकी—वड, पिंपळ, पिंप्री, उंबर, आंबा, बेल, आघाडा, देवदारु, सुरु, साल, शमी इत्यादि सर्व वृक्ष यज्ञीय जाणावे. यज्ञीय काष्ठांप्रमाणें कुश व दर्भ हे मुख्य यज्ञीय तृण असून त्यांच्या अभावीं–कुसळें गवत, सर, मुंज, देवनळ, नड, मोळ, लव्हाळे हे तृण वर्ज्य करून बाकी सर्व तृण यज्ञीय जाणावे. अशा उपलब्ध यज्ञीय वृक्षांचीं काष्ठें इंधनार्थ (कुंडस्थ अग्नि प्रदीप्त करण्यास) यज्ञकुंड प्रमाण, कीटक व पर्ण रहीत अशीं घ्यावीं. कुशादि तृण अग्रयुक्त, मूल रहीत, एकांतएक न मिसळलेले असून त्यांचें लांबीचें मान प्रादेशमात्र ह्मणजे एक टीच जाणावें.* आतां दुसरें आहुतीद्रव्य.—ह्मणजे सुगंध, पुष्ट, मिष्ट गुणयुक्त व रोग नाशक असे पदार्थ मंत्रोच्चारानें प्रज्वलीत अग्नीमध्यें टाकावयाचे ते. चंदन, कस्तूरी, केशर, साखर, दहीं, दूध, तूप, सुगंध तेल, व्रीहि (तूस न काढलेलें भात), यव, तीळ, गहूं, यवागु (क्षीर), चरु (व्रीहि किंवा यव हे ज्या दिवशींचे त्या दिवशीं यज्ञकुंडा-सन्निध ३।३ वेळ शुद्ध कांडून, पाखडून ३।३ वेळ स्वच्छ उदकानें प्रक्षालन केलेल्या तांदळांचा भात—जळकट, कठीण किंवा मऊ असा नसून पक्क, फुललेला, घृतमिश्रित असा) व सोमलतादि औषधी हीं आहुती द्रव्यें असून त्या आहुती द्रव्यांच्या आहुती योजाव्या. आतां द्रव्याहुतीचें

---

* पवित्रे' स्थो वैष्णव्यौ । सवितुर्व': प्रसवऽउत्पुनाम्य-च्छिद्रेण पवित्रे'ण सूर्य'स्य रश्मिभिः । देवी'रापोऽअग्रेगुवोऽ-अग्रेपुवोऽग्रऽइममद्य यज्ञं नयताग्रे' यज्ञपतिꣳसुधातुम् यज्ञप'तिं देवयुवम् ॥ या मंत्रानें होमौषधी नख न लावतां छेदन कराव्या.

**मान** :–हस्ताच्या कोपराच्या कोना पासून कनिष्ठिकाग्रापर्यंत लांबीची व अंगुष्ठाच्या पेरा एवढ्या तोंडाची खैर वृक्षाची किंवा कांस्याची पळी,–उजव्या हाताचा अंगुष्ठ, मध्यमा व अनामिका या तीन अंगुलांनीं मध्यें धरून, त्या स्रुव–पळीनें घृत क्षीरादि प्रवाही पदार्थांच्या आहुती द्याव्या. व्रीहि, चरु आदि अप्रवाही पदार्थ दक्षिण हस्ताचा अंगुष्ठ, मध्यमा व अनामिका यांचीं एकत्र अग्रें करून त्या एकत्र अंगुलाग्रांनीं (येईल तेवढा भाग) घेऊन त्याची एकेक आहुती द्यावी. भाताच्या किंवा जोंधळ्याच्या लाह्यांच्या विशेष आहुती, अंजली प्रमाण होत. आतां समिधा ह्मणजे पूर्वोक्त यज्ञीय वृक्षांचीं व मुख्यत्वेंकरून चंदनाचीं कीटक व पर्ण रहीत, न फुटलेलीं, अंगुष्ठाहून कमी जाड नव्हेत, अशीं दहा अंगुळें लांबीचीं तोडलेलीं काष्ठें जाणावीं. अशा समिधा पूर्वोक्त स्रुवा सारख्या–अंगुष्ठ, मध्यमा व अनामिका यांच्या अग्रांनीं धरून आहुती द्याव्या.

**होमाहुती विधि** :– पूर्वोक्त यज्ञीय काष्ठ, तृणादि उपलब्ध (मिळेल त्या प्रकारचें) इंधन द्रव्य; घृत, व्रीहि, यवादि (ज्या संस्कारांत जें सांगितलें असेल तें) सर्व आहुती द्रव्य; शुद्धोदक पूर्ण पात्र (तांब्या व पंचपात्री); आज्यस्थाली (कांस्याचें मोठें गोल, सुमारें २ शेर तूप मावणारें पात्र); पूर्वोक्त स्रुव; कुशादि उपलब्ध हिरवे तृण असे पदार्थ यज्ञकुंडासन्निध आणून ठेवून, त्या कुंडाच्या दक्षिण बाजूस पुरोहिताला बसण्यासाठीं एक पीठ (पूर्वोक्त यज्ञीय वृक्षाचें एक चांगलें किंचित् उंच आसन) व कुंडाच्या पश्चिमेस कार्य कर्त्याला बसण्यासाठीं मऊ शुभासन, अशीं आसनें स्थापन करावीं.

एणें प्रमाणें सर्व साहित्य सिद्ध झाल्यावर, कार्य कर्त्यानें

॥ ॐ भूर्भुवः स्वः ॥ या मंत्रोच्चारानें ब्राह्मण, क्षत्रिय अथवा वैश्य वर्णांच्या याज्ञिकांच्या घरांतील अग्नि आणून किंवा शमी वृक्षावर वाढलेल्या पिंपळाच्या किंवा अन्य वृक्षाच्या काष्ठ घर्षणानें अग्नि सिद्धकरून तो अग्नि निर्धूम–धूर रहित, असा–कुंडासन्निध ठेऊन उत्तरेकडून बहिर्प्रदेशीं जावें व हस्तपाद प्रक्षालन करून–धुऊन, शुद्ध धूत वस्त्र नेसावें व यज्ञोपवीत वत् ( पांघुरण्याचें वस्त्र उजव्या काखेंतून वरून नेऊन डाव्या खांद्यावरून परिधान केलेलें असें ) उपवस्त्र पांघरून पूर्वीं योजलेल्या *पुरोहिताजवळ जावें व त्यास विनय पूर्वकपणें, ॥ **ॐ आवसोः सदने सीद** ॥ अशा मंत्रोच्चारानें पुरोहितपणा स्वीकारण्यासाठीं विनंति करावी. नंतर पुरोहितानें ॥ **ॐ सीदामि** ॥ असें म्हणून हस्त पादादि प्रक्षालन व आचमन करून नियुक्त पीठासनावर बसावें. व कार्य समाप्ति पर्यंत यज्ञ कुंडाच्या उत्तरेस तोंड करून शांत व नम्रपणें असावें व उपस्थित कार्यसंबंधीच भाषण करावें.†

---

* योग्य धर्मोक्त कर्त्ये पूर्णपणें समजणारा, विद्वान्, सद्धर्मी, कुलीन, निर्व्यसनी, वेदप्रिय, ईश्वरभक्त अशा पूज्य गृहस्थास पुरोहित ( पुरा=अग्रभागीं, हित=ठेवलेला, अर्थात् पूज्य ) ही संज्ञा असून त्यांत कित्येक प्रसंगीं स्त्रियांचाहि समावेश होतो.

† अन्य कोणत्याच विषयावर भाषण करूं नये. केल्यास,

॥ ॐ इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा निदधे पदं । समूळ्हमस्य पांसुरे ॥ त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः ।

अशी पुरोहिताची स्थापना केल्यावर, कार्य कर्त्यानें कुंडासमोर पूर्वाभिमुख बसून हृदयास पोंचे एवढें थंड उदक उजव्या हस्ताच्या अंजलींत घेऊन, हस्ताचा कोपर खांद्याबाहेर न जाई अशा रीतीनें ती हस्तांजली समोर धरून,

**॥ ॐ अमृतोपस्तरणमसि स्वाहा ॥**

या मंत्रानें आचमन करावें. व याच प्रमाणें,

**॥ ॐ अमृतापिधानमसि स्वाहा ॥**

**॥ ॐ सत्यं यशः श्रीर्मयि श्रीः श्रयतां स्वाहा ॥**

या दोन मंत्रांनीं, प्रत्येक मंत्रांनीं एकेक वेळ, अशीं आणखीं दोन आचमनें करावीं; व उभय हस्त धुऊन मुख, कर्ण, चक्षु, नासिकादि इंद्रियांस जल स्पर्श करावा. तो एणेंप्रमाणें:—

॥ **ॐ वाङ्मऽआस्येस्तु** ॥ या मंत्रानें मुखास. ॥ **ॐ नसोर्मे प्राणोस्तु** ॥ यानें नाकास. ॥ **ॐ अक्ष्णोर्मे चक्षुरस्तु** ॥ यानें डोळ्यांस. ॥ **ॐ कर्णयोर्मे श्रोत्रमस्तु** ॥ यानें उभय कानांस ॥ **ॐ बाह्वोर्मे बलमस्तु** ॥ यानें उभय बाहूंस. ॥ **ॐ ऊर्वोर्मेऽओजोस्तु** ॥ यानें उभय मांड्यांस.

---

अतो धर्माणि धारयन् ॥ विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इन्द्रस्य युज्यःसखा॥ ॐ नमो विष्णवे॥ ॥ विष्णोः क्रमोऽसि सपत्नहा गायत्रं छन्द, आरोह पृथिवीमनु विक्रमस्व । विष्णोः क्रमोऽस्यभिमातिहा त्रैष्टुभं छन्द, आरोहान्तरिक्षमनु विक्रमस्व । विष्णोः क्रमोऽस्यरातीयतो हन्ता जागतं छन्द, आरोह दिवमनु विक्रमस्व । विष्णोः क्रमोऽसि शत्रूयतो हन्तानुष्टुभं छन्द, आरोह दिशोऽनु विक्रमस्व ॥

व ॥ ॐ अरिष्टानिमेऽङ्गानि तनूस्तन्वा मे सहसंतु ॥ यानें सर्वांगांस, दक्षिण हस्तानें जलस्पर्श करावा.‡

एणेंप्रमाणें आचमन व जलस्पर्शविधि झाल्यावर यज्ञकुंडांत थोडथोडीं काष्ठें रचून त्यांजवर ॥ ॐ भूर्भुवः स्वः ॥ या मंत्रानें अग्नि स्थापावा. व त्या अग्नीवर पुनः आणखीं पृष्ठ भागापर्यंत काष्ठें व मधून मधून कुशादि तृण रचून, वेळूच्या वगैरे पंख्यानें ( विंझण्यानें ) अग्नि प्रदीप्त करावा, व त्याजवर घृतपात्रांत ( आहुतीच्या मानाप्रमाणें ) घृत घेऊन तापवावें व खालीं उतरून त्यांत केश, कचरा, मुंगी इत्यादि कांहीं पडलेलें असलें, तर तें सर्व उजव्या हाताचा अंगुष्ठ व अनामिका यांनीं दर्भ मध्यें धरून, त्या दर्भाग्रांनीं बाहेर काढून ते दर्भ यज्ञाग्नींत टाकावे. व ते समयीं,

॥ ॐ देवस्त्वा सवितोत्पुनात्वच्छिद्रेण
पवित्रेण वसोः सूर्यस्य रश्मिभिः ॥

हा मंत्र एक वेळ ह्मणावा. याप्रमाणें घृत सिद्ध करून अग्नीवरून खालीं उतरून, कुंडाच्या उत्तर भागीं ठेवावें. पुढें स्थालिपाक ( तांदूळाचा भात ) ज्या संस्कारांत योजिला असेल त्या संस्कारांत सिद्ध करावा, त्याचा विधिः— ज्या मंत्रानें भाताची आहुती द्यावयाची त्या मंत्रांतील देवता (मुख्य ईश्वर वाचक शब्द ) उच्चारून ( 'अग्नि' ही देवता असली

‡ असा हा आचमन व जलस्पर्श विधि शांतपणें आसनावर बसून करावा. चालतांना, हांसत असतां, उभ्यानें, उदक पाहिल्यावांचून, अंगुलांनीं, आडव्या हस्तांजलीनें, तोंडानें फुरफुर असा ध्वनि करून, पायांत जोडे घालून, गळ्यास किंवा डोक्यास वस्त्रादि कांहीं गुंडाळून, पाय पसरून अशा रीतीनें करूं नये. हा साधारण नियम जाणावा.

तर ॥ ॐ अग्नये त्वा जुष्टं निर्वपामि ॥ अशा मंत्रानें) उखळांत प्रत्येक आहुती करितां ४।४ मुठी देवसाळीचें भात किंवा दुसरें धान्य योजिलें असेल तें घालावें. नंतर दुसऱ्या वेळीं मंत्रावांचून मौनपणें अशा प्रत्येक आहुती प्रीत्यर्थ ४।४ मुठी भात घालावें. पुढें पूर्वेस मुख करून मुसळानें त्या भाताचे ३।३ वेळ शुद्ध कांडून, व सुपानें ३।३ वेळां शुद्ध पाखडून, तांदूळ करावे व ते ३।३ वेळां शुद्धोदकानें प्रक्षालन करून चरुस्थालींत (भात चांगला होईल अशा तांब्याच्या भांड्यांत) घालून भात उत्तम करून, सभोंवती (सुर्वत्र वाटोळा) कालथ्यानें ढवळावा. व अशा पक्व फुललेल्या भातांत स्रुव-पळीनें घृत सिंचन करून, तो भात अग्नीवरून उतरून कुंडाच्या उत्तर प्रदेशीं घृतपात्रासन्निध ठेवावा; व त्या भातावर पुनः आणखीं घृत सिंचन करावें, व तो भात चांगला झांकून ठेवावा.

एणेंप्रमाणें स्थालिपाक, घृतादि नियोजित आहुती द्रव्यें सिद्ध झाल्यावर, समिधाधान करावें :--उपलब्ध समिधा काष्ठें (अग्नि चांगला प्रज्वलित होईल तेवढीं) घेऊन त्यांजवर स्रुवानें घृत सिंचन करून त्यांतून,

॥ **ॐ अयन्त इध्म आत्मा जातवेदस्तेनेध्यस्व वर्द्धस्व चेद्ध वर्द्धय चास्मान् प्रजया पशुभिर्ब्रह्मवर्चसेनान्नाद्येन समेधय स्वाहा**--इदमग्नये जातवेदसे, इद न्न मम ॥

या मंत्रानें एकेक, अशा समिधा, यज्ञाग्नि कुंडांत घालाव्या व त्या चांगला पेट घेई पर्यंत, कुशादि ताजे तृण पूर्वाग्र असे हस्तांत घेऊन कुंडा सभंवती दक्षिणेपासून शोभतील तेवढे एक वीत पर्यंत पसरावे. व एक हात लांब व अंगुठाहून किंचित् जाड शमी किंवा पळस् वृक्षाचीं सालीचीं ताजीं

काष्ठें थोडीं वहुत कुंडाच्या प्रत्येक बाजूस ठेवावीं, व नंतर उजवा गुडघा डाव्या पावलावरून जमिनीस लागे, अशा रीतीनें ( मोडी लिहिण्यास साधारण बसतात तद्वत् ) मांडी घालून बसावें व हस्तांजलींत उदक घेऊन कुंडाच्या दक्षिणेकडून पूर्वेकडे एक वीत पर्यंत सिंचन करावें व ते समयीं, ॥ **ओ३म् अदितेऽनुमन्यस्व** ॥ हा मंत्र ह्मणावा; व त्याचप्रमाणें ॥ **ओ३म् अनुमतेऽनुमन्यस्व** ॥ या मंत्रानें पश्चिमेस, आणि ॥ **ओ३म् सरस्वत्यनुमन्यस्व** ॥ या मंत्रानें कुंडाच्या उत्तरेस हस्तांजलीनें उदक सिंचन करावें, व ॥ **ओ३म् देव सवितः प्रसुव** ॥ या मंत्रानें कुंडासभोंवती त्रिवार सिंचन करावें, तदनंतर घृतादि आहुतीद्रव्यांवर॥ **ओ३म् विष्णोर्मनसा पूते स्थ**॥ हा मंत्र ह्मणून किंचित् उदक सिंपडावें, व आहुती देण्यास आरंभ करावा. प्रथम घृताहुती व नंतर स्थालीपाकाहुती द्याव्या. त्याचा प्रकार पुढें संस्कारांत वारंवार येणाऱ्या होमाहुती दाखविल्या आहेत, त्यांजवरून स्पष्ट होईल.

## ३ सामान्य होमाहुती.

विवाहादि संस्कारांत प्रधान ( मुख्य ) होम असतात; त्या मुख्य होमाच्या आहुती **पूर्वीं व शेवटीं** सूत्रोक्त मंत्रांनीं घृताहुती द्यावयाच्या त्या एणेंप्रमाणें :—

( १ ) **आघारावाज्यभागाहुती** :— यज्ञकुंडांत प्रथमतः उत्तरअंगास एक, व दक्षिणअंगास एक अशा दोन आहुती द्यावयाच्या, त्यांस आघारावाहुती ही संज्ञा होय. व मध्यांगास दोन द्यावयाच्या, त्यांस आज्यभागाहुती ही संज्ञा होय. पूर्वीं प्रदर्शीत केल्याप्रमाणें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्यावर, त्या पेटलेल्या समिधांवर सिद्ध घृतपात्रांतून स्रुवभर घृत घेऊन तो घृतपूर्ण स्रुव — अंगुष्ठ, मध्यमा व अनामिका या

त्र्यंगुलांच्या अग्रांनीं मध्य प्रदेशीं धरून त्यांतील घृताची,

॥ **ॐ अग्नये स्वाहा**—इदमग्नये, इद न्न मम ॥

हा मंत्र ह्मणून उत्तरांगीं आहुती द्यावी. व त्याचप्रमाणें,

॥ **ॐ सोमाय स्वाहा**—इदं सोमाय, इद न्न मम ॥

हा मंत्र ह्मणून दक्षिणांगीं प्रज्वलीत समिधा काष्ठांवर दुसरी आहुती द्यावी. पुढें,

॥ **ॐ प्रजापतये स्वाहा**—इदं प्रजापतये, इद न्न मम ॥

॥ **ॐ इंद्राय स्वाहा**—इदमिंद्राय, इद न्न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक घृताहुती मध्यप्रदेशीं प्रज्वलीत समिधांवर पूर्वोक्त रीत्या द्यावी.

( ३ ) **व्याहृति आहुती** :— या आहुती ४ आहेत. या—पूर्वोक्त आघारावाज्यभागाहुती नंतर द्याव्या, व प्रधान होमाच्या शेवटीं द्याव्या. सिद्ध घृतपात्रांतून पूर्वोक्त रीत्या स्रुवानें घृत घेऊन प्रज्वलीत समिधा काष्ठांवर,

॥ **ॐ भूरग्नये स्वाहा**—इदमग्नये, इद न्न मम ॥

॥ **ॐ भुवर्वायवे स्वाहा**—इदं वायवे, इद न्न मम ॥

॥ **ॐ स्वरादित्याय स्वाहा**—इदमादित्याय, इद न्न मम ॥

॥ **ॐ भू र्भुवः स्वः अग्नि वाय्वादित्येभ्यः स्वाहा**—
इदमग्नि वाय्वादित्येभ्यः, इद न्न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा चार आहुती द्याव्या.

( ४ ) **स्विष्टकृद्होमाहुती**:— ही आहुती एकच असून मुख्य होम जसा असेल, त्याप्रमाणें घृताची किंवा भाताची सरशेवटीं एकेक द्यावी. या आहुतीचा मंत्रः—

॥ **ॐ यदस्य कर्मणोऽत्यरीरिचं यद्वा न्यूनमिहाकरं।
अग्निष्टत्स्विष्टकृत् विद्यात् सर्वं स्विष्टं सुहुतं करोतु मे। अग्नये स्विष्टकृते सुहुतहुते सर्वप्राश्चित्ता-**

हुतीनां कामानां समर्द्धयित्रे सर्वान्नः कामान्त्समर्द्धय स्वाहा—इदमग्नये स्विष्टकृते, इद न्न मम ॥

**चतस्र आज्याहुतीः**— ह्या ४ घृताहुतीचा होम,—चौल, उपनयन, समावर्तन व विवाह या संस्कारांत प्रधान (मुख्य) होय. ह्या ४ आहुती वेदोक्त मंत्रांनीं द्यावयाच्या, ते वेदोक्त मंत्रः—

॥ ओं भूर्भुवःस्वः। अग्न आयूंषि पवस आ सुवोर्जमिषं च नः। आरे बाधस्व दुच्छुनां स्वाहा—इदमग्नये पवमानाय, इद न्न मम ॥ १ ॥

॥ ओं भूर्भुवःस्वः। अग्निर्ऋषिः पवमानः पाञ्चजन्यः पुरोहितः। तमीमहे महागयं स्वाहा—इदमग्नये पवमानाय, इद न्न मम ॥ २ ॥

॥ ओं भूर्भुवःस्वः। अग्ने पवस्व स्वपा अस्मे वर्चः सुवीर्यं। दधद्रयिं मयि पोषं स्वाहा—इदमग्नये पवमानाय, इद न्न मम ॥ ३ ॥

॥ ओं भूर्भुवःस्वः। प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परि ता बभूव। यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तु वयं स्याम पतयो रयीणां स्वाहा—इदं प्रजापतये, इद न्न मम ॥ ४ ॥

**प्राजापत्याहुतीः**— ही मनांतल्या मनांत ह्मणण्याची एकच आहुती आहे. ही होमानुसार घृताची किंवा स्थालिपाक—पक्क भाताची द्यावयाची. ही नित्य—सर्वत्र मंगल होमास लागत असून हिचा कोणकोणत्या वेळीं कसकसा उ-

पयोग करावयाचा, हें पुढें संस्कारांत जेथच्या तेथें स्पष्ट केलें आहे. हा आहुती मंत्रः—

॥ ॐ प्रजापतये स्वाहा— इदं प्रजापतये, इद न्न मम ॥

**अष्टाज्याहुती** :— ह्या आठ घृताहुती नित्य सर्वत्र होमास लागू असून त्या कोणकोणत्या समयीं व स्थानीं योजावयाच्या, याचें स्पष्टीकरण पुढें संस्कारांत त्या त्या होम प्रसंगीं केलेलें आहे. हे आहुती मंत्र :—

॥ ॐ त्वन्नोऽअग्ने वरुणस्य विद्वान् देवस्य हेडोऽअवयासि सीष्ठाः । यजिष्ठो वन्हितमः शोशुचानो विश्वाद्वेषा ᳪ सि प्रमु मुग्ध्यस्मत्स्वाहा—इदमग्नि वरुणाभ्यां, इद न्न मम ॥

॥ ॐ सत्वंनोऽअग्नेऽवमोभवोती नेदिष्ठोऽअस्या उषसो व्युष्टौ । अवयक्ष्वन्नो वरुण ᳪ रराणो वीहि मृडीक ᳪ सुहवो नएधि स्वाहा— इदमग्नि वरुणाभ्यां, इदं न्न मम ॥

॥ ॐ इमं मे वरुण शुधी हवमद्या च मृडय । त्वामवस्युराचके स्वाहा-- इदं वरुणाय, इद न्न मम ॥

॥ ॐ तत्वा यामि ब्रह्मणा वन्दमानस्तदाशास्ते यजमानो हविर्भिः । अहेडमानो वरुणेह बोध्युरुश ᳪ समा न आयुःप्रमोषीः स्वाहा—इदं वरुणाय, इद न्न मम ॥

॥ ॐ येते शतं वरुणं ये सहस्रं यज्ञियाः पाशा वितता महान्तः । तेभिर्नोऽअद्य सवितोत विष्णुर्विश्वे मुंचंतु मरुतः स्वर्काः स्वाहा— इदं वरुणाय, सवित्रे, विष्णवे, विश्वेभ्यो देवेभ्यो, मरुद्भयः, स्वर्केभ्यश्च इद न्न मम ॥

॥ ॐ अयाश्चाग्नेस्य नभि शस्तिपाश्च सत्य मित्त्व मयाऽसि । अयानो यज्ञं वहास्य यानो धेहि भेषज ᳪ स्वाहा— इदमग्नये अयसे, इद न्न मम ॥

॥ ओं उदुत्तमं वरुण पाशमस्म दवाधमं विमध्यमꣳ श्रथाय । अथा वयमादित्य व्रते तवानागसोऽदितये स्याम स्वाहा—इदं वरुणाय, आदित्याय, अदितये च; इद न्न मम ॥

॥ ओं भवत न्नः समनसौ सचेतसा वरेपसौ । मा यज्ञꣳ हिꣳसिष्टं मा यज्ञपतिं जातवेदसौ शिवौ भवतमद्य नः स्वाहा— इदं जातवेदाभ्यां, इद न्न मम ॥

## ४ मंत्र पठण.

विवाहादि संस्कारांत ईश्वरोपासने संबंधी व कार्य कर्त्यांच्या प्रतिज्ञे संबंधीं वगैरे असलेले वेदोक्त व सूत्रोक्त मंत्र वस्तुतः कार्य कर्त्यानेंच ह्मणावे. तथापि ते मंत्र यथोक्त रीत्या बिनचूक, व क्रमानें ह्मणण्यास त्याजकडून दुर्लक्ष, हयगय किंवा आळस घडून येऊं नये, एतदर्थ पुरोहितानेंहि कार्य कर्त्याबरोबर मंत्र ह्मणत असावे. आतां एकादा कार्य कर्ता—जड, मतिमंद, अक्षरशत्रु, शुद्ध अक्षर वटिका करण्यास असमर्थ,—असा असला तरं ईश्वरोपासनेचे व आहुतीचे सर्व मंत्र पुरोहितानें ह्मणावे. प्रतिज्ञेचे मंत्र मात्र ज्याच्या त्या कार्य कर्त्याकडून बोलवावे. उत्तम भोजन, उत्तम वस्त्रालंकार, रंग मंडप वगैरे शोभेच्या इतर साहित्याच्या तयारीकडे पूर्वींच, कार्य कर्ता जेवढें लक्ष पुरवितो, त्या पेक्षांहि त्याणें मंत्र पठणाच्या तयारीकडे विशेष लक्ष पुरवावें. व मंत्र पठण समयीं त्या मंत्रांचा अर्थहि लक्षांत आणावा.

## ५ वामदेव्य गान.

विवाहादि संस्कारांत होम हवनादि यथोक्त विधि संप-

त्यावर सामवेदोक्त गान मंत्रांनीं वामदेव्य गान ह्मणावें; ते वामदेव्य गान मंत्र :–

॥ ॐ भूर्भुवःस्वः । कयानश्चित्र आ भुवदूतीसदावृधः सखा । कयाशचिष्ठयावृता ॥१॥

॥ ॐ भूर्भुवःस्वः । कस्त्वासत्यो मदानाम्मꣳहिष्ठोमत्सदन्धसः । दृढाचिदारुजे वसु ॥२॥

॥ ॐ भूर्भुवःस्वः । अभीषुणः सखीनाम-विता जरि तृणाम् । शतम्भवास्यूतये ॥३॥

॥ महावामदेव्यं ॥ काऽ५या । नश्चा३ इत्रा३ आभुवात् । ऊ । तीसदा वृधःस । खा । औ ३होहाइ । कया२३ शचौइ । ष्ठयौहो३ । हुम्मा२ । वा२ तौ३ऽ५हाइ ॥(१)॥

॥ काऽ५स्त्वा । सत्यो३ मा३ दानाम् । मा । हिष्ठो मात्सादन्ध । सा । औ३होहाइ । दृढा २३ चिदा । रुजौहो३ । हुम्मा२ । वाऽ३सो ३ऽ५हायि ॥(२)॥

। आऽ५भी । षुणा३ : सा३ खीनाम् । आ । वि-ताजरायितॄ । णाम् । औ२३होहायि । शं-ता२३ म्भवा । सियौहो ३ । हुम्मा२ । ताऽ २यो३ऽ५हायि ॥(३)॥

हें वामदेव्य गान गाईल्यावर कार्य कर्त्यानें सद्धर्मी, लोकप्रीय, परोपकारी व ब्रह्मचारी, सन्यासादि केवळ विद्यार्थी व लोक कल्याणार्थ झटणारे अशा पुरुषांस व स्त्रियांस यथाशक्त्या आदरसत्कार व सन्मान पूर्वक भोजन द्यावें.

## ६ स्थान व काल मान.

चौल, उपनयन, वेदारंभ, समावर्तन, विवाह व सीमन्तोन्नयन या संस्कारांची योजना बहुशः घरा बाहेर मंडप स्थानींच करावी. तिचा मुख्य काल उत्तरायणांतील शुक्लपक्ष जाणावा. ह्मणजे मकर संक्रांती पासून पुढें कर्क संक्रांती पर्यंत ६ महिने उत्तरायण काल; ज्या मध्यें सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस असतो; या ६ महिन्यांपैकीं कोणत्याहि एका महिन्यांतील प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंतच्या कोणत्याहि शुभ नक्षत्रयुक्त दिवशीं हे संस्कार करावे.* उत्तरा, हस्त, चित्रा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, उत्तरा भाद्रपदा, रेवती, अश्विनी, स्वाती, मृगशीर्ष आणि रोहिणी हीं शुभ नक्षत्रें जाणावीं. जातकर्म संस्कार जो प्रसूत वेळावर अवलंबून आहे तो खेरीज करून बाकी विवाहादि सर्व शुभ संस्कारांचा आरंभ नियुक्त दिवशीं प्रातःकाळीं दिवस पालटण्याचे पूर्वीं अर्थात दोनप्रहर दिवस येण्याचे पूर्वीं करावा.

ह्या सर्व सामान्य संस्कार विधींचा उल्लेख पुढें संस्कारांत जेथच्या तेथें पृष्ठ देऊन न्यूनाधिक स्पष्ट केलाच आहे.

---

* सीमन्तोन्नयनाचा विशेष काळ गर्भ मासापासून ४ था, ६ वा किंवा ८ वा महिना असून तो उत्तरायणास न मिळाला तर मात्र तो संस्कार दक्षिणायनांत ( कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांतीपर्यंत ६ महिन्यांत ) उक्त दिवशीं करावा.

# वेदोक्त संस्कार प्रकाश.

## विवाह संस्कार विधि.

**विवाह:**— ऐहिक व पारलौकिक सुख प्राप्त्यर्थ स्त्री पुरुषांनीं एकत्र व एक विचारानें राहण्याचा यथाविधि केलेला ठराव, तो विवाह जाणावा.

**विवाह काल:**—मागील २२ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें उत्तरायणांत, शुक्लपक्षीं, शुभ नक्षत्रयुक्त दिवशीं विवाह संस्कार करावा. त्याचा आरंभ प्रात:काळीं दिवस परतण्याच्या पूर्वी अर्थात् मध्यान्हकाला पूर्वी, ह्मणजे १५ घटिका दिवस येण्याचे पूर्वी, केलेला असावा. वरानें वधू गृहीं जाऊन मधुपर्क ग्रहण करणें, हा विवाह आरंभ जाणावा.

**वधूवरांचें वय. कूळ, वास्तव्यस्थान, लक्षण, शरीर व प्रकृतीमान:**— उभय वधूवरें सज्ञान असलीं पाहिजेत; त्यांत वराच्या वयाचें मान वधूच्या वयाच्या दिडी पासून दुप्पटी पर्यंत असावें. वधूवरांचीं परस्पर कुळें जेवढीं दूर संबंधाचीं असतील तेवढीं विशेष चांगलीं. पितृ गोत्रांतील किंवा मातापित्याच्या ६ पिढ्यां पर्यंत परस्पर संबंध अर्थात् नातें असलेलीं—अशीं वधूवरें नसावीं. शिवाय वधूवरें जेवढ्या जेवढ्या दूर देशांतील असतील, तेवढीं तेवढीं विशेष चांगलीं जाणावीं. आतां वधूवरांचीं लक्षणें; हीं समानच असलीं पाहिजेत. ह्मणजे विद्वान् वधू विद्वान् वरानें वरावी—अर्थात् समान गुण, समान शील ( स्वभाव ), समान

बुद्धि, समान आचार, अशा समान लक्षणांचीं ( वर्णांचीं ) वधूवरें असावीं. अहिंसक, सत्य व मधुर वाची, नम्र, कृतज्ञ, परोपकारी, दयाळू, निरहंकारी, निर्मत्सरी, उत्तम बुद्धिमान, स्वदेश सुधारणार्थ विद्या शिकविण्यास व सदुपदेश करण्यास समर्थ व उत्सुक; शिवाय काम, क्रोध, लोभ, मोह, मद, शोक, द्वेष, कपट, प्रतिस्पर्धादि दुर्गुण रहीत अशा जितेंद्रिय स्त्रीपुरुषांचा वर्ण ब्राह्मण जाणावा. पूर्वोक्त अहिंसादि सद्गुण ज्यांमध्ये आहेत, परंतु विद्या शिकविण्यास व सदुपदेश करण्यास सामर्थ्य व उत्सुकता नाहीं, व विद्या थोडी कमी असून शूरत्व, बळ, पराक्रम हीं विशेष असतात, आणि ज्यांची देश संरक्षणाकडे विशेष भक्ति अशीं स्त्रीपुरुषें क्षत्रिय वर्णाचीं जाणावीं. पूर्वोक्त अहिंसादि सद्गुणांनीं युक्त असून, ज्यांस विद्या साधारण येते, परंतु व्यापारादि व्यवहारांत व द्वीप द्वीपांतरीं फिरून माल नेऊन व आणून त्यांचा क्रय विक्रय करण्यांत जीं प्रवीण, चतुर, दक्ष, हुशार, सहनशील, धैर्यवान, प्रकृतीनें शांत अशा स्त्रीपुरुषांचा वर्ण वैश्य जाणावा. व पूर्वोक्त अहिंसादि सद्गुण कांहींएक आहेत, पण विद्या शिकण्यास जड, मतिमंद, असून शिकविलें असतां पुष्कळ प्रयत्नांनींहि कोणतीच विद्या येत नाहीं, तथापि सेवा चाकरी करण्यांत मेहनती, उत्सुक, संतोषी व विश्वासु—अशीं स्त्रीपुरुषें शूद्र वर्णाचीं जाणावीं.* याप्रमाणें वर्ण व्यवस्था पाहून

---

* या चतुर्वर्णाच्या व्यवस्थेस पात्र नसणारीं — दुर्गुणी, दूषित, दुष्ट, अशीं स्त्रीपुरुषें अतिशूद्र; व धर्म भ्रष्ट, व धर्म नाशक अशीं हिंसक स्त्रीपुरुषें असुर, म्लेंच्छ जाणावीं.

ब्राह्मणाचा ब्राह्मणीसह, क्षत्रियाचा क्षत्रियेसह, वैश्याचा वैश्येसह, व शूद्राचा शूद्रीसह अशा समान गुण कर्मांच्या वधूवरांचा परस्पर विवाह असला पाहिजे. पण अशा समान गुण कर्मांच्या योजनेंत १० कुळें धन धान्यादिकांनीं समृद्ध असलीं तथापि वर्ज्य करावीं, तीं हीं :- एक हीनक्रिया- ह्मणजे ज्या कुळांत उत्तम पुरुष नसतात; दुसरें निष्पुरुष- ह्मणजे ज्या कुळांत पुरुषार्थी पुरुष नसतात; तिसरें- ज्या कुळांत वेद विद्या नसते; चवथें- ज्या कुळांत सर्वांच्या शरीरावर मोठमोठाले केश असतात; पांचवें- ज्या कुळांत मूळव्याधी रोग असतो; साहावें- ज्या कुळांत क्षय किंवा दमा रोग असतो; सातवें- ज्या कुळांत आमवाताचे आमांशादि रोग असतात; आठवें- ज्या कुळांत अपस्मार रोग असतो; नववें- ज्या कुळांत श्वेतकुष्ठ ( पांढरें कोड ) असतें; आणि दाहावें- ज्या कुळांत गलित कुष्ठ -रक्तपिती असते;- असे दाहा दोष ज्या कुळांत असतात तीं कुळें त्याग करावीं - अर्थात् ज्यांचीं माता पितरें अशा एखाद्या रोगानें युक्त असतात, त्यांचा त्याग करावा. आणि त्याच प्रमाणें श्वेतवर्ण ( कोडा प्रमाणें सफेत ज्याची त्वचा ) श्वेतकेश (ज्याचे केश सुद्धां सफेत) अशा वर कन्येला, व तद्वत् अधिकांगी ह्मणजे जिचें शरीर वराच्या शरीराहून अधीक उंच, स्थूल, रोगग्रस्त, आणि अत्यंत केश असणारी किंवा मुळींच केश नसणारी, आणि त्याच प्रमाणें अत्यंत वाचाळ व पिंवळे डोळे असणारी कन्या असली ती सुद्धां वर्ज्य करावी. स्त्रीचें शरीर पुरुषाच्या स्कंधा पर्यंत उंच असावें. व दोहोंचें शरीर स्थूल अथवा दोहोंचें शरीर पातळ अर्थात् स्त्रीचा स्थूलपणा पुरुषाच्या स्थूलपणाहून किंचित् कमी

असा प्रकार असावा. या प्रमाणें समान लक्षण * युक्त योग्यता पाहून वधूवरांनीं विवाह यथोक्त कालीं करावा.

वर दर्शविल्याप्रमाणें यथोक्त विवाहाच्या दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्यापूर्वीं उभय वधूवरांच्या गृहासन्निध पूर्व (पुढील) भागीं मंडप उभारून त्यांत (किंवा घरांत) पृष्ठ ८।९ यांत दर्शविल्याप्रमाणें एकेक यज्ञ कुंड बांधावें आणि त्याच्या बाजूस वधूवरांला बसण्यासाठीं किंचित् उंच, असें एक शुभासन सिद्ध करावें व ९।१० व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें इंधनद्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त विवाहाचे दिवशीं प्रातःकालीं वधूला सौभाग्य, बंधुवर्ग स्त्रियांनीं यव

---

* वधूच्या अभ्यंतर लक्षणाची परीक्षा करण्याचा एक विधि उक्त आहे तो असा :– दोन् वेळां धान्य पिकणारें शेत, गुरांचा गोठा, यज्ञ कुंड, उदक पूर्ण डोह (कधींहि न आटणारा उदक संचय), द्यूत स्थान (जुगाराची जागा), नापीक भूमि (जेथें बीं पेरलें असतां उगवत नाहीं), चतुष्पथ (चवाठा– अर्थात् चार रस्ते एकत्र मिळतात अशी भूमि), व स्मशान या आठ ठिकाणांतील आठ प्रकारची मृत्तिका आणून तिचे भिन्न भिन्न ८ पिंड– समान आकृतीचे व मानाचे करावे, व ते पिंड हस्तांतून आणून वधू समीप स्थापन करावे व ते समयीं, ॥ ॐ ऋतमग्रे प्रथमं जज्ञ ऋते सत्यं प्रतिष्ठितं । यदियं कुमार्यभिजाता तदियमिह प्रतिपद्यतां यत् सत्यं तद् दृश्यताम् ॥ हा मंत्र ह्मणावा व पुढें [ वधूचें नाम, (यशोदा नाम असलें तर यशोदे असें) संबोधनान्त उच्चारून] ॥ ॐ य-

व उडीद यांचा कल्क (पिठी) अंगास लावून सचैल स्नान करवावें व ते समयीं त्यांणीं,

॥ ॐ काम वेद ते नाम मदो नामासि समानया मू ऽ सुरा ते अभवत् । परमत्र जन्माग्ने तपसो निर्मितोसि स्वाहा ॥ १ ॥

॥ ॐ इमन्त उपस्थं मधुना स ऽ सृजामि प्रजापतेर्मुखमेतद्द्वितीयं । तेन पु ऽ सोभि भवासि सर्वानव शान्वशिन्यसि राज्ञी स्वाहा ॥ २ ॥

---

इगेदे ! एषामेकं गृहाण ॥ असें वधूस बोलावें. व वधूनें नंतर त्या पिंडांपैकीं एक पिंड उचलावा. पहिल्या ४ जातीच्या पिंडांपैकीं ह्मणजे शेत, गोठा, यज्ञ कुंड, किंवा उदक पूर्ण डोह यांतील मृत्तिकेच्या पिंडांपैकीं एखादा पिंड तिणें घेतला, तर ती वधू वरावी. व अन्य जातीय मृत्पिंड घेतला असला, तर ती वधू वर्ज करावी. या प्रत्येक मृत्पिंड गृहणाचें भिन्न भिन्न फल दर्शविलें आहे तें असें:— शेतांतील मृत्पिंड घेतला तर वधूला संतती होईल, व ती संतती धनधान्य संपन्न असेल. गोठ्यांतील मृत्पिंड घेतला, तर ती वधू गुरांढोरांची धनीन होईल. यज्ञ कुंडांतील मृत्पिंड घेतला तर तिला ब्रह्मतेज प्राप्त होईल. डोहांतील मृत्पिंड घेतला तर ती सर्व संपत्तिमान होईल. द्यूत स्थानांतील मृत्पिंड घेतला तर ती व्यभिचारी होईल. चतुष्पथांतील मृत्पिंड घेतला तर ती स्वच्छंदी व दुर्व्यसनी निपजेल. नापीक भूमींतील मृत्पिंड घेतला तर ती अपुत्रिका, दुर्भाग्या अशी होईल. आणि स्मशानांतील मृत्पिंड घेतला तर ती पतिघ्नी ह्मणजे नवऱ्यास मारणारी (विधवा) होईल.

॥ ॐ अग्निं क्रव्याद मकृण्वन्गुहानाः स्त्रीणामुपस्थ मृषयः पुराणाः । तेनाज्य मकृण्व २ त्रैशृंगं त्वाष्ट्रं त्वयि तद्दधातु स्वाहा ॥ ३ ॥

या तीन मंत्रांचा पाठ ह्मणावा. स्नानोत्तर वधूनें उत्तम वस्त्रालंकार परिधान करून पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख वसावें. व पुढें कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठापर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करावी. वधू कार्यकर्त्यानें व पुरोहितानेंहि सन्निध वसून वधूसह २० व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें ईश्वरोपासना चालवावी. व ते समयीं या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष लावावें.

ईश्वरोपासना झाल्यावर, पुढें वधू पक्षी लोकांनीं देशाचाराप्रमाणें वरास वधू गृहीं सन्मान पूर्वक आणण्यास निघावें.

इकडे वरानें स्व गृहीं प्रातःकाळीं स्नान करून उत्तम वस्त्रें परिधान करून वधूप्रमाणेंच शुभासनावर पूर्वाभिमुख वसून प्रारंभीं (१–८ पृष्ठापर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करावी. पुढें, ईश्वरोपासना आटोपल्यावर–वधू गृहीं जाण्याची सिद्धता करावी. व वर सांगितल्याप्रमाणें वधू पक्षी लोकांनीं वराला देशाचाराप्रमाणें मोठ्या सन्मानानें वधू गृहीं आणावा. वरानें वधू गृहीं प्रवेश करितांच त्याचा वधू कार्य कर्त्यानें मधुपर्क रीत्या आदरसत्कार करावा. तो असा :–वरानें आंत प्रवेश करितांच पूर्वाभिमुख * उभें रहावें, व वधू कार्य

---

* मंडप द्वार पूर्वेस असलें तर वरानें उत्तराभिमुख, व वधू कार्य कर्त्यानें पूर्वाभिमुख उभें राहावें.

कर्त्यानें वराच्या सन्निध उत्तराभिमुख उभें राहून वरास,

॥ ॐ साधु भवानास्तामर्चयिष्यामो भवन्तम् ॥

अशी विनंती करावी. नंतर वरानें ॥ ॐ अर्चय ॥ असें बोलावें. पुढें वधू कार्य कर्त्यानें, वरास पूर्व स्थापित शुभासनाजवळ नेऊन,

॥ ॐ विष्टरो विष्टरो विष्टरः प्रति गृह्यताम् ॥

अशी विनंति करावी. पुढें वरानें ॥ ॐ प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून शुभासनावर बसावें आणि,

॥ ॐ वर्ष्मोस्मि समानानामुद्यतामिवसूर्यः ।
इमं तमभितिष्ठामि यो मा कश्चाभिदासति ॥

हा मंत्र बोलावा. पुढें कार्य कर्त्यानें उदक पूर्ण पात्र (उदकानें भरलेला तांब्या) आणून वरासमोर ठेवून,

॥ ॐ पाद्यं पाद्यं पाद्यं प्रतिगृह्यताम् ॥

अशी विनंति करावी. नंतर वरानें ॥ ॐ प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून तें उदक घ्यावें, व उठून पाद प्रक्षालन करावे * व ते समयीं,

॥ ॐ विराजो दोहोसि विराजो दोहमशीय
मयि पाद्यायै विराजो दोहः ॥

हा मंत्र ह्मणावा. पुढें कार्य कर्त्यानें, आणखीं तांब्या-भर शुद्धोदक हस्तांत घेऊन,

॥ ॐ अर्घोऽर्घोऽर्घः प्रतिगृह्यताम् ॥

असें ह्मणून वरास द्यावें. तें वरानें ॥ ॐ प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून घ्यावें व मुख प्रक्षालन करावें व ते समयीं,

---

* ब्राह्मण वर्णानें प्रथम उजवा पाय, व अन्य वर्णानें प्रथम डावा पाय, याप्रमाणें पाय धुवावे.

॥ ओं आपस्थ युष्माभिः सर्वान्कामानवाप्नवानि ॥
॥ ओं समुद्रं वः प्रहिणोमि स्वां योनिमभिगच्छत ।
अरिष्टास्माकं वीरा मा परा सेचिमत्पयः ॥

हे मंत्र ह्मणावे. व शुभासनावर बसावें. पुढें कार्य कर्त्यानें उदकपूर्ण आचमनीय पात्र (उदक पूर्ण प्याला) आणून,

॥ ओं आचमनीयमाचमनीयमाचमनीयं प्रतिगृह्यताम् ॥

असें ह्मणून वरास द्यावें. वरानें तें पात्र ॥ ओं प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून घ्यावें व त्यांतील उदक दक्षिण हस्तांजलींत (अंगुलांच्या मूलापर्यंत येईल तेवढें) घेऊन,

॥ ओं आमागन्य शसासं ꣳ सृज वर्चसा। तम्मा कुरु प्रियं प्रजानामधिपतिं पशूनामरिष्टिं तनूनाम् ॥

हा मंत्र एकेक वेळ ह्मणून एकेक आचमन, अशीं तीन आचमने करावीं. पुढें कार्य कर्त्यानें मधुपर्क * पात्र वरासमोर ठेऊन,

॥ ओं मधुपर्को मधुपर्को मधुपर्कः प्रतिगृह्यताम् ॥

अशी वरास विनंति करावी. नंतर वरानें ॥ ओं प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून त्या मधुपर्काकडे अवलोकन करावें, व तें समयीं,

॥ ओं मित्रस्य त्वा चक्षुषा प्रतीक्षे ॥

हा मंत्र ह्मणावा. तदनंतर तें मधुपर्क पात्र वरानें,

॥ ओं देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनो र्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां प्रतिगृह्णामि ॥

---

* तूप, दहीं व मध यांच्या मिश्रणास मधुपर्क ही संज्ञा आहे. तूप ४ तोळे, दहीं १२ तोळे, व मध ४ तोळे घेऊन, हा मधुपर्क कांस्याच्या पात्रांत तयार करावा.

हा मंत्र ह्मणून डाव्या हस्तांत घ्यावें व त्या मधुपर्काकडे,

॥ ॐ भूर्भुवःस्वः। मधुवाता ऋतायते मधुं क्षरंति सिंधवः। माध्वीर्नः सन्त्वोषधीः ॥१॥

॥ ॐ भूर्भुवःस्वः। मधुनक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः। मधु द्यौरस्तु नः पिता ॥२॥

॥ ॐ भूर्भुवःस्वः। मधुमान्नो वनस्पतिर्मधुमाँ अस्तु सूर्यः। माध्वीर्गावो भवंतु नः ॥३॥

या तीन मंत्रांनीं अवलोकन करून दक्षिण हस्ताची अनामिका व अंगुष्ठ यांनीं तो मधुपर्क तीन वेळ वाटोळा ढवळावा, आणि त्यांतून,

ॐ वसवस्त्वा गायत्रेण छंदसा भक्षयंतु—यानें पूर्वेस,

ॐ रुद्रास्त्वा त्रैष्टुभेन छंदसा भक्षयंतु—यानें दक्षिणेस,

ॐ आदित्यास्त्वा जागतेनछंदसाभक्षयंतु—यानें पश्चिमेस,

ॐ विश्वेत्वादेवा आनुष्टुभेनछंदसाभक्षयंतु—यानें उत्तरेस,

याप्रमाणें पूर्वोक्त अंगुलाग्रांनीं थोडथोडा टांकावा, व शेवटीं ॥ ॐ भूतेभ्य स्त्वा ॥ हा मंत्र ह्मणून मध्य भागांतून तीन वेळ घेऊन तीन वेळां ऊर्ध्व प्रदेशीं टांकावा.

पुढें तो मधुपर्क तीन भाग करून तीन पात्रांत घालून भूमीवर ठेवावा. आणि,

॥ ॐ यन्मधुनो मधव्यं परमꣳ रूपमन्नाद्यम्। तेनाहं मधुनो मधव्येन परमेण रूपेणान्नाद्येन परमो मधव्योन्ना दोसानि ॥

हा मंत्र एकेक वेळ ह्मणून त्यांतून एकेक भागांतील थोडथोडा मधुपर्क प्राशन करावा—अधीक करूं नये.

उच्छिष्ट (बाकी राहिलेला) मधुपर्क उत्तरेस तोंड करून बसलेल्या ब्राह्मणाला द्यावा, अथवा विहीर किंवा तलावादि उदक संचयांत टाकावा. तदनंतर पृष्ठ १३, यांत दर्शविल्या प्रमाणें,

॥ ॐ अमृतापिधानमसि स्वाहा ॥

॥ ॐ सत्यं यशः श्रीर्मयि श्रीः श्रयतां स्वाहा ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशीं दोन आचमनें शुद्धोदकाचीं करावीं. नंतर १३ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें चक्षुरादि इंद्रियांस जलस्पर्श करावा. पुढें कार्य कर्त्यानें,

॥ ॐ गौ गौं गौः प्रतिगृह्यताम् ॥

अशी विनंति करून आपली स्थिति, योग्यता, व अनुकूलता यांस अनुसरून स्वशक्त्यनुसार वराला भूमि, गाय किंवा द्रव्य अर्पण करावें; तें वरानें ॥ ॐ प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणून ग्रहण करावें.

एणेंप्रमाणें मधुपर्क विधि झाल्यावर; वधू कार्य कर्त्यानें वराला मंडप स्थानांतून[१] घरांत नेऊन शुभासनावर पूर्वाभिमुख बसवावा व त्याच्या सन्मुख वधूला पश्चिमाभिमुख बसवावी व आपण त्यांच्या सान्निध उत्तराभिमुख बसून,

॥ ॐ (अमुक[२]) गोत्रोत्पन्नां इमां (अमुक नाम्नीं[२]). अलंकृतां कन्यां प्रतिगृह्णातु भवान् ॥

---

१ मंडपस्थान नसल्यामुळें मधुपर्क विधि घरांत केला, तर मधुपर्क विधी नंतर, कार्य कर्त्यानें वरास घरांतच अन्य स्थानीं न्यावा. २ (अमुक) या ठिकाणीं वधू, ज्या गोत्रांत अर्थात् कुळांत जन्मली, त्या गोत्राचें किंवा कुळाचें नांव उच्चारावें. व (अमुक नाम्नीं) या स्थानीं वधूचें नांव द्वितीयान्त ह्मणावें.

असें ह्मणून वराच्या उजव्या उताण्या हस्तांत वधूनें आपला उजवा हस्त उताणा द्यावा. नंतर वरानें ॥ ॐ प्रतिगृह्णामि ॥ असें ह्मणावें. पुढें वरानें वधूला उत्तम वस्त्रें द्यावीं:—

॥ ॐ जराङ्गच्छ परिधत्स्व वासो भवा कृष्टीनामभि शस्तिपावा । शतं च जीव शरदः सुवर्चा रयिं च पुत्राननु संव्ययस्वायुष्मतीदं परिधत्स्व वासः ॥

हा मंत्र ह्मणून वरानें वधूला परिधानार्थ वस्त्र द्यावें आणि,

॥ ॐ या अकृंतन्नवयन् या अतन्वत याश्च देवीस्तन्तूनभितो ततन्थ । ता स्त्वा देवीर्जरसा संव्ययन्त्वायुष्मतीदं परिधत्स्व वासः ॥

या मंत्रानें उपवस्त्र ( पांघुरण्याचें वस्त्र ) द्यावें. पुढें हीं दिलेलीं वस्त्रें वधूनें घेऊन अन्य स्थानीं जाऊन धारण करावीं. त्यांत उपवस्त्र यज्ञोपवीतवत् धारण करावें.

या प्रमाणें वधू,—वस्त्रें धारण करून सिद्ध होई पर्यंत कार्य कर्त्यानें किंवा अन्य कोणीं यज्ञ कुंडासन्निध जाऊन ११।१२ व्या पृष्ठावर सांगितल्याप्रमाणें इंधनद्रव्यानें कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, आज्यस्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि साहित्य यज्ञ कुंडाजवळ तयार ठेवावें. शिवाय वर पक्षी एका पुरुषानें शुद्ध वस्त्रें धारण करून यज्ञ कुंडास प्रदक्षिणा करून, कुंडाच्या दक्षिण भागीं स्व कार्य समाप्ति पर्यंत उत्तराभिमुख असावें. व तद्वत्च वर पक्षी अन्य पुरुषानें हस्तांत दंड घेऊन कुंडाच्या दक्षिण प्रदेशीं कार्य समाप्ति पर्यंत उत्तराभिमुख रहावें. व वधूच्या बंधूनें किंवा बंधूच्या अभावीं बंधुस्थानीं बंधुसारख्या नातलगानें (चुलत भाऊ, माऊस भाऊ, किं-

वा मामे भाऊ यानें ) भाताच्या किंवा जोंधळ्याच्या लाह्या व शमी वृक्षाचीं सुकीं पानें हीं एकत्र करून, त्या शमी पत्र-युक्त लाह्या, ४ अंजली एका सुपांत घालून, तें लाह्याचें सूप सन्निध ठेवून यज्ञ कुंडाच्या पश्चिम भागीं रहावें. व कार्य क-र्त्यानें कुंडाच्या पश्चिम बाजूस–ईशान्येकडे एक पाथरवं-टा ठेवून, कुंडा सन्निध पश्चिम बाजूस वधूवरांला बसण्या-साठीं कुश किंवा दर्भादि यज्ञीय तृणासन, अथवा यज्ञीय वृक्षाचें पीठासन हीं स्थापन करावीं.

पुढें–पूर्वीं सांगितल्याप्रमाणें वरानें दिलेलीं वस्त्रें वधूनें यथोक्त रीतीनें धारण केल्यावर, कार्य कर्त्यानें तिला वराच्या सन्मुख आणावी, व ते क्षणीं वरानें,

**॥ ॐ समंजन्तु विश्वेदेवाः समापो हृदयानि नौ । स-**
**म्मातरिश्वा सन्धाता समुदेष्ट्री दधातु नौ ॥**

हा मंत्र ह्मणावा. व दक्षिण हस्तानें वधूचा दक्षिण हस्त * ग्रहण करून,

**॥ ॐ यदैषि मनसा दूरं दिशोनुपवमानो वा । हिरण्य**
**पर्णो वैकर्णः सत्वा मन्मनसां करोतु † असौ ॥**

हा मंत्र बोलावा. व तिला बरोबर घेऊन घराबाहेर मंडप स्थानीं–यज्ञ कुंडासन्निध यावें; व तेथें उभय वधूव-रांनीं परस्पर अवलोकन करावें. व ते समयीं वरानें,

---

* वरानें आपला हस्त उताणा किंवा पालथा धरून उताण्या किंवा पालथ्या हस्तानें वधूचा हस्त पालथाच ग्रहण करावा. हा नियम सर्वत्र जाणावा.

† "असौ" या स्थानीं वधूचें नाम प्रथमान्त ग्रहण करावें.

॥ ओं भूर्भुवःस्वः। अघोर चक्षुरपतिघ्न्येधि शिवा पशुभ्यः सुमनाः सुवर्चाः। वीरसूर्देव कामा स्योना शंनो भवद्विपदे शं चतुष्पदे ॥१॥

॥ ओं भूर्भुवस्स्वः। सोमः प्रथमो विविदे गन्धर्वो विविद उत्तरः। तृतीयो अग्निष्टे पतिस्तुरीयस्ते मनुष्यजाः ॥२॥

॥ ओं भूर्भुवःस्वः। सोमो ददद्गन्धर्वाय गन्धर्वो दददग्नये । रयिं च पुत्रांश्चादादग्निर्मह्यमथो इमाम् ॥३॥

॥ ओं भूर्भुवःस्वः। सानःपूषा शिवतमा मेरय सानऊरू उशती विहर। यस्यामुशन्तः प्रहराम शेपं यस्यामुकामा बहवो निविष्ट्यै ॥४॥

हे ४ मंत्र ह्मणावे व पुढें उभयतांनीं यज्ञ कुंडास प्रदक्षिणा करून कुंडाच्या पश्चिम भागीं जाऊन तेथें कुंडासन्निध पूर्वी स्थापित आसनावर पूर्वेस तोंड करून ( वराच्या दक्षिणभागीं वधू याप्रमाणें ) उभें रहावें व वरानें,

॥ ओं प्र मे पति या नः पन्थाः कल्पताꣳ शिवा अरिष्टा पतिलोकं गमेयम् ॥

हा मंत्र वधू कडून बोलवावा. पुढें पृष्ठ १२, यांत दर्शविल्याप्रमाणें यज्ञ कुंडासन्निध दक्षिण बाजूस पीठासनावर पुरोहिताची स्थापना करून, कुंडासन्निध पश्चिम भागीं वधूवरांनीं ( वराच्या दक्षिण बाजूस वधू या प्रमाणें )

पूर्वाभिमुख बसावें. व पृष्ठ १३, यांत सांगितल्याप्रमाणें "**ॐ अमृतोपस्तरणमसि स्वाहा**" इत्यादि तीन मंत्रांनीं, प्रत्येक मंत्रानें एकेक अशीं तीन आचमनें करावीं. नंतर वरानें यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून १४ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें घृत सिद्ध करावें, व पृष्ठ १५ व. १६ यांत दर्शविल्याप्रमाणें "**ॐ अयन्त इध्म०**" या मंत्रानें समिधा काष्ठांनीं समिधाधान करावें आणि "**ॐ अदितेऽनुमन्यस्व**" इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडासन्निध, व ॥ **ॐ देव सवितः प्रसुव यज्ञं प्रसुव यज्ञपतिं भगाय। दिव्यो गन्धर्वः केतपूः केतन्नः पुनातु वाचस्पति र्वाचन्नः स्वदतु** ॥ या मंत्रानें सभोंवती दक्षिण हस्तांजलीनें उदक सिंचन करावें व आज्याहुती देण्यास आरंभ करावा.

यज्ञाग्नींत दिलेल्या समिधा पेटल्यानंतर त्यांजवर,

| | |
|---|---|
| **ॐ अग्नये स्वाहा०**<br>**ॐ सोमाय स्वाहा०**<br>**ॐ प्रजापतये स्वाहा०**<br>**ॐ इंद्राय स्वाहा०** | हे ४ आघारावाज्य भागाहुती मंत्र १७ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिले आहेत, त्याप्रमाणें प्रत्येक पूर्ण मंत्रानें एकेक अ- |

शा ४ आज्याहुती द्याव्या व नंतर,

| | |
|---|---|
| **ॐ भूरग्नये०**<br>**ॐ भुववार्यवे०**<br>**ॐ स्वरादित्याय०**<br>**ॐ भूर्भुवः स्वः०** | हे ४ व्याहृति मंत्र, १७ व्या पृष्ठावर पूर्ण दिले आहेत; त्याप्रमाणें प्रत्येक पूर्ण मंत्रानें एकेक अशा ४ आज्याहुती द्याव्या. त्याच प्रमाणें, |

| | | |
|---|---|---|
| **ॐ त्वन्नोऽअग्ने०**<br>**ॐ सत्वन्नोऽअग्ने०**<br>**ॐ इमंमेवरुणश्रुधी०**<br>**ॐ तत्वायामि०** | **ॐ येतेशतं०**<br>**ॐ अयाश्चाग्ने०**<br>**ॐ उदुत्तमं०**<br>**ॐ भवतन्नः०** | हे ८ अष्टाज्याहुती मंत्र, १९।२० व्या पृष्ठावर पूर्ण |

दिले आहेत; त्याप्रमाणें प्रत्येक पूर्ण मंत्रानें एकेक अशा ८ आज्याहुती द्याव्या.

तदनंतर प्रधान* होमाहुतीस आरंभ करावा; ते होमाहुती मंत्रः—

| | |
|---|---|
| ओं भूर्भुवः स्वः। अग्नआयूंषि० <br> ओं भूर्भुवः स्वः। अग्निर्ऋषि० <br> ओं भूर्भुवः स्वः। अग्ने पवस्व० <br> ओं भूर्भुवः स्वः। प्रजापते न त्व० | हे ४ चतस्र आज्याहुती मंत्र, १८ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिले आहेत; |

त्यांतील आद्य तीन पूर्ण मंत्रांच्या तीन आज्याहुती प्रथम द्याव्या. व चवथ्या मंत्राची चवथी राहिलेली एक आज्याहुती, खालील मंत्राची एक आज्याहुती मध्यें देऊन नंतर द्यावी. तो मंत्रः—

॥ ओं भूर्भुवः स्वः। त्वमर्यमा भवसि यत्कनीनां नाम स्वधावन्गुह्यं बिभर्षि। अंजंति मित्रं सुधितं न गोभिर्यद्दंपती समनसा कृणोषि स्वाहा—इदमग्नये, इदन्न मम॥

याप्रमाणें या ऋग्वेदोक्त पांच मंत्रांच्या ५ आज्याहुती द्याव्या. व नंतर बारा यजुर्वेदोक्त मंत्रांच्या १२ आज्याहुती द्यावयाच्या ते आहुती मंत्रः—

॥ ऋताषाडृतधामाग्निर्गन्धर्वः। स न इदं ब्रह्म

---

* या प्रधान होमाहुती देते समयीं वधूनें आपल्या दक्षिण हस्तानें वराच्या दक्षिण स्कंधाला स्पर्श करावा.

४

क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्—इदमृता साहे ऋतधाम्ने, अग्नये, गन्धर्वाय; इद न्न मम ॥१॥

॥ ऋताषाडृत धामाग्निर्गन्धर्वस्तस्यौषधयोऽप्सरसो मुदो नाम । ताभ्यः स्वाहा—इदमोषधीभ्यो, अप्सरोभ्यो, मुद्भ्यः; इद न्न मम ॥२॥

॥ सꣳहितो विश्वसामा सूर्यो गन्धर्वः । स न इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्—इदं सꣳहिताय, विश्वसाम्ने, सूर्याय, गन्धर्वाय; इद न्न मम ॥३॥

॥ सꣳहितो विश्वसामा सूर्यो गन्धर्वस्तस्य मरीचयोऽप्सरस आयुवो नाम । ताभ्यः स्वाहा—इदं मरीचिभ्योप्सरोभ्य, आयुभ्यः; इद न्न मम ॥४॥

॥ सुषुम्णः सूर्यरश्मिश्चंद्रमा गन्धर्वः । स न इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्—इदं सुषुम्णाय, सूर्यरश्मये, चंद्रमसे, गन्धर्वाय; इद न्न मम ॥५॥

॥ सुषुम्णः सूर्यरश्मिश्चंद्रमा गन्धर्वस्तस्य नक्षत्राण्यप्सरसो भेकुरयो नाम । ताभ्यः स्वाहा—इदं नक्षत्रेभ्योप्सरोभ्यो, भेकुरिभ्यः; इद न्न मम ॥६॥

॥ इषिरो विश्वव्यचा वातो गन्धर्वः । स न इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्—इदमिषिराय, विश्वव्यचसे, वाताय, गन्धर्वाय; इद न्न मम ॥७॥

॥ इषिरो विश्वव्यचा वातो गन्धर्वस्तस्यापो

ऽप्सरस ऊर्जो नाम । ताभ्यः स्वाहा–इदमद्भ्यो, अप्सरोभ्यऽऊर्भ्यः; इद न्न मम ॥८॥

॥ भुज्युःसुपर्णो यज्ञो गन्धर्वः । स न इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्– इदं भुज्यवे, सुपर्णाय, यज्ञाय, गन्धर्वाय; इद न्न मम ॥९॥

॥ भुज्युः सुपर्णो यज्ञो गन्धर्वस्तस्य दक्षिणा अप्सरसं स्तावा नाम । ताभ्य स्वाहा–इदं दक्षिणाभ्यो,अप्सरोभ्यः,स्तावाभ्यः; इद न्न मम ॥१०॥

॥ प्रजापतिर्विश्वकर्मा मनो गन्धर्वः । स न इदं ब्रह्म क्षत्रं पातु तस्मै स्वाहा वाट्–इदं प्रजापतये, विश्वकर्मणे, मनसे, गन्धर्वाय; इद न्न मम ॥११॥

॥ प्रजापतिर्विश्वकर्मा मनो गन्धर्वस्तस्यं ऽऋक्सामान्यप्सरस एष्टयो नाम । ताभ्य स्वाहा –इदमृक्सामेभ्योप्सरोभ्य,एष्टिभ्यः; इदन्नमम ॥१२॥

या यजुर्वेदोक्त प्रत्येक मंत्रानें एकेक अशा १२ आहुती दिल्यावर सूत्रोक्त मंत्रांनीं प्रथम जया होम करावा. ते होमाहुती मंत्र :—

ॐ चित्तं च स्वाहा–इदं चित्ताय, इद न्न मम ॥१॥
ॐ चित्ति श्च स्वाहा– इदं चित्यै, इद न्न मम ॥२॥
ॐ आकूतं च स्वाहा–इदं आकूताय, इद न्न मम ॥३॥
ॐ आकूतिश्च स्वाहा–इदं आकूत्यै, इद न्न मम ॥४॥
ॐ विज्ञातं च स्वाहा–इदं विज्ञाताय, इद न्न मम ॥५॥

ॐ विज्ञातिश्च स्वाहा—इदं विज्ञात्यै, इद न्न मम ॥६॥
ॐ मनश्च स्वाहा—इदं मनसे, इद न्न मम ॥७॥
ॐ शक्करीश्च स्वाहा—इदं शक्करीभ्यः, इद न्न मम ॥८॥
ॐ दर्शश्च स्वाहा— इदं दर्शाय, इद न्न मम ॥९॥
ॐ पौर्णमासंचस्वाहा—इदं पौर्णमासाय, इद० ॥१०॥
ॐ बृह च स्वाहा— इदं बृहते, इद न्न मम ॥११॥
ॐ रथंतरं च स्वाहा—इदं रथंतराय, इद न्न मम ॥१२॥
ॐ प्रजापतिर्जयानिन्द्राय वृष्णे प्रायच्छदुग्रःपृतना जयेषु। तस्मै विशः समनमन्तः सर्वाः सऽउग्रःसऽ इ हव्यो बभूव स्वाहा—इदं प्रजापतये, जयानिन्द्राय; इद न्न मम ॥१३॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा जया होमाच्या १३ आज्याहुती दिल्यावर अन्य सूत्रोक्त मंत्रांनीं अभ्यातन होम करावा; ते होमाहुती मंत्रः—

"ब्रह्मण्यस्मिन् क्षत्रे स्यामा शिष्यस्यां पुरोधायामस्मिन् कर्मण्यस्यां देव हूत्या ऽ"

हें पद खालील प्रत्येक त्वास्मिन्० पद स्थानापुढें व स्वाहा पदाच्या मागें लावून खालील प्रत्येक मंत्र पूर्ण ह्मणावा.

॥ ॐ अग्निर्भूतानामधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा—इदमग्नये, भूतानामधिपतये; इद न्न मम ॥१॥
॥ ॐ इन्द्रो ज्येष्ठानामधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा—इदमिन्द्राय, ज्येष्ठानामधिपतये; इद न्न मम ॥२॥
॥ ॐ यमः पृथिव्याऽअधिपतिः समावत्वस्मिन्०स्वाहा—इदं यमाय, पृथिव्या अधिपतये; इद न्न मम ॥३॥
॥ ॐ वायुरन्तरिक्षस्याधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा

—इदं वायवे, अन्तरिक्षस्याधिपतये; इद न्न मम ॥४॥

॥ ॐ सूर्यो दिवोधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा—इदं सूर्याय, दिवोधिपतये; इदं न्न मम ॥५॥

॥ ॐ चंद्रमा नक्षत्राणामधिपतिः समावत्वास्मिन्० स्वाहा—इदं चंद्रमसे, नक्षत्राणामधिपतये; इद न्न मम ॥६॥

॥ ॐ बृहस्पतिर्ब्रह्मणोधिपतिः समावत्वस्मिन्०स्वाहा—इदं बृहस्पतये, ब्रह्मणोधिपतये; इद न्न मम ॥७॥

॥ ॐ मित्रः सत्यानामधिपतिः समावत्वास्मिन्० स्वाहा—इदं मित्राय, सत्यानामधिपतये; इदं न्न मम ॥८॥

॥ ॐ वरुणोपामधिपतिः समावत्वास्मिन्० स्वाहा—इदं वरुणाय, अपामधिपतये; इद न्न मम ॥९॥

॥ ॐ समुद्रः स्रोत्यानामधिपतिः समावत्वास्मिन्०स्वाहा—इदं समुद्राय, स्रोत्यानामधिपतये; इद न्न मम॥ १०॥

॥ ॐ अन्नꣳ साम्राज्यानामधिपतिःसमावत्वास्मिन्०स्वाहा—इदमन्नाय, साम्राज्यानामधिपतये; इद न्न०॥ ११॥

॥ ॐ सोम ऽओषधीनामधिपतिः समावत्वास्मिन्०स्वाहा—इदं सोमाय, औषधीनामधिपतये; इद न्न मम ॥१२॥

॥ ॐ सविता प्रसवानामधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा—इदं सवित्रे, प्रसवानामधिपतये; इद न्न मम ॥१३॥

॥ ॐ रुद्रः पशूनामधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा—इदं रुद्राय, पशूनामधिपतये; इद न्न मम ॥१४॥

॥ ॐ त्वष्टा रूपाणामधिपतिः समावत्वस्मिन्० स्वाहा इदं त्वष्ट्रे, रूपाणामधिपतये; इद न्न मम ॥१५॥

॥ ॐ विष्णुः पर्वतानामधिपतिः समावत्वस्मिन्०स्वाहा—इदं विष्णवे, पर्वतानामधिपतये; इद न्न मम ॥१६॥

॥ ॐ मरुतो गणानामधिपतयः समावन्त्वस्मिन्० स्वाहा —इदं मरुद्भ्यो, गणानामधिपतिभ्यो; इद न्न मम ॥१७॥

॥ ॐ पितरः पितामहाः परेवरे ततास्ततामहाः । इह-मावन् त्वस्मिन्० स्वाहा—इदं पितृभ्यः पितामहेभ्यः परेभ्यो, वरेभ्यस्ततेभ्य स्ततामहेभ्य श्च; इदन्नमम ॥१८॥

याप्रमाणें अभ्यातन होमाच्या १८ आहुती दिल्यानंतर,

॥ ॐ अग्निरैतु प्रथमो देवताना ᳪ सोस्यै प्रजां मुञ्चतु मृत्युपाशान् । तदय ᳪ राजा वरुणोनुमन्यतां यथेय ᳪ स्त्री पौत्र मघन्नरोदात्स्वाहा—इदमग्नये, इदन्नमम ॥१॥

॥ ॐ इमामग्निस्त्रायतां गार्हपत्यः प्रजामस्यै नयतु दीर्घ-मायुः । अशून्योपस्था जीवतामस्तु माता पौत्रमानन्द-मभि विबुध्यतामिय ᳪ स्वाहा—इदमग्नये, इदन्नमम ॥२॥

॥ ॐ स्वस्तिनोऽ अग्ने दिव आ पृथिव्या विश्वा निधेह्ययथा यजत्र । यदस्यां महि दिवि जातं प्रशस्तं तदस्मासु द्रविणं धेहि चित्र ᳪ स्वाहा—इदमग्नये, इदन्नमम ॥३॥

॥ ॐ सुगन्नु पन्थाम्प्रदिशन्न ऽ एहि ज्योतिष्मध्ये ह्य-जरन्नऽआयुः । अपैतु मृत्युरमृतं म आगाद्वैवस्वतो नोऽ अभयं कृणोतु स्वाहा—इदं वैवस्वताय, इदन्नमम ॥४॥

॥ ॐ परं मृत्यो ऽअनु परेहि पन्थां यत्र नो ऽ अन्य इतरो देव यानात् । चक्षुष्मते शृण्वते ते ब्रवीमि मा नः प्रजा ᳪ रीरिषो मोत वीरान् स्वाहा—इदं मृत्यवे, इदन्नमम ॥५॥

॥ ॐ द्यौस्ते पृष्ठ ᳪ रक्षतु वायुरूरू अश्विनौ च । स्तनं धयस्ते पुत्रान् त्सविताभिरक्षत्वा वाससः परिधानाद्बृ-हस्पति विश्वेदेवा अभिरक्षन्तु पश्चात्स्वाहा—इदं विश्वे-भ्यो देवेभ्यः, इद न्न मम ॥६॥

[illegible]

॥ ॐ मा ते गृहेषु निषिघोष उत्थ[illegible] [illegible]त्यः संविशन्तु । मा त्वं रुदत्युर आवाधि[illegible] [illegible]पत्नी पतिलोके विराज पश्यन्ती प्रजां सुमनस्यमाना स्वाहा—इदमग्नये, इद न मम ॥७॥

॥ ॐ अप्रजस्यं पौत्रमत्यं पाप्मान मुत वा अघं । शीर्ष्णः स्रजमिवोन्मुच्य द्विषद्भ्यः प्रति मुंचामि पाश स्वाहा—इदमग्नये, इद न मम ॥८॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा आठ आज्याहुती द्याव्या. व शेवटीं " ॐ भूरग्नये स्वाहा० " इत्यादि ४ व्याहृति मंत्र १७ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिले आहेत, त्या प्रमाणें प्रत्येक पूर्ण मंत्रानें एकेक अशा ४ आज्याहुती द्याव्या—याप्रमाणें हवन करून आसनावरून उठून, पूर्वाभिमुख बसलेल्या वधूच्या सन्मुख जाऊन पश्चिमाभिमुख उभें राहावें. व आपल्या वाम हस्तानें बसलेल्या वधूचा दक्षिण हस्त मणिबंध प्रदेशीं (मणगट) धरून वर उचलून दक्षिण हस्तानें—उचललेल्या हस्ताची अंजली, अंगुष्ठ सहीत उताणी ग्रहण करावी. व ते समयीं त्यानें (वरानें),

॥ गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः । भगो अर्यमा सविता पुरं धिर्मह्यं त्वा दुर्गार्हपत्याय देवाः ॥१॥

॥ भगस्ते हस्तमग्रहीत्सविता हस्तमग्रहीत् । पत्नी त्वमसि धर्मणाहं गृह पति स्तवं ॥२॥

॥ ममेय मस्तु पोष्या मह्यं त्वादाद् बृहस्पतिः ।

मया पत्या प्रजावति संजीव: शरदः शतं ॥ ३॥

॥ त्वष्टा वासो व्यदधा च्छुभे कं बृहस्पतेः प्रशिषां कवीनाम्। तेनेमां नारीं सविता भगश्च सूर्यामिव परि धत्तां प्रजया ॥४॥

॥ इंद्राग्नी द्यावा पृथिवी मातरिश्वा मित्रा वरुणा भगो अश्विनो भा। बृहस्पतिर्मरुतो ब्रह्म सोम इमां नारीं प्रजया वर्धयन्तु ॥५॥

॥ अहं वि ष्यामि मयि रूप मस्या वेददित् पश्यन् मनसः कुलायम्। न स्तेयमाद्मि मनसो- दमुच्ये स्वयं श्रन्थानो वरुणस्य पाशान् ॥६॥

हे पाणि ग्रहणाचे ६ मंत्र ह्मणावे. पुढें वरानें वधूला दक्षिण हस्तांजली धरून वर उठवावी. व तिला बरोबर घेऊन, उदक पूर्ण कलशा सुद्धां यज्ञ कुंडाला प्रदक्षिणा करावी. व ते समयीं,

॥ ॐ अमोहमस्मि सा त्व ॱ सा त्वमस्यमोहं। सामाहमस्मिऽ ऋक् त्वं द्यौरहं पृथिवी त्वं। तावेव विवहावहै सहरेतो दधावहै। प्रजां प्रजनयावहै पुत्रान् विन्दावहै बहून्। ते सन्तु जरदष्टय: संप्रियौ रोचिष्णू सुमनस्य मानौ। पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शत ॱ शृणुयाम शरदः शतम् ॥

हा प्रतिज्ञा मंत्र प्रथमतः वरानें व नंतर वधूनें ह्मणावा. पुढें वरानें वधूच्या पाठी मागून निघून, वधूच्या दक्षिण भागीं

सन्निध जाऊन उत्तराभिमुख राहून वधूची दक्षिणांजली आपल्या दक्षिण अंजलीनें धरावी. नंतर वधूच्या बंधूनें किंवा मातेनें पूर्व स्थापित लाह्यांचें सूप वाम हस्तांत घेऊन दक्षिण हस्तानें वधूला तिचा उजवा पाय प्रथम पुढें करून पाथरीवर चढवावी, व ते समयीं वरानें,

॥ ॐ आरोहेममश्मानमश्मेव त्व ँ स्थिरा भव । अभितिष्ठ पृतन्यतोव बाधस्व पृतनायतः ॥

हा मंत्र ह्मणावा. पुढें उभय वधूवरांनीं कुंडा सन्निध पूर्वाभिमुख उभें रहावें, त्यांत वधूनें वराच्या दक्षिण भागीं राहून स्वतांची हस्तांजली वराच्या हस्तांजलींत धारण करावी. तदनंतर वधू माता किंवा भ्राता—कोणी असेल त्यानें तें लाह्यांचें सूप भूमीवर ठेवून किंवा अन्य कोणाजवळ देऊन वरांजलींत असलेल्या वधूच्या अंजलींत प्रथम थोडें घृत सिंचन करून त्याजवर दक्षिण हस्तांजलीनें दोन वेळ लाह्या त्या सुपांतील घालाव्या व. नंतर त्या लाह्यांवरहि थोडें घृत सिंचन करावें. पुढें वधूनें स्वांजली भिन्न न करितां खालीं वांकवून प्रज्वलीत समिधा काष्ठांवर,

॥ ॐ अर्यमणं देवं कन्याऽग्निमयक्षत । स नो ऽअर्यमा देवः प्रेतो मंचतु मा पतेः स्वाहा—इदमर्यम्णे, अग्नये; इद न्न मम ॥१॥

॥ ॐ इयं नार्युपब्रूते लाजानाव पन्तिका । आयुष्मानस्तु मे पतिरेधन्तां ज्ञातयो मम स्वाहा—इदमग्नये, इद न्न मम ॥२॥

॥ ॐ इमां ल्लाजाना वपाम्यग्नौ समृद्धि करणन्तव । मम

**तुभ्य च संवननं तदग्निरनुमन्यतामियॅ स्वाहा**—इद-मग्नये, इद न मम ॥३॥

या तीन मंत्रांनीं, प्रत्येक मंत्रांतीं थोडथोड्या अशा अंज-लिस्थ सर्व लाह्यांच्या तीन आहुती द्याव्या. नंतर वरानें,

॥ **ॐ सरस्वति प्रे दमव सुभगे वाजिनीवति । यान्त्वा विश्वस्य भूतस्य प्रजाया मस्याग्रतः । यस्यां भूतॅ समभवद्यस्यां विश्वमिदं जगत् । तामद्य गाथां गास्यामि या स्त्रीणामुत्तमं यशः ॥**

हा मंत्र ह्मणून आपल्या दक्षिण अंजलीनें वधूची दक्षिण अंजली धरून,

॥ **ॐ तुभ्यमग्ने पर्यवहन्त्सूर्यां वहतु नासह । पुनः पति-भ्यो जायां दाग्ने प्रजया सह ॥१॥**

॥ **ॐ कन्यला पितृभ्यः पतिलोकं पतीय मप दीक्षा-मयष्ट ! कन्या उत त्वया वयं धारा उदन्या इवाति गाहेमहि द्विषः ॥२॥**

या मंत्रांनीं यज्ञ कुंडास प्रदक्षिणा करावी. व यज्ञ कुंडा-सन्निध पश्चिम भागीं पूर्वाभिमुख किंचित् उभें राहावें, आणि नंतर फिरून—पुनः वर सांगितल्याप्रमाणें कलशा सुद्धां यज्ञ कुंडाला प्रदक्षिणा करून हीच क्रिया पुनः पुनः आ-णखीं दोन वेळां करावी. आणि याप्रमाणें शेवटीं यज्ञ कुंडा सन्निध वधूवरांनीं पश्चिम भागीं पूर्वाभिमुख उभें रा-हिल्यावर, वधूच्या बंधूनें किंवा मातेनें—कोणी असेल त्याणें सूप पालथें करून, सुपाच्या दक्षिण कोंपऱ्यानें शेष (बाकी) लाह्या वधूच्या अंजलींत ओताव्या. व वधूनें,

॥ **ॐ भगाय स्वाहा**— इदं भगाय, इद न मम ॥

हा मंत्र बोलून त्या अंजलिस्थ सर्व लाह्यांची प्रज्वलीत समिधा काष्ठांवर एक आहुती द्यावी.

पुढें वरानें वधूला आपल्या दक्षिण भागीं घेऊन कुंडासन्निध पूर्वाभिमुख बसावें. आणि,

॥ ॐ प्रजापतये स्वाहा– इदं प्रजापतये, इद न्न मम ॥ हा मंत्र ह्मणून स्रुवानें एक आज्याहुती द्यावी. तदनंतर वधूचे केश बांधलेले असले तर, वरानें,

॥ प्र त्वा मुंचामि वरुणस्य पाशायेन त्वा बंधात्सविता सुशेवः । ऋतस्य योनौ सुकृतस्य लोकेऽरिष्टां त्वा सह पत्यां दधामि ॥१॥

॥ प्रेतो मुंचामि नामुतः सुबद्धाममुतस्करं । यथेयमिन्द्र मीढ्वः सुपुत्रा सुभगासंति ॥२॥

हे दोन मंत्र ह्मणून तिचे ते केंस सोडावे. आणि पुढें सप्तपदी विधि करावा: तो असा:—

उभय वधूवरांनीं बसलेल्या आसनावरून उठावें; आणि नंतर वरानें आपल्या दक्षिण हस्तानें वधूची दक्षिण हस्तांजली धरून यज्ञ कुंडाच्या पश्चिम बाजूकडून यज्ञ कुंडाच्या उत्तर भागीं जावें, व तेथें वरानें आपला दक्षिण हस्त वधूच्या दक्षिण स्कंधावर ठेवून उभयतांनीं जवळ जवळ उत्तराभिमुख उभें रहावें. नंतर वरानें, "**मासव्येन दक्षिणमति क्राम**" असें बोलून वधूला उजवा पाय प्रथम उचलून चालण्यास सांगावें आणि,

॥ ॐ इष एक पदी भव, सा मामनुव्रता भव, विष्णुस्त्वा नयतु. पुत्रान् विन्दावहै बहूंस्ते सन्तु जरदष्टयः॥

हा मंत्र ह्मणून वधूला आपल्या बरोबर ईशान्य दिशेकडे एक पाऊल* चालवावी. व पुढें त्याच प्रमाणें,

ॐ ऊर्जे द्विपदी भव०† या मंत्रानें दुसरें एक पाऊल,
ॐ रायस्पोषाय त्रिपदी भव० या मंत्रानें तिसरें एक पाऊल,
ॐ मायोभव्याय चतुष्पदी भ० या मंत्रानें चवथें एक पाऊल,
ॐ प्रजाभ्यः पंचपदी भव० या मंत्रानें पांचवें एक पाऊल,
ॐ ऋतुभ्यः षट्पदी भव० या मंत्रानें सहावें एक पाऊल,
ॐ सखा सप्तपदी भव० या मंत्रानें सातवें एक पाऊल,

या रीतीनें सात मंत्रांनीं सात पावलें वधूला आपल्या बरोबर ईशान्य दिशेकडे चालवावी.

०

एणेप्रमाणें वरानें वधूला ७ पावलें चालविल्यावर उभय वधूवरांनीं शुभासनावर एकत्र बसावें. व पुढें, पूर्वोक्त जल पूर्ण कलश सन्निध ठेवून यज्ञ कुंडाच्या दक्षिण भागीं असलेल्या पुरुषानें तो पूर्वे स्थापित कलश वधूवरां सन्निध घेऊन येऊन त्यांतील थोडें उदक वधूवरांच्या मस्तक प्रदेशीं सिंचन करावें व ते समयीं वरानें,

॥ आपो हि,ष्ठा मयो भुवस्ता न ऊर्जे दधातन । महे रणाय चक्षसे ॥१॥ यो वः शिवतमो रस-

---

* हें पाऊल भरण्याचा ( ठेवण्याचा ) प्रकार असा आहे कीं, वधूनें प्रथम उजवा पाय उचलून ठेवावा. आणि त्या नंतर दुसरा पाय उचलून त्याचें पाऊल त्या उजव्या पायाच्या पावला बरोबर ठेवावें व तें एक पाऊल समजावें.

† या प्रत्येक मंत्राच्या भव० पदा पुढें पहिल्या मंत्रांत दर्शविल्याप्रमाणें **सा मामनुव्रता** इत्यादि सर्व पद लावून मंत्र पूर्ण ह्मणावे.

स्तस्य भाजयतेह नः। उशतीरिव मातरः॥२॥
तस्माऽअरम्, गमाम वो यस्य क्षयाय जि-
न्वथ। आपो जनयथा च नः॥३॥

॥ ॐ आपः शिवाः शिवतमाः शान्ताः शान्तत-
मास्ता स्ते कृण्वन्तु भेषजम् ॥४॥

हे चार मंत्र ह्मणावे. तदनंतर वधूवरांनीं उठून,

॥ तच्चक्षुर्देवहितं पुरस्ताच्छुक्रमुच्चरत्। पश्येम
शरदः शतम् जीवेम शरदः शतꣳ शृणुयाम
शरदः शतम् प्रब्रवाम शरदः शतमदीनाः
स्याम शरदः शतं भूयश्च शरदः शतात्॥

हा मंत्र ह्मणून सूर्यावलोकन करावें. पुढें वरानें आपला द-क्षिण हस्त वधूच्या दक्षिण स्कंधावरून नेऊन, त्या हस्तानें तिच्या हृदयाला स्पर्श करून,

॥ ॐ मम व्रते ते हृदयन् दधामि मम चित्तमनु चित्तं
ते अस्तु। मम वाच मेकमना जुषस्व प्रजापतिष्ट्वा
नियुनक्तु मह्यम्॥

हा मंत्र ह्मणावा. व त्याच प्रमाणें वधूनेंहि वराच्या हृदयाला दक्षिण हस्तानें स्पर्श करून तोच मंत्र ह्मणावा.

पुढें वरानें वधूच्या मस्तकावर आपला दक्षिण हस्त ठेवून,

॥ सुमंगलीरियं वधूरिमां समेत पश्यत।
सौभाग्यमस्यै दत्वायाथास्तं वि परेतन॥

हा मंत्र बोलून तेथील कार्यार्थ आलेल्या लोकांकडे अव-लोकन करावें. आणि नंतर त्या लोकांनीं ॥ ॐ सौभाग्य-

मस्तु ॥ ॐ शुभं भवतु ॥ असें आशीर्वाद वचन ह्मणावें. पुढें वधूवरांनीं यज्ञ कुंडा सन्निध पूर्ववत् बसून "ॐ यदस्य कर्मणो०" हा स्विष्टकृद् होमाहुती मंत्र १७ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिला आहे, त्या प्रमाणें पूर्ण मंत्रानें एक आज्याहुती; व "ॐ भूरग्नये स्वाहा०" इत्यादि ४ व्याहृति आहुती मंत्र, १७ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिले आहेत त्या प्रत्येक पूर्ण मंत्रानें एकेक अशा चार अन्य आज्याहुती द्याव्या. आणि या प्रमाणें विवाह संस्काराचा पूर्व भाग संपूर्ण झाल्यावर उभय वधू वरांनीं विश्रांति घ्यावी. पुढें—थोडा वेळ विश्रांति घेतल्यावर विवाहाचा उत्तर विधि करण्याकरितां वधू गृहाच्या मुख्यत्वें करून ईशान्य दिशेस प्रथम योजना करून ठेवलेल्या एका गृहीं जाऊन उत्तर विवाहाच्या साहित्याची तयारी करावी. तदनंतर सूर्यास्तमानीं आकाशांत नक्षत्रें दिसूं लागल्यावर, वधूवरांनीं यज्ञ कुंडा सन्निध पश्चिम भागीं पूर्वाभिमुख बसावें व नंतर पृष्ठ १९ यांत दर्शविल्याप्रमाणें "ॐ अयन्त इध्म०" या मंत्रानें समिधा काष्ठांनीं समिधाधान करून त्या पेटलेल्या समिधा काष्ठांवर, १७ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें आघारावाज्य भागाहुती ४ व व्याहृति आहुती ४ मिळून ८ आज्याहुती द्याव्या. व नंतर प्रधान होम करावा. ते होमाहुती मंत्रः—

ॐ लेखा सन्धिषु पक्ष्मस्वावर्तेषु च यानि ते ।
तानि ते पूर्णाहुत्या सर्वाणि शमयाम्यहम् स्वाहा* ॥
ॐ केशेषु यच्च पापकमीक्षिते रुदिते च यत् । तानि० ॥

---

* एथें "इदं कन्यायै" हा त्याग योजावा. व या मंत्राचा उत्तरार्ध पुढील चार मंत्रांच्या उत्तरार्ध स्थानीं योजावा.

ॐ शीलेषु यच्च पापकं भाषिते हसिते च यत् । तानि०॥
ॐ आरोकेषु च दंतेषु हस्तयोः पादयो श्च यत् । तानि०॥
ॐ ऊर्वो रुपस्थे जंघयोः संधानेषु च यानि ते ॥ तानि०॥
ॐ यानि कानि च घोराणि सर्वांगेषु तवा भवन् ।
पूर्णाहुतिभिराज्यस्य सर्वाणि तान्यशीशमम् स्वाहा ॥

या ६ मंत्रांनीं, प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ६ आज्याहुती द्याव्या. व नंतर १७ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें ४ व्याहृती आहुती द्याव्या. त्या नंतर वधू वरांनीं तेथून उठून मंडपा बाहेर उत्तर प्रदेशीं जावें; व वरानें "ध्रुवं पश्य" असें बोलून वधूला ध्रुवाचा तारा दाखवावा. व वधू, ध्रुव तारा पहाते न पहाते तों तिणें "पश्यामि" असें बोलावें. आणि,

॥ ॐ ध्रुवमसि ध्रुवाहं पतिकुले भूयासं (अमुष्य* असौ) ॥

हा मंत्र ह्मणावा. त्यानंतर "अरुन्धतिं पश्य" असें बोलून वरानें वधूला अरुन्धति तारा दाखवावा. आणि वधूनें पूर्ववत् "पश्यामि" असें बोलावें आणि,

॥ ॐ अरुन्धत्यसि रुद्धाहमस्मि (अमुष्य*–असौ) ॥

हा मंत्र ह्मणावा. व त्या नंतर वरानें वधूकडे अवलोकन करून तिच्या मस्तकावर हस्त ठेवून,

॥ ॐ ध्रुवा द्यौ र्ध्रुवा पृथिवी ध्रुवं विश्व मिदं जगत् ।
ध्रुवासः पर्वता इमे ध्रुवा स्त्री पति कुले इयम् ॥

---

* 'अमुष्य' या ठिकाणीं वराचें नाम षष्ठ्यन्त (षष्ठि विभक्तींत) घ्यावें. (जसें– नारायण, हरि, किंवा विष्णु नाम असलें तर, नारायणस्य, हरेः, किंवा विष्णोः) व 'असौ' या स्थानीं वधूनें आपलें नाम प्रथमान्त (प्रथम विभक्तींत) घ्यावें व या प्रमाणें मंत्र पूर्ण ह्मणावा.

॥ ओं ध्रुवमसि ध्रुवं त्वा पश्यामि ध्रुवैधि पोष्ये मयि मह्यं त्वादात् । बृहस्पति र्मया पत्या प्रजावती संजीव शरदः शतम् ॥

हे मंत्र ह्मणावे. पुढें उभय वधूवरांनीं यज्ञ कुंडा सन्निध पश्चिम भागीं पूर्वाभिमुख बसून १३ व्या पृष्ठावर दर्शविल्या प्रमाणें तीन आचमनें करावीं. व यज्ञीय काष्ठांनीं यज्ञ कुंडांत अग्नि पेटवून १४।१५ व्या पृष्ठांवर दर्शविल्याप्रमाणें घृत व स्थालिपाक* (भात) सिद्ध करून "ओं अयन्त इध्म०" या मंत्रानें समिधा काष्ठांनीं अग्नि प्रज्वलित करून त्यांत १७ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें आघारावाज्य भागाहुती ४ व व्याहृति आहुती ४, मिळून ८ आज्याहुती द्याव्या. नंतर सिद्ध केलेला स्थालिपाक (भात) एका पात्रावर काढून त्याजवर स्रुवानें घृत सिंचन करून, त्यांतून ११ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें दक्षिण हस्तांगुलांनीं भात घेऊन,

॥ ओं अग्नये स्वाहा—इदमग्नये, इदं न मम ॥

॥ ओं प्रजापतये स्वाहा—इदं प्रजापतये, इद न मम ॥

---

* हा स्थालिपाक (भात) करण्याचा विधि १५ व्या पृष्ठावर लिहिला आहे. त्या प्रमाणें, "ओं अग्नये त्वा जुष्टं निर्वपामि," "ओं प्रजापतये त्वा जुष्टं निर्वपामि," "ओं विश्वेभ्यो देवेभ्य स्त्वा जुष्टं निर्वपामि," "ओं अनुमतये त्वा जुष्टं निर्वपामि" या मंत्रांनीं प्रथम तांदूळ तयार करावे. आणि नंतर या मंत्रांच्या शेवटीं निर्वपामि, ह्मणून जें पद आहे त्याच्या बदली प्रोक्ष्यामि हें पद लावून या मंत्रांनीं ते तांदूळ धुवावे व नंतर त्याचा भात शिजवावा,

॥ ॐ विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा—इदं विश्वेभ्यो देवेभ्यः, इद०॥
॥ ॐ अनुमतये स्वाहा—इदमनुमतये, इद न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ४ स्थालिपाकाहुती द्याव्या. व नंतर—शेवटीं "ॐ यदस्य कर्मणो०" हा स्विष्टकृद् आहुती मंत्र १७ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिला आहे तो म्हणून दुसरी एक स्थालिपाकाहुती द्यावी. तदनंतर पृष्ठ १७ व १९, यांजवर लिहिल्याप्रमाणें व्याहृति आहुती ४ व अष्टाज्या आहुती ८ अशा १२ आज्याहुती द्याव्या. पुढें स्थालिपाक शेष (बाकी राहिलेला भात) एका पात्रावर काढून त्याजवर घृत सिंचन करावें आणि नंतर त्याजवर दक्षिण हस्तांजली ठेवून,

॥ ॐ अन्न पाशेन मणिना प्राण सूत्रेण पृश्निना ।
बध्नामि सत्य ग्रंथिना मनश्च हृदयं च ते ॥१॥

॥ ॐ यदेतद् हृदयं तव तदस्तु हृदयं मम ।
यदिदꣳ हृदयं मम तदस्तु हृदयं तव ॥२॥

॥ ॐ अन्नं प्राणस्य षड्विꣳशस्तेन बध्नामि त्वा असौ*॥

हे मंत्र जपावे. नंतर तें हविष्यान्न प्रथम वरानें थोडें भक्षण करून उच्छिष्ट (बाकी) वधूला भक्षण करण्यास द्यावें. व तें भक्षण केल्यावर, वधूवरांनीं मंडपस्थ शुभासनीं पूर्वाभिमुख बसावें आणि,

---

* 'असौ' या ठिकाणीं वधूचें नांव संबोधनान्त (संबोधन विभक्तींत) योजावें. जसें, यशोदा—यशोदे; वेदमति—वेदमते; गंगा—गंगे; इत्यादि.

| | |
|---|---|
| ओं भूर्भुवः स्वः । कयानश्चित्र० | हे साम वेदोक्त ३ गान मंत्र २१ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिले आहेत त्या |
| ओं भूर्भुवः स्वः । कस्त्वा सत्यो० | |
| ओं भूर्भुवः स्वः । अभी षुणः० | |

पूर्ण मंत्रांनीं वामदेव्य गान ह्मणावें. नंतर पृष्ठ १—८ पर्यंत लिहिलेल्या मंत्रांनीं ईश्वरोपासना करून क्षार व लवण रहित यथोक्त भोजन करावें. आणि २२ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें पुरोहितादि सद्धर्मी व कार्यार्थ आलेल्या लोकांस सन्मानार्थ उत्तम भोजन द्यावें आणि नंतर योग्य आदर सत्कार करून त्यांची रवानगी करावी. व रात्रौ १० घटिकां नंतर उभय वधूवरांनीं अधःस्थानीं ह्मणजे भूमीवर अंथरूण पसरून श-यन करावें. व ब्रह्मचर्य वृत्तीनें रहावें. या प्रमाणें तीन रात्री व्रतस्थ राहून नंतर चवथे दिवशीं गर्भाधान संस्कार करावा. पण ते दिवशीं कांहीं अडचण असली, तर गर्भाधान सं-स्कार पर्यंत उभयतांनीं व्रतस्थ रहावें.

आतां वरानें वधूला घेऊन स्वगृहीं जाण्याचा विधि :— वर लिहिल्याप्रमाणें विवाहाचा यथोक्त विधि संपल्यावर दु-सऱ्या किंवा तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं वर पक्षी लोकांनीं वधूवरांला रथांत बसवून मोठ्या सन्मानानें वर गृहीं घेऊन जावें. वरानें वधूला रथांत आपल्या जवळ दक्षिण बाजूस बसवावी. व ते समयीं,

॥ पूषा त्वेतो नयतु हस्तगृह्याश्विना त्वा प्र वं-
हतां रथेन । गृहान्गच्छ गृहपत्नी यथासो
वशिनी त्वं विदथमा वंदासि ॥

॥ सुकिंशुकं शल्मलिं विश्वरूपं हिरण्य-

वर्णं सुवृतं सुचक्रं । आरोह सूर्ये अमृतस्य लोकं स्योनं पत्ये वहतुं कृणुष्व ॥

हे मंत्र ह्मणावे. पुढें वधूवरांचा रथ वरा जवळ येऊन पोंचल्यावर कुलीन, पुत्रवती, सौभाग्यवती अशा कांहीं ब्राह्मण स्त्रियांनीं सामोरें येऊन वधूला तिच्या हस्तास धरून वरासह खालीं उतरावी आणि वरासह तिला मंडप द्वारीं घेऊन आल्या नंतर, कार्यार्थ आलेल्या लोकांकडे अवलोकन करून वरानें,

॥ सुमंगलीरियं वधूरिमां समेत पश्यत । सौभाग्यमस्यै दत्वायाथास्तं वि परेतन ॥

हा मंत्र ह्मणावा. व नंतर त्या आलेल्या लोकांनीं ओँ सौभाग्यमस्तु । ओँ शुभंभवतु । असें ह्मणावें. तदनंतर वरानें,

॥ इह प्रियं प्रजया ते समृध्यतामस्मिन् गृहे गार्हपत्याय जागृहि । एना पत्या तन्वं सं सृजस्वाधा जिव्री विदथमा वदाथः ॥

हा मंत्र बोलून वधूला मंडपांत घेऊन जावी. नंतर तेथें पूर्वें स्थापित कुंडा सन्निध उभय वधूवरांनीं जावें आणि वरानें,

॥ ओँ इह गावः प्रजायध्वमिहाश्वा इह पूरुषाः । इहो सहस्र दक्षिणो पि पूषा निषीदतु ॥

हा मंत्र ह्मणून यज्ञ कुंडा सन्निध पश्चिम भागीं पीठासनावर किंवा तृणासनावर वधूला आपल्या दक्षिण बाजूस पूर्वाभिमुख बसवावी. नंतर एका सौभाग्यवती व पुत्रवती अशा स्त्रीनें वधूच्या मांडीवर चौल संस्कार न केलेला असा एक सुंदर

मुलगा आणून बसवावा. व त्या मुलाच्या हस्तांत देंटयुक्त कमल पुष्प किंवा आम्रादि एकादें फल द्यावें. नंतर त्या मुलास वधूच्या मांडीवरून उठवून वधू सन्निध बसवावा. तदनंतर ११–१९ पृष्ठांपर्यंत लिहिल्याप्रमाणें वधूवरांनीं प्रथम आचमन करून नंतर यज्ञ कुंडांत यथाविधि अग्नि स्थापन करावा. आणि नंतर त्यांत, आहुती करितां घृत सिद्ध करावें. त्यानंतर समिधाधान करून त्या पेटलेल्या समिधा काष्ठांवर ४ आघारावाज्य भागाहुती; ४ व्याहृति आहुती; व ८ अष्टाज्याहुती मिळून एकंदर १६ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर प्रधान होमास आरंभ करावा. ते प्रधान होमाहुती मंत्रः—

ओ३म् इह धृतिः स्वाहा—इदमिहधृत्यै, इद न्न मम ॥
ओ३म् इह स्वधृतिः स्वाहा—इदमिह स्वधृत्यै, इद न्न मम ॥
ओ३म् इह रन्तिः स्वाहा—इदमिहरन्त्यै, इद न्न मम ॥
ओ३म् इह रमस्व स्वाहा—इदमिह रमाय, इद न्न मम ॥
ओ३म् मयि धृतिः स्वाहा—इदं मयि धृत्यै, इद न्न मम ॥
ओ३म् मयि स्वधृतिः स्वाहा—इदं मयि स्वधृत्यै, इद न्न मम ॥
ओ३म् मयि रमः स्वाहा—इदं मयि रमाय, इद न्न मम ॥
ओ३म् मयि रमस्व स्वाहा—इदं मयि रमाय, इद न्न मम ॥

या प्रत्येक सूत्रोक्त मंत्रानें एकेक अशा ८ आज्याहुती प्रथम द्याव्या. आणि नंतर,

॥ आ नः प्रजां जनयतु प्रजापतिराजरसाय सर्मनक्त्वर्यमा । अदुर्मङ्गलीः पतिलोकमा विश शं नो भव द्विपदे शं चतुष्पदे ॥१॥

॥ अघो॑र चक्षुरप॑तिघ्न्येधि शि॒वा प॒शुभ्यः॑ सु॒मनाः॑ सु॒वर्चाः॑ । वी॒र॒सूर्दे॒वका॑मा स्यो॒ना शं नो॑ भव द्वि॒पदे॒ शं चतु॑ष्पदे ॥२॥

॥ इ॒मां त्वमि॑न्द्र मीढ्वः सुपु॒त्रां सु॒भगां॑ कृणु । दशा॑स्यां पु॒त्राना धे॑हि॒ पति॑मेकाद॒शं कृ॑धि ॥३॥

॥ स॒म्राज्ञी श्वशु॑रे भव स॒म्राज्ञी॑ श्व॒श्र्वां भ॑व । नना॑न्दरि स॒म्राज्ञी॑ भव स॒म्राज्ञी अधि॑ दे॒वृषु॑* ॥४॥

ये प्रत्येक वेदोक्त मंत्रानें एकेक अशा ४ आज्याहुती द्याव्या. तद्वत् नंतर– १७ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें १ स्विष्टकृद् होमाहुती, व ४ व्याहृति आहुती अशा आणखीं पांच आज्याहुती शेवटीं द्याव्या. तदनंतर वधू वरांनीं,

॥ सम॑ञ्जन्तु विश्वे॑ दे॒वाः समापो॒ हृद॑यानि नौ । सं मा॑त॒रिश्वा॒ सं धा॒ता समु॒ देष्ट्री॑ दधातु नौ ॥

हा मंत्र ह्मणून कांहीं दहीं प्राशन करावें. पुढें वरानें, अहं भो अभिवादयामि असें ह्मणून मातापितादि वडिलांस नमन करावें. नंतर वधूनेंहि तद्वत् वंदन करावें. पुढें उभय वधूवरांनीं शुभासनावर बसून २१ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें वामदेव्य गान ह्मणावें. आणि नंतर पृष्ठ १–८ पर्यंत लिहिलेल्या चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करावी. पुढें पुरोहितादि कार्यार्थ आलेल्या सर्व लोकांस वरानें ॥ ओ३म् स्वस्ति भवन्तो ब्रुवन्तु ॥ असें सांगावें आणि

---

* यापुढें "स्वाहा" व "सूर्यासावित्र्या०" हा त्याग सर्वत्र लावावा.

त्या लोकांनीं ॥ ॐ स्वस्ति। ॐ स्वस्ति। ॐ स्वस्ति ॥ असें ह्मणावें. तदनंतर वरकार्य कर्त्यानें कार्यार्थ आलेल्या लोकांचा यथाचार आदर सत्कार करून त्यांची रवानगी करावी. पुढें वधूवरांनीं क्षार आहार व विषय तृष्णा रहीत असें व्रतस्थ राहून गर्भाधान संस्कारांत लिहिल्याप्रमाणें विवाहाचे चवथे दिवशीं किंवा त्या दिवशीं यथोक्त ऋतुकाल नसला, तर यथोक्त ऋतुकालीं—पुढील गर्भाधान संस्कार विधीनें गर्भ स्थापना करावी.

आतां वर, दूर देशाहून तेथें विवाह करण्यास आलेला असल्यास त्याणें गृह प्रवेश व गर्भाधान विधि वधूच्या गांवांत आपल्या राहण्याच्या ठिकाणीं करावा. नंतर वरानें वधूला स्वग्रामीं घेऊन जावें. जात असतां मार्गांत नौकेंत बसावें लागल्यास, । अश्मन्वती रीयते सं रभध्वमुत्तिष्ठत प्रतरता सखायः । हा पूर्वार्ध ह्मणून वधूला बसवावी. आणि तिला उतरते वेळेस, । अत्रा जहाम ये असन्नशेवाः शिवान्वयमुत्तरे माभि वाजान् । हा उत्तरार्ध मंत्र ह्मणून उतरावी.

शिवाय मार्गांत जात असतां माता, पिता बंधु इत्यादिकांच्या वियोगामुळें वधू खेदयुक्त होऊन डोळ्यांत आसवें आणूं लागली तर, ते समयीं वरानें,

॥ जीवं रुदंति वि मयन्ते अध्वरे दीर्घामनु प्रसितिं दीधियुर्नरः । वामं पितृभ्यो य इदं समेरिरे मयः पतिभ्यो जनयः परिष्वजे ॥

हा मंत्र ह्मणावा. मार्गांत चतुष्पथ ( चवाठा ), नदी, व्याघ्र चोरादिकांचें भयंकर स्थान, उंच सखल भूमि, मोठमोठे घन दाट वृक्ष, किंवा स्मशान लागल्यास वरानें,

॥ मा विंदन्परिपंथिनो य आसीदंती दंपती ॥
सुगेभिर्दुर्गमतीतामप द्रांत्वरातयः ॥

ह्या मंत्राचा पाठ ह्मणावा. वधूवरें बसलेल्या रथाच्या कांहीं भाग मोडला असला, किंवा चोरादिकांपासून कांहीं उपद्रव झाला असला, किंवा अन्य कांहीं अपघात झाला असला, तर मार्गांत चांगल्या स्थळीं मुक्काम करून बरोबर आणलेला विवाह होमाग्नि प्रज्वलीत करून त्यांत १७ व्या पृष्ठावर लिहिल्याप्रमाणें ४ व्याहृति मंत्रांनीं ४ आज्याहुती द्याव्या आणि २१ व्या पृष्ठावर दर्शविल्याप्रमाणें वामदेव्य गान ह्मणावें. आणि नंतरें स्वदेश गमनार्थ मार्ग क्रमावा.

पुढें पति गृहीं आल्यावर, पतीनें व त्याच प्रमाणें सासू, सासरा, दीर, नणंद, जाऊ, इत्यादि कुटुंबांतील माणसांनीं त्या वधूची पूजा अर्थात् तिचा सत्कार नित्य प्रीतिपूर्वक करावा. आणि तिला मधुर वाणीनें व तसेंच अन्न वस्त्राभूषणादिकानें सदा प्रसन्न व संतुष्ट ठेवावी. आणि पतीनें तिच्याशीं पत्नी व्रतादि सद्धर्मानें वागावें. त्याच प्रमाणें पत्नीनेंहि आपल्या पतीशीं पतिव्रतादि सद्धर्मानें चालून त्याच्या आज्ञेंत व सेवेंत सदा तत्पर व उत्सुक रहावें. व त्याच प्रमाणें मधुर भाषणानें, संतुष्ट मनानें व सदाचरणानें पतीला सदा संतुष्ट ठेवावें. त्याच प्रमाणें गृह्य कृत्यांत ( घर कामांत ) व इतर संसार व्यवहारांत मोठें दक्ष असावें. आणि

अंगांत मोठी हुशारी व चपलता सदा ठेवावी. आणि त्याच प्रमाणें कुटुंबांतील सर्व मनुष्यांशीं योग्य मर्यादेनें व शांत स्वभावानें चालून त्यांलाहि सदा प्रसन्न ठेवावें.

विवाह संस्कार विधि समाप्त.

---

# गर्भाधान संस्कार विधि.

——000——

**गर्भाधान :**— या जगांत प्रमुख व श्रेष्ठ अशा मानवीं प्राण्याची उत्पत्ति सदृढ, सतेज व दीर्घायुषी व्हावी, म्हणून यथाविधि व यथा कालीं बीज स्थापन करणें याचें नांव गर्भाधान. गर्भ=बीज, आणि आधान=स्थापना.

**गर्भाधान काल :**— गर्भाधान कालीं वधू, १६ वर्षांहून जास्त वयाची— अशी सज्ञान असून प्रथम ऋतु प्राप्त कालापासून तीन वर्षें पर्यंत ( ३६ वेळ ) रजोदर्शनानें शुद्ध झालेली असावी. आणि वराचें वय वधूच्या वयापेक्षां दीडी पासून दुप्पटी पर्यंत अधिक असावें. चतुर्थी कर्म (गर्भाधान) विवाहाचे चवथे दिवशीं करावें. परंतु त्या दिवशीं यथोक्त ऋतुकाल नसल्यास, किंवा अन्य कांहीं अडचण प्राप्त झाली, तर पुढें दुसरा कोणताहि ऋतुकालाचा शुभ दिवस पाहून त्या दिवशीं गर्भाधान संस्कार करावा. स्त्रियांचा यथोक्त ऋतुकाल म्हणजे गर्भ धारण करण्याचा काल. हा ऋतुकाल रजो दर्शनापासून १६ दिवस पर्यंत असतो. ह्या ऋतुकालाच्या १६ दिवसांतील पहिल्या रजस्रावाच्या रोगकारक, उष्ण, निंद्य, दूषित ४ रात्री, व शरीरस्थ धातू-

ला दूषित करणाऱ्या ११ व्या व १३ व्या रात्री—मिळून ६ रात्री वर्ज करून बाकी १०* रात्री राहिल्या तो यथोक्त ऋतुकाल जाणावा: अर्थात् ५ वी, ६ वी, ७ वी, ८ वी, ९ वी, १० वी, १२ वी, १४ वी, १५ वी, व १६ वी या रात्री ऋतु कालाच्या जाणाव्या. परंतु त्यांत अमावास्या किंवा पौर्णिमा आली तर तीहि रात्र वर्ज करावी. व बाकी ऋतु कालाच्या रात्री ज्या राहिल्या त्या दिवसांतील कोणत्याहि एका दिवशीं गर्भाधान संस्कार करावा.

विधि:—वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त गर्भाधान दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वी, विवाह संस्कारांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड व तत्सन्निध एक शुभासन सिद्ध केलेलें असावें. व ९–१० व्या पृष्ठांवर लिहिल्या प्र-

---

* या दश रात्रींत दोन भेद आहेत. युग्म रात्री व अयुग्म रात्री. रजोदर्शनापासून ६ वी, ८ वी, १० वी, १२ वी, १४ वी व १६ वी या युग्म रात्री; व ५ वी, ७ वी, ९ वी व १५ वी ह्या अयुग्म रात्री जाणाव्या. व या रात्रीं पहिल्या १० घटिका व शेवटील १० घटिका रात्र सोडून बाकी मधल्या १० घटिका रात्रींत ऋतुदान करावें. युग्म रात्रीं यथोक्त कालीं ऋतुदान केल्यानें पुत्रोत्पत्ति होते. आणि अयुग्म रात्रीं यथोक्त कालीं ऋतुदान केल्यानें कन्योत्पत्ति होते. ऋतुकालाच्या रात्री शिवाय अन्य रात्री किंवा दिवसास—अयोग्य काळीं ऋतुदान केल्यानें गर्भ राहात नाहीं; तशांत कदाचित् राहिला, आणि संतानोत्पत्ति झालीच तर तें संतान अशक्त, रोगी, मतिमंद, अल्पायुषी नपुंसक असें निपजतें. त्याच प्रमाणें स्त्रीपुरुषांचीहि अवस्था होते: त्यांचें शारीरिक बळ व बुद्धिबळ क्षीण होऊन तीं निस्तेज, रोगी व अल्पायुषी होतात. तस्मात् अयोग्य कालीं, अयोग्य दिवशीं, व अयोग्य समयीं ऋतुदान करून व्यर्थ वीर्य हानि करून आपलें जीवित्व भंग करून घेऊं नये व अशक्त प्रजा उत्पन्न करूं नये.

माणें इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातः कालीं सूर्योदया पूर्वी वधू वरांनीं शुद्ध अभ्यंग स्नान करून उत्तम वस्त्रें परिधान करावीं. व पूर्वोक्त शुभासनावर (वराच्या दक्षिणांगीं वधू या प्रमाणें) पूर्वाभिमुख बसावें. व पुढें कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१-८ पृष्ठां पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहिता सह ईश्वरोपासना चालवावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष लावावें.

एणे प्रमाणें ईश्वरोपासना झाल्यावर पुढें- ११।१२ व्या पृष्ठावर सांगितल्या प्रमाणें इंधन द्रव्यानें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करावा. (एथें अग्नि घ्यावयाचा तो विशेषेंकरून वधू पितृ गृहाहून आणलेला विवाह होमाग्नि असावा.) आणि आहुती करितां घृत, आज्य स्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र, इत्यादि साहित्य यज्ञ कुंडा जवळ ठेवावें. व यज्ञ कुंडा सन्निध दक्षिण बाजूस पीठासनावर पुरोहिताची स्थापना करून कुंडा सन्निध पश्चिम भागीं वधू वरांनीं (वराच्या दक्षिणांगीं वधू या प्रमाणें) पूर्वाभिमुख बसावें. व नंतर पृष्ठ १३-१५, यांत सांगितल्या प्रमाणें प्रथम तीन आचमनें करावीं; व वरानें यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत व स्थालिपाक* (भात) हीं आहुती द्रव्यें सिद्ध

* हा स्थालिपाक (भात) करण्याचा विधि १५ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिला आहे. त्या प्रमाणें, **ॐ अग्नये पवमानाय त्वा जुष्टं निर्वपामि । ॐ अग्नये पावकाय त्वा जुष्टं निर्वपामि । ॐ अग्नये शुचये त्वा० । ॐ अदित्यै त्वा० । ॐ अग्नये स्विष्टकृते त्वा० । ॐ प्रजापतये त्वा० ।** हे मंत्र म्हणून प्रथम तांदूळ तयार करावे; आणि नंतर त्या मंत्रांच्या

करावीं; आणि नंतर आहुती देण्यास आरंभ करावा:—प्रथम "ॐ अयन्त इध्म०" या मंत्रानें समिधाधान ह्मणजे समिधांच्या आहुती द्याव्या: ( पृष्ठ १५ ) व नंतर यज्ञ कुंडा सन्निध उदक सिंचन करावें: ( पृष्ठ १६ ). पुढें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर त्या प्रज्वलीत समिधांवर प्रथम आघारावाज्य भागाहुती ४, व व्याहृति आहुती ४, मिळून ८ आज्याहुती द्याव्या: ( पृष्ठ १७ ). नंतर प्रधान* होमाहुतीस आरंभ करावा. ते होमाहुती मंत्र :—

**॥ ॐ अग्ने प्रायश्चित्ते त्वं देवानां प्रायश्चित्तिरसि ब्राह्मण स्त्वा नाथकाम उपधावामि याऽस्या: 'पापीलक्ष्मीस्तनू' स्तामस्या अपजहि, स्वाहा—इदमग्नये, इद०॥ १॥**

**॥ ॐ वायो प्रायश्चित्ते त्वं देवानां प्रायश्चित्तिरसि ब्राह्मण स्त्वा नाथकाम उपधावामि याऽस्या:'पापीलक्ष्मीस्तनू' स्तामस्या अपजहि, स्वाहा—इदं वायवे, इद०॥ २॥**

**॥ ॐ चंद्र प्रायश्चित्ते त्वं देवानां प्रायश्चित्तिरसि ब्राह्मण स्त्वा नाथकाम उपधावामि याऽस्या:'पापीलक्ष्मीस्तनू' स्तामस्या अपजहि, स्वाहा— इदं चंद्राय, इद न०॥ ३॥**

**॥ ॐ सूर्य प्रायश्चित्ते त्वं देवानां प्रायश्चित्तिरसि ब्राह्मण स्त्वा नाथकाम उपधावामि याऽस्या:'पापीलक्ष्मीस्तनू' स्तामस्या अपजहि स्वाहा—इदं सूर्याय, इद न मम ॥ ४॥**

**॥ अग्नि वायु चंद्र सूर्या: प्रायश्चित्तयो यूयं देवानां प्रा**

---

शेवटीं "निर्वपामि" ह्मणून जें पद आहे, त्याच्या बदली "**प्रोक्षामि**" हें पद लावून त्या मंत्रांनीं तांदूळ प्रक्षालन करावे (धुवावे). व नंतर त्याचा भात शिजवावा.

* या प्रधान होमाहुती देते समयीं वधूनें आपल्या दक्षिण हस्तानें वराच्या दक्षिण स्कंधाला स्पर्श करावा.

**यश्चित्तयः स्थ ब्राह्मणो वो नाथकाम उपधावामि या-ऽस्याः 'पापीलक्ष्मीस्तनू' स्तामस्या अपहत, स्वाहा–** इदमग्नि वायु चंद्र सूर्येभ्यः, इद न्न मम ॥५॥

या पंचिकेंतील प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ५ आज्याहुती प्रथम द्याव्या. नंतर या मंत्र पंचिकेंत "**पापीलक्ष्मीस्तनू**" असें जें पद आहे, त्या पद स्थानीं "**पतिघ्नीतनू**" हें पद पांचहि मंत्रांस लावून त्या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ५ आज्याहुती दुसऱ्या वेळीं द्याव्या. तदनंतर या "पतिघ्नीतनू" पद स्थानीं "**अपुत्र्यातनू**" हें पद जोडून प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ५ आज्याहुती तिसऱ्या वेळीं द्याव्या. पुढें त्या "**अपुत्र्यातनू**" स्थानीं "**अपसव्यातनू**" हें पद योजून प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ५ आज्याहुती चवथ्या वेळीं द्याव्या. या प्रमाणें एकंदर २० आहुती देऊन त्या प्रत्येक आहुतीचें शेष घृत एका कांशाच्या उदक पात्रांत (त्या-ल्यांत) जमवून ठेवावें.

पुढें स्थालिपाक (भात) एका पात्रावर आहुतीच्या मानाप्रमाणें थोडा काढून त्यांत तूप, दूध, साखर, असे पदार्थ मिश्र करून त्या मिश्र भाताच्या खालील मंत्रांनीं आहुती द्याव्या :—

**ॐ अग्नये पवमानाय स्वाहा**–इदमग्नये पवमानाय, इद०।
**ॐ अग्नये पावकाय स्वाहा**– इदमग्नये पावकाय, इद० ।
**ॐ अग्नये शुचये स्वाहा**–इदमग्नये शुचये, इद न्न मम ।
**ॐ अदित्यै स्वाहा**–इदमदित्यै, इद न्न मम ।
**ॐ प्रजापतये स्वाहा**–इदं प्रजापतये, इद न्न मम ।

या प्रत्येक मंत्रानें एकेक व "**ॐ यदस्य कर्मणो०**" (पृष्ठ १७) या स्विष्टकृत् मंत्रानें एक अशा भाताच्या ६ आहु-

ती द्याव्या. पुढें १५ आज्याहुती द्याव्या; त्या एणें प्रमाणें:—
प्रथमतः "ॐ त्वन्नो अग्ने०" (पृष्ठ १९—२०) इत्यादि
अष्टाज्याहुती मंत्रांनीं ८, व "ॐ भूरग्नये०" (पृष्ठ १७)
इत्यादि व्याहृति आहुती मंत्रांनीं ४, मिळून १२ आज्या-
हुती द्याव्या. तदनंतर,

॥ ॐ अयास्यग्नेर्वषट् कृतं यत्कर्मणात्यरीरिचं देवा गातु विदः स्वाहा—इदं देवेभ्यो गातु विद्भ्यः, इद न्न मम ॥

॥ ॐ प्रजापतये स्वाहा— इदं प्रजापतये, इद न्न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा दोन आज्याहुती द्याव्या. व शेवटीं स्विष्टकृत् मंत्रानें एक आज्याहुती द्यावी : (पृष्ठ १७). आणि या प्रत्येक आहुतीचें सुद्धां शेष घृत पूर्वोक्त कांशाच्या उदक पात्रांत जमवून ठेवावें. पुढें हें जमविलेलें घृत वधूनें घेऊन स्नान गृहांत जावें; व तेथें तें नखकेशान्त सर्वांगास लावून शुद्ध स्नान करावें. व पूर्ववत् उत्तम वस्त्रे धारण करून कुंडा सन्निध यावें. नंतर उभय वधू वरांनीं कुंडास प्रदक्षिणा करून सूर्यावलोकन करावें व ते समयीं,

॥ आदित्यं भर्गं पयसा समङ्ग्धि सहस्रस्य प्रतिमां विश्वरूपं। परिवृङ्ग्धि हरसा माभिमंस्थाः शतायुषं कृणुहि चीयमानः ॥

॥ सूर्यो नो दिवस्पातु वातो अंतरिक्षात्। अग्निर्नः पार्थिवेभ्यः ॥ ज्योषा सवितर्यस्य ते हरः शतं सवाँ अर्हति। पाहि नो दिद्युतः पतंत्याः ॥ चक्षुर्नो देवः संविता चक्षुर्न उत पर्व-

तः । चक्षुर्धाता दधातु नः ॥ चक्षुर्नो धेहि चक्षुषे चक्षुर्विख्यै तनूभ्यः।संचेदं वि च पश्येम॥ सु संदृशं त्वा वयं प्रति पश्येम सूर्य । वि पश्येम नृचक्षसः ॥ हे मंत्र ह्मणावे. व पुढें वधूनें,

॥ ॐ ( अमुक* ) **गोत्रा, शुभदा** ( अमुका† ) **दा अहं भो अभिवादयामि** ॥

असें ह्मणून आपल्या पतीस नमस्कार करावा. व तद्वत्च पतीच्या गोत्राचे वडील मनुष्यांस व इतर वडील गृहस्थ मंडळीस अभिवंदन करावें. या प्रमाणें वधू ही वर गोत्री झाल्यावर ( ह्मणजे वधूस पत्नित्व व वरास पतित्व प्राप्त झाल्यावर उभय पतिपत्नींनीं शुभासनावर पूर्वाभिमुख (पतीच्या दक्षिणांगीं पत्नी या प्रमाणें ) एकत्र बसावें. आणि २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें **वामदेव्य गान** ह्मणावें. नंतर यथोक्त‡ भोजन करावें. व पुरोहितादि सर्वत्र मंडळीस स-

* या स्थानीं वराचें गोत्र अर्थात् कुळाचें नांव प्रथमान्त घ्यावें.
† या स्थानीं वधूनें आपलें नांव प्रथमान्त ह्मणावें.

‡ उत्तम संतति होणें हें माता पित्यांच्या आहारावर विशेषतः अवलंबून आहे. तस्मात् आरोग्य, पुष्टि, बळ, बुद्ध्यादिकांची वृद्धि करणारें सर्वौषधीचें (वेखंड, आंबे हळद, हळद, चंदन, मुरा, कुष्ट, जटामांसी, मोरवेल, शिलाजित, कापूर, मुस्ता, भद्रमोथ, अशा औषधांचें ) चूर्ण सम भाग घेऊन औदुंबर काष्ठ पात्रांत गाईच्या दुधाशीं मिळवून दहीं करूं द्यावें. आणि नंतर तें दहीं औदुंबर काष्ठाच्या मंथनीनें ( रवीनें ) मंथन करून त्यांतून लोणी काढावें. आणि त्याचें घृत सिद्ध करून त्या घृतांत, केशर, कस्तूरी, जायफळ, वेलची-अशीं कांहीं सुगंधिक द्रव्यें किंचित् मिळवावीं. आणि नंतर त्या घृतांतून दर दिवस

न्मानार्थ उत्तम भोजन द्यावें व आदर सत्कार पूर्वक त्यांची यथाचार रवानगी करावी.

पुढें सायंकालीं संध्या होमादि नित्य कर्म आटोपून उभय पतिपत्नीनीं १० घटिका रात्री नंतर एकांत शयन गृहीं जावें. आणि तेथें शुभ शय्येवर पतीनें उत्तराभिमुख व पत्नीनें पूर्वाभिमुख बसावें. आणि नंतर पतीनें पत्नीच्या गर्भ स्थानाला हस्त स्पर्श करून,

॥ विष्णुर्योनिं कल्पयतु त्वष्टा रूपाणि पिंशतु ।
आ सिंचतु प्रजापतिर्धाता गर्भं दधातु ते ॥
॥ गर्भं धेहि सिनीवालि गर्भं धेहि सरस्वति ।
गर्भं ते अश्विनौ देवा वा धत्तां पुष्करस्रजा ॥

---

प्रातःकालीं थोडें घृत घेऊन उभयतांनीं नित्य होम करावा. आणि नंतर दुधांत उत्तम तांदूळ शिजवून क्षीर करून, किंवा दह्यांत किंवा पाण्यांत तांदूळ शिजवून भात करून त्यांत पूर्वोक्त घृत मिळवून, ती घृत युक्त क्षीर, किंवा तो घृत युक्त भात उभयतांनीं भक्षण करावा. तेणेंकरून सुशील, विद्वान, दीर्घायुषी, सतेज, सदृढ, निरोगी असे पुत्र उत्पन्न होतात. आणि त्याच प्रमाणें तांदूळ व तीळ एकत्र करून पाण्यांत शिजवून त्यांत पूर्वोक्त घृत मिळवून भक्षण करावें. तेणेंकरून तशाच उत्तम गुणाच्या कन्या प्राप्त होतात. तात्पर्य अशा प्रकारचे योग्य पदार्थ गर्भ धारण करणाऱ्या स्त्रीनें व तिच्या पतीनें सेवन केल्यानें त्यांची संतति, शारीरिक व मानसिक शक्तीनें सदृढ होऊन दीर्घायुषी होते. पूर्वोक्त घृत युक्त पदार्थ भक्षण करण्याचा सामान्य नियम असा आहे कीं, ऋतुदान करण्याचा शुभ दिवस शुक्ल पक्षांतील घेऊन तत्पूर्वी १२ दिवस व्रतस्थ राहावें; अर्थात् वर लिहिल्या प्रमाणें घृत युक्त भोजन करून, मिताहारी राहून ब्रह्मचर्य व्रत धारण करावें व नंतर ऋतुदान विधि करावा.

॥ हिरण्ययीं अरणी यं निर्मंथतो अश्विनां ।
तं ते गर्भं हवामहे दशमे मासि सूतवे ॥
॥ यथेयं पृथिवी मही भूतानां गर्भ मादधे ।
एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥
॥ यथेयं पृथिवी मही दाधारे मान्वनस्पतीन् ।
एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥
॥ यथेयं पृथिवी मही दाधार पर्वतान् गिरीन् ।
एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥
॥ यथेयं पृथिवी मही दाधार विष्ठितं जगत् ।
एवा ते ध्रियतां गर्भो अनु सूतुं सवितवे ॥

या मंत्रांनीं ईश्वराची आराधना करून ऋतु दान विधि करावा. वीर्य दान होते समयीं उभयतांनीं प्रेम व प्रीति पूर्वक स्थिर असावें; व परस्पर शरीर समोरासमोर सरळ राहूं देऊन, पतीनें मुख द्वारा प्राण वायु व पत्नीनें योनी द्वारा अपान वायु आकर्षण करून वीर्य स्थीर करावें. पुढें उभयतांनीं शारीर शांति झाल्यावर पृथक् होऊन ५।१० पळें राहून स्नान करावें, आणि पूर्ववत् शय्येवर बसावें. नंतर पतीनें आपल्या दक्षिण हस्तानें पत्नीच्या हृदयाला स्पर्शून,

॥ ओं यत्ते सुशीमे हृदयं दिवि चंद्रमसि श्रितं । वेदाहं तन्मां तद्विद्यात् पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शत१ं शृणुयाम शरदः शतम् ॥

या मंत्राचा जप करावा. व पुढें धातु वर्द्धक व सुगंध युक्त औषधी, थंड दुधाशीं यथारुचि सेवन करून उभयतांनीं

पृथक् पृथक् शय्येवर निद्रा घ्यावी. या रीतीनेंच* पुढें ऋतु दान विधि फक्त ऋतु कालींच करावा.

गर्भाधान संस्कार विधि समाप्त.

---

# गृहाश्रम संस्कार विधि.

———ooo———

**गृहाश्रम** :–ऐहिक व पारलौकिक सुख प्राप्त्यर्थ विवाह करून स्व शक्त्यनुसार परोपकार व नियमित कालीं यथाविधि ईश्वरोपासना करून सद्धर्मानें आयुष्य क्रमण करणें याचें नांव गृहाश्रम. स्त्री पुरुषांनीं प्रातःकालापासून रात्रौ निजेपर्यंत नियामित क्रमानें नित्य वागावें, त्याचा प्रकार :–

---

* पण दोन महिन्यांत गर्भ धारणा न झाली, तर तिसऱ्या महिन्यांत यथोक्त ऋतु कालीं पुष्य नक्षत्र युक्त दिवस पाहून त्या दिवशीं, जिच्या रूपा प्रमाणें वासराचें रूप असतें अशा गाईचें दहीं दोन माष, व भाजलेल्या यवाचें पीठ दोन माष, या प्रमाणें एकत्र करून तें पतीनें पत्नीच्या हस्तांत देऊन "**किं पिबसि**" असें त्रिवार विचारावें. नंतर तें दहीं पत्नीनें "**पुंसवनं**" असें त्रिवार सांगून प्यावें. या प्रमाणें दहीं त्रिवार प्रातःकालीं भोजना पूर्वी प्राशन करावें. व रात्रौ भूयरिंगणी ही औषधी पाण्यांत बारीक वांटून सूक्ष्म वस्त्रांतून गाळून काढलेला रस पत्नीच्या उजव्या नाकपुडींत थोडा पिळावा. व ते समयीं पतीनें,

**॥ ओ३म् इयमोषधी त्रायमाणा सहमाना सरस्वती । अस्याऽहं बृहत्याः पुत्रः पितुरिव नाम जग्रभम् ॥**

या मंत्र पाठानें जगन्नियंत्या परमात्म्याची प्रार्थना करावी. आणि पुढें यथोक्त ऋतु दान विधि करावा.

स्त्री पुरुषांनीं पहाटेस ह्मणजे सुमारें ४ घटिका रात्र असतां उठून प्रथम मनांत ईश्वर चिंतन करावें. व नंतर —त्या दिवशीं कोणकोणता व कोणकोणत्या रीतीनें व्यवहारिक उद्योग करावा, व शरीरांत रोगादि क्लेश असले तर औषधोपचार संबंधी कसकसे उपाय योजावे व स्व शक्त्यनुसार परोपकार कसा होईल इत्यादि आपल्या व्यवहारिक व पारमार्थिक कर्तव्य कर्मा विषयींचा विचार करून तत् सिध्यर्थ ईश्वरोपासना करावी; ते ईश्वरोपासनेचे मंत्र :—

॥ प्रातरग्निं प्रातरिन्द्रं हवामहे प्रातर्मित्रा वरुणा प्रातरश्विना । प्रातर्भगं पूषणं ब्रह्मणस्पतिं प्रातः सोममुत रुद्रं हुवेम ॥१॥ प्रातर्जितं भगमुग्रं हुवेम वयं पुत्रमदितेर्यो विधर्ता । आध्रश्चिद्यं मन्यमानस्तुरश्चिद्राजा चिद्यं भगं भक्षीत्याह ॥२॥ भूर्भुवः स्वः सुप्रजाः प्रजाभिः स्याᳬ सुवीरो वीरैः सुपोषः पोषैः । नर्य प्रजां मे पाहि । शᳬस्य पशून् मे पाहि । अथर्य पितुं मे पाहि ॥३॥ गृहा मा बिभीत मा वेपध्वमूर्ज्जं बिभ्रत एमसि । ऊर्ज्जं बिभ्रद्वः सुमनाः सुमेधा गृहानैमि मनसा मोदमानः ॥४॥ येषां मध्येति प्रवसन्येषु सौमनसो बहुः । गृहानुप ह्वयामहे ते नो जानन्तु जानतः ॥५॥ उपहूता इह गाव उपहूता अजावयः ।

अथोऽअन्नस्य कीलालऽउपहूतो गृहेषु नः । क्षेमाय वः शान्त्यै प्र पद्ये शिवꣳ शग्मꣳ शंयोः शंयोः ॥६॥

या प्रमाणें ईश्वरोपासना केल्यावर, शौच कर्म आटोपून हस्त पाद प्रक्षालन करावें. व नंतर दंत धावन* व मुख प्रक्षालन करून १३ व्या पृष्ठावर लिहिलेल्या मंत्रांनीं तीन आचमनें पूर्वाभिमुख राहून करावीं. व पुढें अर्ध किंवा पाव-कोस व्यायाम करून घरीं येऊन सूर्योदयापूर्वीं शुद्ध स्नान करावें. आणि शुद्ध धूत वस्त्रें धारण करून संधीच्या† ठायीं संध्योपासना ह्मणजे सृष्टिकर्त्या परमात्म्याची स्तुति, प्रार्थना व उपासना करावी. ती अशी :—

शुद्ध स्नान व शुद्ध वस्त्रें परिधान केल्या नंतर एकांत स्थळीं स्वच्छ आसनावर बसून,

॥ शं नो देवी रभिष्टय आपो भवन्तु पीतये । शं यो रभिस्रवन्तु नः ॥

हा मंत्र एकेक वेळ ह्मणून एकेक आचमन अशीं तीन आचमनें करावीं. नंतर खालील मंत्रांनीं इंद्रिय स्पर्श करावा :— ॐ वाक् वाक् । या मंत्रानें मुखाला. ॐ प्राणः प्राणः ।

---

* दंतधावनार्थ औदुंबर, बेल, अघाडा, निंब, जांब, सप्तपर्णी, कोन्हाटी, कदंब, करंज, बाभळ, आंवळ—अशा कोणत्याहि वृक्षाचें ओलें काष्ठ असावें. किंवा वैद्यक ग्रंथानुसार कांहीं मंजनाचाहि ( दांतवणाचा ) उपयोग करावा.

† रात्रीची समाप्ति व दिवसाचा आरंभ ही प्रातःकाल सन्धि, व दिवसाची समाप्ति आणि रात्रीचा आरंभ ती संध्याकाल सन्धि अशा दोनच सन्धि जाणाव्या.

यानें नाकपुडीला. ओं चक्षुः चक्षुः । यानें डोळ्यांला. ओं श्रोत्रम् श्रोत्रम् । यानें कानांला. ओं नाभिः । यानें नाभीला. ओं कंठः । यानें कंठाला. ओं शिरः । यानें मस्तकाला. ओं बाहुभ्यां यशो बलम् । यानें उभय बाहूंला. ओं करतल कर पृष्ठे । यानें हस्तांच्या तळव्यांला. या प्रमाणें प्रत्येक मंत्रानें प्रत्येक इंद्रियाला हस्त स्पर्श करावा. तदनंतर पुढील मंत्रांनीं मार्जन करावें; तें असें :—

ओं भूः पुनातु शिरसि । या मंत्रानें शिर प्रदेशीं,
ओं भुवः पुनातु नेत्रयोः । या मंत्रानें डोळ्यांवर,
ओं स्वः पुनातु कण्ठे । या मंत्रानें कण्ठावर,
ओं महः पुनातु हृदये । या मंत्रानें हृदयावर,
ओं जनः पुनातु नाभ्याम् । या मंत्रानें नाभी प्रदेशीं,
ओं तपः पुनातु पादयोः । या मंत्रानें पायांवर,
ओं सत्यं पुनातु पुनश्शिरसि । या मंत्रानें पुनः शिर प्रदेशीं,
ओं खं ब्रह्म पुनातु सर्वत्र । या मंत्रानें सर्वांगावर.

या प्रमाणें प्रत्येक मंत्रानें प्रत्येक अवयवावर दक्षिण हस्तांगुलांनीं किंवा कुशादि यज्ञीय तृणांनीं थोडें जल सिंचन करावें. पुढें **प्राणायाम** करावे ते असे :—

नाभीच्या खालील मुलेंद्रियापासून मोठ्या धैर्यानें अपान वायु नाभी प्रदेशीं आणावा. व तेथून ( नाभीहून ) तो अपान वायु तेथील समान वायु सह हृदयांत आणावा. पुढें हे दोन वायु व तिसरा हृदयस्थ प्राण वायु—हे तीन वायु हृदयांतून ऊर्ध्व आकर्षून नासिका द्वारें बाहेर आकाशांत मोठ्या जोरानें टाकून द्यावे. अर्थात् अत्यंत वांतीच्या जोरानें जसें मुखांतून अन्न बाहेर पडतें तद्वत् शरीरस्थ सर्व

वायु नासिका द्वारें बाहेर सोडावा. व तो वायु सामर्थ्य असे पर्यंत आंत न घेतां,

| | | | |
|---|---|---|---|
| ॐ भूः । | ॐ स्वः । | ॐ जनः । | ॐ सत्यम् । |
| ॐ भुवः । | ॐ महः । | ॐ तपः । | |

या प्राणायाम मंत्रांचा पाठ करावा. व चित्तांत स्वासावरोधनानें अत्यंत क्लेश वाटूं लागेल, तेव्हां बाहेरील वायु हळू हळू आंत घ्यावा.* या प्रमाणें कमींत कमी तीन प्राणायाम करावे. तदनंतर अघमर्षण (पापदूरीकरण) मंत्र ह्मणावे ते :—

॥ ऋतं च सत्यं चाभीद्धात्तपसोऽध्यजायत ।
ततो रात्र्य जायत ततः समुद्रो अर्णवः ॥१॥
॥ समुद्रा दर्णवा दधि संवत्सरो अजायत ।
अहोरात्राणि विदध द्विश्वस्य मिषतो वशी ॥२॥
॥ सूर्या चंद्रमसौ धाता यथा पूर्वमकल्पयत् ।
दिवं च पृथिवीं चान्तरिक्ष मथो स्वः ॥ ३ ॥

या तीन मंत्रांचा पाठ केल्यावर पूर्वोक्त "शंनो देवी०" या मंत्रानें पुनः तीन आचमनें करावीं. तदनंतर **परिक्रमण** मंत्रांनीं सर्व व्यापक परमेश्वराचें चिंतन करावें :—

* अशा प्रकारें वीस वेळां नित्य प्राणायाम केल्यानें प्राण वायु स्थीर होऊन त्या सह चित्तहि स्थीर राहातें. बुद्धि व ज्ञान वृद्धिंगत पावून गहन विषय समजण्याची शक्ति येते. शरीरांत बळ व पराक्रम यांची वृद्धि होते व वीर्यहि स्थीर राहातें. व मानसिक शक्ति तीव्र व प्रफुल्लित राहून स्मरण शक्ति वाढते. तस्मात् अधिकांत अधिक २० वेळां प्राणायाम करण्याचा नित्य अभ्यास असावा.

॥ प्राची दिगग्नि रधिपति रसितो रक्षितादित्या इषवः । तेभ्यो नमोऽधिपतिभ्यो नमो रक्षितृभ्यो नम इषुभ्यो नम एभ्यो अस्तु । योऽस्मान् द्वेष्टि यं वयं द्विष्मस्तं वो जंभे दध्मः ॥ १ ॥ दक्षिणा दिगिन्द्रोऽधिपतिस्तिरश्चिराजी रक्षिता पितर इषवः । * ० ॥ २ ॥ प्रतीची दिग् वरुणोऽधिपतिः पृदाकू रक्षितान्न मिषवः । * ० ॥ ३ ॥ उदीची दिक् सोमोऽधिपतिः स्वजो रक्षिताशनिरिषवः । * ० ॥ ४ ॥ ध्रुवा दिग्विष्णु रधिपतिः कल्माष ग्रीवो रक्षिता वीरुध इषवः । * ० ॥ ५ ॥ ऊर्ध्वा दिग् बृहस्पति रधिपतिः श्वित्रो रक्षिता वर्ष मिषवः । * ० ॥ ६ ॥

या प्रत्येक मंत्रानें अनुक्रमें पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, अधर, व ऊर्ध्व या दिशांचें मनांत चिंतन करून परमात्म्याची प्रार्थना करावी. पुढें **उपस्थान** मंत्रांनीं परमात्म्याची उपासना करावी; ते मंत्र :—

॥ जातवेदसे सुनवाम सोम मरातीयतो नि दहाति वेदः । स नः पर्षदति दुर्गाणि विश्वा नावेव सिंधुं दुरितात्यग्निः ॥

---

* या पूर्वार्ध मंत्र भागा पुढें—पहिल्या मंत्रा प्रमाणेंच **तेभ्यो नमो** इत्यादि उत्तरार्ध भागाचे दोन चरण लावून मंत्र पूर्ण म्हणावे.

॥ चित्रन् देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः । आप्रा द्यावा पृथिवी ऽ अन्तरिक्षꣳ सूर्य्य ऽ आत्मा जगतस्तस्थुषश्च स्वाहा ॥

॥ उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः ।
दृशे विश्वाय सूर्यम् ॥

॥ उद्वयन् तमसस्परि स्वः पश्यन्त उत्तरम् ।
देवं देवत्रा सूर्य्य मगन्म ज्योतिरुत्तमम् ॥

॥ तच्चक्षुर्देवहितं पुरस्ताच्छुक्र मुच्चरत् । पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतꣳ शृणुयाम शरदः शतं प्रब्रवाम शरदः शतमदीनाः स्याम शरदः शतं भूयश्च शरदः शतात् ॥

॥ नमो ब्रह्मणे नमो अस्त्वग्नये नमः पृथिव्यै नम ओषधीभ्यः । नमो वाचे नमो वाचस्पतये नमो विष्णवे महते करोमि ॥

हे मंत्र म्हटल्यानंतर प्रणव व व्याहृति यां सहीत गायत्री मंत्रानें परमात्म्याचें ध्यान करावें, तो मंत्र :—

॥ ॐ भूर्भुवःस्वः । तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् ॥

या गायत्री मंत्राचा करवेल तेवढा जप करून शेवटीं,

॥ नमः शम्भवाय च, मयोभवाय च,

नमः शंकराय च, मयस्कराय च,
नमः शिवाय च, शिवतराय च ॥

या मंत्रानें परमेश्वराला अंतःकरण पूर्वक अनन्यभावें नमस्कार करावे. या प्रमाणें सूर्योदया पूर्वी प्रातः संध्योपासना विधि करावा; तदनंतर अग्निहोत्र विधि करावा ते असा :—

पृष्ठ ८।११ यांत दर्शविल्या प्रमाणें एक कुंड धातूचें किंवा मातीचें घरांत तयार करून त्या सन्निध यज्ञीय वृक्षांचीं—यज्ञ कुंड प्रमाण काष्ठें; व घृत घेऊन त्यांत यथा शक्त्या केशर, कस्तूरी आदि सुगंधिक द्रव्य मिळवून तें घृत सिद्ध करून पूर्वी ठेवलेलें असावें. पुढें उभय स्त्री* पुरुषांनीं यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख वसून समिधा काष्ठांनीं अग्नि प्रज्वलित करावा आणि त्यांत,

॥ सूर्यो ज्योति ज्योतिः सूर्यः स्वाहा ॥१॥ सूर्यो वर्चो ज्योतिर्वर्चः स्वाहा ॥२॥ ज्योतिः सूर्यः सूर्यो ज्योतिः स्वाहा ॥३॥ सजूर्देवेन सवित्रा सजूरुषसेन्द्रवत्या । जुषाणः सूर्यो वेतु स्वाहा† ॥४॥ ॐ प्रजापतये स्वाहा ॥

---

* स्त्री किंवा पुरुष यांतून कोणी कांहीं कारणामुळें असमर्थ असेल किंवा सन्निध नसेल तर एकट्या पुरुषानें किंवा एकट्या स्त्रीनेंच हा प्रातःकाल होम व तसाच सायंकाल होम करावा.

† संध्या काल समयीं या ४ मंत्रांबद्दल खालील मंत्र योजावे :—
॥ अग्निर्ज्योति ज्योतिरग्निः स्वाहा ॥ अग्निर्वर्चो ज्योतिर्वर्चः स्वाहा ॥ सजूर्देवेन सवित्रा सजूरात्र्येन्द्रवत्या । जुषाणोऽअग्निर्वेतु स्वाहा ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक—अशा—त्या सिद्ध केलेल्या घृताच्या पांच आहुती स्रुवानें (पळीनें) द्याव्या.*

एणें प्रमाणें स्नान, संध्या, व अग्निहोत्र विधि एक घटिका दिवस येण्या पूर्वी आटोपून, नंतर गृहस्थानें आपल्या व्यवहारीक उद्योगास, व स्त्रीनें पाक सिद्धि आदि गृह्य कृत्याच्या व्यवस्थेकडेस लागावें. पुढें पाक सिद्ध झाल्यावर देव यज्ञ (वैश्व देव) करावा; तो असा:—

पूर्वोक्त यज्ञ कुंडांत पाक सिद्ध केलेला अग्नि स्थापन करून त्याजवर समिधा काष्ठें रचून अग्नि प्रदीप्त करून त्यांत,

**॥ ओँ सूर्याय स्वाहा । ओँ प्रजापतये स्वाहा । ओँ सोमाय वनस्पतये स्वाहा । ओँ अग्नीषोमाभ्यां स्वाहा । ओँ इंद्राग्निभ्यां स्वाहा । ओँ द्यावा पृथिवीभ्यां स्वाहा । ओँ धन्वन्तरये स्वाहा । ओँ इंद्राय स्वाहा । ओँ विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा । ओँ ब्रह्मणे स्वाहा ॥**

हा प्रत्येक मंत्र बोलून घृत मिश्रित सिद्ध भाताची एकेक आहुती द्यावी. पुढें भूत यज्ञ (बलि हरण) करावा. तो असा:—

**॥ ओँ सूर्याय नमः । ओँ प्रजापतये नमः । ओँ सोमाय वनस्पतये नमः । ओँ अग्नीषोमाभ्यां नमः । ओँ इंद्राग्निभ्यां नमः । ओँ द्यावा पृथिवीभ्यां नमः । ओँ धन्वन्तरये नमः । ओँ इंद्राय नमः । ओँ विश्वेभ्यो देवेभ्यो नमः । ओँ ब्रह्मणे नमः । ओँ अद्भ्यो नमः । ओँ ओषधि वनस्पतिभ्यो नमः । ओँ गृहाय नमः । ओँ गृह देवताभ्यो नमः । ओँ वास्तु देवताभ्यो नमः ॥**

---

* विशेष आहुती देण्याचें सामर्थ्य असल्यास गायत्री मंत्रा पुढें **स्वाहा** पद लावून त्या मंत्रानें आहुती द्याव्या.

या प्रत्येक मंत्रानें एकेक बलि ( थोड थोडा भात ) एका पात्रावर सभोंवती ठेवावा. नंतर,

**॥ ॐ इंद्राय नमः । ॐ इंद्र पुरुषेभ्यो नमः । ॐ यमाय नमः । ॐ यम पुरुषेभ्यो नमः । ॐ वरुणाय नमः । ॐ वरुण पुरुषेभ्यो नमः । ॐ सोमाय नमः । ॐ सोम पुरुषेभ्यो नमः ॥**

ह्या ८ मंत्रांतील पहिल्या दोन मंत्रांनीं पूर्व दिशेस, दुसऱ्या दोन मंत्रानीं दक्षिणेस, तिसऱ्या दोन मंत्रांनीं पश्चिमेस, व चवथ्या दोन मंत्रांनीं उत्तरेस, या प्रमाणें पात्रावर दर एक दिशेस दोन दोन बलि ठेवावे. व नंतर,

**॥ ॐ ब्रह्मणे नमः । ॐ ब्रह्म पुरुषेभ्यो नमः । ॐ विश्वेभ्यो देवेभ्यो नमः । ॐ सर्वेभ्यो भूतेभ्यो दिवाचारिभ्यो नमः । ॐ नक्तं चारिभ्यो नमः ॥**

या प्रत्येक मंत्रानें एकेक असे ५ बलि मध्य भागीं द्यावे. व शेवटीं **ॐ रक्षोभ्यो नमः ।** या मंत्रानें उत्तर दिशेस एक व यज्ञोपवीत अपसव्य करून " **ॐ स्वधा पितृभ्यो नमः**" या मंत्रानें दक्षिण दिशेस एक असे दोन बलि ठेवावे. पुढें सर्व बलि भाग एकत्र करून कोणत्याहि प्राण्याच्या मुखीं लावावे. नंतर **नर यज्ञ** (अतिथि सत्कार) करावा. तो असा :—

पूर्वोक्त भूत यज्ञ झाल्यावर गृहस्थानें गृह द्वारीं सुमारें ५—१० पळें अतिथीची वाट पहावी. इतक्यांत कोणी विद्यार्थी, ब्रह्मचारी, संन्यासी (परोपकारी, सत्योपदेशक, साधु संत), अथवा केवळ निरपेक्ष पणानें लोक कल्याणार्थ व देश सुधारणार्थ झटणारा असा कोणी सद्गुणी सुपात्र* आला तर

* पण ठक, ढोंगी, लबाड, हिंसक, पाखंडी, असा कोणी कुपात्र, साधूचा व ईश्वर भक्ताचा वेश धरून आल्यास,

त्यास, तसाच अनाथ, लाचार, आंधळा, पांगळा असा दुःखी माणूस कोणी आल्यास, त्याला मोठ्या प्रेमानें आसन देऊन बसवावा. आणि अन्नोदकानें सत्कार करून त्याला प्रसन्न करावा. आणि नंतर गृहस्थानें सह कुटुंब भोजन करावें.

या प्रमाणें भोजन करून पुनः संध्या काल पर्यंत आपल्या व्यवहारीक उद्योगास लागावें. पुढें सूर्यास्त झाल्या नंतर घरीं राहून प्रातः काला प्रमाणें पुनः संध्या कालीं संध्योपासना व अग्निहोत्र विधि करावा. आणि नंतर यथोक्त भोजन करून स्वताच्या उद्योगास लागावें. पण १० घटिका रात्री नंतर ईश्वर स्मरण करून शयन करावें. या प्रमाणें नित्य कर्तव्य कर्म जाणावें.

आतां **पक्ष यज्ञ** :—पक्ष यज्ञ, दर पंधरवड्यास—पौर्णिमा व अमावास्या या दिवशीं करावा. त्याचा विधि :— पौर्णिमेच्या दिवशीं प्रातः कालीं नित्य अग्निहोत्राच्या आहुती दिल्यावर खालील मंत्रांनीं विशेष आहुती द्याव्या :—**ॐ अग्नये स्वाहा। ॐ अग्नीषोमाभ्यां स्वाहा। ॐ विष्णवे स्वाहा।** या प्रत्येक मंत्रानें एकेक व १७ व्या पृष्ठावर लिहिलेल्या **स्विष्टकृद् होमाहुती** मंत्रानें एक अशा स्थालिपाकाहुती प्रथम द्याव्या. व शेवटीं १७ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें ४ व्याहृति आहुती द्याव्या. याच प्रमाणें अमावास्येस होम करावा. पण त्यांत भेद एवढाच कीं, "**ॐ अग्नीषोमाभ्यां स्वाहा**" या मंत्रा बदली "**ॐ इंद्राग्निभ्यां स्वाहा**" हा मंत्र योजावा. या प्रमाणें पक्ष यज्ञ विधि जाणावा.

---

त्याचा या प्रमाणें सत्कार करूं नये. कारण कुपात्रीं दान, मान, व सत्कार केलेला व्यर्थ जातो. व अशा कुपात्र मनुष्यांला मदत अर्थात् सत्कार करणारा दोषी ठरून ईश्वराचा अपराधी होतो.

आतां वार्षिक धान्योत्पत्ति यज्ञ. हा यज्ञ प्रत्येक वर्षी नवें धान्य उत्पन्न झाल्यावर करावयाचा; त्याचा विधि :— नव्या धान्याची कापणी (लाणी) झाल्यावर २२व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें शुभ दिवस योजून त्या दिवशीं शेतांत* मंडप उभारून त्यांत यज्ञ कुंड सिद्ध करावें, आणि नंतर प्रारंभीं (पृष्ठ १–८ पर्यंत) लिहिल्या प्रमाणें ईश्वरोपासना करून त्या कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि प्रज्वलीत करावा. व त्यांत १७ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें प्रथम आघारावाज्य भागाहुती ४ व व्याहृति आहुती ४ मिळून ८ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर,

॥ ओं पृथिवी द्यौः प्रदिशो दिशो यस्मै द्युभिरावृताः।
तमिहेंद्र मुप व्हये शिवा नः सन्तु हेतयः स्वाहा ॥
॥ ओं यन्मे किंचिदुपेप्सित मस्मिन् कर्मणि वृत्रहन्।
तन्मे सर्वꣳ समृध्यतां जीवतः शरदः शतꣳ स्वाहा ॥
॥ ओं सम्पत्ति र्भूति र्भूमि र्वृष्टि र्ज्यैष्ठ्यꣳ श्रैष्ठ्यꣳ श्रीः प्रजा मिहावतु स्वाहा— इदमिंद्राय, इद न्न मम ॥
॥ ओं यस्या भावे वैदिक लौकिकानां भूति र्भवति कर्मणां। इन्द्रपत्नी मुप व्हये सीताꣳ सामेत्वनपायिनी भूयात् कर्मणि कर्मणि स्वाहा—इदमिंद्रपत्न्यै, इद न्न मम ॥
॥ ओं अश्वावती गोमती सूनृतावती बिभर्ति या प्राणभृतो अतंद्रिता। खला मालिनी मुर्वरामस्मिन् कर्मण्युप व्हये ध्रुवाꣳ सामेत्वनपायिनी भूयात्स्वाहा—सीतायै०॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा प्रधान होमाच्या ५ आज्या-

* शहरांतील रहाणारे लोक ज्यांस शेतें नसतात, त्यांणीं हा धान्योत्पत्ति यज्ञ स्व गृहींच करावा.

हुती द्याव्या. आणि त्या नंतर, **ॐ सीतायै स्वाहा । ॐ प्रज्ञायै स्वाहा । ॐ शमायै स्वाहा । भूत्यै स्वाहा ।** या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ४, व स्विष्टकृत् होमाहुती मंत्रानें १, अशा ५ स्थालिपाकाहुती द्याव्या. आणि शेवटीं अष्टाज्याहुती ८, व्याहृति आहुती ४ अशा १२ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर तेथून उठून अन्यत्र शुभासनीं बसून २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें **वामदेव्य गान** द्वारा ईश्वरोपासना करावी.

आतां **ब्रह्म यज्ञ** व **पितृ यज्ञ** ह्मणजे प्रत्येक मनुष्यानें या जगांत सदैव कोणत्या रीतीनें वागावें त्याचा प्रकारः--

**ब्रह्म यज्ञ** ह्मणजे संध्योपासनादि कर्म निष्काम वृत्तीनें करणें, व वेदादि सद्विद्यांचें पठन पाठन निरपेक्ष बुद्धीनें करविणें तो. आणि **पितृ यज्ञ** ह्मणजे देव, ऋषि, पितरादि श्रेष्ठ, सद्धर्मी लोकांचा आदर, सत्कार करून त्यांची सेवा करणें अर्थात् त्यांना सदैव संतुष्ट ठेवणें तो; देव-अर्थात् महा विद्वान्, निःपक्षपाती, व दिव्य काम व परोपकार करणारे पुरुष जाणावे; ऋषि-अर्थात् वेदादि सद्विद्यांचें विवेचन पूर्वक अध्ययन केवळ निरपेक्ष बुद्धीनें करविणारे पुरुष जाणावे; आणि पितर-अर्थात् माता पितादि वडील, वृद्ध पुरुष, जे सद्धर्मी, श्रेष्ठ, ज्ञानी, ईश्वर भक्त होत; असे सर्व पुरुष पूज्य असून त्यांचा सदैव व सर्वत्र सन्मान राखावा. आणि मोठ्या प्रीतीनें सेवा, सत्कार करून त्यांना जीवंत असे पर्यंत सदा प्रसन्न ठेवावें-हाच पितृ यज्ञ होय. या प्रमाणें सृष्टि क्रमा संबंधी हे दोन मुख्य यज्ञ होत, त्यांचें प्रत्येक पुरुषानें प्रेम भावानें सदैव रक्षण करावें.

एणें प्रमाणें प्रत्येक गृहस्थानें आचरण ठेवून सद्धर्मानें

व सुनीतीनें चालावें. सदैव जितेंद्रिय व सुशिक्षित रहावें. निर्वैर बुद्धीनें सर्व भूत मात्राशीं वर्तावें; पण हिंसक, दुर्व्यसनी, व छंदी अशा दुष्ट पुरुषां पासून सदा दूर रहावें.

**गृहाश्रम संस्कार विधि समाप्त.**

---

# पुंसवन संस्कार विधि.

——000——

**पुंसवन** :— पुरुषत्वाचें अर्थात् गर्भाचें योग्य धारण, संरक्षण व जनन होऊन त्याची प्राप्ति व्हावी, व शरीरांत वीर्य चांगलें जमून त्याच्या अंगीं स्थिरता, दृढता व नैरोग्य हे गुण यावे; या उद्देशानें केलेला जो विधि तो पुंसवन होय.

**काल** :— हा पुंसवन संस्कार गर्भाचें स्पष्ट ज्ञान झाल्या नंतर गर्भ मासापासून अर्थात् गर्भ धारण झाल्या पासून दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यांत, शुक्ल पक्षांत — ज्या दिवशीं पुनर्वसु, पुष्य, अनुराधा, अश्विनी, मृगशीर्ष, मूळ, श्रवण, रेवती अशा एखाद्या पुल्लिंग वाचक नक्षत्रानें युक्त चंद्र असेल — त्या दिवशीं प्रातः कालीं करावा.

**विधि** :— वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त पुंसवन दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वी, पृष्ठ ८—१०, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड बांधावें. व त्याच्या बाजूस गर्भिणीला बसण्या साठीं एक शुभासन सिद्ध करावें; व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातःकालीं सूर्योदय समयीं गर्भिणीनें व तिच्या पतीनें शुद्ध स्नान करून उत्तम वस्त्रें परिधान करावीं, नंतर

उभयतांनीं (पतीच्या दक्षिणांगीं पत्नी या प्रमाणें) पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें. व पुढें कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह **ईश्वरोपासना** चालवावी. व तिकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष लावावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्यावर, पृष्ठ ११।१२, यांत दर्शविल्या प्रमाणें इंधन द्रव्यानें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, आज्य स्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र, इत्यादि साहित्य यज्ञ कुंडा जवळ तयार ठेवावें, आणि नंतर पुरोहिताची स्थापना करून गर्भिणीनें व तिच्या पतीनें यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख बसावें व पृष्ठ १३, यांत सांगितल्या प्रमाणें तीन आचमनें करावीं. नंतर पतीनें यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत व स्थालिपाक* सिद्ध करावा: (पृष्ठ १४।१५) व नंतर "**ओं अयन्त इध्म०**" (पृष्ठ १५) या मंत्रानें समिधाधान करावें. पुढें त्या यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर त्या पेटलेल्या समिधांवर, प्रथम **आघारावाज्य भागाहुती** ४, व **व्याहृति आहुती** ४, मिळून ८ आज्याहुती द्याव्या: (पृष्ठ १७) व नंतर, **ओं प्रजापतये स्वाहा** (पृष्ठ १९)

---

* हा स्थालिपाक (भात) करण्याचा विधि १५ व्या पृष्ठावर पूर्ण लिहिला आहे. त्या प्रमाणें, **ओं प्रजापतये त्वा जुष्टं निर्वपामि। ओं अग्नये स्विष्टकृते त्वा जुष्टं निर्वपामि।** हे मंत्र ह्मणून प्रथम तांदूळ तयार करावे; आणि नंतर त्याच मंत्रांच्या शेवटीं "निर्वपामि" ह्मणून जें पद आहे, त्याच्या बदलीं "**प्रोक्षामि**" हें पद लावून त्या मंत्रांनीं तांदूळ प्रक्षालन करावे (धुवावे). व नंतर त्याचा भात शिजवावा.

या मंत्रानें एक व "ॐ यदस्य कर्मणो०" ( पृष्ठ १७ ) या मंत्रानें एक अशा दोन स्थालिपाकाहुती द्याव्या. व शेवटीं अष्टाज्याहुती ८ (पृष्ठ १९।२०) व व्याहृति आहुती ४ (पृष्ठ १७) अशा १२ आज्याहुती द्याव्या. तदनंतर उभयतांनीं तेथून उठून पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें. पुढें पतीनें पत्नीच्या पृष्ठ प्रदेशीं राहून आपल्या दक्षिण हस्तानें प्रथमतः तिच्या दक्षिण स्कंधाला स्पर्श करावा. नंतर वस्त्रानें आच्छादित अशा तिच्या नाभी प्रदेशीं,

॥ ॐ पुमाꣳसौ मित्रा वरुणौ पुमाꣳसा वश्विना वुभौ।
पुमा नग्नि श्च वायु श्च पुमान् गर्भ स्तवोदरे ॥
॥ ॐ पुमा नग्निः पुमानिन्द्रः पुमान् देवो बृहस्पतिः।
पुमाꣳसं पुत्रं विन्दस्व तं पुमाननु जायताम् ॥

या दोन मंत्रांनीं हस्त स्पर्श करावा. नंतर गर्भिणीला सूर्य किरण नसलेल्या वन दाट छायेंत बसवून तिच्या उजव्या नाकपुडींत दूर्वांचा रस सूक्ष्म वस्त्रानें गाळून थोडा पिळावा व ते समयीं,

॥ ॐ आ ते गर्भो योनिमेतु पुमान् वाण इवेषुधिम्।
आ वीरो जायतां पुत्रस्ते दशमास्यः ॥१॥
॥ ॐ अग्निरेतु प्रथमो देवतानां सोऽस्यै प्रजां मुंचतु मृत्युपाशात्। तदयं राजा वरुणोऽनुमन्यतां यथेयं स्त्री पौत्र मघं न रोदात् ॥२॥

हे दोन मंत्र ह्मणावे. नंतर पत्नीच्या हृदयाला हस्त लावून,

॥ ॐ यत्ते सुसीमे हृदये हितमन्तः प्रजापतौ।
मन्येऽहं मां तद्विद्वांसमाह पौत्र मघन्नियाम् ॥

हा मंत्र ह्मणावा. आणि नंतर २१ व्या पृष्ठावर लिहिल्या

प्रमाणें वामदेव्य गान ह्मणावें. तदनंतर शेवटीं कार्यार्थ आलेल्या लोकांची यथाचार रवानगी करावी. पुढें रात्रौ वट वृक्षाचे कोंवळे अंकुर किंवा सोम लता (एक जातीची वेल) वाटून त्याचा रस सूक्ष्म वस्त्रानें गाळून तो रस गर्भिणीच्या उजव्या नाकपुडींत थोडा पिळावा व ते समयीं,

॥ हिरण्य गर्भः सम वर्त्तताग्रे भूतस्य जातः प-
तिरेक ऽ आसीत्। स दाधार पृथिवीं द्यामुते
मां कस्मै देवाय हविषा विधेम ॥१॥

॥ अद्भ्यः संभृतः पृथिव्यै रसा च्च विश्व कर्मणः
सम वर्त्तताग्रे। तस्य त्वष्टा वि दधद्रूपमेति
तन्मर्त्यस्य देवत्वमा ऽ जान मग्रे ॥२॥

हे दोन मंत्र ह्मणावे. पुढें गर्भिणीच्या गर्भ स्थानाला स्पर्शून,

॥ सुपर्णोसि गरुत्मां स्त्रिवृत्ते शिरो गायत्रं चक्षु
र्बृहद्रथन्तरे पक्षौ। स्तोमऽआत्मा छंदा ᳪ स्यं
गानि यजू ᳪ षि नाम। साम ते तनू र्वामदेव्यं
यज्ञाय ज्ञियं पुच्छं धिष्ण्याः शफाः। सुपर्णो-
सि गरुत्मान् दिवं गच्छ स्वः पत ॥

हा मंत्र ह्मणावा. या प्रमाणें हा पुंसवन संस्कार केल्या नंतर त्या दिवसा पासून गर्भिणी स्त्रीनें नियमित आचरण ठेवावें तें असें:— रात्रौ १० घटिका रात्रीहून जास्त जागरण करूं नये. नित्य नियमित माना पेक्षां अधिक किंवा कमी निजूं नये. फार बोलूं नये; पुष्कळ हंसूं नये; मुळींच रडूं नये; मन दिल-

गीर व दुःखी ठेवूं नये; क्रोध आणूं नये; मोठ्या जोरानें चालूं नये; ओझें वाहूं नये; पुर्ण चवकशी व विचार केल्या वांचून औषध घेऊं नये; क्षार, खारट, आंबट, व तिखट पदार्थ भक्षण करूं नयेत; जेवण खाण साधें व नियमित ठेवावें; सुगंधिक द्रव्य अंगास लावावें, व उष्णोदकानें स्नान करावें; मन सदा आनंदानें प्रफुल्लित ठेवावें; आणि पुंसवन संस्कार झाल्या दिवसा पासून उभय स्त्री पुरूषांनीं प्रसूति होऊन निदान ४।६ महिने अर्थात् प्रसूतीचें शरीर पूर्ववत् आकुंचित व सदृढ होई तों पर्यंत ब्रह्मचर्य वृत्तीनें राहावें.

**पुंसवन संस्कार विधि समाप्त.**

# सीमन्तोन्नयन संस्कार विधि.

——ooo——

**सीमन्तोन्नयन** :– गर्भिणी स्त्रीचें मन संतोषी, व शरीर प्रफुल्लित व आरोग्य राहून गर्भाची स्थिति उत्कृष्ट राहावी व त्याची दिवसें दिवस उन्नति व्हावी, एतदर्थ ईश्वरोपासनादि नियमित विधि करणें याचें नांव सीमन्तोन्नयन. सीमन्त=व्याप्ति, स्थिति. उन्नयन=उन्नति, उत्कृष्टपणा.

**काल** :– हा सीमन्तोन्नयन संस्कार, गर्भ मासा पासून अर्थात् गर्भ धारण झाल्या पासून ४ थ्या, ६ व्या, किंवा ८ व्या महिन्यांत शुक्लपक्षीं–ज्या दिवशीं पुनर्वसु, पुष्य, अनुराधा, मूळ, श्रवण, अश्विनी, किंवा मृगशीर्ष–अशा पुल्लिंग वाचक नक्षत्रानें युक्त चंद्र असेल, त्या दिवशीं करावा. त्याचा आरंभ प्रातःकालीं अर्थात् मध्यान्ह काला पूर्वी केलेला असावा.

**विधि** :— वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त सीमन्तोन्नयन दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वी, पृष्ठ ९–११, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड, व त्याच्या बाजूस गर्भिणीला बसण्या करितां एक शुभासन सिद्ध करावें व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातःकालीं सूर्योदय समयीं, गर्भिणीनें व तिच्या पतीनें शुद्ध स्नान करून उत्तम वस्त्रें परिधान करावीं. नंतर उभयतांनीं (पतीच्या दक्षिणांगीं पत्नी या प्रमाणें) पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें व पुढें–कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "**अग्नि-मीळे०**" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह **ईश्वरोपासना** चालवावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य लावावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्यावर पृष्ठ ११–१२, यांत दर्शविल्या प्रमाणें इंधन द्रव्यानें यज्ञ कुडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, समिधा, आज्य स्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि साहित्य यज्ञ कुंडा सन्निध ठेवावें आणि नंतर पुरोहिताची स्थापना करून गर्भिणीनें व तिच्या पतीनें यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख बसावें व पृष्ठ १३ यांत दर्शविल्या प्रमाणें तीन आचमनें करावीं. नंतर पतीनें यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत व स्थालिपाक*

* या संस्कारांत "**ओं प्रजापतये त्वा जुष्टं निर्वपामि**" या मंत्रानें तांदूळ, तीळ, व मूग हे सम भाग घेऊन ते कांडून पाखडून तयार करावे. आणि ते "**ओं प्रजापतये त्वा जुष्टं प्रोक्षामि**" या मंत्रानें प्रक्षालन करून (धुऊन) त्याचा भात अर्थात् खिचडी सिद्ध करावी.

( भात ) सिद्ध करावा. ( पृष्ठ १४–१५ ) व नंतर " ओ३म् **अयन्त इध्म०** " ( पृष्ठ १५ ) या मंत्रानें सामिधाधान करावें. तदनंतर " ओ३म् अदिते अनुमन्यस्व " ( पृष्ठ १६ ) इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडाच्या बाजूंस व " ओ३म् **देव सवितः प्र-सुव०** " ( पूर्ण मंत्र पृष्ठ ३६ ) या मंत्रानें कुंडा सभोंवती उदक सिंचन करावें. पुढें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर, त्या पेटलेल्या समिधांवर प्रथम **आघारावाज्य भागाहुती** ४, व व्याहृति आहुती ४, मिळून ८ आज्या-हुती द्याव्या; ( पृष्ठ १७ ) आणि नंतर प्रधान होम करावा; ते होमाहुती मंत्र :—

॥ धाता ददातु दाशुषे प्राचीं जीवातु मुक्षितं वयं देवस्य धीमहि। सुमतिं वाजिनीवति, स्वाहा* ॥ १ ॥

॥ धाता प्रजानामुतराय ऽ ईशे धात्रेदं विश्वं भुवनं जजान। धाता कृष्टी रनिमिषा भिचष्टे धात्र ऽ इद्धव्यं घृतवज्जुहोत, स्वाहा ॥ २ ॥

॥ राकामहं सुहवां सुष्टुती हुवे शृणोतु नः सुभगा बोधतु त्मना। सीव्यत्वपः सूच्या च्छिद्यमानया ददातु वीरं शतदायमुक्थ्यं, स्वाहा ॥ ३ ॥

॥ यास्ते राके सुमतयः सुपेशसो याभि र्ददासि

* एथून लिहिलेल्या सात मंत्रां पैकीं पहिल्या दोन मंत्रांतीं (स्वाहा पदा नंतर) "इदं धात्रे, इद न्न मम," दुसऱ्या दोन मंत्रांतीं "इदं राकाया, इद न्न मम," व बाकी तीन मंत्रांतीं "इदं विष्णवे, इद न्न मम" असा त्याग सर्वत्र योजावा.

दाशुषे वसूनि । ताभिर्नो अद्य सुमना उपागहि सहस्रपोषं सुभगे रराणा, स्वाहा ॥४॥

॥ नेजमेष परापत सुपुत्रः पुनरापत । अस्यै मे पुत्रकामायै गर्भ मा धेहि यः पुमान् स्वाहा॥५॥

॥ यथेयं पृथिवी मह्युत्ताना गर्भ मा दधे। एवं तं गर्भ माधेहि दशमे मासि सूतवे स्वाहा ॥६॥

॥ विष्णोः श्रेष्ठेन रूपेणास्यां नार्यांगवीन्याम् । पुमांसं पुत्राना धेहि दशमेमासिसूतवेस्वाहा॥७॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा ७ व "ॐ प्रजापते न त्व०" (पृष्ठ १८) या मंत्रानें एक मिळून ८ आज्याहुती द्याव्या. तदनंतर "ॐ प्रजापतये०" (पृष्ठ १९) या मंत्रानें प्राजापत्य आहुती १ व "ॐ यदस्य कर्मणो०" (पृष्ठ १७।१८) या मंत्रानें स्विष्टकृत् आहुती १ अशा पूर्वोक्त भाताच्या (खिचडीच्या) दोन आहुती द्याव्या. तदनंतर ॐ त्वन्नो अग्ने० (पृष्ठ १९।२०) इत्यादि ८ मंत्रांनीं अष्टाज्याहुती ८, व ॐ भूरग्नये० (पृष्ठ १७) इत्यादि ४ मंत्रांनीं व्याहृति आहुती ४, मिळून १२ आज्याहुती द्याव्या.

तदनंतर उभय पति पत्नींनीं तेथून उठून शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें आणि नंतर पतीनें गर्भिणी पत्नीच्या पृष्ठ भागीं राहून,

॥ सुमित्रिया नऽआप ओषधयः सन्तु दुर्मित्रिया स्तस्मै सन्तु योऽस्मान्द्वेष्टि यं च वयं द्विष्मः॥

॥ मूर्द्धानं दिवोऽअरतिं पृथिव्या वैश्वानरमृतऽ
आ जातमग्निं। कवि ँ सम्राज मतिथिं जनानामासन्ना पात्रं जनयन्त देवाः ॥

॥ ॐ अय मूर्ज्जावतो वृक्ष ऊर्ज्जीव फलिनी भव।
पर्णं वनस्पते नुत्वा नुत्वा सूयता ँ रयिः ॥

॥ ॐ येनादितेः सीमानं नयति प्रजापतिर्महते सौभगाय।
तेनाहमस्यै सीमानं नयामि प्रजामस्यै जरदृष्टिं कृणोमि॥

॥ ॐ राका मह ँ सुहवा ँ सुष्टुती हुवे शृणोतु नः सुभगा बोधतु। उपागहि सहस्र पोष ँ सुभगे रराणा।

॥ ॐ किं पत्मना सीव्यत्वपः सूच्या च्छिद्यमानया ददातु वीर ँ शतदायु मुख्यम् ॥

॥ ॐ यास्ते राके सुमतयः सुपेशसो याभि र्ददासि दाशुषे वसूनि। ताभि र्नो अद्य सुमनाउपागहि प्रजां पशून् त्सौभाग्यं मह्यं दीर्घायुष्ट्वं पत्युः ॥

हे मंत्र ह्मणून औदुंबर किंवा अर्जुन वृक्षाच्या फणीनें किंवा कुश तृणाच्या कुंचीनें किंवा साही जनावराच्या कांट्यानें सुगंधिक तेल लावून डोक्याचे केश विंचरून स्वच्छ करावे व बांधावे. तदनंतर वीणा वाजविणाऱ्या, व गायन करणाऱ्या मनुष्यांस गायन करण्यास सांगावें. व त्यांणीं,

॥ ॐ सोम ऽ एव नो राजे मा मानुषीः प्रजाः।
अविमुक्त ऽ चक्र आसीरं स्तीरे तुभ्यम् असौ*॥

हा मंत्र आरंभीं गाऊन दुसरें मनोरंजक गायन करावें.

---

* "असौ" या स्थानीं जी कोणती नदी जवळ असेल त्या नदीचें नाव संबोधनान्त (संबोधन विभक्तींत) बोलावें.

गायन पुरें झाल्या नंतर पूर्वोक्त आहुती देऊन बाकी राहिलेली खिचडी एका पात्रावर काढून त्यांत प्रतिबिंब दिसेल एवढें पुष्कळ घृत मिळवावें. नंतर त्या खिचडीकडे गर्भिणीनें अवलोकन करावें. व अवलोकन करीत असतां पतीनें तिला " **किं पश्यसि** " असें विचारावें, आणि त्या स्त्री कडून " **प्रजां पश्यामि** " असें बोलवावें. नंतर ती खिचडी गर्भिणी स्त्रीनें स्वतः भक्षण करावी; भक्षण करिते समयीं, वृद्ध, कुलीन, सौभाग्यवती, पुत्रवती अशा ब्राह्मण वर्णाच्या ( गुणांच्या ) स्त्रियांनीं,

॥ओं वीरसू स्त्वंभव। जीवसू स्त्वंभव। जीवपत्नी त्वंभव॥

अशीं शुभ, मांगलीक वचनें ह्मणावीं. पुढें कार्यार्थ आलेल्या लोकांची यथाचार, सन्मान पूर्वक रवानगी करावी.

**सीमन्तोन्नयन संस्कार विधि समाप्त.**

# जातकर्म संस्कार विधि.

——ooo——

**जातकर्म :**— गर्भिणी स्त्रीच्या प्रसूत काल समयीं अमंगलपणा नाहींसा व्हावा, व स्त्री सुखरूप पणें प्रसूत व्हावी व सन्तान सांगोपांग प्राप्त व्हावें, एतदर्थ परमात्म्याची यथाविधि आराधना करून नियमित विधि करणें याचें नाव जातकर्म. जात=जन्म संबंधी. कर्म=विधि.

**काल :**— गर्भिणी स्त्रीला प्रसूति होण्याचे कष्ट होऊं लागतील, किंवा प्रसूतीचीं अन्य कांहीं चिन्हें समजूं लागतील त्या वेळीं जात कर्म संस्काराला आरंभ करावा.

**विधि :**— वर दर्शविल्या प्रमाणें प्रसूति चिन्हें गर्भिणी

त्रीस मासूं लागल्यावर प्रथम सोष्यंती होम करावा :—प्रसूती स्थानाच्या बही प्रदेशीं ( बाळंत खोली बाहेर ) द्वारा सन्निध पृष्ठ ९–१२, यांत दर्शविल्या प्रमाणें पूर्वीच एक यज्ञ कुंड तयार करून ठेवलेलें असावें. व पुढें गर्भिणीला प्रसूत चिन्हें होऊं लागल्यावर, तिच्या पतीनें प्रारंभीं ( १–८ पृष्ठा पर्यंत ) दर्शविल्या प्रमाणें ईश्वरोपासना करून यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि प्रज्वलीत करून त्याजवर आज्य स्थालींत घृत घेऊन, त्या घृतांत यथा शक्त्या केशर, कस्तूरी आदि सुगंधिक द्रव्य मिळवून तें घृत सिद्ध करावें. (पृष्ठ १४) आणि नंतर, ओं अयन्त इध्म० ( पृष्ठ १५ ) या मंत्रानें मुख्यत्वें करून चंदनाच्या समिधांनीं समिधाधान करून त्या पेटलेल्या समिधांवर पूर्वोक्त सिद्ध केलेल्या, सुगंधिक द्रव्ययुक्त घृताच्या प्रथम व्याहृति आहुती ४, व आघारावाज्य भागाहुती ४, अशा ८ आज्याहुती द्याव्या. ( पृष्ठ १७ ) व नंतर,

॥ ओं या तिरश्ची निपद्यते अहं वि धरणी इति । तां त्वा घृतस्य धारया यजे सꣳराधनी महं । सꣳराधन्यै देव्यै देष्ट्यै, स्वाहा–इदं संराधिन्यै, इद न्न मम ॥

॥ ओं विपश्चित् पुच्छ मभरत्त द्धाता पुनराहरत् । परे हि त्वं विपश्चित् पुमानयं जनिष्यतेऽसौ नाम, स्वाहा– इदं धात्रे, इद न्न मम ॥

या दोन मंत्रांच्या दुसऱ्या दोन आज्याहुती द्याव्या. नंतर शेवटीं २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें वामदेव्य गान द्वारा ईश्वराची आराधना करावी. या प्रमाणें सोष्यंती होम झाल्या नंतर,

॥ एजतु दशमास्यो गर्भो जरायुणा सह ।
यथा यं वायुरेजंति यथा समुद्र एजंति ।
एवा यं दशमास्यो ऽ अस्त्रज्जरायुणा सह ॥

या मंत्रानें गर्भिणी स्त्रीच्या अंगावर किंचित् उदक सिंचन करावें. आणि त्या नंतर,

॥ ॐ अवैतु पृश्निशेवल ं शुने जराय्वत्तवे नैव मा ं सेन पीवरीं न कस्मिं श्च नायतन मवजरायु पद्यताम् ॥

या मंत्राचा जप करावा. पुढें गर्भिणी स्त्री प्रसूत झाल्यावर बालकाच्या शरीरा वरील सर्व मळ काढून सुमारें एक वीत नाल (नाळ) ठेवून बाकी सर्व नाल छेदन केल्या नंतर, त्या बालकाला औषधी युक्त किंचित् उष्ण उदकानें स्नान घालावें आणि मऊ वस्त्रानें त्याचें शरीर पुसून मऊ बिछान्यावर ठेवावें. व नंतर घृत व मध एकत्र करून तें सोन्याच्या सळीनें किंवा अन्य सुवर्ण वस्तूनें बालकाच्या मुखांत,

॥ ॐ प्र ते ददामि मधुनो घृतस्य वेद सवित्रा प्रसूतं मघोनां । आयुष्मान् गुप्तो देवताभिः शतं जीव शरदो लोके ऽ अस्मिन् ॥

॥ ॐ मेधां ते मित्रो वरुणो मेधा मग्नि र्दधातु ते । मेधां ते अश्विनौ देवा वा धत्तां पुष्कर स्त्रजौ ॥

॥ ॐ भूस्त्वयि दधामि । ॐ भुवस्त्वयि दधामि । ॐ स्वस्त्वयि दधामि । ॐ भूर्भुवः स्वः सर्वं त्वयि दधामि ॥

॥ सदसस्पति मद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् ।
सनिं मेधामयासिष ं स्वाहा ॥

हे मंत्र ह्मणून घालावें अर्थात् त्याचा जिव्हेनें तें चाखवावें. तदनंतर व्रीहि व यव पाण्यांत वाटून त्यांचा रस सूक्ष्म वस्त्रानें गाळून एका पात्रांत ठेवावा. नंतर हस्तांगुष्ठ व अनामिका हीं दोन अंगुलें एकत्र करून त्यानें तो रस घेऊन बालकाच्या मुखांत,

॥ ओँ इय माज्ञे दमन्न मिद मायु रिदममृतम् ॥

या मंत्रानें त्याचे कांहीं थेंब पाडावे.* तदनंतर बालकाच्या पित्यानें प्रथम दक्षिण कर्णा सन्निध मुख करून (धरून),

॥ ओँ मेधान्ते देवः सविता मेधां देवी सरस्वती ।
मेधान्ते अश्विनौ देवा वा धत्तां पुष्कर स्रजौ ॥
॥ ओँ अग्नि रायुष्मान् स वनस्पतिभि रायुष्माँस्तेन त्वा
युषा युष्मन्तं करोमि ॥
॥ ओँ सोम ऽ आयुष्मान् स ओषधीभि रायुष्माँस्तेन०†॥
॥ ओँ ब्रह्म ऽ आयुष्मत्तद् ब्राह्मणै रायुष्मत्तेन० ॥
॥ ओँ देवा ऽ आयुष्मंतस्ते ऽ मृते नायुष्मन्तस्तेन० ॥
॥ ओँ ऋषय ऽ आयुष्मन्तस्ते व्रतै रायुष्मन्तस्तेन० ॥
॥ ओँ पितर ऽ आयुष्मन्तस्ते स्वधाभि रायुष्मन्तस्तेन० ॥
॥ ओँ यज्ञ ऽ आयुष्मान् स दक्षिणाभि रायुष्माँस्तेन० ॥
॥ ओँ समुद्र ऽ आयुष्मान् स स्रवन्तीभि रायुष्माँस्तेन०॥

हे मंत्र जपावे. आणि नंतर बालकाच्या वाम (डाव्या) कर्णासमीप मुख धरून तेच मंत्र पुनः दुसऱ्या वेळीं जपावे तदनंतर पित्यानें बालकाच्या उभय स्कंधांला हस्तानें किंचित् हळू स्पर्श करून,

---

* हें एकट्या गोभिलीय सूत्राचेंच मात्र मत होय.

† या पुढें "त्वा युषा युष्मन्तं करोमि" हें पद सर्वत्र लावावें.

॥ इंद्र श्रेष्ठानि द्रविणानि धेहि चित्तिं दक्षस्य सुभगत्वमस्मे । पोषं रयीणामरिष्टिं तनूनां स्वाद्मानं वाचः सुदिनत्वमन्हां ॥१॥

॥ अस्मे प्र यंधि मघवन्नृजीषिन्निंद्र रायो विश्ववारस्य भूरेः । अस्मे शतं शरदो जीवसे धा अस्मे वीराञ्छश्वत इंद्र शिप्रिन् ॥२॥

॥ ॐ अश्मा भव परशु र्भव हिरण्य मस्तृतं भव । वेदो वै पुत्र नामासि स जीव शरदः शतम् ॥३॥

हे मंत्र ह्मणावे आणि त्या नंतर,

॥ त्र्यायुषं जमदग्नेः कश्यपस्य त्र्यायुषं । यद्देवेषु त्र्यायुषं तं नो ऽ अस्तु त्र्यायुषं ॥

या मंत्राचा त्रिवार जप करावा. तदनंतर ज्या स्थानीं बालकाचा जन्म झाला असेल त्या स्थानीं,

॥ ॐ वेदते भूमि हृदयं दिवि चंद्रमसि श्रितं । वेदाहं तन्मा तद्विद्यात् पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शत ꣳ शृणुयाम शरदः शतम् ॥

या मंत्राचा जप करावा. नंतर प्रसूत स्त्रीच्या कल्याणार्थ,

॥ ॐ इडासि मैत्रा वरुणी वीरे वीर मजीजनथाः सा त्वं वीरवती भव यास्मान् वीरवतो करत् ॥

या मंत्रानें ईश्वराची प्रार्थना करावी. तदनंतर प्रसूत स्त्रीचे उभय स्तन प्रक्षालन करावे आणि नंतर,

॥ ॐ इम ꣳ स्तन मूर्ज्ज स्वन्तं धयापां प्रपीनमग्ने शरीरस्य

मध्ये । उत्सं जुषस्व मधुमन्त मर्वन् त्समुद्रिय ं सद-
नमा विशस्व ॥

हा मंत्र ह्मणून बालकाला प्रथम दक्षिण स्तन पाजावें. नंतर,

॥ ॐ य स्ते स्तनः शशयो यो मयो भूर्यो रत्न धाव सु विद्यः
सुदत्रः । येन विश्वा पुष्यसि वीर्याणि सरस्वति
तमिह धातवेकः ॥

हा मंत्र ह्मणून वाम स्तन पाजावें. तदनंतर,

॥ ॐ आपो देवेषु जाग्रथ यथा देवेषु जाग्रथ । एव-
मस्या ं सूतिकाया ं स पुत्रिकायां जाग्रथ ॥

या मंत्रानें एक उदक पूर्ण कलश तयार करून प्रसूत स्त्रीच्या शय्ये सन्निध मस्तक प्रदेशीं ठेवावा. आणि तो दहा रात्री पर्यंत तेथें राहूं द्यावा. आणि प्रसूत स्त्री प्रसूति स्थानांत दहा दिवस असे पर्यंत नित्य दोन वेळ ( सायं व प्रातः संधि कालाच्या ठायीं ),

॥ ॐ शण्डो मर्क्का उपवीरः शौण्डिकेय ऽ उलूखलः ।
मलिम्लुचो द्रोणासश्च्यवनो नश्यतादितः स्वाहा—इदं
शंडा मर्क्का उपवीराय, शौंडिकेयाय, उलूखलाय मलि-
म्लुचो द्रोणासश्च्यवनो नश्यतादितेभ्यश्च, इद न्न मम ॥१॥

॥ ॐ आलिखन्न निमिषः किं वदन्त ऽ उपश्रुतिः । हर्यक्षः
कुंभी शत्रुः पात्र पाणि नृमणि हन्त्री मुखः सर्षपारुण
श्चवनो नश्यतादितः स्वाहा—इदमालिखन्न निमिषाय,
किंवद्भ्यः उपश्रुत हर्यक्षाय, कुंभी शत्रवे, पात्र पाणये, नृमणये,
हंत्री मुखाय, सर्षपारुणाय, च्यवनाय च, इद न्न मम ॥ २ ॥

या दोन मंत्रांनीं पूर्वोक्त यज्ञ कुंडांत देव साळीचें भात व सर्षप मिश्र करून त्यांच्या दोन दोन आहुती द्याव्या.

**जातकर्म संस्कार विधि समाप्त.**

# नामकरण संस्कार विधि.

---000---

**नाम करण** :— जन्मलेल्या बालकाला व्यक्ति दर्शक— सुंदर, गंभीर व सोपें नांव देणें, आणि त्या नांवा प्रमाणें बालकाच्या अंगीं बुद्धि व शरीर बळ यांची वृद्धि होऊन त्याला विद्यादि सद्गुण प्राप्त व्हावे, एतदर्थ परमात्म्याची उपासना करून यथाविधि योजना करणें याचें नांव नाम करण. नाम = नांवा संबंधी. करण = क्रिया अर्थात् विधि.

**काल** :— बालकाच्या जन्म दिवसा पासून दहा रात्री गेल्या नंतर—११ व्या किंवा १०१ व्या दिवशीं किंवा द्वितीय वर्षारंभ दिवशीं अर्थात् जन्म दिवशीं हा नाम करण संस्कार प्रातःकालीं करावा.

**विधि** :— वर लिहिल्या प्रमाणें यथोक्त नाम करण संस्कार दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वीं, पृष्ठ ९–११, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड बांधावें, व त्याच्या बाजूस (दक्षिण किंवा उत्तर प्रदेशीं) बसण्यासाठीं एक शुभासन सिद्ध करावें; व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातःकालीं कार्य कर्त्या पित्यानें शुद्ध स्नान करावें व उत्तम वस्त्रें परिधान करावीं. नंतर पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें. पुढें कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह **ईश्वरोपासना** चालवावी. आणि त्या उपासने कडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य लावावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्यावर पृष्ठ ११।१२, यांत

सांगितल्या प्रमाणें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुतीकरितां घृत, समिधा आज्यस्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि साहित्य यज्ञ कुंडा सन्निध तयार ठेवावें आणि नंतर पुरोहिताची स्थापना करून कर्त्यानें यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख बसावें. आणि पृष्ठ १३, यांत सांगितल्या प्रमाणें तीन आचमनें करावीं. नंतर कर्त्यानें यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत सिद्ध करावें: (पृष्ठ १४) व नंतर " ॐ अयन्त इध्म० " (पृष्ठ १९) या मंत्रानें समिधाधान करावें; पुढें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर, त्या पेटलेल्या समिधा काष्ठांवर आघारावाज्य भागाहुती ४, व्याहृति आहुती ४, (पृष्ठ १७) व अष्टाज्याहुती ८ (पृष्ठ१९।२०) मिळून १६ आज्याहुती द्याव्या. नंतर बालकास शुद्ध स्नान व वस्त्रें धारण करवावीं. आणि त्याला हस्तांत घेऊन मातेनें कुंडा सन्निध कार्य कर्त्याच्या दक्षिणांगीं यावें. आणि नंतर तिणें तें बालक उदक्शिर (उत्तर दिशेप्रत मस्तक असें) कार्य कर्त्याच्या हस्तांत द्यावें. आणि आपण, कर्त्याच्या पृष्ठ भागा कडून निघून उत्तर भागीं जाऊन पूर्वाभिमुख बसावें. नंतर तें बालक, कर्त्यानें परत मातेकडे द्यावें. आणि पुढें प्रधान होम करावा:—प्रथम, "ॐ प्रजापतये स्वाहा" ह्या मंत्रानें एक आज्याहुती द्यावी. नंतर ज्या तिथीस, ज्या नक्षत्रीं, बालकाचा जन्म झाला असेल, त्या तिथीच्या नांवानें १, त्या तिथीच्या देवतेच्या नांवानें १, त्या नक्षत्राच्या नांवानें १, व त्या नक्षत्राच्या देवतेच्या नांवानें १, अशा ४ आज्याहुती द्याव्या.* आणि नंतर स्विष्टकृत् आहुती १,

* प्रतिपदेस जन्म झाल्यास प्रतिपदे स्वाहा असें बोलून

व व्याहृति आहुती ४, (पृष्ठ १७।१८) मिळून ९ आज्याहुती द्याव्या. तदनंतर मतिनें बालकासह शुभासनावर बसावें. आणि पित्यानें बालकाच्या नासिका द्वारा येणाऱ्या प्राण वायूला स्पर्श करून,

॥ ओं कोऽसि कतमोऽस्येषोस्यमृतोसि ।
आहस्पत्यंमास प्र विशासौ ॥

---

तिथीची आहुती द्यावी. व प्रतिपदेची देवता **ब्रह्मन्** होय त्याची आहुती **ब्रह्मणे स्वाहा** असें बोलून द्यावी. त्याच प्रमाणें पुष्य नक्षत्रीं जन्म झाल्यास, त्या नक्षत्राची आहुती **पुष्याय स्वाहा** असें बोलून द्यावी. व पुष्याची देवता बृहस्पति होय त्याची आहुती **बृहस्पतये स्वाहा** असें बोलून द्यावी.–या रीतीनें ज्या तिथि नक्षत्रीं जन्म झाला असेल, त्या तिथि नक्षत्राच्या नांवाला व तद्वत् त्या तिथि नक्षत्रांच्या देवतांच्या नांवाला चतुर्थी विभक्तीचे प्रत्यय लावून त्यांजवर स्वाहा पद योजून त्यांनीं आहुती द्याव्या. तिथि नक्षत्रांचीं व त्यांच्या देवतांचीं नांवें खालीं लिहिल्या प्रमाणें जाणावीं:–(१=प्रतिपदा, २=द्वितीया इ०)

**तिथि–देवता**:– १-ब्रह्मन्। २–त्वष्टृ। ३–विष्णु। ४–यम। ५– सोम। ६–कुमार। ७–मुनि। ८–वसु। ९–पिशाच। १०–धर्म। ११– रुद्र। १२–वायु। १३–मन्मथ। १४–यक्ष। १५–विश्वेदेवाः। ३०–पितरः। **नक्षत्र–देवता**:–अश्विनी–अश्वि। भरणी–यम। कृत्तिका–अग्नि। रोहिणी–प्रजापति। मृगशीर्ष–सोम। आर्द्रा–रुद्र। पुनर्वसु–अदिति। पुष्य–बृहस्पति। आश्लेषा–सर्प। मघा–पितृ। पूर्वाफाल्गुनी–भग। उत्तरा फाल्गुनी–अर्यमन्। हस्त–सवितृ। चित्रा–त्वष्टृ। स्वाति–वायु। विशाखा–इंद्राग्नि। अनुराधा–मित्र। ज्येष्ठा–इंद्र। मूल–निर्ऋति। पूर्वाषाढा–अप्। उत्तराषाढा–विश्वेदेव। श्रवण–विष्णु। धनिष्ठा– वसु। शततारका–वरुण। पूर्वा भाद्रपदा–अजपाद। उत्तरा भाद्रपदा–अहिर्बुध्न। रेवती–पूषाणः।

या मंत्राला शेवटील "असौ" पदा पुढें बालकाचें ठेवलेलें* नांव योजून पूर्ण मंत्र ह्मणावा. आणि याच प्रमाणें पुढील मंत्रांतील शेवटील "असौ" या सर्वनाम स्थानीं बालकाचें नांव योजून दुसरा मंत्र ह्मणावा, तो मंत्रः—

॥ ओ३म् सत्वान्हे परि ददात्व ह स्त्वाराञ्यै परि ददातु रात्रि-
स्त्वाहो रात्राभ्यां परि ददात्व हो रात्रौ त्वार्द्ध मासेभ्यः
परि दत्ता मर्द्ध मासा स्त्वा मासेभ्यः परि ददतु मासा स्त्व-
र्त्तुभ्यः परिददत्वृतव स्त्वा संवत्सराय परि ददतु संवत्सर
स्त्वायुषे जरायै परि ददातु असौ ॥

या प्रमाणें बालकाला नांव ठेवून कार्यार्थ आलेल्या लोकांस सांगून तें नांव प्रसिद्ध करावें. पुढें २१व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें वामदेव्य गान ह्मणावें. आणि नंतर कार्यार्थ आलेल्या लोकांची यथाचार, आदर सत्कार पूर्वक रवानगी करावी.

## नामकरण संस्कार विधि समाप्त.

---

* बालकास नांव द्यावयाचें तें खालील नियमास अनुसरून असावें:– नामाचें आद्य अक्षर– घोष (मृदु वर्ण) अर्थात् ककारादि पंच वर्गाचे पहिले दोन दोन वर्ण खेरीज करून बाकी– ग घ ङ, ज झ ञ, ड ढ ण, द ध न, ब भ म, आणि य, र, ल, व, ह– या वीस वर्णां पैकीं असावें. नामाचें मध्य अक्षर य, र, ल, व, या वर्णां पैकीं असावें. व अंत्य अक्षर दीर्घ किंवा विसर्ग युक्त असावें. अशा प्रकारचें नांव दोन किंवा चार अक्षरांचें असावें. उदाहरण,–भद्रः, देवः, देव दत्तः, भवः, भव नाथः, नाग देवः, रुद्र दत्तः, हरि देवः, बलिध्वंसी, विश्वंभर, इ०. स्त्रियांच्या नांवास हेच नियम असून भेद इतकाच कीं, आद्य अक्षर द्वित्व असूं नये. जसें,–त्र्यंबिका, प्रियं वदा, इ०. व अंत्य अक्षर दीर्घ असावें. जसें,– वसुदा, यशोदा, भागीरथी, मथुरा,

# निष्क्रमण संस्कार विधि.

———ooo———

**निष्क्रमण :**— जन्म झाल्या पासून अल्प वयाच्या कोमल शरीरांच्या लेंकरांस बहीर्प्रदेशीं अर्थात् घरा बाहेर शुद्ध हवेंत, स्वच्छ व सुंदर स्थलीं यथाविधि प्रथमच फिरावयास काढणें याचें नाव निष्क्रमण. निः = बाहेर. क्रमण=गमन.

**काल :**— निष्क्रमण संस्काराच्या कालाचे दोन भेद आहेत. एक भेद हा कीं, बालकाच्या जन्म काला पासून तिसऱ्या शुक्लपक्षीं—तृतीया तिथि रोजीं हा संस्कार करावा. आणि दुसरा भेद हा कीं, बालकाच्या जन्म काला पासून चवथ्या महिन्यांत जन्म तिथि दिवशीं हा संस्कार करवा.

**विधि :**—पहिल्या भेदा प्रमाणें निष्क्रमण दिवसाची योजना करून, त्या दिवशीं बालकाला प्रातःकालीं सूर्योदया नंतर प्रथम औषधी युक्त शुद्धोदकाचें स्नान घालून, शुद्ध व सुंदर वस्त्रें परिधान करवावीं. पुढें पित्यानें (कार्य कर्त्यानें) संध्योपासना, अग्नि होत्रादि नित्य कर्म प्रथम आटोपून, नंतर बालकाला सन्निध घेऊन प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) दर्शविल्या प्रमाणें पूर्वाभिमुख बसून "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करावी. नंतर सर्व दिवस उत्साहांत घालवून संध्याकालीं पुनः पित्यानें सूर्यास्ता

---

वेदमती, नर्मदा, इ०. पुरुषाच्या नांवास प्रारंभीं किंवा अन्यत्र कोठें तरी द्वित्व अक्षर असल्यास चालेल. जसें,—देव स्वामी, व्यंकटेश, गोविन्द, दयानन्द, विष्णु, इ०. दुसरा सामान्य भेद हा कीं, पुरुषाचें नांव तद्धितान्त (वृद्धि झालेलें) नसावें. जसें,—ऐंद्र, औपमन्यु, इ०. पण स्त्रीचें नांव असें तद्धितान्त असल्यास चालेल. जसें,—गांधारी, दैवदत्ती, द्रौपदी इ०.

नंतर संध्या होमादि नित्य कर्म आटोपून घरा बाहेर मो-
कळ्या, स्वच्छ व सुंदर अशा स्थलीं पश्चिमाभिमुख चंद्रा-
समोर राहून प्रारंभीं दर्शविल्या प्रमाणें ईश्वरोपासना करावी.
एवढ्यांत मातेनें बालकाला शुद्ध व सुंदर वस्त्रें परिधान
करवून, त्याला हस्तांत घेऊन त्या स्थलीं यावें. आणि
पतीच्या दक्षिण बाजू कडून पतीच्या समोर होऊन बा-
लकाला उदक् शिर व उत्तान ( उत्तरेस डोकें केलेला व
उताणा असा ) पतीच्या हस्तांत द्यावा. आणि नंतर पत्नी-
नें पतीच्या दक्षिण बाजू कडून पाठीं मागून निघून त्याच्या
वाम भागीं यावें. व त्याच्या बरोबर पश्चिमाभिमुख रहावें.
तदनंतर बालकाच्या पित्यानें,

॥ ॐ यत्ते सुसीमे हृदय ऽ हितमन्तः प्रजापतौ । वेदा-
हं मन्ये तद् ब्रह्म माहं पौत्र मघं निगाम् ॥ १ ॥
॥ ॐ यत् पृथिव्या अनामृतं दिवि चंद्रमसि श्रितं ।
वेदामृतस्याह नाम माहं पौत्र मघ ऽ रिषम् ॥ २ ॥
॥ ॐ इंद्राग्नी शर्म यच्छतं प्रजापती । यथा यन्न प्रमी-
येत पुत्रो जनित्र्य अधि ॥ ३ ॥

या मंत्रांनीं परमात्म्याची आराधना करून बालकाला चंद्र
दर्शन करवावें आणि नंतर बालकाला ज्या रीतीनें घेतला
होता त्या रीतीनें परत माते जवळ द्यावा. नंतर अंजलींत
उदक घेऊन, चंद्राच्या सन्मुख उभें राहून,

॥ ॐ यददश्चन्द्रमसि कृष्णं पृथिव्या हृदय ऽ श्रितम् ।
तदहं विद्वा ऽ स्तत्पश्यन् माहं पौत्र मघ ऽ रुदम् ॥

या मंत्रानें परमात्म्याची स्तुति व प्रार्थना करावी व तें
अंजलिस्थ उदक जमिनीवर टाकून द्यावें. पुढें बालकाच्या

आशीर्वादार्थ हाच मंत्र पुनः द्विवार मनांत ह्मणावा. तदनंतर बालकास माता पिता यांनीं सन्निध घेऊन शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें आणि २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें **वामदेव्य गान** ह्मणावें.आणि नंतर बालकाला घेऊन आंजू बाजूस स्वच्छ, सुंदर, हवाशीर अशा स्थलीं फिरवावा.

---

आतां दुसऱ्या भेदा प्रमाणें निष्क्रमण दिवसाची योंजना करून त्या दिवशींहि वर लिहिल्या प्रमाणें बालकाला शुद्ध स्नान व उत्तम वस्त्रें परिधान करवून संध्योपासना अग्नि होत्रादि नित्य कर्म, कार्य कर्त्यानें आटोपावें. व नंतर शुभासनावर पूर्वाभिमुख बसून प्रारंभीं ( १–८ पृष्ठा पर्यंत ) लिहिल्या प्रमाणें " अग्निमीळे० " इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं बालकाला सन्निध घेऊन ईश्वरोपासना करावी. आणि नंतर बालकास घेऊन बहीर्प्रदेशीं अर्थात् घरा बाहेर मोकळ्या, स्वच्छ व सुंदर अशा स्थलीं यावें आणि पूर्वाभिमुख सूर्या समोर उभें राहून, "तच्चक्षुर्देव हितं०" ( पृष्ठ ७९ ) या मंत्रानें परमात्म्याची आराधना करून बालकाला सूर्य दर्शन करवावें. तदनंतर बालकाला घेऊन उत्साहानें स्वच्छ स्थलीं व स्वच्छ हवेंत थोडा फिरवावा. आणि पुढें त्या दिवसापासून दर रोज बालकाला बाहेर स्वच्छ हवेंत व सुंदर स्थलीं, थंड वेळीं फिरावयास घेऊन जावें, कीं तेणें करून बालकाचें शरीर सदृढ होईल व आरोग्य राहील.

## निष्क्रमण संस्कार विधि समाप्त.

# अन्न प्राशन संस्कार विधि.

——ooo——

**अन्नप्राशन :**— जन्मलेल्या बालकाचें वय अन्न भक्षण करण्यास योग्य—अर्थात् त्याच्या ठायीं अन्न पाचक शक्ति उत्पन्न होण्याचे समयीं उत्तम दिवस योजून हलकें, पक्व, व हितकारक अन्न यथा विधि प्रारंभीं—प्रथम भक्षण करविणें याचें नाव अन्न प्राशन. अन्न = खाण्यायोग्य पदार्थ — अर्थात् धान्यादि वनस्पति. प्राशन = भक्षण करणें.

**काल :**— बालकाच्या अंगीं जन्म काला पासून ६ व्या महिन्यांत हलकें अन्न भक्षण करण्याची व तें अन्न पाचन करण्याची शक्ति येत असून त्या महिन्यांत शुक्लपक्षीं, उत्तम व शुभ नक्षत्रयुक्त दिवसाची योजना करून, त्या दिवशीं मध्यान्ह काला पूर्वीं अर्थात् प्रातःकालीं हा अन्न प्राशन विधि करून बालकाला अन्न घालण्यास प्रारंभ करावा.

**विधि :**— वर लिहिल्या प्रमाणें यथोक्त अन्न प्राशन संस्कार दिवसाची योजना करावी. आणि तो दिवस येण्यापूर्वी पृष्ठ ९—११, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड बांधावें व त्याच्या बाजूस (उत्तरांगीं किंवा दक्षिणांगीं) एक शुभासनहि सिद्ध करावें; व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातःकालीं बालकाला शुद्ध स्नान व उत्तम वस्त्रें परिधान करवून, त्याला सन्निध घेऊन पूर्वोक्त शुभासनावर माता पित्यानें (कार्य कर्त्यानें) पूर्वाभिमुख बसावें व पुढें कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१—८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह ईश्वरोपासना करावी. व त्या

उपासने कडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य द्यावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्यावर पृष्ठ ११–१२, यांत सांगितल्या प्रमाणें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, समिधा, आज्यस्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि साहित्य यज्ञ कुंडा सन्निध तयार ठेवावें, आणि नंतर पुरोहिताची स्थापना करून कर्त्यानें यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख बसावें. व पृष्ठ १३, यांत दर्शविल्या प्रमाणें तीन आचमनें करावीं. व नंतर यज्ञ कुंडात यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत व स्थालिपाक* (भात) हीं आहुती द्रव्यें सिद्ध करावीं: (पृष्ठ १४) तदनंतर " ॐ अयन्त इध्म० " (पृष्ठ १९), या मंत्रानें समिधाधान करावें. पुढें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर त्या पेटलेल्या समिधांवर आघारावाज्य भागाहुती ४, व व्याहृति आहुती ४, (पृष्ठ १७) अशा ८ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर प्रधान होमाहुती द्याव्या; ते होमाहुती मंत्रः—

॥ दे॒वीं वाच॑मजनयन्त दे॒वास्तां वि॒श्वरू॑पाः

---

* हा स्थालिपाक (भात) करण्याचा विधि १५ व्या पृष्ठावर लिहिला आहे, त्या प्रमाणें तीन वर्षांच्या जुन्या साळीच्या भाताचा भात करावा, पण प्रथम त्या भाताचे, । **ॐ प्राणाय त्वा जुष्टं निर्वपामि । ॐ अपानाय त्वा० । ॐ चक्षुषे त्वा० । ॐ श्रोत्राय त्वा० । ॐ अग्नये स्विष्टकृते त्वा०** । या मंत्रांनीं तांदूळ करावे. आणि नंतर या प्रत्येक मंत्राच्या शेवटीं "**निर्वपामि**" पद आहे तें बदलून त्याच्या स्थानीं "**प्रोक्षामि**" पद लावून त्या मंत्रांनीं ते तांदूळ प्रक्षालन करावे (धुवावे) आणि नंतर त्याचा भात शिजवावा.

पशवो वदन्ति । सा नो मन्द्रेष मूर्ज्जं दुहाना धेनु र्वागस्मानुप सुष्टुतैतु स्वाहा–इदं वाचे, इद न मम ॥

॥ व्वाजो नोऽअद्य प्रसुवाति दानं वाजो देवाँऽ ऋतुभिः कल्पयाति । व्वाजो हि मा सर्व व्वीर ञ्जजान व्विश्वा ऽ आशा व्वाजपति र्जयेय ᳪ, स्वाहा– इदं वाचे वाजाय, इद न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा २ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर, एका पात्रावर भात काढून त्यांत घृत मिश्र करून,

ॐ प्राणेनान्नमशीय स्वाहा– इदं प्राणाय, इद न मम ।
ॐ अपानेन गन्धानमशीय स्वाहा– इद मपानाय, इद० ।
ॐ चक्षुषा रूपाण्यशीय स्वाहा– इदं चक्षुषे, इद० ।
ॐ श्रोत्रेण यशो यशीय स्वाहा– इदं श्रोत्राय, इद० ।

या प्रत्येक मंत्रानें एकेक, व "ॐ यदस्य कर्मणो०" (पृष्ठ १७–१८) या स्विष्टकृत् आहुती मंत्रानें एक, अशा त्या घृतयुक्त भाताच्या पांच आहुती द्याव्या. आणि तदनंतर व्याहृति आहुती ४, (पृष्ठ १७) व अष्टाज्याहुती ८, (पृष्ठ १९–२०) अशा १२ आज्याहुती द्याव्या. पुढें आहुती देऊन राहिलेल्या भातांत दहीं, मध, घृत असे पदार्थ मिळवून तो भात व शिवाय पयसादि ह्मणजे क्षीर आदि मिष्ट व सुगन्धयुक्त अन्य उत्तम पाक सिद्ध करून बालकाला त्याच्या रुची प्रमाणें.

॥ अन्नपतेऽन्नस्य नो देह्यनमीवस्य शुष्मिणः ।
प्रप्रदातारन्तारिषऽऊर्जं नो धेहि द्विपदे चतुष्पदे ॥

हा मंत्र ह्मणून भक्षण करवावा. नंतर त्या बालकाला सन्निध घेऊन शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें व २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें **वामदेव्य गान** ह्मणावें. तदनंतर कार्यार्थ आलेल्या लोकांची, यथाचार आदर सत्कार पूर्वक रवानगी करावी. पुढें त्या दिवसा पासून दर रोज बालकाला यथा रुचि हलकें, पक्क, शुद्ध असें अन्न भक्षण करवावें.

**अन्न प्राशन संस्कार विधि समाप्त.**

---

# चूडाकरण संस्कार विधि.

---

**चूडाकरण** :– बालकाचे जन्मकालाचे ह्मणजे मातेच्या उदरांत उत्पन्न झालेले डोक्याचे केश काढून टाकण्याकरितां, व त्या जागीं सुंदर नवे केश येण्याची अनुकूल योजना करण्या करितां, जे पहिले केश यथा विधि छेदन करणें, त्याचें नांव चूडाकरण; अथवा चौल. चूडा = केशसमूह. करण = क्रिया अर्थात् विधि.

**काल** :– हा चूडाकरण संस्कार मुलाच्या तिसऱ्या वर्षी (पृष्ठ २२ यांत लिहिल्या प्रमाणें) उत्तरायण कालांत, शुक्ल पक्षीं, शुभ नक्षत्रयुक्त दिवशीं प्रातःकालीं करावा.

**विधि** :– वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त चूडाकरण संस्कार दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्यापूर्वी पृष्ठ ९–११, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड बांधावें. व त्याच्या बाजूस एक शुभासन सिद्ध करावें. व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें नियुक्त दिवशीं प्रातःकालीं बालकाला शुद्ध स्नान व उत्तम वस्त्रें परिधान करवून त्याला सन्निध घेऊन माता पित्यानें (कार्य कर्त्यानें) पूर्वोक्त

शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें व कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह ईश्वरोपासना चालवावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य लावावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्या नंतर पृष्ठ ११।१२, यांत सांगितल्या प्रमाणें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, समिधा, आज्यस्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि सर्व साहित्य यज्ञ कुंडा सन्निध तयार ठेवावें. व शिवाय भात, यव, उडीद व तीळ हे एकेक मातीच्या शरावांत (परळ) वेगवेगळें भरून यज्ञ कुंडाच्या उत्तर प्रदेशीं ठेवावे. व गाईचें शेण, रांधलेला भात, व शमी वृक्षाचीं पानें हीं सुद्धां शरावांत भिन्न भिन्न भरून त्यांच्या बाजूस पश्चिमांगीं ठेवावीं. व २१ दर्भ किंवा अन्य यज्ञीय तृण, उष्ण उदकानें भरलेलें औदुंबर काष्ठाचें एक पात्र, एक थंड उदक पात्र, व नवनीत–लोण्याचें एक पात्र, किंवा दह्याचें एक पात्र हीं सर्व कुंडाच्या दक्षिण भागीं ठेवावीं. व नापित (नाहवी) यानें वस्तरा, कातर, आरसी वगैरे सर्व सामान घेऊन कुंडाच्या दक्षिण भागीं असावें.–पुढें पुरोहिताची स्थापना करून कर्त्यानें बालकासह यज्ञ कुंडा सन्निध पूर्वाभिमुख बसावें. व पृष्ठ १३–१६ यांत सांगितल्या प्रमाणें, तीन आचमनें करावीं; नंतर यज्ञ कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि प्रदीप्त करून घृत सिद्ध करावें; नंतर "ओं अयन्त इध्म०" या मंत्रानें समिधाधान करावें. व शेवटीं "ओं अदितेऽनुमन्यस्व" (पृष्ठ १६) इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडाच्या बाजूस व "ओं देव सवितः०" (पृष्ठ १६) या मंत्रानें कुंडा सभोंवती जल सिंचन करावें. पुढें,–यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर, त्या

पेटलेल्या समिधांवर प्रथम आघारावाज्य भागाहुती ४, व्याहृति आहुती ४, (पृष्ठ १७) व अष्टाज्याहुती ८, (पृष्ठ १९–२०) अशा सर्व मिळून १६ आज्याहुती द्याव्या. व नंतर पृष्ठ १८, यांत लिहिल्या प्रमाणें "ॐ भूर्भुवः स्वः। अग्न आयुंषि पवस०" इत्यादि ऋग्वेदोक्त चार मंत्रांनीं प्रधान होमाच्या ४ आज्याहुती द्याव्या. व शेवटीं व्याहृति आहुती ४, व स्विष्टकृत् आहुती १, (पृष्ठ १७) अशा ५ आज्याहुती द्याव्या.

या प्रमाणें होम विधान झाल्या नंतर, कार्य कर्त्यानें मनांत परमात्म्याचें ध्यान करावें. नंतर नापिता कडे (नाहव्या कडे) प्रथमतः पाहून "ॐ आय मगात् सविता क्षुरेण" हा मंत्र जपावा. आणि नंतर उष्णोदक पात्राकडे पाहून "ॐ उष्णेन वाय उदकेनैधि" हा मंत्र जपावा. पुढें पित्यानें (कर्त्यानें) बालकाच्या पृष्ठ भागीं राहून एका पात्रांत पूर्वोक्त उष्णोदक व शीतोदक, "ॐ उष्णेन वाय उदकेनेहि" हा मंत्र ह्मणून एकत्र करावें. नंतर तें उदक आणि लोणी किंवा दह्यांची साय घेऊन बालकाचें मस्तक,

॥ ॐ अदितिः केशान्वप त्वाप उन्दन्तु वर्चसे । ॐ सवित्रा प्रसूत्रा दैव्याऽआपऽउन्दन्तु ते तनूं दीर्घायुत्वाय वर्चसे ॥

हे मंत्र ह्मणून सभोंवती हात फिरवून तीन वेळ चोळावें. आणि नंतर फणीनें मस्तकाचे केश विंचरून एकत्र करावे. तदनंतर "ॐ ओषधे त्रायस्वैनम्" ह्या मंत्रानें तीन दर्भ घेऊन, उजव्या बाजू कडील केश समूहावर डाव्या हातानें धरून ठेवावे. आणि नंतर "ॐ विष्णो र्द्दं ष्ट्रोऽसि" या मंत्रानें वस्तऱ्याकडे अवलोकन करून,

॥ शिवो नामासि स्वधितिस्ते पिता नमस्तेऽअस्तु

मामाहि ऀ्सीः ॥ हा मंत्र ह्मणून तो वस्तरा दक्षिण हस्तांत घ्यावा.आणि नंतर ॥ ॐ स्वधिते मैनं ऀ् हि ऀ् सीः॥

॥ निवर्तयाम्यायुषेऽन्नाद्याय प्रजननाय रायस्पोषाय सु प्रजा स्त्वाय सु वीर्याय ॥ असे दोन मंत्र ह्मणून तो वस्तरा, केश व दर्भ यांच्या सन्निध नेऊन,

॥ ॐ येना वपत्सविता क्षुरेण सोमस्य राज्ञो वरुणस्य विद्वान्। तेन ब्रह्माणो वपते दमस्यायुष्मा ञ्जरदष्टि र्यथासत् ॥

हा मंत्र ह्मणून दर्भसहीत ते केश कापावे. * व ते कापलेले केश व दर्भ—शमी पत्र सहित—माते कडे द्यावे; आणि ते तिणें शेणाच्या शरावांत धरून ठेववे. व त्यांतलि केश कांहीं उडून बहिर पडले असल्यास, ते सुद्धां शेणानें धरून एकत्र करावे, व शरावांत टाकावे. या प्रमाणें एक वेळ केश कापल्या नंतर पुनः,

॥ ॐ येन धाता बृहस्पते रग्नेरिन्द्रस्य चायुषे ऽवपत्।
तेन ते आयुषे वपामि सु श्लोक्याय स्वस्तये ॥

हा मंत्र ह्मणून याच रीती प्रमाणें दर्भ सहीत दुसरे केश दुसऱ्या वेळीं कापावे, व ते शरावांत एकत्र करावे. तदनंतर,

॥ ॐ येन भूयश्चरात्यं ज्योक् च पश्याति सूर्यम्।
तेन ते आयुषे वपामि सु श्लोक्याय स्वस्तये ॥

या मंत्रानें तिसऱ्या वेळीं त्याच प्रमाणें करावें आणि शेवटीं, पूर्वोक्त तीन मंत्र, आणि,

---

* हे केश कापण्याची रीति अशी आहे कीं, दर्भ व केश हे दोन्ही, युक्तीनें दोहीं कडून धरावे. आणि नंतर ते दोन्ही, मधून वस्तऱ्यानें कापावे. वस्तऱ्या बदली कातरीनें कापण्यास कांहीं दोष नाहीं. मात्र विधीनें केश कापावे एवढेंच तात्पर्य होय.

॥ ॐ येन पूषा बृहस्पते र्वायो रिंद्रस्य चा वपन् । तेन ते वपामि ब्रह्मणा जीवातवे जीवनाय दीर्घायुष्ट्वाय ॥

हा चौथा मंत्र,–मिळून ४ मंत्र ह्मणून चवथ्या वेळीं त्याच प्रमाणें करावें. या प्रमाणें दक्षिण बाजू कडील केश कापण्याचा विधि पूर्ण झाल्या नंतर डाव्या बाजू कडील केश कापण्याचा विधि सुद्धां याच प्रमाणें–याच मंत्रांनीं ४ वेळ करावा. पण भेद मात्र एवढाच कीं, " ॐ येन पूषा० " या मंत्राच्या बदली, ॥ ॐ येन भूरिश्चरादिवं ज्योक् च पश्चाद्धि सूर्यम् । तेन ते वपामि ब्रह्मणा जीवातवे जीवनाय सुश्लोक्याय स्वस्तये ॥ हा मंत्र योजावा. व नंतर,

॥ त्र्यायुषं जमदग्नेः कश्यपस्य त्र्यायुषम् ।
यद्देवेषु त्र्यायुषं तं नो ऽ अस्तु त्र्यायुषम् ॥

हा एक वेदोक्त मंत्र ह्मणून बालकाच्या पृष्ठ भागाकडील केश एकवेळ कापावे. तदनंतर बालकाच्या मस्तक प्रदेशीं हस्त ठेवून पूर्वोक्त मंत्र पुनः जपावा. पुढें वस्तरा नापिताकडे देऊन,

॥ ॐ यत् क्षुरेण मर्चयता सुपेशसा वप्ता वपसि केशान् । शुन्धि शिरो मास्यायुः प्रमोषीः ॥

हा मंत्र ह्मणून त्याच्या कडून वस्तऱ्याला धार काढवावी आणि नंतर त्याला सांगावें. कीं, " शीतोष्ण मिश्र उदकानें बालकाचें मस्तक चांगल्या रीतीनें चोळून, त्याला कांहीं इजा न होईं, अशा रीतीनें मुंडन अर्थात् वपन कर. " पुढें नापितानें यज्ञ कुंडाच्या उत्तर प्रदेशीं जाऊन तेथें पश्चिमाभिमुख बसावें. व नंतर बालकाला त्याच्या समोर पूर्वाभिमुख बसवावा. आणि पुढें मुंडण करिते समयीं

कुलाचारा प्रमाणें केश जसे ठेवायाचे त्या प्रमाणें नापिता कडून ठेववून बाकी सर्व केश वपन करवावे. तदनंतर कुंडा सन्निध ठेवलेले धान्यादि सर्व पदार्थ नापिताला द्यावे. आणि वपन केलेले सर्व केश ( दर्भ, शमी पत्र व शेण यांहीं युक्त असे) नापिताकडे द्यावे. व त्याणें ते सर्व अरण्यांत किंवा गुराच्या गोठ्या सन्निध किंवा नदी तलावाच्या सन्निध खोल खाडा खणून पुरून टाकावे.

इकडे बालकाला डोक्यास लोणी किंवा दह्यांवरील साय चोळून शुद्ध अभ्यंग स्नान घालावें व नंतर उत्तम वस्त्रें परिधान करवावीं. तदनंतर त्याला सन्निध घेऊन कर्त्यानें शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें. आणि २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें—वामदेव्य गान ह्मणावें. आणि नंतर पुरोहितादि कार्यार्थ आलेल्या लोकांची, यथाचार आदर सत्कार पूर्वक रवानगी करावी.

चूडाकरण संस्कार विधि समाप्त.

---

# कर्णवेध संस्कार विधि.

———ooo———

**कर्ण वेध :**— अलंकार धारण करण्या साठीं कानाला योग्य जागीं यथा कालीं व यथा विधि छिद्र पाडणें याचें नांव कर्ण वेध. कर्ण=कान. वेध=विंधणें—विंधन अर्थात् छिद्र.

**काल :**—बालकाच्या जन्मापासून तिसऱ्या किंवा पांचव्या वर्षीं उत्तरायणांत शुक्ल पक्षीं, शुभ नक्षत्रयुक्त दिवशीं सूर्योदयानंतर पहिल्या प्रहरांत हा कर्ण वेध संस्कार करावा.

**विधि:**—वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त कर्ण वेध संस्कार

दिवसाची योजना करून, त्या दिवशीं प्रातःकालीं बालकाला शुद्ध स्नान घालून उत्तम वस्त्रें परिधान करवावीं. नंतर कार्य कर्त्यानें त्या बालकासह शुभासनीं पूर्वाभिमुख बसून प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करावी. ईश्वरोपासना झाल्यानंतर बालकाला खाण्याचे मधुर मधुर पदार्थ देऊन त्याच आसनावर पूर्वाभिमुख बसवावा. आणि नंतर,

॥ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभि र्यजत्राः । स्थिरै रंगैस्तुष्टुवाꣳसस्तनूभि र्व्यशेमहि देवहितं यदायुः ॥

हा मंत्र ह्मणून सुश्रुत नामें वैद्यक ग्रंथानुसार केलेल्या सुंदर, तीक्ष्ण शस्त्रानें प्रथम त्याचा उजवा कान शिर चुकवून विंधावा. अर्थात् नाडी परीक्षकाच्या हातानें विंधवावा. कीं जेणे करून बालकाच्या शिरेला दुःख पोंचूं नयें. तदनंतर,

॥ वक्ष्यन्तीवेदागनीगन्ति कर्णं म्प्रियꣳ सखायं परिषस्वजानाः । योषेव शिंक्ते वितताधिधन्वंज्या ऽ इयꣳ समने पारयन्ति ॥

हा मंत्र ह्मणून दुसरा–वाम (डावा) कान विंधावा. नंतर विंधलेलें छिद्र पक्क होऊन बालकाला दुःख न होई, व तें छिद्र बुजून न जाई, असा कांहीं उपाय करावा.

**कर्ण वेध संस्कार विधि समाप्त.**

# उपनयन संस्कार विधि.

——ooo——

**उपनयन :–** शरीरांत वीर्याचें चांगलें संरक्षण होऊन व शिवाय गुरु गृहीं एकान्त स्थलीं उत्तम विद्याभ्यास होऊन संततीचें शारीर बळ व बुद्धि बळ सदृढ व्हावें, एतदर्थ यथाकालीं व यथाविधि मुलांला ब्रह्मचर्य व्रत पाळण्यांची व वेदशास्त्रादि विद्याभ्यास करण्याची दीक्षा * देणें याचें नांव उपनयन. उप = जवळ. नयन = नेणें. अर्थात् ब्रह्मचर्य व्रत व विद्याभ्यास यांजकडेस वळविणें.

**काल :–** २२ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें उत्तरायण कालीं, शुक्ल पक्षीं कोणत्याहि एका शुभ नक्षत्र युक्त दि-

* ब्राह्मण कुळांतील मुलांचें उपनयन गर्भमासा पासून ८ वे वर्षी, क्षत्रिय कुळांतील मुलांचें–११ व्या वर्षी; व वैश्य कुळांतील मुलांचें–१२ व्या वर्षी करून ब्रह्मचर्य व्रताची दीक्षा द्यावी असा सूत्रोक्त सामान्य नियम आहे. व शिवाय, एक विशेष नियम हा आहे कीं, एकादें मूल शरीरानें चांगलें सदृढ व निरोगी असलें तर ब्राह्मण कुळांतील मुलाचें ५ व्या वर्षी, क्षत्रिय कुळांतील मुलाचें ६ व्या वर्षी, व वैश्य कुळांतील मुलाचें ८ व्या वर्षी–या प्रमाणें उपनयन करावें. पण अशा यथोक्त कालीं बालकांची शारीर प्रकृति चांगली नसली किंवा अन्य कांहीं कारणानें अडचण प्राप्त झाली असली तर, सूत्रकारांनीं ब्राह्मण कुळांतील मुलांला १६ वर्षांची, क्षत्रिय कुळांतील मुलांला २२ वर्षांची व वैश्य कुळांतील मुलांला २४ वर्षांची अशी उपनयन करण्याची अवधी दिलेली आहे. ही अवधी गेल्यानंतर मात्र पुरुष वेदाध्ययनास अनधिकारी व अयोग्य जाणावे. व अशा अयोग्य पुरुषाशीं कोणता व्यवहार व संबंध ठेवूं नये.

वसाची योजना करून त्या दिवशीं प्रातःकाळीं या उपनयन संस्कारास आरंभ करावा.

विधिः—वर दर्शविल्या प्रमाणें यथोक्त उपनयन दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वी गृहासन्निध पूर्व (पुढील) भागीं मंडप उभारून त्यांत पृष्ठ ८–१०, यांत दर्शविल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड बांधावें. व त्याच्या बाजूस बटूला (ज्याचें उपनयन व्हावयाचें त्याला) बसण्या करितां एक शुभासन, जमिनीहून किंचित् उंच सिद्ध करावें; व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची व दुसरे जे कांहीं पदार्थ या संस्काराला अवश्य आहेत, त्या सर्वांची प्रथम तयारी करून ठेवावी. पुढें नियुक्त उपनयनाचे दिवशीं प्रातःकाळीं बटूचें वपन करवून त्याला शुद्ध स्नान घालावें, व उत्तम, शुद्ध वस्त्रें परिधान करवून मंडपांत पूर्वोक्त शुभासनावर पूर्वाभिमुख बसवावा. आणि नंतर कर्त्यानें बटू सन्निध पूर्वाभिमुख बसून कार्य सिध्यर्थ प्रारंभीं (१–८ पृष्ठा पर्यंत) लिहिलेल्या "अग्निमीळे०" इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं पुरोहितासह ईश्वरोपासना चालवावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य लावावें.

या प्रमाणें ईश्वरोपासना झाल्या नंतर बटूला भोजन घालावें. व तेवढ्या वेळांत कार्य कर्त्यानें पृष्ठ ११–१२, यांत लिहिल्या प्रमाणें इंधन द्रव्यानें यज्ञ कुंडांत अग्नि सिद्ध करून, आहुती करितां घृत, समिधा, आज्य स्थाली, स्रुव, शुद्धोदक पात्र इत्यादि होम साहित्य यज्ञ कुंडाजवळ तयार ठेवून, कुंडा-

च्या दक्षिण भागीं पूर्वं स्थापित पीठासनावर आचार्याची * उत्तराभिमुख स्थापना करावी. व नंतर बटू, भोजन करून सिद्ध झाल्यावर, त्याला कार्य कर्त्यानें आणून यज्ञ कुंडासन्निध पश्चिमभागीं पूर्वं स्थापित आसनावर पूर्वाभिमुख बसवावा.

पुढें कार्य कर्त्यानें बटू कडून "**ब्रह्मचर्य मागाम्**", "**ब्रह्मचार्यसानि**" ("मी आतां ब्रह्मचर्याश्रम घेतों" "मी आतां ब्रह्मचारी होतों") असें आचार्याला सांगवावें. नंतर,

**॥ ॐ येनेन्द्राय बृहस्पति र्वासः पर्य दधाद मृतम् । तेन त्वा परि दधाम्यायुषे दीर्घायुत्वाय बलाय वर्चसे ॥**

या मंत्रानें वस्त्र उपवस्त्र धारण करवावें. व नंतर,

**॥ ॐ यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापते र्यत्सहजं पुरस्तात् । आयुष्यमग्र्यं प्रतिमुंच शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः । यज्ञोपवीत मसि यज्ञस्य त्वा यज्ञोपवीतेनोप नह्यामि ॥**

हा मंत्र ह्मणून आचार्यानें बटूला यज्ञोपवीत धारण करवावें; तें अशा रीतीनें कीं, तें यज्ञोपवीत उजव्या काखेंतून वर डाव्या खांद्यावर राहावें. तदनंतर कार्य कर्त्यानें १४ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें घृत सिद्ध करावें, व बटूला आपल्या दक्षिणांगीं बसवून होमाहुती देण्यास आरंभ करावा. प्रथमतः पृष्ठ १९।१६ यांत दर्शविल्या प्रमाणें "**ॐ अयन्त इध्म०**" या मंत्रानें समिधा काष्ठांनीं **समिधाधान** करावें; आणि "**ॐ अदितेऽनुमन्यस्व**" इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडा सन्निध, व "**ॐ देव सवितः प्रसुव०**" (पृष्ठ ३६) यानें कुंडा सभोंवती दक्षिण हस्तांजलीनें उदक सिंचन

---

*आचार्य ह्मणजे जो बटूला अत्यंत प्रेमानें धर्मयुक्त व्यवहारीक-शिक्षण व वेदादि विद्या संपादन होण्याकरितां तन, मन, व धनानें प्रयत्न करितो तो; अर्थात् असा सद्गुणी गुरु जाणावा.

करावें. नंतर आज्याहुतीस आरंभ करावा:—यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर त्या पेटलेल्या समिधांवर, १७ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें आघारावाज्य भागाहुती ४, व्याहृति आहुती ४, व पृष्ठ १९।२० यांत लिहिल्या प्रमाणें अष्टाज्याहुती ८, मिळून एकंदर १६ सामान्य आज्याहुती द्याव्या. व नंतर प्रधान होमाहुती बटू कडून देववाव्या :—प्रथम १८ व्या पृष्ठावर दर्शविल्या प्रमाणें "ॐ भूर्भुवः स्वः । अग्न आयूंषि०" इत्यादि ऋग्वेदोक्त चार मंत्रांनीं चतस्र आज्याहुती ४ द्याव्या. आणि नंतर,

**ॐ अग्ने व्रतपते 'व्रतं चरिष्यामि तत्ते प्र ब्रवीमि तच्छकेयं तेनर्ध्या समिदमह मनृतात् सत्य मुपैमि स्वाहा'॥१॥**
**ॐ वायो व्रतपते० *स्वाहा**—इदं वायवे, इद न्न मम ॥ २ ॥
**ॐ सूर्य व्रतपते० स्वाहा**—इदं सूर्याय, इद न्न मम ॥ ३ ॥
**ॐ चंद्र व्रतपते० स्वाहा**—इदं चंद्राय, इद न्न मम ॥ ४ ॥
**ॐ व्रतानां व्रतपते० स्वाहा**—इदमिंद्राय, इद न्न मम ॥५ ॥

या सूत्रोक्त पांच मंत्रांनीं दुसऱ्या ५ आज्याहुती द्याव्या. आणि नंतर शेवटीं व्याहृति आहुती ४, व स्विष्टकृत् आहुती १, (पृष्ठ १७) अशा ५ आज्याहुती द्याव्या.

तदनंतर आचार्यानें यज्ञ कुंडाच्या उत्तर बाजूस जाऊन तेथें पूर्वाभिमुख बसावें. आणि नंतर बटूला आचार्या समोर—सन्मुख बसवावा. पुढें आचार्यानें बटू कडे अवलोकन करून,

---

* या पुढें वरील १ ल्या मंत्रांतील "व्रतं चरिष्यामि०" इत्यादि स्वाहान्त पद, एथून पुढें सर्वत्र, योजावें. व १ ल्या मंत्रांतीं 'इदमग्नये, इद न्न मम' हा त्याग लावावा.

॥ ओ३म् आगंत्रा समगन्महि प्र सुमर्त्यं युयोतन ।
अरिष्टाः संचरे महि स्वस्ति चरता दयम् ॥

हा मंत्र जपावा. आणि नंतर "ओ३म् ब्रह्मचर्य मागा मुपमानयस्व" असें बटूनें आचार्याला सांगावें. तदनंतर आचार्यानें बटूला "को नामासि" (तुझें नांव काय?) असें विचारावें व बटूनें अमुक "— नामास्मि" (मी अमुक नांवाचा) असें सांगावें. पुढें आचार्यानें "आपो हि ष्ठा०" (पृष्ठ ४८) इत्यादि तीन मंत्र ह्मणून बटूची दक्षिण हस्तांजली शुद्धोदकानें भरावी.* व नंतर आपली दक्षिण हस्तांजली उदकानें भरून,

॥ तत्सवितुर्वृणीमहे वयं देवस्य भोजनम् ।
श्रेष्ठं सर्व धातमं तुरं भगस्य धीमहि ॥

हा मंत्र ह्मणून आपल्या अंजलींतील उदक—बटूच्या हस्तांजलींतील उदकांत सोडावें. आणि नंतर बटूची दक्षिण हस्तांजली अंगुष्ठ सहीत,

॥ ओ३म् देवस्य त्वा सवितुः प्रसवे ऽश्विनोर् बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां हस्तं गृह्णामि †असौ ॥

ह्या मंत्रानें धरून तें हस्तांजलिस्थ उदक बाहेर टाकावें. नंतर दुसऱ्या वेळीं सुद्धां त्याच प्रमाणें ह्मणजे पूर्ववत् आपल्या अंजलीनें बटूची अंजली भरून पुनः दुसऱ्या वेळीं,

॥ ओ३म् सविता ते हस्त मग्रभीद् 'असौ' ॥

हा दुसरा मंत्र ह्मणून, तें हस्तांजलींतील उदक टाकावें.

---

* बटूच्या व आचार्याच्या हस्तांजलींत जें उदक भरणें, तें कोणी अन्य ब्राह्मणानें भरावें असें फक्त गोभिलीय सूत्रांत आहे.

† असौ यास्थानीं बटूचें नांव एथें व पुढेंहि सर्वत्र संबोधनान्त ह्मणावें.

आणि त्याच प्रमाणें तिसऱ्या वेळीं त्याची हस्तांजली भरून,

॥ ॐ अग्निराचार्य स्तव 'असौ' ॥

या तिसऱ्या मंत्रानें पुनः तिसऱ्या वेळीं पण त्याच रीतीनें उदक टाकावें. तदनंतर आचार्यानें बटूसह बहीर्प्रदेशीं जाऊन,

॥ ॐ देव सवितरेष ते ब्रह्मचारी तं गोपाय स मामृत ॥

हा एक मंत्र, व "तच्चक्षुर्देव हितं०" (पृष्ठ ७९) हा एक मंत्र असे दोन मंत्र ह्मणून बटूला सूर्यावलोकन करवावें. तदनंतर आचार्यानें बटूसह पूर्ववत् यज्ञ कुंडाच्या उत्तर प्रदेशीं जावें व,

॥ युवा सुवासाः परिवीत आगात् स उ श्रेयान् भवति जायमानः ॥

॥ ॐ सूर्यस्या वृत मन्वा वर्तस्व 'असौ' ॥

हे मंत्र ह्मणावे आणि बटूला आपल्या सभोंवती प्रदक्षिणा करवून आपल्या सन्मुख बसवावा. पुढें बटूच्या दक्षिण स्कंधाला आपल्या दक्षिण हस्तानें प्रथम स्पर्श करून, नंतर बटूच्या वस्त्राच्छादित अशा नाभी प्रदेशीं, "ॐ प्राणानां ग्रंथिरासि मा विस्रसोंतक इदं ते परि ददामि * अमुं" हा मंत्र ह्मणून स्पर्श करावा. नंतर "ॐ अहुर इदं ते परि ददामि * अमुं" यानें उदर प्रदेशीं, "ॐ कृशन इदं ते परिददामि * अमुं" यानें हृदय प्रदेशीं, ॥ ॐ प्रजापतये त्वा परि ददामि 'असौ'॥ हा मंत्र ह्मणून दक्षिण स्कंधाला व ॥ॐ देवाय त्वा सवित्रे परि ददामि 'असौ'॥ हा मंत्र ह्मणून सव्य (डाव्या) हस्तानें डाव्या स्कंधाला स्पर्श करावा. तदनंतर बटूच्या वाम भागीं राहून त्याच्या स्कंधावरून आपला दक्षिण हस्त नेऊन त्याच्या हृदयाला,

---

* "अमुं" या पदस्थानीं बटूचें नांव द्वितीया विभक्त्यन्त ह्मणावें.

॥ तं धीरा॑सः कुवय॒ उन्न॑यंति
स्वा॒ध्यो॒ ३ मन॑सा देव॒ यन्तः॑ ॥

हा मंत्र ह्मणून त्या दक्षिण हस्तानें आचार्यानें स्पर्श करावा. त्यानंतर आचार्यानें बटूच्या सन्मुख राहून त्याच्या दक्षिण हृदयावर आपला दक्षिण हस्त ठेवून,

॥ ॐ मम व्रते ते हृदयं दधामि मम चित्त-
मनु चित्तं ते अस्तु । मम वाच मेक मना
जुषस्व बृहस्पतिष्ट्वा नि युनक्तु मह्यम् ॥

हा **प्रतिज्ञा मंत्र** प्रथम आपण ह्मणावा, आणि नंतर बटूला ह्मणण्यास सांगावा. बटूनें सुद्धां तोच प्रतिज्ञा मंत्र ह्मणून आचार्या जवळ आपली प्रतिज्ञा करावी. या प्रमाणें परस्पर प्रतिज्ञा झाल्यानंतर, आचार्यानें आपल्या दक्षिण हस्तानें बटूचा दक्षिण हस्त धरून "**को नामासि**" (तुझें नांव काय?) असें विचारावें. आणि बटूनें अमुक "—**अहं भो**" (माझें अमुक नांव) असें सांगावें. नंतर "**कस्य ब्रह्म-चार्यसि**" (तूं कोणाचा ब्रह्मचारी?) असें आचार्यानें विचारावें. व बटूनें "**भवतः**" (आपला) असें उत्तर द्यावें. नंतर आचार्यानें, ॥ **इंद्रस्य ब्रह्मचार्यस्य ग्निराचार्य स्तवाह माचार्य स्तव 'असौ'** ॥ असें बोलावें नंतर शेवटीं बटूच्या संरक्षणार्थ व कल्याणार्थ,

॥ ॐ कस्य ब्रह्मचार्यसि प्राणस्य ब्रह्मचार्यसि कस्त्वा
कमुप नयते काय त्वा परि ददामि ॥

॥ ॐ प्रजापतये त्वा परि ददामि, देवाय त्वा सवित्रे परि
ददामि, अद्भ्य स्त्वौषधीभ्यः परि ददामि, द्यावा पृ-

थिवीभ्यां त्वा परि ददामि, विश्वेभ्य स्त्वा देवेभ्यः परि ददामि, सर्वेभ्य स्त्वा भुतेभ्यः परि ददाम्य रिष्टचै ॥

हे दोन मंत्र आचार्यांनें ह्मणावे. या प्रमाणें उपनयन संस्कार पूर्ण झाल्या नंतर,—वेदारंभ संस्कार त्याच दिवशीं करण्याचा, कार्य कर्त्याचा व आचार्याचा विचार असल्यास, —त्या संस्काराची पुढें लिहिल्या प्रमाणें आरंभ करावा. पण तो संस्कार पुढें अन्य नियुक्त दिवशीं करण्याचा विचार ठरल्यास, त्या दिवशीं शेवटीं **वामदेव्य गान** करून कार्यार्थे आलेल्या लोकांची, यथाचार सन्मान पूर्वक रवानगी करावी.

**उपनयन संस्कार विधि समाप्त.**

# वेदारंभ संस्कार विधि.

**वेदारंभ** :— गायत्री मंत्रा पासून आरंभ करून व्याकरणादि सांगोपांग वेद पर्यंत सर्व सत्य ग्रंथांचें—शास्त्रांचें अध्ययन करण्या करितां यथा कालीं व यथा विधि नियम धारण करणें याचें नांव वेदारंभ.

**काल** :— ज्या दिवशीं उपनयन संस्कार करावयाचा त्या दिवशीं तो उपनयन संस्कार, पूर्वी लिहिल्या प्रमाणें संपल्या नंतर वेदारंभ संस्कार करावा. किंवा त्या दिवशीं कार्य कर्त्याचा व आचार्याचा विचार नसला तर तो संस्कार त्या दिवसा पासून तिसऱ्या, साहाव्या, बाराव्या किंवा चौविसाव्या दिवशीं, शुभ नक्षत्र युक्त दिवस, पृष्ठ २२ प्रमाणें पाहून, करावा, तथापि ते पण दिवस अनुकूल नसले तर सहा महिने किंवा वर्ष पर्यंत कोणताहि शुभ नक्षत्र युक्त दिवस, पृष्ठ २२ प्रमाणें पाहून, त्या दिवशीं हा संस्कार करावा.

**विधि** :– वर लिहिल्या प्रमाणें वेदारंभाचा यथोक्त दिवस योजून त्या दिवशीं प्रातःकालीं बटूला शुद्ध स्नान घालून उत्तम वस्त्रें परिधान करवावीं. आणि नंतर कार्य कर्त्यानें बटूला सन्निध घेऊन शुभासनावर पूर्वाभिमुख बसावें. आणि आचार्या सहीत प्रारंभीं ( १–८ पृष्ठा पर्यंत ) लिहिलेल्या " **अग्निमीळे०** " इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना* चालवावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनी आपलें लक्ष्य लावावें.

पुढें–उपनयन संस्कारांत केलेल्या होम विधाना प्रमाणेंच यज्ञ कुंडादि सर्व होम साहित्याची तयारी केलेली असावी. व पीठासनावर आचार्याची स्थापना करावी. नंतर बटूनें यज्ञ कुंडाला प्रदाक्षिणा करून कुंडा सन्निध पश्चिम भागीं पूर्वाभिमुख बसावें. आणि त्याच्या जवळ वाम भागीं कार्य कर्त्यानें बसून यज्ञीय काष्ठांनीं यज्ञ कुंडांत अग्नि पेटवून, आहुती करितां घृत सिद्ध करावें : ( पृष्ठ १४ ) नंतर " **ॐ अयन्त इध्म०** " ( पृष्ठ १५ ) या मंत्रानें समिधाधान करावें. तदनंतर " **ॐ अदितेऽनुमन्यस्व** " (पृष्ठ १६ ) इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडा सन्निध, व " **ॐ देव सवितः प्रसव०** " ( पृष्ठ ३६ ) या मंत्रानें कुंडा सभोंवती दक्षिण हस्तांजलीनें उदक सिंचन करावें. पुढें यज्ञ कुंडांत प्रदिप्त झालेल्या समिधांवर **आघारावाज्य भागाहुती** ४, **व्याहृति आहुती** ४, (पृष्ठ १७) व **अष्टाज्याहुती** ८ (पृष्ठ १९) अशा १६ आज्याहुती प्रथम द्याव्या. नंतर प्रधान होमाहुती बटूकडून उपनयन संस्कारांत जशा नऊ देवविल्या होत्या, त्याच प्रमाणें एथेंहि

---

* हा वेदारंभ संस्कार उपनयन संस्काराच्याच दिवशीं केल्यास अशी द्विवार ईश्वरोपासना करण्याची जरूरी नाहीं.

बटू कडूनच त्या ९ आहुती देवव्याव्या. नंतर शेवटीं, व्याहृति आहुती ४, स्विष्टकृत् आहुती १, व प्राजापत्य आहुती १ ( पृष्ठ १७।१९ ) अशा ६ आज्याहुती द्याव्या. तदनंतर,

॥ ॐ अग्ने सुश्रवः सुश्रव सं मा कुरु । यथा त्वमग्ने सुश्रवः सुश्रवा । अस्येवं माꣳ सुश्रवः सौश्रव सं कुरु । यथा त्वमग्ने देवानां यज्ञस्य निधिपा ऽ अस्येव महं मनुष्याणां वेदस्य निधिपो भूयासम् ॥

हा मंत्र ह्मणून कुंडांतील अग्नि एकत्र करावा. आणि नंतर बटूनें यज्ञ कुंडाला प्रदक्षिणा करून कुंडा सभोंवती पूर्ववत् उदक सिंचन करावें. आणि कुंडाच्या दक्षिणांगीं उभें राहून,

॥ ॐ अग्नये समिध माहार्षं बृहते जातवेदसे । यथा त्वमग्ने समिधा समिध्य स ऽ एव मह्मा युषा मेधया वर्चसा प्रजयाꣳशुभि र्ब्रह्म वर्चसेन समिंधे जीवपुत्रो ममाचार्यो मेधाव्यहं मसान्य निरा करिष्णु र्यशस्वी तेजस्वी ब्रह्म वर्चस्यन्नादो भूयासꣳ स्वाहा ॥

हा मंत्र ह्मणून प्रथम एक समिधा कुंडांत टाकावी. नंतर पुनः सुद्धां तोच मंत्र ह्मणून दुसरी समिधा टाकावी. व पुनः आणखी तिसऱ्या वेळीं तोच मंत्र ह्मणून तिसरी समिधा कुंडांत टाकावी. तदनंतर पूर्ववत् "ॐ अग्ने सुश्रवः०" या मंत्रानें पुनः अग्नि एकत्र करून पूर्ववत् पुनः कुंडा सन्निध उदक सिंचन करावें. तदनंतर बटूनें पूर्ववत् बसून,

ॐ तनूपा ऽ अग्ने ऽसि तन्वं मे पाहि ॥१॥
ॐ आयुर्दा ऽ अग्ने ऽ स्यायुर्मे देहि ॥२॥
ॐ वर्चोदा ऽ अग्ने ऽ सि र्वर्चो मे देहि ॥३॥
ॐ अग्ने यन्मे तन्वा ऽ ऊनं तन्म ऽ आपृण ॥४॥

ॐ मेधां मे देवः सविता ऽ आ दधातु ॥५॥
ॐ मेधां देवी सरस्वती ऽ आ दधातु ॥६॥
ॐ मेधा मश्विनौ देवा वा धत्तां पुष्करस्रजौ॥७॥

या प्रत्येक मंत्रानें दक्षिण हस्तांजली किंचित् उष्ण करून त्या हस्तांजलीनें मुख स्पर्श करावा.

तदनंतर खालीं लिहिल्या प्रमाणें अंग स्पर्श करावा :—

ॐ वाक् च म ऽ आप्यायताम् । या मंत्रानें मुख प्रदेशीं,
ॐ प्राण श्च म ऽ आप्यायताम्।या मंत्रानें नासिका द्वाराला,
ॐ चक्षु श्च म ऽ आप्यायताम् । या मंत्रानें उभय नेत्र प्रदेशीं,
ॐ श्रोत्रं च म ऽ आप्यायताम् ।या मंत्रानें उभय कर्ण प्रदेशीं,
ॐ यशो बलं च म ऽ आप्यायताम् ।या मंत्रानें उभय बाहूंला,
या रीतीनें अंग स्पर्श केल्या नंतर,

॥ ॐ मयि मेधां मयि प्रजां मय्यग्नि स्तेजो दधातु. । मयि मेधां मयि प्रजां मयीन्द्र इन्द्रियं दधातु. । मयि मेधां मयि प्रजां मयि सूर्यो भ्राजो दधातु. । यत्ते अग्ने तेज स्तेनाहं तेजस्वी भूयासं. । यत्ते अग्ने वर्च स्तेनाहं वर्चस्वी भूयासं. । यत्ते अग्ने हरस्तेनाहं हरस्वी भूयासम्॥

या मंत्रांनीं परमात्म्याचें उपस्थान (प्रार्थना) करून यज्ञ कुंडाच्या उत्तर बाजूस जाऊन बटूनें खालीं गुडघे टेंकून पूर्वाभिमुख बसावें. आणि आचार्यानें त्याच्या सन्मुख पश्चिमाभिमुख बसावें. नंतर बटूनें आचार्याला दंडवत् नमस्कार करून "अधीहि भूः सावित्रीं भो अनु ब्रूहि" (ॐ कार, तीन व्याहृति, व सावित्री या त्रिकचें उच्चारण करून मला सांगावें) असें ह्मणावें. तदनंतर आचार्यानें आपलें व बटूचें मस्तक, स्कंध पर्यंत एका वस्त्रानें झांकून आपल्या हस्तानें ब-

टूचे हस्त ग्रहण करून गायत्री मंत्राचा उपदेश तीन भागांनीं करावा :—प्रथम "ॐ भूर्भुवः स्वः। तत्सवितुर्वरेण्यं" एवढा मंत्र भाग बटू कडून सावकाश पद पदाचा स्पष्ट उच्चार करून ह्मणवावा. तदनंतर द्वितीय वार "ॐ भूर्भुवः स्वः। तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि" एवढा मंत्र भाग बटू कडून सावकाश पद पदाचा स्पष्ट उच्चार करून ह्मणवावा. व तदनंतर, तृतीय वार,

॥ ॐ भूर्भुवः स्वः। तत्सवितुर्वरेण्यं भर्गो
देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् ॥

हा पूर्ण मंत्र बटू कडून पूर्ववत् सावकाश पद पदाचा स्पष्ट उच्चार करून ह्मणवावा. आणि नंतर त्या मंत्राचा त्याला संक्षेप रीतीनें अर्थ समजावून द्यावा. तदनंतर बटूच्या (ब्रह्मचाऱ्याच्या) हृदय प्रदेशीं ऊर्ध्वांगुली हस्त ठेवून,

ॐ ममव्रते हृदयन्ते दधामि मम चित्तमनु चित्तं ते अस्तु।
मम वाचमेक व्रतो जुषस्व बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम् ॥

हा प्रतिज्ञा मंत्र आचार्यानें ह्मणावा. आणि नंतर,

ॐ इयं दुरुक्तं परिबाधमाना वर्णं पवित्रं पुनती म आगात्।
प्राणापानाभ्यां बलमादधाना स्वसा देवी सुभगा मेखलेयं॥
ॐ युवासुवासाः परिवीतआगात्सउश्रेयान्भवतिजायमानः। तंधीरासः कवय उन्नयंति स्वाध्योमनसा देवयन्तः॥

हे मंत्र ह्मणून आचार्यानें ब्रह्मचाऱ्याच्या कटिप्रदेशीं (कमरेंत) मेखला*(मुंज) बांधावी. नंतर त्याला दंड† द्यावा. तो,

---

* ब्राह्मणाला मुंज किंवा दर्भ तृणाची मेखला, क्षत्रियाला धनुष्य तृणाची मेखला, व वैश्याला, सणाची मेखला अशी द्यावी.

† ब्राह्मणाला ललाट ह्मणजे मस्तकाच्या केशापर्यंत उंचीचा

॥ ॐ योमे दण्डः परा पतद्वैहायसो ऽधि भूम्याम् ।
तमहं पुनरादद ऽ आयुषे ब्रह्मणे ब्रह्म वर्चसाय ॥

हा मंत्र ह्मणून त्याणें ग्रहण करावा. तदनंतर कार्य कर्त्यानें (पित्यानें) ब्रह्मचाऱ्याला ब्रह्मचर्याश्रमाचा उपदेश करावा :–

॥ १ ब्रह्मचार्यसि असौ * । २ अपो ऽशान । ३ कर्म कुरु । ४ दिवा मा स्वाप्सीः । ५ आचार्याधीनो वेद मधीष्व । ६ द्वादश वर्षाणि वेद ग्रहणांनं वा ब्रह्मचर्यं चर । ७ आचार्याधीनो भवान्यत्रा धर्म चरणात् । ८ क्रोधाऽनृते वर्जय । ९ मैथुनं वर्जय । १० उपरि शय्यां वर्जय । ११ कौशीलव गन्धांजनानि वर्जय । १२ अत्यन्त स्नानं वर्जय । १३ अव लेखन दंत प्रक्षालन पाद प्रक्षालनानि वर्जय । १४ क्षुर कृत्यम् वर्जय । १५ मधु मा ९ सं वर्ज्जय । १६ गो युक्त रोहणं वर्जय । १७ अंतर्ग्राम उपानहोर्धारणं वर्ज्जय । १८ स्वयमिन्द्रिय मोचनं वर्ज्जय । १९ मेखला धारण भैक्षचर्य दंड धारण समिधाधानोदकोपस्पर्शन प्रातरभिवादा इत्येते नित्य धर्माः ।

भावार्थ :–१ आज पासून तूं ब्रह्मचारी आहेस. २ जलाचें आचमन कर. ३ दुष्ट कर्म सोडून सत्कर्म आचरण कर. ४ दिवसा निजूं नको. ५ गुरूच्या आज्ञेंत राहून वेद शीक. ६ बारा वर्षे पर्यंत किंवा वेदाभ्यास पूर्ण होई पर्यंत ब्रह्मचर्य धारण कर. ७ आचार्याधीन राहा. परंतु आचार्य अधर्म

---

पळसाचा दंड द्यावा. क्षत्रियाला भृकुटी पर्यंत औदुंबराचा, व वैश्याला नासिका छिद्र पर्यंत बेल वृक्षाचा–असा दंड द्यावा. परंतु अशा प्रमाणें दंड न मिळाल्यास, या तीन वृक्षांतून जो वृक्ष ज्यास मिळेल त्या वृक्षाचा दंड त्याणें ग्रहण करावा.

* "असौ" या स्थानीं ब्रह्मचाऱ्याचें नांव संबोधनान्त घ्यावें.

करील किंवा सांगेल तर तो करूं किंवा ऐकूं नको. ८ क्रोध व मिथ्या भाषण सोडून दे. ९ मैथुन अर्थात् विषय वर्ज कर. १० गुरूहून उंच आसन किंवा शय्या वर्ज कर. ११ नृत्य, गीत, वाद्य, सुगंधिक पदार्थ व नेत्र अंजन हें सर्व वर्ज कर. १२ अति ( वारंवार ) स्नान वर्ज कर. १३ हस्तानें भूमी खणूं नये व अत्यन्त दंत धावन व पाद प्रक्षालन करूं नये. १४ क्षौर अर्थात् वपन करूं नये. १५ मद्य मांस कधींच भक्षण करूं नको. १६ गाडी घोड्यावर बसतां नये. १७ गांवांत पादुका—पायपोश वापरूं नये. १८ हस्तानें वीर्यपात करूं नको. १९ मेखला व दंड धारण करावा; भिक्षाचरण करावें; स्नान संध्या, समिधाधान, करावें; व माता, पितादि वडील, आचार्य व अतिथी यांच्या पुढें सदा अत्यन्त नम्र असावें. एणें प्रमाणें कार्य कर्त्यानें (पित्यानें) ब्रह्मचाऱ्यास सार्थ उपदेश करावा. व ब्रह्मचाऱ्यानें प्रत्येक बोधाच्या अंतीं "ॐ बाढं" ( होय महाराज ) असें प्रति उत्तर द्यावें.

तदनंतर ब्रह्मचाऱ्यानें यज्ञ कुंडाला प्रदक्षिणा करून कुंडाच्या पश्चिम भागीं पूर्वाभिमुख राहून—आई, बाप, बहीण, भाऊ, मामा, मावशी, चुलता इत्यादि कोणी आप्त—जे भिक्षा नाहीं ह्मणणार नाहींत, त्यांच्या पाशीं भिक्षा * मागावी. व ती मिळालेली सर्व भिक्षा आचार्याकडे द्यावी. नंतर आचार्यानें त्यांतून कांहीं आपण घेऊन बाकी ब्रह्मचाऱ्याला द्यावी. ती त्याणें आपल्या भोजनार्थ ठेवावी. तदनंतर ब्रह्मचाऱ्याला शुभासनीं पूर्वाभिमुख बसवून २१

---

* भिक्षा मागते समयीं भवत् ( आपण ) हा शब्द ब्राह्मणानें भिक्षावचनीं—आद्यस्थानीं ; क्षत्रियानें, मध्यस्थानीं ; व वैश्यानें अन्त्य स्थानीं; असा योजावा. पुरुषापाशीं भिक्षा मागतांना

व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें कर्त्यानें **वामदेव्य गान** ह्मणावें. आणि त्या नंतर ब्रह्मचाऱ्यानें पूर्वोक्त ठेवलेली भिक्षा घेऊन ती भक्षण करावी; व संध्याकाळ पर्यंत विश्रान्ति घ्यावी.

पुढें—सूर्यास्तानंतर ब्रह्मचाऱ्या कडून गृहाश्रमांत लिहिलेली संध्योपासना करवावी. व नंतर आचार्यानें ब्रह्मचाऱ्यासह यज्ञ कुंडाच्या पश्चिम भागीं पूर्वाभिमुख बसावें. व कुंडांत यज्ञीय काष्ठांनीं अग्नि पेटवून घृत व स्थालीपाक * हीं आहुती द्रव्यें सिद्ध करावीं: (पृष्ठ १४). नंतर "**ॐ अयन्त इध्म०**" (पृष्ठ १५) या मंत्रानें कुंडांत समिधाधान करावें. पुढें—त्या समिधा पेटल्या नंतर त्यांजवर प्रथम "**आघारावाज्य भागाहुती ४**, व व्याहृति आहुती ४, मिळून ८ आज्याहुती द्याव्या. त्या नंतर पूर्वोक्त विधिप्रमाणें ब्रह्मचाऱ्यानें

---

भवत् शब्दाचें रूप **भवान्** करावें व स्त्री पाशीं मागते समयीं भवत् शब्दाचें रूप **भवती** करावें. उदाहरण :—

| पुरुषा पाशीं मागण्याचें वचन. | स्त्री पाशीं मागण्याचें वचन. |
|---|---|
| **ॐ भवान् भिक्षां ददातु** | **ॐ भवती भिक्षां ददातु**— ब्राह्मणानें. |
| **ॐ भिक्षां भवान् ददातु** | **ॐ भिक्षां भवती ददातु**,— क्षत्रियानें. |
| **ॐ भिक्षां ददातु भवान्** | **ॐ भिक्षां ददातु भवती**— वैश्यानें. |

* हा स्थालीपाक करण्याचा विधि १५ व्या पृष्ठावर लिहिला आहे; त्या प्रमाणें "**ॐ सदसस्पतये त्वा जुष्टं निर्वपामि**" "**ॐ सवित्रे त्वा०**" "**ॐ ऋषिभ्यस्त्वा०**" व "**ॐ अग्नये स्विष्टकृते त्वा०**" हे मंत्र ह्मणून प्रथम तांदूळ तयार करावे; आणि नंतर त्याच मंत्रांच्या शेवटीं "निर्वपामि" ह्मणून जें पद आहे, त्याच्या बदली "**प्रोक्षामि**" हें पद लावून त्या मंत्रांनीं तांदूळ प्रक्षालन करावे (धुवावे). व नंतर त्याचा भात शिजवावा.

उभें राहून '**ॐ अग्ने सुश्रवः०**' या मंत्रानें समिधा होमाव्या; व नंतर बसून त्या कुंडस्थ अग्नि वर आपला हस्त किंचित् उष्ण करून त्यानें पूर्व वत् मुख स्पर्श करून, नंतर अंग स्पर्श करावा. तदनंतर पूर्वोक्त सिद्ध करून ठेवलेला भात ब्रह्मचाऱ्यानें आचार्याकडे होमार्थ व भोजनार्थ द्यावा. व आचार्यानें त्या भातांतून थोडा भात एका पात्रावर काढून त्यांत घृत मिश्र करावें. आणि नंतर त्या घृत मिश्र भाताच्या,

॥ सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम् । सनिं मेधामयासिषं, स्वाहा–सदसस्पतये, इद०॥

॥ तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि । धियो यो नः प्रचोदयात् स्वाहा–इदं सवित्रे, इद न्न मम ॥

॥ ॐ ऋषिभ्यः स्वाहा–इदं ऋषिभ्यः, इद न्न मम ॥

या प्रत्येक मंत्रानें एकेक अशा तीन आहुती, व **ॐ यदस्य कर्मणो०** (पृष्ठ १७।१८) या स्विष्टकृत् मंत्रानें एक, अशा एकंदर ४ आहुती द्याव्या. तदनंतर व्याहृति आहुती ४, व **अष्टाज्याहुती** ८, मिळून १२ आज्याहुती शेवटीं द्याव्या. पुढें ब्रह्मचाऱ्यानें शुभासनावर पूर्वाभिमुख बसून २१ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें **वामदेव्य गान** आचार्यासह ह्मणावें. नंतर अमुक "**–गोत्रोत्पन्नः, अहं भो भवंत मभि वादयामि**" असें ह्मणून आचार्याला वंदन करावें. तदनंतर पूर्वोक्त आहुती देऊन राहिलेलें हविष्यान्न व अन्य भोजन ब्रह्मचाऱ्यानें आचार्या सह भक्षण करावें. नंतर कार्यार्थ आलेल्या लोकांला भोजन देऊन त्यांची, यथाचार रवानगी करावी. पुढें १० घटिका रात्र झाल्यावर ब्रह्म-

चाऱ्यानें अधः स्थानीं–भूमीवर अंथरूण पसरून शयन करावें.

या नंतर ब्रह्मचाऱ्यानें निदान तीन दिवस पर्यंत सावित्री व्रत पाळावें;–अर्थात् पूर्वोक्त विधि प्रमाणें त्या प्रत्येक दिवशीं प्रातःकालीं व संध्याकालीं संध्योपासना; यज्ञ कुंडांत समिधा होम; व मुख, अंगादि स्पर्श ब्रह्मचाऱ्याने करावे. व **सदसस्पति०** इत्यादि ३ मंत्रांनीं स्थालीपाकाहुती द्याव्या. क्षार व लवण रहीत भोजन करावें व अधः स्थानीं–भूमीवर अंथरूण पसरून शयन करावें.

तदनंतर, पुढें–ब्रह्मचाऱ्यानें पाठशाळेंत जाऊन गुरूपाशीं विद्याभ्यासास आरंभ करावा:–प्रथम गृहाश्रम संस्कारांत दर्शविल्या प्रमाणें संध्योपासना व अग्निहोत्र विधि आदि नित्य कर्म शिकून नंतर दर दिवस संध्योपासना करावी. आणि नंतर गुरूच्या आज्ञे प्रमाणें नित्यक्रमें सारखा विद्याभ्यास करावा. त्याचा प्रकार:–

प्रथम–प्रारंभीं ब्रह्मचाऱ्यानें पाणिनि मुनि कृत **अष्टाध्यायी** तोंड पाठ शिकावी. नंतर धातुपाठ, **गणपाठ**, व **लिंगानुशासन** यांचा अभ्यास करावा. आणि नंतर **अष्टाध्यायी**,–धातुपाठादिसह द्वितीय वार शिकून पक्की करावी. नंतर पतंजलि कृत **महाभाष्य**, ज्यांत अष्टाध्यायी आदि ४ हि ग्रंथांची यथावत् व्याख्या दिली आहे, त्याचा चांगला अभ्यास करावा. या रीतीनें व्याकरणाचा अभ्यास पूर्ण होण्यास चांगल्या बुद्धिमान् विद्यार्थ्याला फक्त तीन वर्षें लागतील. व तो विद्यार्थी नंतर,–सर्व विषय समजण्यास अर्थात् शिकण्यास योग्य होईल. या पुढें–नंतर कात्यायनादि मुनि कृत **कोश**, यास्क मुनि कृत **निघंटु** व **निरुक्त** हे ग्रंथ शिकावे,–ज्यांत अव्ययार्थ, एकार्थ व

अनेकार्थ कोशाचें निर्विवाद स्पष्टीकरण केलें आहे. त्याचा अभ्यास १॥ वर्षांत होऊं शकेल. त्या नंतर पिंगल मुनि कृत **छंद सूत्र**, भाष्य सहीत शिकून; यास्क मुनि कृत **काव्यालंकार सूत्र**, व त्याजवर केलेलें वात्स्यायन मुनींचें **भाष्य** हीं शिकावीं,—जेणें करून गायत्री आदि छंद संबंधी काव्यालंकार व श्लोक रचनेचें यथावत् ज्ञान ६ महिन्यांत होईल. तदनंतर जैमिनि मुनि कृत सूत्र— **पूर्व मीमांसा शास्त्र**,— व्यास मुनि कृत **अधिकरण माला व्याख्या** सहीत शिकून, त्याच्या बरोबरच **मनु स्मृतिचा** अभ्यास करावा; त्याला ५।६ महिने लागतील. तदनंतर कणाद मुनि कृत सूत्र—**वैशेषिक दर्शन**,—व त्याज वरील गोतम मुनि कृत पाद **भाष्य** व भारद्वाज मुनि कृत **सूत्र वृत्ति** हे ग्रंथ शिकावे; त्यास २।३ महिने लागतील. नंतर गोतम मुनि कृत सूत्र—**न्याय दर्शन**, व त्या वरील वात्स्यायन मुनींचें **भाष्य** हीं शिकावीं; त्यास ४।५ महिने लागतील. तदनंतर पतंजलि मुनि कृत सूत्र—**योग शास्त्र**,—व त्याजवरील व्यास मुनि कृत **भाष्य** हीं शिकावीं; त्यास १।२ महिने लागतील. नंतर कपिल मुनि कृत सूत्र—**सांख्य दर्शन**, व त्या वरील भागुरि मुनि कृत **भाष्य**, हीं शिकावीं; त्यास सुमारें १।२ महिने लागतील. तदनंतर **ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडूक्य, छान्दोग्य, ब्रह्मविद्या, ऐतरेय,** व **बृहदारण्यक** या उपनिषदांचा अभ्यास करावा; तो ५–६ महिन्यांत होऊं शकेल. याच्या पुढें व्यास मुनि कृत सूत्र—**वेदान्त दर्शन**, व त्या वरील वात्स्यायन व बौधायन मुनि कृत **भाष्य** या ग्रंथांचा अभ्यास करावा; तो ६ महिन्यांत पूर्ण होईल. या प्रमाणें ६ शास्त्रें व १० उप-

निषदें यांचा अभ्यास झाल्या नंतर, अर्थ व स्वर यां सहित **ऋग्वेद** शिकून, त्या बरोबर आश्वलायन मुनि कृत **श्रौत** व **गृह्य सूत्र**, **बह्वृच ब्राह्मण**, व **कल्पसूत्र** हे ग्रंथ ह्मणावे. त्यास सुमारें २ वर्षें लागतील. नंतर त्याच प्रमाणें **यजुर्वेद** व त्यासह कात्यायन (पारस्कर) **श्रौत** व **गृह्य सूत्र** आणि **शतपथ ब्राह्मण** हे ग्रंथ ह्मणावे. त्यास सुमारें १॥ वर्ष लागेल. नंतर **सामवेद**, व त्या सह गोभिलीय व राणायन **श्रौत सूत्र**, **कल्पसूत्र**, **साम ब्राह्मण**, गोभिलीय व राणायन **गृह्यसूत्र** हे ग्रंथ शिकावे. जे दोन वर्षांत पूर्ण होतील. पुढें त्याच प्रमाणें **अथर्व वेद** व त्यासह शौनक **श्रौत** व **गृह्य सूत्र** **अथर्व ब्राह्मण** व **कल्प सूत्र** या ग्रंथांचा अभ्यास करावा. त्यास सुमारें एक वर्ष लागेल. या प्रमाणें ६।७ वर्षांत चारी वेदांचें अध्ययन होऊन जाईल. ह्या पुढें ऋग्वेदाचा उपवेद जो **आयुर्वेद** त्याचा अभ्यास करावा, आणि त्यांत धन्वन्तरी कृत **निघंटु**, **चरक**, व **सुश्रुत** या तीन ग्रंथांतील शास्त्र क्रिया, हस्त क्रिया व निदानादिक विषयांचें यथार्थ ज्ञान संपादन करावें; त्यास सुमारें ३ वर्षें लागतील. त्या नंतर यजुर्वेदाचा उपवेद **धनुर्वेद** शिकावा; त्यांतील शस्त्र अस्त्र विद्या; व शकट व्यूह, मकर व्यूह, गरुड व्यूह, इत्यादि सैन्य रचना शिकण्यास २।३ वर्षें लागतील. पुढें सामवेदाचा उपवेद **गांधर्व वेद** शिकावा; त्यांतील वाद्य, राग रागिणी, कालताल, स्वर पूर्वक गायन विद्येचा अभ्यास २ दोन वर्षांत होईल. त्यापुढें अथर्व वेदाचा उपवेद **अर्थ वेद** (शिल्पशास्त्र) शिकावा; त्यांतील कलायंत्राचें; पदार्थांच्या अनुकूल व विरुद्ध गुणांचें; त्यांच्या रसायन प्रयोगाचें; दूरवीक्षण, अण्वीक्षण, पृथ्वी यान, जलयान, आकाश

यान इत्यादि पदार्थ रचण्याचें ज्ञान सुमारें ३ वर्षांत होऊं शकेल. त्याच्या पुढें गणीत विद्या ज्योतिः शास्त्र— भृग्वादि मुनि कृत सूत्र व भाष्य यांचा अभ्यास करावा. त्यास सुमारें ३ वर्षें लागतील.

एणें प्रमाणें सर्व विद्यांचा परिपूर्ण अभ्यास होण्या करितां सुमारें २५—३० वर्षें ब्रह्मचर्य व्रत प्रत्येक पुरुषानें पाळलें पाहिजे. व तोच उत्तम पुरुष होईल. आतां या प्रमाणें सर्व अभ्यास करण्यासाठीं एखाद्या पुरुषाला तन, मन, धनादिकाची अनुकूलता नसली तर, त्याणें कमींत कमी २४—२५ वर्षांची उमर होई पर्यंत ब्रह्मचर्य व्रतानें होईल तेवढा विद्याभ्यास करावा. व याच प्रमाणें स्त्रियांनीं हि २३—२४ वर्षांची उमर होई पर्यंत ब्रह्मचर्य व्रत पाळून, व्याकरण, धर्म शास्त्र, वैद्यक शास्त्र, गान विद्या, शिल्प शास्त्र, व अग्नि होत्रादि यज्ञ कार्य व गृह कार्य जाणण्या करितां वेदाभ्यास अवश्य करावा. परंतु या प्रमाणें सर्व अभ्यास करण्या करितां एकाद्या स्त्रीला तन, मन, धनादिकाची अनुकूलता नसली तर, तिणें कमींत कमी १६।१७ वर्षांची उमर होई पर्यंत ब्रह्मचर्य व्रतानें होईल तेवढा विद्याभ्यास करावा. या प्रकारें पुरुषाच्या पाठ शाळेंत पुरुषांनीं व स्त्रियांच्या पाठ शाळेंत स्त्रियांनीं अभ्यास करावा, असे वेदोक्त धर्मी आर्य लोकांचे पूर्वापार नियम आहेत, त्या प्रमाणें ब्रह्मचारी स्त्री पुरुषांनीं गुरु गृहीं विद्याभ्यास केल्या नंतर, गृहाश्रम स्वीकारण्याची इच्छा असली* तर गुरूच्या

* या समयीं पृष्ठ २४, यांत दर्शविलेल्या गुणकर्मा प्रमाणें गुरूनें विद्यार्थ्यास ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा पदव्या द्याव्या. व त्या प्रमाणें त्याणीं आपापल्या नांवां पुढें शर्मन्,

व माता पितादि वडीलांच्या संमतीनें व अनुमोदनानें विवाह संस्कारांत दर्शविल्या प्रमाणें स्व प्रतिमानुरूप, समान व योग्य लक्षण युक्त,–स्त्रीनें वराची व पुरुषानें वधूची योजना करावी. आणि नंतर–पुढें लिहिल्या प्रमाणें समावर्तन संस्कार प्रथम करून, नंतर विवाह संस्कार करावा. पण कोणी ब्रह्मचारी स्त्री पुरुषांला ब्रह्मचर्य व्रतानें पूर्ण विद्याभ्यास करून जितेंद्रिय व वैराग्य शक्ति प्राप्त झाली असली, व त्यांची मन वासना विषय भोगाकडे अर्थात् त्यांची मनोवृत्ति गृहाश्रम स्वीकारण्याची नसली तर, त्यांणीं केवळ परोपकारार्थ व परमार्थार्थ एकदम संन्यासाश्रम स्वीकारावा. आणि केवळ निरपेक्ष व निष्काम बुद्धीनें पुढील सन्यासाश्रम संस्कारांत लिहिल्या प्रमाणें आयुष्य क्रमण करावें.

वेदारंभ संस्कार विधि समाप्त.

# समावर्तन संस्कार विधि.

——०००——

**समावर्तनः**– ब्रह्मचर्य व्रत, व सांगोपांग वेद विद्या, सुशिक्षा, व पदार्थ विज्ञान हीं सर्व संपादन करून, नंतर विवाह विधान पूर्वक गृहाश्रम स्वीकारण्या करितां विद्यालया पासून निवृत्त होणें याचें नांव समावर्तन. सम्=पूर्ण, उत्तम. आवर्तन=निवृत्त होणें अर्थात् समाप्त करणें.

---

**वर्मन्, गुप्त** व **दास** अशा अनुक्रमें संज्ञा लावाव्या. जसें, बाळाजी शर्मा, **भद्रवर्मा, विष्णुगुप्त. हरिदास.** स्त्रियांलाहि त्याच प्रमाणें पदव्या द्याव्या, व त्यांच्या नांवां पुढें **दा** हें संज्ञार्थ पद लावावें. जसें, **मथुरादा, गंगादा वेदमतीदा** इ०.

कालः—वेदारंभ संस्काराच्या विधींत दर्शविल्या प्रमाणें ब्रह्मचारी स्त्री पुरुषांनीं यथोक्त विद्याभ्यास यथावत् काल संपूर्ण झाल्या नंतर, गुरूच्या व माता पितादि वडीलांच्या संमतीनें व अनुमोदनानें गृहाश्रम स्वीकारण्या साठीं प्रशस्त, स्वप्रतिमानुरूप व सवर्ण लक्षण युक्त, पुरुषानें वधूची व स्त्रीनें वराची योजना केल्या नंतर, व गुरु गृहीं विवाहाचा वाग् निश्चय झाल्या नंतर, हा समावर्तन संस्कार विधि, २२ व्या पृष्ठावर लिहिल्या प्रमाणें शुभ नक्षत्र युक्त दिवस योजून त्या दिवशीं करावा.

विधिः—वर लिहिल्या प्रमाणें यथोक्त समावर्तन संस्कार दिवसाची योजना करावी. व तो दिवस येण्या पूर्वीं आचार्याच्या गृहीं पृष्ठ ८—११, यांत सांगितल्या प्रमाणें एक यज्ञ कुंड व इंधन द्रव्यादि सर्व होम साहित्याची तयारी ठेवावी. पुढें—नियुक्त दिवशीं ब्रह्मचाऱ्यानें शुद्ध स्नान व उत्तम वस्त्रें परिधान करून शुभासनावर पूर्वाभिमुख बसून प्रारंभीं ( पृष्ठ १—८ पृष्ठा पर्यंत ) लिहिलेल्या अग्निमीळे० इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं आचार्यासह ईश्वरोपासना करावी. व त्या उपासनेकडे कार्यार्थ आलेल्या लोकांनीं आपलें लक्ष्य लावावें.

पुढें—ईश्वरोपासना झाल्या नंतर, ११।१२ व्या पृष्ठावर सांगितल्या प्रमाणे इंधन द्रव्यानें कुंडांत अग्नि सिद्ध करून आहुती करितां घृत, समिधा, आज्यस्थाली, स्त्रुव शुद्धोदक पात्र इत्यादि होम साहित्य कुंडा सन्निध तयार ठेवावें. नंतर आचार्यानें कुंडाच्या दक्षिणांगीं उत्तराभिमुख बसावें. व ब्रह्मचाऱ्यानें कुंडा सन्निध पश्चिम भागीं पूर्वाभिमुख बसावें; आणि कुंडांत यज्ञीय काठांनीं अग्नि प्रज्वलीत

करून घृत सिद्ध करावें ( पृष्ठ १४ ). नंतर समिधांनीं समिधाधान करून कुंडा सन्निध व सभोंवती उदक सिंचन करावें. ( पृष्ठ १५।१६ ). पुढें यज्ञाग्नींत दिलेल्या समिधांनीं पेट घेतल्या नंतर त्या पेटलेल्या समिधांवर प्रथम **आघारावाज्य भागाहुती** ४; **व्याहृति आहुती** ४; **स्विष्टकृत् आहुती** १; ( पृष्ठ १७ ), **अष्टाज्याहुती** ८; व **प्राजापत्याहुती** १; ( पृष्ठ १९ ); अशा एकंदर १८ आज्याहुती द्याव्या. आणि **वेदारंभ संस्कारांत** लिहिल्या प्रमाणें **ॐ अग्ने सुश्रवः०** या मंत्रानें कुंडांतील अग्नि एकत्र करून, **ॐ अग्नये समिध०** या मंत्रानें कुंडांत समिधा द्याव्या. व **ॐ तनूपा०** इत्यादि ७ मंत्रांनीं मुख स्पर्श, व **ॐ वाक् च म०** इत्यादि मंत्रांनीं अंग स्पर्श विधि करावा. पुढें सुगंध्यादि औषधी युक्त उदकानें भरलेले ८ घट ( घडे ) कुंडाच्या उत्तर प्रदेशीं तयार ठेवावे. आणि त्यांतून एक घट,

**॥ ॐ येप्स्वन्तरग्नयः प्रविष्टा गोह्य ऽ उप गोह्यो मयूषो-
मनो हास्खलु विरुजस्तनू दुषु रिन्द्रियहा तान् वि ज
हामि यो रोचन स्तमिह गृह्णामि ॥**

हा मंत्र म्हणून ग्रहण करावा. आणि त्यांतील उदकानें,
**ॐ तेन मामभिषिंचामि श्रियै यशसे ब्रह्मणे ब्रह्मवर्चसाय।**
या मंत्रानें स्नान करावें. नंतर पूर्ववत् वरील **ॐ येप्स्वन्तर०**" या मंत्रानें दुसरा घट ग्रहण करून, त्यांतील उदकानें,

**॥ ॐ येन श्रियम कृणुतां येनावमृशता ꣳ सुरान्।
येना क्षावभ्यषिंचतां यद्वां तदश्विना यशः ॥**

या मंत्रानें स्नान करावें, तदनंतर पूर्ववत् **ॐ येप्स्वन्तर०** या मंत्र पाठानें तीन घट ग्रहण करून त्यांतील उदकानें

"आपोहिष्ठा०" (पृष्ठ ४९) इत्यादि ३ मंत्रांनीं स्नान करावें. पुढें तीन घट राहिले, त्यांतील उदकानें पूर्वोक्त "आपोहिष्ठा०" इत्यादि तीन मंत्र ह्मणून स्नान करावें. व नंतर,

उदुत्तमं वरुण पाशमस्मदवाधमं वि मध्यम ऽ श्रथाय। अथा वयमादित्य व्रते तवानागसो ऽ अदितये स्याम ॥

या मंत्रानें आपली मेखला (मुंज) व दंड यांचा त्याग करावा. पुढें स्नातकानें सूर्याभिमुख होऊन,

॥ ॐ उद्यन् भ्राज भृष्णुरिंद्रो मरुद्भिरस्थात् प्रात र्यावभिरस्थाद्दश सनिरसि दश सनिं मा कुर्वा विदन् मा गमयोद्यन् भ्राज भृष्णुरिंद्रो मरुद्भिरस्थाद्दिवा यावभिरस्थाच्छत सनिरसि शत सनिं मा कुर्वा विदन् मा गमयोद्यन् भ्राज भृष्णुरिंद्रो मरुद्भिरस्थात् सायं यावभिरस्थात् सहस्र सनिरसि सहस्र सनिं मा कुर्वा विदन् मा गमय ॥

या मंत्रानें परमात्म्याचें उपस्थान करावें. तदनंतर थोडें दहीं किंवा तीळ प्राशन करून वपन करवावें. व नंतर,

॥ ॐ अन्ना द्याय व्यूहध्व ऽ सोमो राजाय मा गमत्। स मे मुखं प्रमार्क्ष्यते यशसा च भगेन च ॥

या मंत्र पाठानें औदुंबर काष्ठानें दंत धावन करावें. नंतर सुगंधिक द्रव्यें अंगास लावून पुनः शुद्ध स्नान करावें. व उत्तम वस्त्रें परिधान करून अंगास चंदनादि सुगंध युक्त अनुलेपन करावें. नंतर चक्षु, मुख व नासिका द्वार प्रदेशीं,

॥ ॐ प्राणापानौ मे तर्पय चक्षु में तर्पय श्रोत्रं मे तर्पय ॥

या मंत्रानें स्पर्श करून, नंतर हस्तांत उदक घेऊन अ-पसव्य व दक्षिणाभिमुख होऊन "ॐ पितरः शुंधध्वम्" या मंत्रानें तें उदक भूमीवर टाकावें. व यज्ञोपवीती होऊन,

ॐ सुचक्षा अहमक्षीभ्यांभूयास ऽ सुवर्चा मुखेन । सुश्रु-त् कर्णाभ्यां भूयासम् ॥ या मंत्राचा जप करावा. आणि,

॥ ॐ परिधास्यै यशोधास्यै दीर्घायुत्वाय जरदष्टिरस्मि । शतंच जीवामिशरदःपुरूचीरायस्पोषमभि सँव्ययिष्ये ॥

या मंत्रानें सुंदर व उत्तम वस्त्र परिधान करावें. त्या नंतर,

॥ ॐ यशसा मा द्यावा पृथिवी यशसेंद्राय बृहस्पती ।
यशो भगश्च मा विदद्यशो मा प्रति पद्यताम् ॥

या मंत्रानें उत्तम उपवस्त्र धारण करावें. तदनंतर,

॥ ॐ या ऽ आहरज्जमदग्निः श्रद्धायै कामायेंद्रियाय ।
ता ऽ अहं प्रति गृह्णामि यशसा भगेन च ॥

या मंत्रानें सुगंधिक, सुंदर पुष्प माला ग्रहण करून,

॥ ॐ यद्यशो ऽप्सरसामिन्द्र श्चकार विपुलं पृथु ।
तेन संग्रथिताः सुमनस ऽ आबध्नामि यशो मयि ॥

या मंत्रानें धारण कराव्या. नंतर सुंदर शिरोवेष्टन (टोपी मंदील, पागोटें इ० ) ग्रहण करून, "युवासु-वासाः०" (पृष्ठ १२५) या मंत्रानें धारण करावें. तद-नंतर कर्णालंकार घेऊन ॥ ॐ अलंकरणमसि भूयोलं-करणं भूयात् ॥ या मंत्रानें धारण करावे. नंतर ॐ वृ-त्रस्यासि कनीनक श्चक्षुर्दा असि चक्षुर्मे देहि । या मंत्रानें डोळ्यांत अंजन करावें. त्या नंतर ॐ रोचिष्णुरसि । या मंत्रानें आरशांत मुखावलोकन करावें. तदनंतर,

॥ ॐ बृहस्पते छदिरसि पाप्मनो मा मन्तर्द्धे-
हि तेजसो यशसो मा मन्तर्द्धेहि ॥

या मंत्रानें छत्री धारण करावी. नंतर ॐ प्रतिष्ठेस्थो विश्वतो मा पातम् । या मंत्रानें उपानह–पाद वेष्टन ( पादत्राणा–पादुका–पायपोश ) घालावें. आणि नंतर शेवटीं,

॥ ॐ विश्वाभ्यो मानाष्ट्राभ्य स्परि पाहि सर्वतः ॥

या मंत्रानें वेळूची वगैरे सुंदर काठी हस्तांत धारण करावी. पुढें त्या स्नातकाला त्याच्या माता पितादि वडीलांनीं देशाचारा प्रमाणें मोठ्या समारंभानें स्वगृहीं आणावा. आणि स्नातक व आचार्य यांजला विवाह संस्कारांत दर्शविल्या प्रमाणें मधुपर्केरील्या आदर सत्कार करून नंतर आचार्यादि कार्यार्थ आलेल्या मंडळीला सन्मानार्थ उत्तम भोजन देऊन त्यांची, यथाचार रवानगी करावी. आणि नंतर स्नातकानें आचार्याला यथा शक्ति दक्षणा ( विद्याभ्यास शिकविण्या बद्दल देणगी द्यावयाची ती ) देऊन त्याला प्रसन्न करावा. आणि त्या दिवसापासून त्या पुरुषानें उत्तम शिक्षण व उत्तम दीक्षा लोकांला देऊन संसारांत सत्यधर्म, सद्विद्या, ईश्वरभक्ति, सज्जनता, सद्नीति, सद्विचार इत्यादि श्रेष्ठ गुणांची प्रवृति करण्याकारितां सदा प्रयत्न करीत असावा. व लोकांच्या सुखांत आपलें सुख असतें असें समजून सर्वांवर दयाभूत होऊन यथा शक्ति परोपकार करीत असावें. व एणें प्रमाणें मनोवृत्ति दृढ ठेवून विवाह संस्कारांत दर्शविल्या प्रमाणें विवाह करून गृहाश्रम स्वीकारावा.

## समावर्तन संस्कार विधि समाप्त.

# वानप्रस्थ सन्यासाश्रम संस्कार विधि.

——ooo——

**वानप्रस्थ** :– वनांत अर्थात् अरण्यांत एकान्त स्थलीं जेथें कामिनी कांचनादि संसार संबंधी मोहकारक पदार्थ दृष्टीस न पडे अशा एकान्त वासांत वास करून परमात्म्याचें सदैव चिंतन करणें; व सत्य व असत्य, धर्म व अधर्म, इत्यादि विषयांवर विचार करून तत्संबंधी गुण दोषांचा निर्णय करून तो लोकांच्या अंतःकरणांत ठसविण्या करितां व त्यांस सत्यते कडे वळविण्या करितां काया वाचा व मनें करून एकान्त स्थलीं राहून सतत प्रयत्न करणें; याचें नांव वानप्रस्थ.

**संन्यास** :– सर्व संग व सर्व सांसारीक मोहकारक पदार्थ त्याग करून, व वैराग्यशील व जितेंद्रिय वृत्तींत दृढ होऊन निर्लोभ व निर्भय पणानें देशदेशान्तरीं भ्रमण करून लोकांस सत्याचा बोध करून त्यांला सद्धर्मीं व सन्मार्गीं लावण्या करितां काया, वाचा व मनें करून निःपक्षपातानें सदैव परिश्रम घेणें याचें नांव संन्यासाश्रम.

**काल** :– ब्रह्मचर्याश्रमीं वेदादि विद्याभ्यास पूर्ण करून नंतर यथोक्त गृहाश्रम पूर्ण भोगल्या नंतर, अर्थात् मुलांस मुलें झाल्या नंतर किंवा पक्क वयानें इंद्रियें शिथिल झाल्यावर गृहस्थानें वानप्रस्थाश्रम स्वीकारावा. आतां संन्यासाश्रम; त्याचे तीन काल आहेत.– ब्रह्मचर्याश्रम, गृहाश्रम व वानप्रस्थाश्रम हे तीन आश्रम अनुक्रमें भोगून नंतर संन्यासाश्रम घेणें हा एक काल; गृहाश्रमा-

पासूनच, पूर्ण ज्ञान प्राप्त होऊन मनोवृत्ति दृढ झाल्यावर, संन्यास ग्रहण करणें हा द्वितीय काल; आणि ब्रह्मचर्याश्रम पूर्ण पाळून संपूर्ण ज्ञान प्राप्त झालें असलें; जितेंद्रियता व वैराग्यादि गुण एकदम प्राप्त होऊन मनोवृत्ति सदृढ झाली असली; आणि तेणें करून मन कामना सांसारीक सुख भोगण्यांत विरक्त होऊन, लोक कल्याणार्थ आयुष्य क्रमण करण्याचा दृढ निश्चय झाला असला; तर अशा ब्रह्मचाऱ्यानें एकदम संन्यास घ्यावा. हा तृतीय काल; या प्रमाणें तीन काल आहेत.

**विधि व कर्तव्य कर्मः**- गृहस्थानें वानप्रस्थाश्रम घेण्याचा समय आल्यावर, २२ व्या पृष्ठावर दर्शविल्या प्रमाणें शुभ नक्षत्रयुक्त दिवसाची योजना करून त्या दिवशीं स्नानसंध्यादि नित्यकर्म आटोपून स्त्री पुत्रादि कुटुंबासह प्रीति पूर्वक भोजन करून नंतर कुटुंबास धीर देऊन संसारांत कोणत्या रीतीनें वर्तावें, या विषयीं उत्तम बोध करावा. आणि स्त्री पुत्रादि सर्व कुटुंब, वडील पुत्राच्या स्वाधीन करावें; व नंतर प्रारंभीं ( १—८ पृष्ठापर्यंत ) लिहिलेल्या अग्निमीळे० इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करून नंतर गृहाबाहेर निघावें. आणि वनांत जाऊन एकान्त स्थलीं राहावें. व ते समयीं आपली स्त्री असून, ती केवळ साध्वी वृत्तीनें सेवा करण्याच्या इच्छेनें येत असली तर, तिलाहि बरोबर घेऊन जावी. व तेथें एकान्त स्थलीं वनांतील फल, मूल, कंद, पुष्प, भाजीपाला व श्याम ( सांवे ) इत्यादि नांगरल्या वांचून झालेलें—ज्यास मुनि अन्न ह्मणतात, त्यानें नित्य पंच महायज्ञ व उदर पोषण करावें; वल्कल अर्थात् ताग आदि वृक्षाच्या सालीचें वस्त्र धारण करावें; प्रातः व सायं कालीं द्वि-

वार सीतोदकानें नित्य स्नान करावें. जटादि पंच केश राखावे; स्वाधाय अर्थात् परमात्म्याची स्तुति, प्रार्थना, व उपासना नियम पूर्वक निरंतर करावी; पठन पाठन, व वेदादि सत्य व ज्ञान विधायक शास्त्रांचा तत्वज्ञान विचार, यांच्या मध्यें सदा निमग्न व तत्पर राहावें; सर्व प्राणिमात्राशीं प्रेमानें व प्रीति भावानें वर्तावें; शिवाय कोणी अतिथि आल्यास त्याचा यथाशक्ति सत्कार करावा. वनवासी लोकांला सत्य धर्माचा निरंतर बोध करावा. ज्ञान व विद्या यां शिवाय अन्य कांहीं लोकांकडून ग्रहण करूं नये. पण कदाचित् कांहीं कारणामुळें पूर्वोक्त मुनि अन्न वनांत मिळून लागलें तर, गावांतून भिक्षा मागून आणून त्यांतून मात्र आठ ग्रास अन्न भक्षण करावें.

याप्रमाणें वानप्रस्थाचे धर्म होत. आतां संन्यास ग्रहणाच्या विधींत व कर्तव्य कर्मांत विशेष प्रकार एवढा आहे कीं, ब्रह्मचारी, गृहस्थ किंवा वानप्रस्थ पुरुषानें संन्यास घेण्याचा समय आल्यावर पृष्ठ २२, यांत लिहिल्याप्रमाणें शुभ नक्षत्रयुक्त दिवसाची योजना करून त्या दिवशीं प्रातःकालीं प्रथम शिखादि केश छेदन करवून, नंतर स्नान, संध्या व अग्नि होत्रादि नित्यकर्म आटोपून नंतर आपलें यज्ञोपवीत त्याग करावें. आणि त्याची, अग्निहोत्र होमांत " ॐ प्रजापतये स्वाहा " या मंत्रानें आहुती द्यावी. आणि नंतर १—८ पृष्ठा पर्यंत लिहिलेल्या अग्निमीळे० इत्यादि चतुर्वेदोक्त मंत्रांनीं ईश्वरोपासना करून परिव्राट् अर्थात् संन्यासी होऊन लोक कल्याणार्थ सत्याचा बोध करण्याकरितां देश देशांतरीं, ग्राम ग्रामांतरीं—सर्वत्र स्थलीं भ्रमण करावें. आणि भिक्षाटणानें उदर पोषण करून त्यांस

सत्य धर्माचा बोध करावा. व स्वत: सत्य मार्गानें वर्तून निराकार ईश्वराचें सदैव चिंतन करावें. व अद्वितीय निराकार परमात्म्याचा व सत्य धर्माचा लोकांस बोध करून सद्धर्मी प्रवर्तविण्यास सदैव प्रयत्न करावा. आणि याच प्रमाणें स्त्रीयांनींहि संन्यास घ्यावा. आणि कन्या पाठशाळा वगैरे स्त्री मंडळींत फिरून त्यांस बोध करावा. व लोकांनीं सुद्धां अशा संन्याशा पासून बोध ग्रहण करावा. कारण अशा संन्याशाला पुत्रैषणा—पुत्र कामना, वित्तैषणा—द्रव्य कामना व लोकैषणा—प्रतिष्ठा कामना हीं नसल्यामुळें ते निर्लोभी व निर्भय होऊन लोकांचा लेशमात्रहि पक्षपात करीत नसतात. व असे संन्यासी राजापासून रंकापर्यंत सर्वांस एक सारखें मानून त्यांस एक सारखा—समान उपदेश, धर्म व्यवस्थेकरितां, करितात. तस्मात् अशा सत्यवादी, सद्धर्मी व सदाचरणी संन्याशा पासून मोठ्या प्रीतीनें सदुपदेश, ज्ञान प्राप्ति व संदेह निवृत्ति करून घ्यावी. व अशा संन्याशाचा, लोकांनीं मोठ्या प्रेमानें प्रीति पूर्वक आदर सत्कार करावा.

**वानप्रस्थ संन्यासाश्रम संस्कार विधि समाप्त.**

---

# पूर्वोक्त विवाहादि संस्कार प्रमाणार्थ वेदोक्त व शतपथ ब्राह्मण, आश्वलायन सूत्रादि आर्ष ग्रंथोक्त मूळ वचनें.

——000——

**सामान्य संस्कार :**—उदगयनेपूर्वपक्षेपुण्येहनिप्रागावर्तनादन्ह:कालंविद्यात् । अपवर्गेभिरूपभोजनंयथाशक्ति । ब्रह्मचारीवेदमधीत्यान्त्यांसमिधमभ्याधास्यन् । जायायावापाणि-

जिघृक्षन्। भूर्भुवःस्वरित्यभिमुखमग्निंप्रणयन्ति। अग्निमाद्वस्याभ्यादध्यात्। बहुयाजिनएवागारादूब्राह्मणस्यवाराजन्यस्यवावैश्यस्यवा। अपिवान्यंमथित्वाभ्यादध्यात्। तेनचैवास्यप्रातराहुतिर्हुत्वाभवतीति। सायमाहुत्युपक्रमएवातऊर्ध्वंगृह्येग्नौहोमोविधीयते। पुरोदयात्प्रातःप्रादुष्कृत्योदितेनुदितेवाप्रातराहुतिंजुहुयात्। यज्ञोपवीतंकुरुतेसूत्रंवस्त्रंवापिवाकुशरज्जुमेव। दक्षिणंबाहुमुद्धृत्यशिरोवधायसव्येंसेप्रतिष्ठापयतिदक्षिणंकक्षमन्ववलंबंभवत्येवंयज्ञोपवीतीभवति। सव्यंबाहुमुद्धृत्यशिरोवधाय दक्षिणेंसेप्रतिष्ठापयतिसव्यंकक्षमन्ववलंबंभवत्येवंप्राचीनावीती भवति। पितृयज्ञेत्वेवप्राचीनावीतीभवति। उदगग्नेरुत्सृप्यप्रक्षाल्यपाणीपादौचोपविश्यत्रिराचामेत्। पादावभ्युक्ष्यशिरोम्युक्षेत्। इंद्रियाण्यद्भिःसंस्पृशेत्। अक्षिणीनाशिकेकर्णाविति। तत्रैतदाहुः। नोपस्पृशेद्व्रजन्नतिष्ठन्नहसन्नविलोकयन्नाप्रणतः,नांगुलीभिः,नातीर्थेनूनसशब्दं।नानेवाक्षितंनवाह्यांसः, नांतरीयैकदेशस्यकल्पयित्वोत्तरीयतांनोष्णाभिः, नसफेनाभिः, नचसोपानत्कःक्वचित्कासक्तिकः,गलेबद्धः,चरणौनप्रसार्यच। हृदयस्पशस्त्वेवापआचामेत्। सुप्त्वास्नात्वापुनराचामेत्। अभिमुपसमाधायपरिसमूह्यदक्षिणजान्वक्तोदाक्षिणेनाग्निमदितेत्युदकांजलिंप्रसिंचेत्। अनुमतइतिपश्चात्। सरस्वत्युत्तरतः। देवसवित इतिप्रदक्षिणमग्निपर्युक्षेत्सकृद्वात्रिर्वा। पर्युक्षणान्तान्व्यतिहरन्नभिपर्युक्षन्होमीयं।

अथयदिदधिपयोयवागूंवा, कंसेनवाचरुस्थाल्यावास्रुवेणवैवा। कामंगृह्येग्नौपत्नीजुहुयात्सायंप्रातर्होमौगृहाः पत्नीगृह्यएषोग्निर्भवतीति। अथेध्मानुपकल्पयते, खादिरान्वापालाशान्वा। खादिरपालाशालाभे, — विभीतकतिल्वकबाधकनीवनिंबराजवृक्षशाल्मल्य ऽ रलुदधित्यकोविदारश्लेष्मातक — वर्जं ँ स-

र्वनस्पतीनामिध्मोयथार्थं ॅ स्यात् । विशाखानिप्रतिलूनाः कुशाबर्हिः । तेषामलाभे,— शूकतृणशरशीर्ष्यबल्वजमुतवनल- लुंठ,— वर्जं ॅ सर्वतृणानि । आज्यं, स्थालीपाकीयान्व्रीही- न्वायवान्वा, चरुस्थालींमेक्षणंअनुगुप्ताअपइति । अपउपस्पृ- श्याथब्रह्मासनउपविशत्यावसोःसदनेसीदामीति । अग्निमभि- मुखोवाग्यतःप्रांजलिरास्तआकर्मणःपर्य्यवसानात् । भाषेत- यज्ञस ॅ सिद्धिं । नायज्ञीयांवाचंवदेत् । यद्ययज्ञीयांवाचंवदेत्- वैष्णवीमृचंयजुर्वाजपेत् । अपिवानमोविष्णवेइतिब्रूयात् । अथ- हविर्निर्वपतिव्रीहीन्वायवान्वाकंसेनवाचरुस्थाल्यावा । अमुष्मै- त्वेतिसकृद्द्विस्तूष्णीं । गोभिलीय गृह्यसूत्र । तस्यैतस्यैदेवतायैचतु रश्चतुरोमुष्टीन्निर्वपतिदेवतानामादेशं । आश्वलायन गृह्यसूत्र । अथपश्चात्प्राङ्मुखोवहंतुमुपक्रमतेदक्षिणोत्तराभ्यांपाणिभ्यां । त्रिःफलीकृता ॅ स्तंडुलान्त्रिर्देवेभ्यःप्रक्षालयेत्—अमुष्मैत्वेति । शृतमभिघार्य्योदगुद्वास्य प्रत्यभिघारयेत् । अग्निमुपसमाधा- यकुशैःसमन्तंपरिस्तृणुयात्,पुरस्ताद्दक्षिणतउत्तरतःपश्चादिति । बहुलमयुग्मसंहतं । एषपरिस्तरणन्यायःसर्वेष्वाहुतिमत्सु । परि- धीनप्येकेकुर्वंतिशामीलान्पार्णान्वा । बर्हिःप्रादेशमात्रेपवित्रे- कुरुते ।, ओषधिमंतर्धायच्छिनत्तिननखेन— पवित्रेस्थोवैष्णव्या- विति । अथैनेअद्भिरनुमार्ष्टि, विष्णोर्मनसापूतेस्थइति । अंगु- ष्ठाभ्यांचोपकनिष्ठिकाभ्यांचांगुलिभ्यामभिसंगृह्यप्राक्शास्त्रिरु- त्पुनातिदेवस्त्वेति । गो० । हवींष्यभिघार्योदगुद्वास्यत्राहिंष्यासाद्ये- ध्ममभिघार्यायन्तइध्मइति । आ० । पूर्वमाज्यमपरःस्थालीपाकः । पर्युक्ष्यस्थालीपाकआज्यमानीयमेक्षणेनोपघात ॅ होतुमेवोपक्र- मते । महाव्याहृतिभिराज्येनाभिजुहुयात् । प्राक्स्विष्टकृतआ- वापः । मंत्रान्तेस्वाहाकारः । आज्याहुतिष्वनादेशेपुरस्ताच्चोपरि- ष्टाच्चमहाव्याहृतिभिर्होमः । यथापाणिग्रहणे, तथाचूडाकर्मण्यु-

पनयनेगोदानेच । अपवृतेकर्मणिवामदेव्यगान ͜ शांत्यर्थ ͜ शांत्यर्थं–गो०। तूष्णीमाघारावाघार्याज्यभागौजुहुयादग्नयेस्वाहा सोमायस्वाहेति । उत्तरमाग्नेयंदक्षिणंसौम्यं । आ० ।

**विवाह.**–उदगयनआपूर्यमाणपक्षेकल्याणेनक्षत्रे † चौलकर्मोपनयनगोदानविवाहः । कुलमग्रेपरीक्षेतयेमातृत:पितृतश्चेतियथोक्तंपुरस्तात् । बुद्धिमतेकन्यांप्रयच्छेत् । बुद्धिरूपशीललक्षण*संपन्नामरोगामुपयच्छेत् । आ० । क्लीतकैर्यवैर्माषैर्वाप्लुता ͜ सुहृत्-

---

† त्रिषुत्रिषूत्तरादिषुस्वातौमृगशिरसिरोहिण्यांवा । पंचसुबहिः शालायांविवाहेचूडाकरणउपनयनेकेशांतेसीमन्तोन्नयने । षडर्घ्याभवन्त्याचार्य:ऋत्विग्वैवाह्योराजाप्रिय:स्नातकइतिआसनमाहार्याहसाधुभवानित्याहरंतिविष्टरंपाद्यंपादार्थमुदकमर्घ्यमाचमनीयंमधुपर्कंदधिमधुघृतमपिहितंका ͜ स्येका ͜ स्येनान्यास्त्रिस्त्रि:प्राहविष्टरादीनिविष्टरंप्रतिगृह्णातिवर्ष्मोस्मीति । ब्राह्मणश्चेद्दक्षिणंप्रथमांविराजोदोहोसीति । अर्घ्यंप्रतिगृह्णात्यापस्थइत्यभिमंत्रयतेसमुद्रमित्याचामत्यामागन्यईति । पारस्कर गृ० । मधुपर्कमाह्रियमाणमीक्षेतमित्रस्यत्वेति । देवस्यत्वेतितदंजलिनाप्रतिगृह्यमधुवाताइतितृचेनावेक्ष्यानामिकयाचांगुष्ठेनचत्रि:प्रदक्षिणमालोड्यवसवस्त्वेतिपुरस्तान्निमार्ष्टि । रुद्रास्त्वेतिदक्षिणत:आदित्यास्त्वेतिमध्यात्त्रिरुद्गृह्य । नतांप्तिगच्छेत् । ब्राह्मणायोदंङुच्छिष्टंप्रयच्छेत्अलाभेप्सु । अथाचमनीयेनान्वाचामतिअमृताइति । सत्यमितिद्वितीयं । आचान्तोदकायगांवेदयंते ।

* दुर्विज्ञेयानिलक्षणानीति । अष्टौपिंडान्कृत्वाऋतमग्रइतिपिंडानभिमंत्र्यकुमारींब्रूयादेषामेकंगृहाणेति । पूर्वेषांचतुर्णांगृह्णन्तीमुपयच्छेत् । क्षेत्राच्चेदुभयत:सस्याद्गृह्णीयादन्नवत्यस्या प्रजाभविष्यतीति । विद्यान्द्गोष्ठात्पशुमतीवेदिपुरीषाद्ब्रह्मव-

सुरोत्तमेनसशरीरांत्रिर्मूर्द्धन्यभिषिंचेत्कामवेदतइतिपतिनामगृह्णीयात् । पाणिग्रहणेपुरस्ताच्छालायाग्निरूपसमाहितोभवति । अथजन्यानामेकोध्रुवाणामपांकलसंपूरयित्वासहोदकुंभः प्रावृतो वाग्यतोग्रेणाग्निंपरिक्रम्यदक्षिणतउदङ्मुखोवतिष्ठते । प्राजनेनान्यः । शमीपलाशमिश्रांश्चलाजांश्चतुरंजालिमात्रान्सूर्पेणोपसादयन्तिपश्चादग्नेः । दृशत्पुत्रंच । अथयस्याःपाणिग्रहीष्यन्भवतिसशिरस्कासाप्लुताभवति । अहतेनवसनेनपतिःपरिदध्यात्—गो० । अथैनांवासःपरिधापयतिजरांगच्छेति ।अथोत्तरीयंया अकृंतन्नवयमिति । अथैनौसमंजयतिसमंजांत्वितिपित्राप्र-

---

र्चस्विन्यविदासिनोन्हदात् सर्वसंपन्नादेवनात्कितवीचतुष्पथाद्द्विप्रव्राजिनीरिणादधन्याश्मशानात्पतिघ्नी । आ० ।

उद्वहेतद्विजोभार्यांसवर्णांलक्षणान्वितां । असपिंडाच या मातुरसगोत्राचयापितुः। साप्रशस्ताद्विजातीनांदारकर्मणिमैथुने ॥ महान्त्यपिसमृद्धानिगोजाविधनधान्यतः । स्त्रीसंबंधेदशैतानिकुलानिपरिवर्जयेत् ॥ हीनक्रियंनिष्पुरुषंनि*छंदोरोमशार्शसं । क्षय्यामयाव्यपस्मारिश्वित्रिकुष्ठिकुलानिच । नोद्वहेत्कपिलांकन्यांनाधिकांगींनरोगिणीं । नालोमिकांनातिलोमांनवाचाटान्नपिंगलां । अव्यंगांगींसौम्यनाम्नींहंसवारणगामिनीं। तनुलोमकेशदशनांमृद्वंगीमुद्वहेत्स्त्रियं—उत्कृष्टायाभिरूपायवरायसदृशायचेति । मनु । दुहितादुर्हितादूरेहिताभवतीति । निरुक्त । पाणिग्राहस्यसाध्वीस्त्रीजीवितोवामृतस्यवा। पतिलोकमभीप्सन्तीनाचरेत्किंचिदप्रियम् ॥पितृभिर्भ्रातृभिश्चैवपतिभिर्देवरैस्तथा । पूज्याभूषयितव्याश्चबहुकल्याणमीप्सुभिः ॥ वैवाहिकोविधिःस्त्रीणांसंस्कारोवैदिकःस्मृतः । पतिसेवागुरौवासोगृहार्थोग्निपरिक्रिया ।मनु । पंचविंशेततोवर्षेपुमान्नारीतुषोडशे । समत्वागतवीर्यौतौजानीयात्कुशलोभिषक् । सुश्रुत । ब्राह्मणोस्यमुखमासीद्बाहूराजन्यःकृतः । ऊरूतदस्ययद्वैश्यःपद्भ्यांशूद्रोअजायत । यजुर्वेद । ब्रह्मचर्येणकन्यायुवानंविन्दतेपतिं । अथर्ववेद ।

त्तामादायगृहीत्वानिष्क्रामतियदैषीयथैनौसमीक्षयत्यवोरइति— पा०। प्रावृतांयज्ञोपवीतिनीमभ्युदानयन्जपेत्सोमाइति । पश्चादग्नेःसंवेष्टितंकटमेवंजातीयंवान्यत्पदाप्रवर्तयंतींवाचयेत्— प्रमेपतियानइति । गो० । पश्चादग्नेस्तेजनींकटंवादक्षिणपादेनप्रवृत्योपविशत्यन्वारब्धआघारावाज्यभागौमहाव्याहृतयः सर्वप्रायश्चित्तंप्राजापत्यꣳ स्विष्टकृच्चेतन्नित्यꣳसर्वत्रप्राङ्महाव्याहृतिभ्यः स्विष्टकृदन्यच्चेदाज्याद्धविः सर्वप्रायश्चित्तंप्राजापत्यांतरमेतदावापस्थानंविवाहे । पा० । तेषांपुरस्तात्चतस्रआज्याहुतीर्जुहुयात् । अग्नआयूंषिपवसइतितिसृभिः प्रजापतेनेतिचव्याहृतिभिर्वा । समुच्चयमेके । त्वमर्यमाभवसीतिविवाहेचतुर्थी । आ० । राष्ट्रभृतइच्छन्जयाभ्यातानांश्चजानन्येनकर्मणेर्छेदितिवचनात् चित्तंचेति । पा०। दक्षिणेनपाणिनादक्षिणमंसमन्वारब्धायाः- षडाज्याहुतीर्जुहोत्यग्निरेतुप्रथमइत्येतत्प्रभृतिभिः । महाव्याहृतिभिश्चपृथक्।समस्ताभिश्चतुर्थी।गो०।पश्चादग्नेर्दृषदमश्मानंप्रतिष्ठाप्योत्तरपुरस्तादुदकुंभंसमन्वारब्धायांहुत्वातिष्ठन्प्रत्यङ्मुखः- प्राङ्मुख्याआसीनाया। आ० ।अवसिक्तायाःसव्येनपाणिनांजलिमुपोद्गृह्यदक्षिणेनपाणिनादक्षिणंपाणिꣳसांगुष्ठमुत्तानंगृहीत्वैताःषट्पाणिग्रहणीयाजपतिगृह्णामीति । गो०। प्रदक्षिणमग्निमुदकुंभंचत्रिःपरिणयन्जपति—अमोहमस्मीति ।आ०। अनुपृष्ठंपतिःपरिक्रम्यदक्षिणतउदङ्मुखोवतिष्ठतेवध्वंजलिंगृहीत्वा। पूर्वामाताला जानादायभ्रातावावधूमाक्रामयेदश्मानंदक्षिणेनप्रपदेन । पाणिग्रहोजपति—आरोहेति। सकृत्संगृहीतंलाजानामंजलिंभ्रातावध्वांजलावावपति । तꣳसोपस्तीर्णाभिघारितमग्नौजुहोत्याविच्छिन्दत्यंजलिं—इयंनार्युपब्रूते—इति । अर्यमणमित्युत्तरयोः । गो० । अथगाथांगायतिसरस्वतीयथपरिक्रामतैस्तुभ्यमग्रइत्येवंद्विपरंलाजादिचतुर्थꣳशूर्पकुष्ट्यासर्वांलाजानाव-

पतिभगायस्वाहेतित्रिःपरिणीतांप्राजापत्यꣳहुत्वा।पा०।हुतेपति-र्यथेतंपरिव्रज्यप्रदक्षिणमग्निंपरिणयतिमंत्रवान्कन्यलाइति।गो० अथास्यैशिखेविमुंचतियदिकृतेभवतः। ऊर्णास्तुकेकेशपक्षयोर्बद्धेभवतः।प्रत्वामुंचामीति। उत्तरामुत्तरया। अथैनामपराजितायान्दिशिसप्तपदान्यभ्युत्क्रामयतीषएकपदूर्जे-इति। उभयोःसन्निधायशिरसिउदकुंभेनावसिच्य।आ०। दक्षिणेनप्रक्रम्यसव्येनानुक्रामेत्। मासव्येनदक्षिणमतिक्रामेतिब्रूयात्। गो०। अथैनामुदीचीꣳसप्तपादानिक्रामयति। निष्क्रमणंप्रभृत्युदकुंभꣳस्कंधेकृत्वादक्षिणतोग्नेर्वाग्यतःस्थितोभवत्युत्तरतएकेषांततएनांमूर्धन्यभिषिंचत्यापःशिवाइत्यापोहिष्ठेतिचतिसृभिरथैनाꣳसूर्यमुदीक्षयतितच्चक्षुरित्यथास्यैदक्षिणाꣳसमधिहृदयमालभेतममव्रते—इति। अथैनामभिमंत्रयतेसुमंगलीरियमिति। पा०।

ब्राह्मण्याश्चवृद्धायाजीवपत्न्याजीवप्रजायाअगारएतांरात्रींवसेत्।आ०। प्रागुदीच्यांदिशियद्ब्राह्मणकुलमभिरूपं। तत्राग्निरुपसमाहितोभवति। प्रोक्तेनक्षत्रेषडाज्याहुतीर्जुहोति—लेखासंधिष्वित्येततप्रभृतिभिः। हुत्वोपोत्थायोपनिष्क्रम्यध्रुवंदर्शयति। ध्रुवमसीतिपतिनामगृह्णीयादात्मनश्च। अरुंधतीश्च। रुद्धाहमस्मीति। अथैनामनुमंत्रयतेध्रुवाद्यौरित्येतयर्चा। हविष्यमन्नंप्रथमंपरिजापितंभुंजीत। तस्यदेवताअग्निःप्रजापतिर्विश्वेदेवाअनुमतिरिति। उद्धृत्यस्थालीपाकंव्यूह्यैकदेशंपाणिनाभिमृशेदन्नपाशेनमणिनेति। भुक्त्वोच्छिष्टंवध्वैप्रदायययथार्थं। यानमारोहन्त्याꣳसुकिꣳसुकꣳशाल्मलिमित्येतामृचंजपेत्। अध्वनिचतुष्पथान्प्रतिमंत्रयेतनदीश्चविषमाणिचमहावृक्षान्श्मशानंस—माविदन्निति। अक्षभंगे०व्याहृतिभिर्जुहोति। वामदेव्यंगीत्वारोहेत्।गो०।प्रयाणउपपद्यमानेपूषात्वेताइतियानमारोहयेत्। उत्तरेणोत्क्रमयेत्। जीवंरुदन्तीतिरुदत्यां। विवाहा-

ग्निमग्रतोजस्रन्नयंति । वासेवासेसुमंगलीरियंवधूरितीक्षकानी-क्षेत । इहप्रियमितिगृहंप्रवेशयेत् । आनःप्रजामितिचतसृभिः प्रत्यृचंहुत्वासमंजंत्वितिदध्नःप्राशयेत् । अक्षारलवणाशिनौब्र-ह्मचारिणावलंकुर्वाणावधःशायिनौस्यातां । अतऊर्ध्वंत्रिरात्रं-द्वादशरात्रंसंवत्सरंवैकऋषिर्जायतइति । 'अथस्वस्त्ययनंवाच-यीत । आ० । गृहागतांपतिपुत्रशीलसंपन्नाब्राह्मण्योवरोप्यो-पवेशयंतिइहगावःप्रजायध्वमिति । तस्याःकुमारमुपस्थआद-ध्युः । शकलोटानंजलावावपेयुःफलानिवा । उत्थाप्यकुमारं-ध्रुवाआज्याहुतीर्जुहोत्यष्टाविहधृतिरिति । समाप्तासुयथावयसं-गुरून्गोत्रेणाभिवाद्ययथार्थं । गो० ।

**अथगर्भाधान** ‍ स्त्रियापुष्पवत्याश्चतुरहादूर्ध्वं ‍ स्नात्वाविरजायास्तस्मिन्नेवादेवाआदित्यमित्यादित्यमवेक्षते गृहेवास्नापयित्वातामभिगच्छे*दितिश्रुतेस्तस्मिन्प्रजायाः संभवकालेनिशायांकु

---

* सयः कामयेतमहत्प्राप्नुयामित्युदगयनआपूर्यमाणपक्षेपु-ण्याहेद्वादशाहमुपवसद्व्रतीभूत्वौदुंबरके सेचमसेवासर्वौषधंफलानीतिसंभृत्येत्यादि।अथयामिच्छेत् । गर्भंदधीतेतितस्यामर्थंनिष्ठाप्यमुखेनमुखं संधायापान्याभिप्राण्यादिंद्रियेणतेरेतसारेतआदधामीतिगर्भिण्येवभवाति।सयइच्छेत्—पुत्रोमेगौरोजायेतवेदमनुब्रुवीतसर्वमायुरियादितिक्षीरौदनंपाचयित्वासर्पिष्मन्तमश्नीयातामीश्वरौ जनयितवै । अथयच्छेत्—पुत्रोमेकपिलःपिंगलोजायेतद्वौवेदावनुब्रुवीतसर्वमायुरियादितिदध्योदनंपाचयित्वा० । अथयइच्छेत्-पुत्रोमेश्यामोलोहिताक्षोजायेतत्रीन्वेदानुब्रुवीतसर्वमायुरियादित्युदौदनंपाचयित्वा०।अथयइच्छेत्—दुहितामेपंडिताजायेतसर्वमायुरियादितिदध्योदनंपाचयित्वा ० । ( श. ब्रा.)

ऋतुकालाभिगामी स्यःत्स्वदारनिरतःसदा । पर्ववर्जंब्रजे

र्याद्यदिदिवामैथुनंव्रजेक्लिबाअल्पवीर्याअल्पायुषाश्चप्रसूयंतेतस्मा
देतद्वर्जयेत्प्रजाकामोगृहीश्रुतिस्मृतिविरोधाभ्यांदक्षिणेनपाणि
नाऊरूप्रसार्यप्रजास्थानमभिमृशतिपूषाभगंसवितामेददातुरु-
द्र:कल्पयतिललामगुंविष्णुर्योनिमितिप्राङ्मुखउदङ्मुखोवोपवि
ष्टोमंथेद्रेतोमूत्रमित्तिचैकेश्रावणंकुर्यात् । पा० । अथातश्चतुर्थी
कर्म । अग्निमुपसमाधायप्रायश्चित्ताज्याहुतीर्जुहोतिअग्नेप्रायश्चि
त्तइतिचतु:। अग्ने:स्थानेवायुचंद्रसूर्या: । समस्यपंचमींबहुवद्रूह्य ।
आहुतेराहुतेस्तुसंपातमुदपात्रेवनयेत् । तेनैनां सकेशनखाम
भ्यज्यन्हासयित्वाप्लावयंति । यदर्तुमतीभवत्युपरतशोणितातदा
संभवकाल: । दक्षिणेनपाणिनोपस्थमभिमृशेद्विष्णुर्योनिमिति ।

---

चैनांतद्व्रतोरतिकाम्यया । ऋतु:स्वाभाविक:स्त्रीणांरात्रय:षो
डशस्मृता: ।चतुर्भिरितरै:सार्धमहोभि:सद्विगर्हितै: । तासा-
माद्याश्चतस्रस्तु निन्दितैकादशीचया । त्रयोदशीचशेषास्तुप्रश
स्तादशरात्रय: । युग्मासुपुत्राजायन्तेस्त्रियोऽयुग्मासुरात्रिषु । त
स्माद्युग्मासुपुत्रार्थीसंविशेदार्त्तवेस्त्रियम् । पुमान्पुंसोधिकेशुक्रे
स्त्रीभवत्यधिकेस्त्रिया:। समेपुमान्पुंस्त्रियौवाक्षीणेल्पेचविपर्यय:।
मनु । उपनिषदिगर्भलंभनंपुंसवनमनवलोभनंच । यदिनाधी-
यात्तृतीयेगर्भमासेतिष्येणोपोषितायाःसरूपवत्सायागोर्दधनि-
द्वौद्वौमाषौयवंचदधिप्रसृतेनप्राशयेत् । किंपिबसिकिंपिबसीति-
पृष्टापुंसवनंपुंसवनमितित्रि:प्रतिजानीयात् । एवंत्रीन्प्रसृतान् ।
आ० । सायदिगर्भंनदधीतसीह्या:श्वेतपुष्प्याउपोष्यपुष्येणमू-
लमुत्थाप्यचतुर्थेहनिस्नातायांनिशायामुदपेषांपिष्ट्वास्यान्नासिका-
यादक्षिणमासिंचतीयमोषधीति । पा० ।
नोपगच्छेत्प्रमत्तोपिस्त्रियमार्तवदर्शने । समानशयनेचैवन शयी
त तयासह । स्नानंमैथुनिनःस्मृतं । त्रिणिवर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुम
ती सती । ऊर्ध्वंतु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिं । मनु ।

**गृहाश्रमः**— ब्राह्मेमुहूर्तेबुध्येतधर्मार्थौचानुचिंतयेत् । कायक्लेशांश्चतन्मूलान् वेदतत्वार्थमेवच । मनु । अहरहः संध्यामुपासीतअहरहरग्निहोत्रंजुहुयात् । तस्मादहोरात्रस्यसंयोगेब्राह्मणः संध्यामुपासीत् । साम ब्रा. । प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य । योग सूत्र । प्रातःसंध्यांजपंस्तिष्ठेत्सावित्रीमार्कदर्शनात् । पश्चिमांतुसमासीनःसम्यगृक्षविभावनात् म० । सायं सायं०इति. प्रातः प्रातर्इति०— अथर्ववेद कांड १६ अनुवाक ७ मंत्र ३–४ । ऋषियज्ञंदेवयज्ञंभूतयज्ञंचसर्वदा । नृयज्ञंपितृयज्ञंचयथाशक्तिनहापयेत् ॥ भोजनंहिगृहस्थानांसायंप्रातर्विधीयते । मनु । अग्नयेस्वाहेतिसायंजुहुयात्सूर्यायस्वाहेतिप्रातस्तूष्णींद्वितीयेउभयत्र । अथसायंप्रातःसिद्धस्यहविष्यस्यजुहुयात् अग्निहात्रेदेवताभ्यःसोमायेति। अथबलिहरणंएताभ्यश्चैवदेवताभ्योअद्भ्यइति । स्वधापितृभ्यइतिप्राचीनावीतीशेषंदक्षिणानिनयेत् । अथपार्वणस्थालीपाकः । तस्यदर्शपूर्णमासाभ्यामुपवासः । आ० । अथसीतायज्ञोव्रीहियवानांयत्रयत्रयजेततन्मयं स्थालीपाकं श्रपयेत्—क्षत्रस्यपुरस्ताद्वदुत्तरोवाशुचौदेशेअग्निमुपसमाधायआज्यभागाविष्ट्वाज्याहुतीर्जुहोतिपृथिवीति । पा० ।

**पुंसवनः**—प्रातःसशिरस्काप्लुतापश्चादग्नेप्राच्युपविशति । पश्चात्पतिरवस्थायदक्षिणेनपाणिनादक्षिणमंसमन्ववमृश्यानन्तर्हितंनाभिदेशमभिमृशेत्पुंमांसौमित्रावरुणाविस्येतयर्चा पश्चात्पतिरवस्थायदक्षिणस्यपाणेरंगुष्ठेनोपकनिष्ठिकयाचांगुल्याभिसंगृह्यदक्षिणेनासिकाश्रोतस्यवनयेत्—पुमानग्निइत्येतयर्चा । गो० । अथास्यैमंडलागारच्छायायांदक्षिणस्यांनासिकायामजीतामोषधींनस्तःकरोति । आतेगर्भोयोनिमितिप्राजापत्यस्यस्थालीपाकस्यहुत्वाहृदयदेशमस्याआलभेत—यत्तेसुसीमइति । आ० । अथपुंसवनंपुरास्यन्दतइतिमासेद्वितीयेतृतीये-

वायदहःपुंसानक्षत्रेणचंद्रमायुज्येततदहरूपवास्याप्लाव्याहतेवाससीपरिधायन्यग्रोधावरोहांछुगांश्चनिशायामुदपेषंपिष्ट्वापूर्ववदासेचनं॰हिरण्यगर्भोद्भ्यःसंभृतइत्येताभ्यांकुशकंटं॰सोमां॰शुंविकुत्यैनमभिमंत्रयतेसुपर्णोसीतिप्राग्विष्णुक्रमेभ्यः । पा०।

**सीमन्तोन्नयनः**— अथसीमंतकरणंप्रथमगर्भे । चतुर्थेमासिषष्ठेष्टमेवा । गो० । आपूर्यमाणपक्षेयदापुंसानक्षत्रेणचंद्रमायुक्तःस्यात् । अथाग्निमुपसमाधायसमन्वारब्धायां—धातादधात्वितिद्वाभ्यां—राकामहमितिद्वाभ्यां—नेजमेषइतितिसृभिः प्रजापतेनेतिच । आ०। पुं॰सवनवत् तिलमुद्गमिश्रं॰स्थालीपाकं॰श्रपयित्वाप्रजापतेर्हुत्वापश्चादग्नेर्भद्रपीठउपविष्टायायूग्मेनशलाटुग्रप्सेनौदुंबरेणत्रिभिश्चदर्भपिंजुलैस्त्र्येण्याशलल्यावीरतरशंकुनापूर्णचात्रेणचसीमन्तमूर्द्धंविनयतिभूर्भुवःस्वरितिप्रातिमहाव्याहृतिभिर्वात्रिवृत्तमाबध्नात्ययमूर्ज्जावतोवृक्षइति— । पा० । कृसरःस्थालीपाकउत्तरघृतस्तमवेक्षयेत् । किंपश्यसीत्युक्त्वाप्रजामितिवाचयेत् । तं॰सास्वयंभुंजीत । वीरसूरितिब्राह्मण्योमंगल्याभिर्वाग्भिरूपासीरन् । गो०। वीणागाथिनौसंशास्तिसोमंराजानंसंगायेतामिति । सोमोनोराजावत्विति । आ० ।

**जातकर्मः**— अथसोष्यंतीहोमः । प्रतिष्ठितवस्तौपरिस्तीर्याग्निमाज्याहुतीर्जुहोति—यातिरश्चीत्येतयर्चाविपश्चित्पुच्छमभरादितिच । गो० । सोष्यंतीमद्भिरभ्युक्षत्येजतुदशमास्यइतिप्राग्यस्यैतइत्यथावरावपतनमवेत्विति।जातस्यकुमारस्याच्छिन्नायांनाड्यांमेधाजननायुष्येकरोत्यनामिकयासुवर्णांतार्हितयामधुघृतेप्राशयतिघृतंवाभूस्त्वयिदधामीत्यथास्यायुष्यंकरोतिनाभ्यांदक्षिणेवाकर्णेजपत्यग्निरायुष्मानितित्रिस्त्र्यायुषमिति । पा० । कुमारंजातंपुरान्यैरालंभात्सर्पिर्मधुनीहिरण्यनिकाषंहिरण्येनप्राशयेत्प्रतेददामीति । कर्णयोरुपनिधायमेधाजननंजपति—मेधांतेदेव-

शति । अंसावभिमृशाति । अश्माभवेति । इंद्रश्रेष्ठानीतिच ।आ०।
व्रीहियवौपेषेयत्तयैवावृतायथाशुंगां कुमारस्यजिव्हायांनिमार्ष्टी-
यमाज्ञेति । तथैवमेधाजननंसर्पिःप्राशयेत् मेधांतइतिसदसस्प-
तिमितिच । सयस्मिन्देशेजातोभवतितमभिमंत्रयतेवेदतइत्यथैन
मभिमृश्यत्यश्माभवेत्यथास्यमातरमभिमंत्रयतइडासीत्यथास्यैद-
क्षिण २ स्तनंप्रक्षाल्यप्रयच्छतीम २ स्तनमितियस्तेस्तनइत्युत्तर-
मेताभ्यामुदपात्र २ शिरसोनिदधात्यापोदेवेश्चितिद्वारदेशेसूति-
काग्निमुपसमाधायोत्थानान्संधिवेलयोःफलीकरणमिश्रान्सर्षपा-
नग्नावावपतिशंडाइति।अतऊर्द्धमसमालंभनमादशरात्रात् ।गो०

**नामकरणः**— जननाद्दशरात्रेव्युष्टेशतरात्रेसंवत्सरेवानाम-
धेयकरणं । अथमाताशुचिनावसनेनकुमारमाच्छाद्यदक्षिणत-
उदञ्चंपित्रेप्रयच्छत्युदक्शिरसं । अनुपृष्ठंपरिक्रम्योत्तरतउप-
विशत्युदगग्रेषु । अथजुहोतिप्रजापतयेतिथयेनक्षत्रायदेवताया-
इति । तस्यमुख्यान्प्राणान्संमृशन्कोसीत्येतंमंत्रंजपति । आह-
स्पत्यंमित्यन्तेचमंत्रस्यघोषवदाद्यन्तन्तरन्तस्थंदीर्घाभिनिष्ठानांतं-
कृतंनामदध्यात् । एतदतद्धितं । अयुग्दांत २ स्त्रीणां । गो० ।
द्व्यक्षरंचतुरक्षरंवा । द्व्यक्षरंप्रतिष्ठाकामश्चतुरक्षरंब्रह्मवर्चस-
कामः । युग्मानित्वेवपुंसां । अयुजानिस्त्रीणां । आवृत्तैवकु-
मार्यै । आ० । नतद्धितमयुजाक्षरमाकारांत २ स्त्रियैतद्धित २
शर्मब्राह्मणस्यवर्मक्षत्रियस्यगुप्तेतिवैश्यस्य । पा० ।

**निष्क्रमण**:—जननाद्यस्तृतीयोज्यौत्स्नस्तस्यतृतीयायांप्रा-
तःसशिरस्कंकुमारमाप्लाव्यास्तमितेवीतेलोहितिम्न्यंजलिकृतः-
पितोपतिष्ठते। अथमाताशुचिनावसनेनकुमारमाच्छाद्यदक्षिण-
तउदञ्चंपित्रेप्रयच्छत्युदक्शिरसं । अनुपृष्ठंपरिक्रम्योत्तरतोव-
तिष्ठते । अयजपतियत्तइति । उदञ्चंमात्रेप्रदाययथार्थं ।गो०।
चतुर्थेमासिनिष्क्रमणिकासूर्यमुदीक्षयतितच्चक्षुरिति । पा० ।

**अन्न प्राशन** :– षष्ठेमास्यन्नप्राशनं । आजमन्नाद्यका-
मः । घृतौदनंतेजस्कामः । दधिमधुघृतमिश्रमन्नंप्राशयेत्– अ-
न्नपतइति । आवृतैवकुमार्यै ।आ०। षष्ठेमासेन्नप्राशनꣳस्थाली-
पाकꣳश्रपयित्वाज्यभागाविष्ट्वाज्याहुतीर्जुहोतिदेवींवाचमितिवा-
जोनोअद्येतिचद्वितीयाꣳस्थालीपाकस्यजुहोतिप्राणेनान्नमशीय-
स्वाहेतिसर्वान्नसांत्सर्वमन्नमेकतउद्धृत्यार्थेनंप्राशयेत्तूष्णीं ।

**चूडाकरण** :– अथातस्तृतीयेवर्षेचूडाकरणं । पुरस्ता-
च्छालायाउपलिप्तेग्निरुपसमाहितोभवति । एकविꣳशतिर्दर्भ-
पिंजल्यउष्णोदककꣳसऔदुंबरःक्षुरआदर्शोवाक्षुरपाणिर्नापि-
तइतिदाक्षिणतः । आनडुहोगोमयःकृसरःस्थालीपाकोवृथाप-
कइत्युत्तरतः । व्रीहियवैस्तिलमाषैरितिपृथक्पात्राणिपूरयित्वा-
पुरस्तादुपनिदध्युः । कृसरोनापितायसर्वबीजानिचेति । गो०।
माताकुमारमादायप्लाव्याहतेवाससीपरिधायांकआधायपश्चा-
दग्नेरुपविशत्यन्वारब्धआज्याहुतीर्हुत्वाशीतास्वप्सूष्णाआसिंच-
त्युष्णेनेत्यदितेकेशान्वपेतिकेशश्मश्रितिचकेशान्तैथात्रनवनीत-
पिंडंघृतपिंडंदध्नोवाप्रास्यतिततआदायदक्षिणंगोदानमुन्दतिस-
वित्रेति । पा० । शीतोष्णाअपःसमानीयोष्णेनेतितासांगृहीत्वा-
नवनीतंदधिद्रप्सान्वाप्रदक्षिणांशिरस्त्रिरुन्दातिआदितिइति । द-
क्षिणेकेशपक्षेत्रिणित्रिणिकुशपिंजूलान्यभ्यात्माग्राणिनिदधाति-
ओषधइति । स्वधितइतिलौहेनक्षुरेण । आ० । अथजपत्यायम-
गादितिसवितारंमनसाध्यायन्नापितंप्रेक्षमाणः । उष्णेनेतिवायुं-
मनसाध्यायन्नुष्णोदकꣳसंप्रेक्षमाणः । विष्णोरित्यौदुंबरंक्षुरंप्रे-
क्षत । गो० । प्रच्छिनत्तियेनावपदिति । प्रच्छिद्यप्रच्छिद्य-
प्रागग्राच्छमीपर्णैःसहमात्रेप्रयच्छतितानानडुहेगोमयेनिदधा-
ति । येनधाताइतिद्वितीयं । येनभूयइतितृतीयं । सर्वैर्मंत्रैश्चतु-
र्थं । एवमुत्तरतस्त्रिः । आ० । शिवोनामेतिक्षुरमादायनिवर्त-

यामीति । अथपश्चात्त्र्यायुषमित्यथोत्तरतोयेभूनरीति । पा० । क्षुरतेजोनिमृजेत्यत्क्षुरेणेति । नापितंशिष्याच्छीतोष्णाभिरद्भिरवर्थंकुर्वाणोक्षुण्वन्कुशलीकुर्विति । यथाकुलधर्मंकेशवेशान्कारयेत् आवृतैवकुमार्यै । आ० । केशंगोमयपिंडंनिधायगोष्टेपल्वलउदकान्तेवाचार्यायवरंददाति । पा० । येनपूषाइतित्रिः प्रांचंप्रोहतिउभाभ्यांपाणिभ्यांमूर्द्धानंपरिगृह्यजपेत्त्र्यायुषमिति । आनडुहेगोमयेकेशान्कृत्वारण्य ५ हत्वानिखनंति । गो० ।

**उपनयन.**—अष्टवर्षंब्राह्मणमुपनयेत्गर्भाष्टमेवैकादशवर्ष ५ राजन्यं, द्वादशवर्षंवैश्यंयथामंगलंवासर्वेषांब्राह्मणान्भोजयेत्तंचपर्युप्तशिरसमलंकृतमानयंति । पश्चादग्नेरवस्थाप्यब्रह्मचर्यमागामितिवाचयति । ब्रह्मचार्यसानीतिचाथैनंवासःपरिधापयतियेनेंद्रायेति । अथयज्ञोपवीतपरिधानंयज्ञोपवीतमिति । पा० । आषोडशाद्वर्षाद्ब्राह्मणस्यानतीतःकालोभवत्याद्वावि ५ शात्क्षत्रियस्याचतुर्वि ५ शाद्वैश्यस्य । अथऊर्ध्वंपतितसावित्रिकाभवंति । नैनानुपनयेयुर्नाध्यापयेयुर्नयाजयेयुर्नैभिर्विवहेयुः । अग्नेव्रतपतइतिहुत्वापश्चादग्नेरुदगग्रेषुप्राङाचार्योवतिष्ठते । अंतरेणाग्न्याचार्यौमाणवकोंजलिकृतोभिमुखआचार्यमुदगग्रेषु । तस्यदक्षिणतोवस्थायमंत्रवान्ब्राह्मणोपामंजलिपूरयति । उपरिष्टाच्चाचार्यस्य । प्रेक्षमाणोजपत्यागंत्रेति । कोनामासीतिनामधेयंपृच्छतितस्याचार्यः । उत्सृज्यापामंजलिमाचार्योदक्षिणेनपाणिनादक्षिणंपाणि ५ सांगुष्ठंगृह्णातिदेवस्येति । अथैनंप्रदक्षिणमावर्तयतिसूर्यस्येति । दक्षिणेनपाणिनादक्षिणम ५ समन्ववमृश्यानंतर्हितांनाभिमभिमृशेत्प्राणानामिति । उत्सृप्यनाभिदेशमहुरइतिहृदयदेशंकृश.नइतिदक्षिणेनपाणिनादक्षिणम ५ समन्वालभ्यप्रजापतयेत्वेति । सव्येनसव्यंदेवायत्वासवित्रइति ।गो०। समन्वारब्धेहुत्वोत्तरतोग्नेःप्राङ्मुखआचार्योवतिष्ठते । पुरस्तात्

प्रत्यङ्मुखइतरः। अपामंजलीपूरयित्वातत्सवितुर्वृणीमहइतिपूर्णेनास्यपूर्णमवक्षारयत्यासिच्यदेवस्यत्वेति । सवितेतिद्वितीयं। अग्निरितितृतीयं। आदित्यमीक्षयेत्.देवेति। कस्येतियुवेत्यर्द्धर्चेनैनंप्रदक्षिणमावर्तयेत्। तस्याध्यंसौपाणीकृत्वाहृदयदेशमालभेतोत्तरेण। आ०।अथास्याद्भिरंजलीनांजलिंपूरयत्यापोहिष्ठेति तिसृभिरथैन ९ सूर्यमुदीक्षयतितच्चक्षुरित्यथास्यदक्षिणा ९ समधिहृदयमालभेममव्रतइत्यथास्यदक्षिण ९ हस्तंगृहीत्वाहकस्येतिभवतइत्युच्यमानइंद्रस्येत्यथैनंभूतेभ्यःपरिददातिप्रजापतयेत्वेति।पा०*

**वेदारंभः**—प्रदक्षिणमग्निंपरीत्योपविशत्यन्वारब्धआज्याहुतीर्हुत्वा । पा० । अग्नयइतिससमिधमाधायाग्निमुपस्पृश्यमुखंनिमार्ष्टित्रिःतेजसेति । मयिमेधामिति.इत्युपस्थायजान्वाच्योपसंगृह्यब्रूयात्अधीहीति । तस्यत्रासस्तापाणिभ्यांचपाणीसंगृह्यसावित्रीमन्वाहपच्छोर्द्धर्चशःसर्वां । यथाशक्तिवाचयीत । हृदयदेशेस्योर्ध्वांगुलिंपाणिमुपदधातिममव्रतइति । आ० । पाणिनाग्निपरिसमूहत्यग्नेसुश्रवइतिःप्रदक्षिणमग्निंपर्युक्ष्योत्तिष्ठन्समिधमादधात्यग्नयइत्येवंद्वितीयांतथातृतीयामेषातइतिवासमुच्चयोवापूर्ववत्परिसमूहनपर्युक्षणेपाणीप्रतप्यमुखंविमृष्टेतनूपाइति। अथास्मै सावित्रीमन्वाहोत्तरतोग्नेःप्रत्यङ्मुखायोपविष्टायोपशन्नायसमीक्षमाणायसमीक्षितायदक्षिणतस्तिष्ठतआसीनायवैकेपच्छोर्द्धर्चशःसर्वांचतृतीयेनसहानुवर्तयंसंवत्सरेषाण्मास्येचतुर्विं ९ शत्यहेद्वादशाहेषडहेत्र्यहेवा । पा० । मेखलामाबध्यदंडंप्रदायब्रह्मचर्यमादिशेत् । ब्रह्मचार्यसीति । अस्तमितेब्रह्मौदनमनुप्रवचनीयंश्रपयित्वाचार्यायवेदयीत । आचार्यःसमन्वारब्धेजुहुया-

---

* **कर्णवेधः**— अथ कर्णवेधो वर्षे तृतीये पंचमे वा पूर्वाण्हे कुमारस्य मधुरं दत्वा प्राङ्मुखायोपविष्टाय दक्षिणं कर्णमभि मंत्रयते भद्रंकर्णेभिरिति सव्यं वक्ष्यंतीवेदिति चाथ भिंद्यात् । पा० ।

तूसदसस्पतीति । सावित्र्याद्वितीयंऋषिभ्यस्तृतीयंसौविष्टकृतं-चतुर्थं।आ०।अत्रभिक्षाचर्यचरणंभवत्पूर्वांब्राह्मणोभिक्षेतभवन्मध्या ँ राजन्योभवदंत्यांवैश्यस्तिस्रोप्रत्याख्यायिन्यःमातारंप्रथममिकआचार्यायभैक्षंनिवेदयित्वावाग्यतोहःशेषंतिष्ठत् । पा० ।

**समावर्तन**:—वेद ँ समाप्यस्नायाद्ब्रह्मचर्यंवाष्टचत्वारिं ँ शकंद्वादशकेप्येकेगुरुणानुज्ञातोविधिविधेयस्तर्कश्चवेदःषडंगमेकेनकल्पमात्रेकामंतुयाज्ञिकस्योपसंगृह्यगुरू ँ सामिधोभ्याधायपरिश्रितस्योत्तरतःपुरस्तात्स्थित्वाष्टानामुदकुंभानांयेप्स्वंतरित्येकस्मादपोगृहीत्वातेनाभिषिंचतेतेनमामितियेनश्रियमित्यापोहिष्ठेतिचप्रत्यृचंत्रिभिस्तूष्णीमितरैरुदुत्तममितिमेखलाउन्मुच्यदंडंनिधायवासोन्यत्परिधायादित्यमुपतिष्ठतउद्यन्भ्राजभृष्णुरितिदधितिलान्वाप्राश्यजटालोमनखान्स ँ हृत्यौदुंबरेणदन्तान्धावेतान्नाद्यायेत्युछाद्य पुनःस्नात्वानुलेपनं नासिकयोर्मुखस्यचोपगृह्णाते प्राणापानावितिपितरःशुंधध्वमिति पाण्योरवनेजनंदक्षिणानुषिच्यानुलिप्यजपेत्सुचक्षेत्यहतंवासोधौतंवामन्त्रेणाच्छादयीतपरिधास्यैइत्यथोत्तरीयंयशसामेत्येकंचेत्पूर्वस्योत्तरवर्गेणप्रच्छादयीत सुमनसःप्रतिगृह्णाति याआहरेत्यथावबध्नीते यद्यशोप्सरसामित्युष्णीषेणशिरोवेष्टयतेयुवेत्यलंकरणमसीतिकर्णवेष्टकौवृत्रस्येत्यंगेक्षिणीरोचिष्णूरसीत्यात्मानमादर्शेप्रेक्षतेछत्रंप्रतिगृह्णातिबृहस्पतइतिप्रतिष्ठइत्युपानहौप्रतिमुंचेतिविश्वाभ्योइतिवैणवंदंडमादत्ते । पा० । गुरुणानुमतःस्नात्वासमावृत्तोयथाविधि । म० ।

**वानप्रस्थसंन्यासाश्रम**:— ब्रह्मचर्याश्रमंसमाप्यगृहीभवेद्गृही भूत्वावनीभवेद्वनी भूत्वाप्रव्रजेत्इति । श. ब्रा. । प्राजापत्यांनिरूप्येष्टिंसर्ववेदसदक्षिणां । आत्मन्यग्नीन् समारोप्यब्राह्मणःप्रव्रजेद्गृहात् । एवंगृहाश्रमेस्थित्वाविधिवत्स्नातकोद्विजः । वनेवसेत्तुनियतो यथावद्विजितेंद्रियः । गृहस्थस्तुयदापश्येद्व-

लोपलितमात्मनः । अपत्यस्यैवचापत्यंतदारण्यंसमाश्रयेत् । संत्यज्यग्राम्यमाहारंसर्वंचैवपरिच्छदं । पुत्रेषुभार्यांनिक्षिप्यवनंगच्छेत्सहैववा । मुन्यन्यैर्विविधैर्मेध्यैःशाकमूलफलेनवा । एतान्येवमहायज्ञान्निर्वपेद्विधिपूर्वकं । वसीतचर्मचीरंवासायंस्नायात्प्रगेतथा । जटाश्चबिभृयान्नित्यंश्मश्रुलोमनखानिच । स्वाध्यायेनित्ययुक्तःस्याद्दान्तोमैत्रःसमाहितः । दातानित्यमनादातासर्वभूतानुकंपकः । ग्रामादाहृत्य वाश्नीयादष्टौग्रासान्वने वसन् । प्रतिगृह्यपुटेनैवपाणिनाशकलेनवा । एताश्चान्याश्चसेवेतदीक्षाविप्रोवनेवसन् । विविधाश्चोपनिषदीरात्मसंसिद्धयेश्रुतीः।म.। यदहरेवविरजेत्तदहरेवप्राव्रजेद्वनाद्वागृहाद्वाब्रह्मचर्यादेवप्रव्रजेत् इति । प्राजापत्यांनिरूप्येष्टिंतस्यांसर्ववेदसंहुत्वाब्राह्मणःप्रव्रजेत् । श. ब्रा. । तपःश्रद्धेयेह्युपवसन्त्यरण्येशान्ताविद्वांसोभैक्षचर्यांचरन्तः । सूर्यद्वारेणतेविरजाःप्रयान्तियत्रामृतःसपुरुषोह्यव्ययात्मा । परीक्ष्यलोकान्कर्मचितान्ब्राह्मणोनिर्वेदमायान्नास्त्यकृतःकृतेन । तद्विज्ञानार्थंसगुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिःश्रोत्रियंब्रह्मनिष्ठं । मुंडकोपनिषत् ।

नाविरतो दुश्चरितान्नाशान्तो नासमाहितः । नाशान्तमानसो वापिप्रज्ञानेनैनमाप्नुयात् । कठ. उप० । तमेतंवेदानुवचनेनविविदिषंति । ब्रह्मचर्येणतपसाश्रद्धयायज्ञेनाशकेनचैतमेवविदित्वामुनिर्भवत्येतमेवप्रव्राजिनोलोकमीप्सन्तःप्रव्रजंति । एतद्धस्मवैतत्पूर्वेब्राह्मणाः । अनुचानाविद्वांसः प्रजांनकामयन्तेकिंप्रजया करिष्यामोयेषां नोयमात्मायंलोकइतितेहस्मपुत्रैषणायाश्चवित्तैषणायाश्चलोकैषणायाश्चव्युत्थायाथभिक्षाचर्यंचरंतियाह्येवपुत्रैषणासावित्तैषणायावित्तैषणासालोकैषणोभेह्येते ऽ एषणेएवभवतःइति । श.ब्रा०। तस्मादात्मज्ञंह्यर्चयेद्भूतिकामःइति । मुं.उ. ।

# पूर्वोक्त संस्कारांत आलेले मंत्र व त्यांतील कठीण शब्द यांचा अर्थ.

ईश्वरोपासनेचे मंत्र सोपे असून त्यांचा भाषार्थ दिल्यापेक्षां त्यांतील कठीण शब्दांचा अर्थ समजल्यावर मूळ मंत्रांचा अर्थ सहज समजून कानालाहि प्रिय लागतो. या करितां फक्त त्यांतील कठीण शब्दांचा अर्थ दिला आहे. व बाकी प्रतिज्ञेच्या वगैरे मंत्रांचा भाषार्थ दिला आहे.

शब्दार्थः– ॐ हा शब्द अ, उ, म्–हे तीन वर्ण मिळून झाला आहे, व तो परमेश्वराचें मुख्य व सर्वोत्तम वाचक नाम होय. सकल सृष्टीचे भूमि, अन्तरिक्ष व आकाश असे तीन भाग मानले असून त्या प्रत्येक भागांत व्याप्त असलेल्या जगन्नियंत्याच्या विभूतीला अ, उ, म्, अशी अनुक्रमें संज्ञा आहे; (अ– विराट्, अग्नि व विश्व; उ–हिरण्यगर्भ, वायु व तेज; व म्–ईश्वर, आदित्य व प्राज्ञ) अर्थात् सकलगुण संपन्न, सर्व व्यापक, जगदुत्पादक, परमात्मा. भूः–(भूरितिवैप्राणः) जीविव उत्पादक, सर्व प्रिय. भुवः–( भुवरित्यपानः ) दुःख निवारक, आनंद दायक. स्वः–( स्वरितिव्यानः ) विविध सुखास्पद, अनेक स्वरूपाधार. अग्निं (अंचु गति पूजनयोः )– सर्वज्ञ सर्व पूज्याला. ईळे (ईडे)– स्तवितों. पुरोहितं–( पुरः–प्रारंभीं, हितं–धारण केलेलें )– पृथिव्यादि तत्वें आकर्षणादि गुणांनीं धारण करणाराला. यज्ञस्य देवं=( यज्ञस्य–वेदादि सत्य विद्येच्या, देवं–प्रकाशकाला ) सत्य विद्या प्रकाशकाला, ऋत्विजं–वसंतादि ऋतु रचकाला. होतारं–जगत् उत्पत्ति व प्रलय कालीं होमकर्त्याला. रत्नधातमं–रमणीय पृथिव्यादि धारण कर्त्याला । तं–त्याला

ईशानं–सर्वजगत्स्वामीला. जगतः–जंगम वस्तुमात्राचा, व तस्थुषः–स्थावर वस्तुमात्राचा. पतिं–स्वामीला. धियं–विज्ञान स्वरूपाला. जिन्वं–तृप्ति दायकाला. अवसे–संरक्षणार्थ. वयं–आह्मीं. हूमहे–आव्हान करितों. पूषा–सर्व पोषक. नो (नः) –आमचा. यथा–ज्या प्रकारें. वेदसां–विद्यादि धनाची. असत्–व्हावें. वृधे–वृध्यर्थ. रक्षिता–रक्षक. स्वस्तये–स्वस्थतार्थ. पायुः–पालक. अदब्धः–विनाश निवारक। बृहते दिवे–महत्प्रकाशकाला. रोदसीभ्यां–सर्व व्यापक व सर्व प्रकाशकाला. वोचं–ह्मणतों. नमो–स्तोत्र. मीळ्हुषे–दान शीलाला, सुमृळीकाय–उत्तम सुखदायकाला. दृक्षं–प्रकाशकाला. अर्यमणं–सर्वज्ञाला. उपस्तुहि–स्तुति करावी. ज्योक्–चिरकाल. प्रजायासचेमहि–पुत्र पौत्रासह राहावें. ऊती–प्रसादानें। गणानां–देवादि गणांचा. त्वा–तुला. गणपतिं–स्वामीला. कवीनांकविं–श्रेष्ठ विद्वानाला. उपमश्रवस्तमं–कीर्तिमानाला. ज्येष्ठराजं–श्रेष्ठामध्यें श्रेष्ठ, शोभायमानाला. ब्रह्मणस्पते– हे वेदस्वामी !. हवामहे–आव्हान करितों. शृण्वन्–ऐकत होसाता. सीद–प्रवेश कर. सादनं–गृहाप्रत। स्वस्ति–कल्याण. मिमीतां–करावें. भगः–ऐश्वर्यवान्. देव्यदिति–दीप्तिमान्. अनर्वण–अजिंक्य. असुरः–प्राणिमात्राचा. द्यावा–दैदीप्यमान्. पृथिवी–सर्व व्यापक. सुचेतुना–शोभनें करून। पथ्ये–हे सत्यमार्ग मित्र. रेवति–लक्ष्मीवान्. अदिते–अविनाशक. कृधि–कर। स्वस्तये–क्षेमार्थ. वायुं–( वागति गंधयोः ) सर्वज्ञ, जगच्चालकाला. उपब्रवामहे–स्तवितों. भुवनस्य पति–सर्व लोकस्वामी. बृहस्पतिं–सर्व पालकाला. आदित्यासः– अविनाश. भवंतु–होवो। शं–शान्त्यर्थ, सुखकारक. चक्षसा–तेजानें. अन्हा–दिवसानें. भानुना–किरणांनीं. हिमा–शीतपणें.

घृणेन–उष्णपणें. अध्वन्–मार्गामध्यें. दुरोणे–गृहांत. असत् व्हावें. चित्रं–पूजनीयाला. द्रविणं–धन. धेहि–दे. पूर्वहूतौ–पहिल्याच मागण्यानें. दशये–दर्शनार्थ. वनिनो–वृक्ष. जिष्णु–जयशील. रजसस्पति–लोकपति । हे जन ! वः–तुमचें. आकूतिः–मन, संकल्प. समान–भेदरहित. सुसह–शोभन सहीत. असति व्हावें. ॥ इषे–अन्नादि उत्तम पदार्थ प्राप्त्यर्थ. ऊर्जे–पराक्रमार्थ. स्थ–आहां. सविता–सर्व जगदुत्पादक. प्रार्पयतु– प्राप्त करो. श्रेष्ठतमायकर्मणे–अत्युत्तम कर्म अर्थात् परोपकारार्थ. आप्यायध्वं–उन्नति स्थिति प्रत प्राप्त व्हावें. अघ्न्याः –गाई आदि पशु मारण्यास अयोग्य. इंद्राय–ऐश्वर्यार्थ. भागं–पूजनीय. प्रजावतीः–बहुत संतानयुक्त. अनमीवाः–व्याधिरहित. अयक्ष्माः–प्रबल रोग रहित. मा –नको. ईशत–समर्थ होवो. स्तेन–चोर, ठक. अघशंसः–पापी. ध्रुवा–निश्चल सुख हेतु. अस्मिन्–यांत. गो पतौ–पृथिव्यादि पदार्थांचें संरक्षण करणाऱ्या सज्जन लोकांत. स्यात–व्हावें. बह्वीः–बहुविध पदार्थ. यजमानस्य–ईश्वर भक्त व परोपकारी मनुष्याला. पशून्–गाई, घोडे व संपत्ति संतति. पाहि–संरक्षण कर । हिरण्यबाहवे–सर्व शक्तिमानाला. सेनान्येः–न्यायकारी जगच्चालकाला. तस्मै–त्याला. पशूनां–जीवांच्या. वृक्षेभ्यो–शत्रु विनाशकाला. शष्पिंजराय–अनाथ रक्षकाला. त्विषीमते–सन्मार्ग रक्षकाला. उपवीतिने –ज्ञान दायकाला. पुष्टानां–सद्गुणी मनुष्यांच्या. पतये–पालकाला । व्रातपतिभ्यः–चराचर स्वामीला. गृत्सपतिभ्यः –पूर्ण ज्ञात्याला. विरूपेभ्यो, विश्वरूपेभ्यः–नानाविध रूप धारकाला । कराय, भवाय–कर्त्याला. मयः–सुख. शिवाय–कल्याण स्वरूपाला । ऋचं वाचं–ऋग्रूप वाचेप्रत, यजुः

मनो–यजुरूप मनाप्रत. सामप्राणं–सामरूप प्राणाला. वागोजः–वाचीक व मानसीक तेजाप्रत. ओजः–तेज. मयि–माझ्या ठायीं. प्राणापानौ–उच्छ्वास निःश्वास वायु. प्रपद्ये–प्राप्त होवो. द्यौ–आकाश. आप–उदक. विश्वेदेवाः–सर्वत्र विद्वान् लोक. मा–मला. एधि–असोत। अहानि–दिवस. प्रतिधीयतां–प्राप्त होवोत. इंद्राग्नीं–सकल ऐश्वर्य युक्त, पूज्यमान. अवोभि–पालन करून. रातहव्या–यज्ञ पूज्य. वाजसातौ–अन्नदायक. सुविताय–उत्तम स्थिति करितां. शंयोः–रोगभय शमनार्थ। दृते–हे शत्रु विदारक. दृंह–दृढ कर. मित्रस्य चक्षुषा–मित्र दृष्टीनें. समीक्षंतां–समान दृष्टि असो. समीक्षे–पहातों. समीक्षामहे–परस्पर द्रोह रहित असावें। यतोयतः–ज्या ज्या पासून. समीहसे–अपकार होतो. कुरु–कर. हिरण्मयेन–प्रकाशें करून. सत्यस्य–अविनाश पुरुषाचें. मुखं–शरीराला. अपिहितं–आच्छादित, व्याप्त. खं–परब्रह्म ॥ आयाहि–यावें. वीतये–उत्तम धर्म प्रवृत्यर्थ. गृणानः–स्तविलेला. होता–आव्हान केलेला. निसत्सि–प्रवेश करावा. बर्हिषि–बुद्धीच्या ठायीं। राजन्–हे दीप्यमान. पवस्व–प्राप्त कर. गवे–गुरांला. अर्वते–अश्वांला। स्वायुधः–सुंदर, मनोहर. अशस्तिहा–अनिष्ट चिंतकाला मारणारा. वृजना–उपद्रव. पिता–पालक. जनिता–उत्पादक. सुदक्ष–शोभनीय. विष्टंभ–स्तंभन कर्त्ता. धरुणः–धारक. पृथिव्याः–पृथ्वीचा.। मघवंनिंद्र–हे उत्तम ऐश्वर्यवान्. न–नाहीं, त्वावा २–तुझ्या सारखा. दिव्यः–आकाशीं झालेला. पार्थिवः–भूलोकीं झालेला. जातः–झाला. जनिष्यते–होईल. वाजिनो गव्यंतः–अन्न व गाई यांची इच्छा करणारे. वयं–आम्ही। वसु (वस्–निवासे) आकाशादि भूतें ज्यांत रहातात तो अर्था-

तूं परमेश्वर. शतक्रतो–अनंत कृति कर्त्ता. बभूविथ–झाला. सुम्नं–उत्तम सुख. ईमहे–इच्छितों. वरुण–( वृञ् वरणे ) स्वीकार करण्यास योग्य असा श्रेष्ठ परमात्मा. उत–आणि. मित्र–सखा. मतिभिः–स्तुतीनें. वसिष्ठाः–श्रेष्ठ ऋषिजन. त्वे–तुझ्या ठायीं, वसुः–धन. सुषणनानि–दान शीलत्व. पात–रक्षण करा। यतः–ज्यापासून. कृधि–कर. मघवन्–हे धनवान्. शग्धि–शक्तिमान व्हावें. ऊतये–संरक्षणार्थ. विद्विषः–शत्रूला. विमृधः–हिंसकाला. विजहि–जिंक, नाशकर। राधसस्पते–हे धनपते. विधर्ता–धारक. असि–आहेस. गिर्वणः–स्तुतिप्रिय. सुतावंत–सौम्यशील. । भद्रं–कल्याण. श्रिणुयाम–आह्मीं ऐकावें. पश्येम–पहावें. अक्षभिः–डोळ्यांनीं. यजत्राः–हे सर्व पूज्य. कर्णेन–कानानें. स्थिरैरंगैः–श्रोत्रादि सदृढ इंद्रियांनीं. तुष्टुवांसः–स्तुतिकर्ते. देवहितं–देव निर्मित. आयुः–आयुष्य. व्यशेम–उपभोगावें. । वृद्धश्रवाः–महा वैभवी. विश्व वेदाः–विश्वज्ञ. तार्क्ष्यः–तारक. अरिष्टनेमिः–दुःखहर्त्ता. दधातु–करो ॥ त्रिषप्ताः–त्रैलोक्य पालक. बिभ्रत–धारक. मे–मला. परमेष्ठिनी–उत्तम, श्रेष्ठ. घोरं–भय. संशितं–स्तुत. ससृजे–उत्पन्न झाला. इमानि–हीं. यानि–जीं. ग्रहा–सर्व ग्राह्य. चांद्रमसाः–( चदि आल्हादे ) आनंद स्वरूप. आदित्याः–अविनाश. राहुणा–( रह त्यागे ) एकान्त स्वरूप. धूम केतुः–( कित–निवासे ) सर्व पूज्य, जगन्निवास. रुद्रः–( रुदिर अश्रु विमोचने ) दुष्टांस ताडण करणारा अर्थात् न्यायकारी. तिग्म–अत्युष्ण. जीवेम–जिवन्त रहावें. बुध्येम–बुद्धिमान् असावें. पुष्येम–सदृढ असावें. भूषेम–शोभन युक्त असावें. पनाय्यं–प्रशंसनीय. उपयात–प्राप्त व्हावें. ( पृष्ठ १–८ पर्यंत ).

मंत्रार्थः–पृष्ठ १२ आवसो: ० ) हे विद्वान् श्रेष्ठ [ यज्ञकार्यार्थ ] या आसनीं बसावें.–इदं० ) सर्व त्रैलोक्य धारण, व्याप्त व पालन करणारा परमात्मा बरीं वाईट सर्व कर्मे जाणतो. तस्मात् [ सत्कर्मी दुर्लक्ष्य झाल्यामुळें ] त्याला मी शरण आहें; दुष्ट, हिंसक व निर्दय यांचा नाश करून तो माझें कल्याण करो. १३ अमृतो०) ईश्वर कृपेनें माझें अंतःकरण व प्राणेंद्रियें उत्तम स्थितींत असोत; अर्थात् मी पूर्णायुषी होवो.–सत्यं० ) सत्य, यश, कीर्ति, लक्ष्मी, विद्या हीं माझ्या ठायीं स्थीर राहोत.–वाङ्म० इ. ७) वाचा, नेत्र, कर्णादि ज्ञानेंद्रियें व हस्त पादादि कर्मेन्द्रियें हीं सदा सतेज, पीडा रहीत, न्याय व सद्धर्म प्रवर्तक अशीं माझ्या ठिकाणीं असोत. १४ देव० ) अग्नि व सूर्यकिरण यांच्या योगानें सर्व पदार्थ शुद्ध होऊन प्राप्त होवोत. १५ अग्नये०) सर्व पूज्य भगवंताची प्राप्ति होऊन कार्य सिद्धि व्हावी, या हेतूनें हा व्रीहि संस्कार करितों.–अयंत० ) सर्व व्यापक परमात्म्याचे कृपेनें आह्मांला संपत्ति, संतति, अन्न, तेज, बल, ईश्वर भक्ति हीं प्राप्त होवोत. १६ अदिते० इ. ३ ) हे अदिते= अविनाशक, सरस्वति= अत्यन्त ज्ञानवान्, भक्त प्रिय! आमच्या सत्कामना सिद्धीस न्या. (–देव० हा मंत्र ३६ व्या पृष्ठावर पहावा)–विष्णो० ) सर्व व्यापक व पावन परमात्म्याच्या कृपेनें सर्व पदार्थ शुद्ध प्राप्त होवोत. १७ अग्नये०इ. ४*)सर्वज्ञ, सर्व पूज्य, सौम्यशील, सृष्टिकर्ता, सर्वैश्वर्यवान् परमात्मा आह्मास प्राप्त होवो.–यदस्य० ) हे सर्व पूज्य

* "स्वाहा–इदन्नमम" याचा अर्थ,–स्वाहा=स्वपर कल्याण हेत्वर्थ [ ही आहुती व्हावी ]. इदन्नमम= हें कृत्य माझें [ एकट्याचें ] नव्हे,–असा सर्वत्र समजावा.

परमात्मन् ! आमच्या कर्तव्य कर्मांत कांहीं व्यंगता किंवा विशेषता न होतां आमचें इच्छित सत्कर्म सुसंगीत सिद्धीस जावो. आपली भक्ति, परोपकार व धर्म वृद्धि यां संबंधी ज्या आमच्या मन कामना त्या पूर्ण होवोत. १८ अग्नआयूंषि० इ. ४ )१ हे सर्व पालक पूज्य परमात्मन् ! आमचें जीवित्व सांभाळवें; आह्मांस उत्तम अन्न द्यावें. व दुष्टांचें पारिपत्य करावें. २ हे महाजन स्तुत, सर्व द्रष्टा, सर्व पालक ईश्वर ! आपली मी प्रार्थना करितों. ३ हे शोभन कर्त्ता भगवन् ! आह्माला उत्तम तेज, धन, पुष्टि, आरोग्य हीं द्यावीं. ४ हे जगन्नियन्ता ! या सर्व ब्रह्मांडांत व्याप्त असणारा आपल्याहून अन्य कोणीच नाहीं. आह्मी फलेच्छू आपणास अर्पण आहों. आह्मांला संपत्तिमान करा. १९ त्वन्नो० इ. ८ ) १ हे सर्वपूज्य, जगच्चालक, सर्वज्ञ, द्योतमान् ! सज्जनाचा क्रोध आह्मांवर न येवो. व सर्व दौर्भाग्य आह्मांपासून दूर राहो. २ हे सर्व रक्षक ! आज सन्निध राहून आमचें-संरक्षण करा. व आह्मीं आहुती द्वारा केलेली प्रार्थना आह्मांस सुखकारक होवो. ३ हे श्रेष्ठ परमात्मन् ! आत्म संरक्षणार्थ मी आपल्याला प्रार्थितों; आपण माझी प्रार्थना ऐकून आह्मांस सुखी करावें. ४ हे बहु स्तुत ! उत्तम स्तोत्रांनीं प्रार्थना करून आपल्या जवळ मागतों कीं, आपण उपेक्षा न करितां आमची प्रार्थना ऐकून आह्मांस पूर्णायुष्य द्या. ५ आधि, व्याधि, उपाधि आदि संसारिक अनेक दुःख व संकटांपासून, जगत् प्रभु आह्मांला मोकळें करो ६ हे सज्जन रक्षक, सत्यप्रिय प्रभो ! आमचें कार्य यथासांग सिद्धीस नेणारे आपण आहां. आह्मांस सौभाग्य, आरोग्य व शोभा प्राप्त करा. ७ हे आदित्य, विना-

शरहीत ! आमचीं संसार दुःखबंधनें शिथिल अर्थात् नष्ट करावीं. आह्मी सत्याचरणी व निष्पापी होऊन अक्षय सुखाला प्राप्त व्हावें. ८ हे सर्वज्ञ ! अद्वैत ! मज कार्य कर्त्यावर दया व शांति करावी. २१ कयान० इ. ३ ) सर्व पूज्य, सर्व मित्र, सर्वैश्वर्यवान्, सर्वज्ञ जो परमात्मा, त्याची प्राप्ति कोणत्या उत्तम अनुष्ठानानें व कार्यानें होईल ? २ सत्यभूत, पूजनीय, सर्व शक्तिमान्, दुष्ट नाशक, सुष्ट पालक असा हा जो कोणी परमात्मा. ३ तो आह्मा उत्तम स्तुति व भक्ति करणारांला अनेक प्रकारांनीं संरक्षो. २७काम०इ. ३) हे जगदुत्पादक परमात्मन् ! आपल्या पूर्ण कृपेनें ही वधू तेजस्वी, व सौभाग्यवती स्वामिनी होवो; ही काम स्वरूपी पतिप्रिय होऊन उत्तम संतति संपन्न होवो, अशी आपल्याजवळ अनन्यभावें अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे. २९ साधु० ) हे वर श्रेष्ठ, आपण निरंतर साधु अर्थात् दुर्गुण त्याजी व सद्गुण ग्राही असे निष्पाप व निष्कलंक असावें [ तँरच विवाह विधान पूर्वक ] आपली पूजा, अर्थात् आदर सत्कार करावा [ अशी माझी इच्छा आहे ]. —अर्चय० ) मी सदा साधु वृत्तीनें राहीन. सत्कार करावा. —विष्टरो०*) आसन, हें आसन, या आसनावर बसावें.—वर्ष्मो० ) सूर्यापुढें जसा इतर प्रकाशाचा लोप होतो, तद्वत् माझी स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा मजपुढें नाश होवो. जसें हें आसन माझ्या खालीं असून मी आसनारूढ आहें, तद्वत् मला दुःख देणारे दुष्ट माझ्या खालीं पडोत; अर्थात् हे परमात्मन् त्यांचा

*याचप्रमाणें पाद्यं=पाद प्रक्षालनार्थ उदक; व अर्घः—मुख प्रक्षालनार्थ उदक; असा अर्थ समजावा. व प्रतिगृह्णामि—मी स्वीकार करितों; असें सर्वत्र जाणावें.

पराजय होवो.–विराजो०) उदक हें प्राण्यांचें मुख्य जीवन व शोभन होय; तें ईश्वर कृपेनें मला सदा सुख कारक व शोभा दायक होवो.३०आप०) हें उदक मला सदा हितकारक होऊन ईश्वर कृपेनें माझ्या सर्व न्यायी व परोपकारी कामना सिद्ध होवोत.–समु०) समुद्र हा उदकाचा उगम असून तो सदा पूर्ण असो. हें उत्तम जीवन मला सदा आरोग्य कारक होवो.–आमा०) या उत्तम जीवनापासून माझ्या शरीराची कांति सतेज व प्रफुल्लित असो. ईश्वर कृपेनें सर्व लोक माझे खरे परम मित्र होवोत. उत्तम संतति व संपत्ति मला प्राप्त होवो. माझी मानसिक व शारीर प्रकृति उत्तम प्रकारची असो. मित्रस्य०) ईश्वराच्या कृपा दृष्टीनें हा मधुपर्क मला आरोग्य कारक होवो. व माझी मनोवृत्ति भूतमात्राच्या ठायीं सौम्य व द्वेष रहित असावी. –देवस्य०) हे भगवन्! माझ्या प्राणेंद्रियांचें आपण यथावत् पाळण व पोषण करावें. ३१ मधु० इ. ३) हे परमात्मन्! आपल्या कृपेनें हा वायु मला सदा सुगंध, मधुर, व पुष्टिकर अर्थात् सुखदायक असा होवो. समुद्र नद्यादि उदक संचय पूर्ण व सुखप्रद होवोत; ही सर्व वनस्पति आरोग्यकारक होवो. हे भगवन्! दिवस, रात्र, सूर्यादिक प्रकाशक गोल, प्राण, इंद्रियें, किरण, पृथिवी इत्यादि सर्व पदार्थ मला सुख दायक होवोत.–वसव०इ. ४) वसु, रुद्र, आदित्य, विश्वे देवादि सर्व लहान मोठ्या विद्वज्जनांस व अन्य भूतमात्रांस ईश्वर कृपेनें मधुपर्क आरोग्य कारक व सुख वर्द्धक होवो.–यन्मधु०) मधुपर्क सेवना पासून ईश्वर कृपेनें माझ्या शरीरास उत्तम कांति, पोषण व आरोग्य होवो. व माझी मनोवृत्ति न्यायी, सद्धर्मी व सुशील होवो. ३२ गोत्रो०)

अमुक कुळांत झालेली–ही अमुक नांवाची कन्या–यथा शक्त्या अलंकृत केलेली–इचें आपण पाणिग्रहण(अंगीकार)करावा. ३३ जरा०) हे गुणवान् वधू ! ईश्वर कृपेनें तूं पूर्णायुषी हो. हें वस्त्र परिधान कर. प्रीतिवंत व पतिव्रता हो. सौंदर्य, तेज, संतति व संपत्ति हीं सर्व तुला प्राप्त होवोत. हे दीर्घायुषी वधू ! साध्वी स्त्रियांनीं निर्मिलेलें हें वस्त्र परिधान कर. त्यांच्या आशीर्वादानें वृद्धापकाल पर्यंत सर्व आयुष्य सुखानें क्रमण कर. ३४ समंजंतु०)हे परमात्मन् ! विद्वान, सद्धर्मी व श्रेष्ठलोक व प्राण, जलादि तत्वें हीं सर्व आह्मां उभयतांचीं अंतःकरणें परस्परानुकूल व प्रीतियुक्त करोत. शरीरस्थ वायु व अंतरस्थ आत्मा हे आह्मां उभयतांकडून पति व स्त्री पणाच्या धर्मांत अंतर पडूं न देवोत; अर्थात् द्वेष व व्यभिचार आह्मां परस्परांकडून न होवो.–यदेषि०) हे स्त्रिये! स्वयंप्रकाशक, सर्व व्यापक परमात्मा तुझी पति प्राप्तीची मनकामना पूर्ण करो. आणि तुझें मन मज पतीकडे वळवो. ३५ अघोर० इ. ४) ईश्वर कृपेनें ही स्त्री मंगल कारिणी, सौजन्य, सौभाग्यवती, सुहास्य वदनी, पतिव्रता, पुत्रवती, ममताळू, सतेजरूगुणी, आनंदी, शुभचिंतक, प्रियकर, उत्तम संतति व संपत्ति यांची वृद्धि करणारी अशी मला प्राप्त होवो. ही स्त्री चांगली सदृढ, निरोगी, धर्मशास्त्र, गानादि विद्यायुक्त, प्रजोत्पादनार्ह अशी असून तिचें मी पाणिग्रहण करितों; अशी ही स्त्री ईश्वर कृपेनें पुष्टि व हित कारी होवो. इच्या ठायीं उत्तम संतति होऊन, ही विषयादि बहुत सुख व आनंद देणारी, मन वेधक अशी होवो.–प्रमे०)हे श्रेष्ठ सज्जन ! या योग्य वराशीं माझें पाणिग्रहण यथोक्त विधिपूर्वक करावें. ईश्वर कृपेनें हा पति मला निर्विघ्नपणें प्राप्त होवो. ३६ देव०)

द्योतमान, शुद्धात्मा, ज्ञानाधिपति–परमात्मा माझें अंतःकरण शुद्ध करो व आह्मां सर्वांला ज्ञानामृताची रूची लावो. ३७ त्वम०) हे सर्व जगत् व्यवस्थापक! आपण सर्व प्राण्यांचें पोषण व धारण कर्ते आहां, तस्मात् या उभय पतिपत्नीचें पोषण करून त्यांचीं परस्पर अंतःकरणें शुद्ध, समान करावीं.–ऋता० इ० १२ मंत्र ) सत्यप्रिय, जगद्धारक, सुखप्रद, कांति वर्धक, सर्व व्यापक, सर्व पालक–परमात्मा आह्मां ब्राह्मणादि सर्व लोकांला उत्तम बुद्धि, व धान्य, वनस्पत्यादि प्रिय अन्न देऊन आमचें संरक्षण करो. ३९ चित्तं०इ. १३) सर्व पुज्य, सर्वैश्वर्यवान् परमात्मन् मला–शुद्धांतःकरण, सुविचार, सदृढ बुद्धि, मान्यता, जय, ज्ञान, कार्यसिद्धि, आत्मसंयमन, चातुर्य, एकाग्रता, शक्ति, सुस्वरूप, ऐश्वर्य, सत् शास्त्रज्ञान हीं प्राप्त करो. ४० अग्निर्भूता०इ० १८)प्राणिमात्राचा तद्वत् पृथिवी, अंतरिक्ष, आकाश, सूर्यादि प्रकाशक गोल, ब्रह्मांडें, सज्जंन, अन्न, वनस्पति, जल, नद्या, समुद्र, औषधी, उत्पादकता, गुरेंढोरें, अनंत विश्व रूपें, पर्वत, सर्वजाती, वाडवडील, इष्टमित्र–अशा सर्व सृष्ट पदार्थांचा स्वामी माझें संरक्षण करून मला शुद्धांतःकरण, पराक्रम, ईश्वरभक्ति, व सद्धर्मेच्छा देओ ४१ अग्निरैतु०इ ८) १ सर्वपूज्य जगत्कर्ता परमात्मा या स्त्रीला प्रसन्न होऊन उत्तम संतति प्राप्त करो. व त्या भावी संतति अकाल मरणा पासून मुक्त व निर्भय करो. व त्याच्या कृपेनें या स्त्रीला पुत्रपौत्र संबंधी क्लेश प्राप्त न होवो २ सर्व पालक परमात्मा या स्त्रीचें रक्षण करो; इची भावी संतति पूर्णायुषी होवो; ही कधीं विधवा न होवो; ही सदा जीवत्पुत्रवती राहो. व इला सुपुत्र संबंधी सुख प्राप्त होवो. ३ द्योतमान सर्वात्मा आमचें कल्याण करो पृथिवी,

वायु आदि सर्व पदार्थ आह्मांला प्रशस्त व हितकारक होवोत. उत्तम संतति व संपत्ति प्राप्त होवो. ४ हे द्योतमान परमात्मन्! आह्मांला उत्तम सन्मार्ग दाखवा; कीं जेणें करून या संसारांत आह्मांला रोगादि दुःख प्राप्त न होय. हे जगत् प्रभु! आह्मांला अकाल मृत्यु भया पासून निर्भय करा. ५ ईश्वर कृपेनें अकाल मृत्यु आह्मां पासून पराङ्मुख होवो. व आमचा सर्व परिवार व भावी पुत्र त्या पासून निर्भय होवो. ६ हे स्त्रिये! जगच्चालक परमात्मा तुझ्या सर्व शरीराचें व तुझ्या मुलांचें संरक्षण करो. व सर्व सज्जन लोक तुला इष्ट असोत. ७ ईश्वर कृपेनें तुझ्या गृहीं दुःख कारक आर्तशब्द उत्पन्न न होवो. सर्व अनिष्टें तुझ्या पासून दूर राहोत. सुवासिनी-र् सौभाग्यवती अशी तूं आपल्या पतिगृहीं जाऊन पुत्र पौत्रादि उत्तम परिवारासह नांदावें. ८ वंधत्व, पुत्र पौत्र संबंधी दुःख, मरण, अकाल मृत्यु, आधि व्याधि हीं तुझ्या ठायीं असलीं तर मस्तका वरून पुष्प माला टाकतात, तद्वत् हे परमात्मन्! तीं काढून टाकावीं. ९ ३ गृह्णामि० इ० ६ ) १ हे स्त्रिये! सौभाग्य प्राप्त्यर्थ मी तुझें पाणिग्रहण करितों. तूंहि तद्वत् माझें पाणिग्रहण करणारी हो. विवाह संबंधी नियम व प्रतिज्ञा पाळून वृद्धाप व मरण काल पर्यंत त्वां माझ्याशीं नांदावें. जगत्प्रभू आह्मां उभयतांस आमरणान्त आनंदांत व सुखांत ठेवो. परमात्म्याच्या कृपेनें तूं पुत्रवती होऊन आपला गृहाश्रमाचा हेतु सिद्धीस जावो. २ हे स्त्रि! ऐश्वर्यरूप जो जगन्नियंता त्याणें आमचें परस्पर पाणिग्रहण (लग्न) करविलें आहे; जेणें करून तूं माझी धर्मपत्नि व मी तुझा धर्मपति आहें. ३ हे परमात्मन्! ही विवाहित माझी स्त्री मला पुष्टि व सुख दायक होवो. व मीहि

तद्वत् तिला सुखकारक होवो. ज्या प्रमाणें विश्वनाथाच्या कृपेनें तूं मला अर्पित झाली आहेस तद्वत् मीहि तुला समर्पित आहें. तो परमात्मा तुला माझ्याशीं १०० वर्षं पर्यंत संतति युक्त जीवंत ठेवो. ४ आह्मांला व श्रेष्ठ विद्वानांला वस्त्रान्न देऊन जो संरक्षण करितो, तो परमात्मा तूं जी माझी स्त्री त्या तुला उत्तम संततीनें सुशोभित करो. ५ सकल गुणैश्वर्य संपन्न जगद्धारक परमात्मा या माझ्या स्त्रीची प्रजा वृद्धि करो. ६ मी या स्त्रीला प्राप्त आहें व ही स्त्री मला प्राप्त आहे; तर आह्मां दोघांचीं मनें एक होऊन कुल वृद्धि करावी. या स्त्रीला सोडून मनानें (समजून किंवा चोरीनें (नकळत ) हि अन्य स्त्रीशीं समागम करणार नाहीं. ही स्त्रीहि तद्वत् पर पुरुषाशीं मनानें व चोरीनें हि व्यभिचार न करो; व श्रेष्ठ परमात्मा अशा व्यभिचार जन्य पापापासून आह्मांला मुक्त करो: अर्थात् आमच्या कडून व्यभिचार न घडवो. ४४ अमो०) हे [ स्त्रिये ] तुझ्या वांचून मी अन्य कोणाशीं [ स्त्रीशीं ] लंपट होणार नाहीं. मी आकाशवत् व तूं पृथ्वीवत् आहेसः अर्थात् सूर्यादिकांच्या प्रकाशानें पृथ्वीचा जसा सदा संयोग होतो, तद्वत् आह्मां उभयतांचा संयोग सदैव असो, मी सामवेदवत् व तूं ऋग्वेदवत् आहेसः अर्थात् ऋग्वेदापासून सामवेद पर्यंत जशा विद्या सर्व सिद्ध होतात, तद्वत् आह्मां उभयतांनीं मिळून गृहाश्रम संबंधी सर्व कृत्यें पूर्ण करावीं. प्रफुल्लित व प्रीतियुक्त मनानें प्रजोत्पत्ति करावी. परस्परांवर उत्तम प्रीति ठेवावी. कधीं एकमेकाशीं द्वेष करूं नये. प्रसन्नतेनें, शांतपणानें व सत्व वृत्तीनें राहावें. परस्पर सुख संपादन, ईश्वर भक्ति, धर्म, विद्या, संतति, सुविचार, न्याय, इत्यादिकांची प्राप्ति होण्यासाठीं मोठ्या

दक्षतेनें झटावें. पूर्णब्रह्म परमात्मा आह्मांला निरोगी सद्धर्मी, व पूर्णायुषी करो. ४५ आरो०) हे वधू! या पाषाणावर चढ व त्या पाषाणासारखी माझ्या ठायीं स्थिर व दृढ चित्त ठेव. मीहि आपलें चित्त तुझ्याकडे दृढ ठेवीन. सुख व दुःख हीं दोन्ही आह्मी एकत्र सहन करावीं.-अर्य० इ०३) १ हे न्याय कारिन् परमात्मन् ही मी वधू आपली आराधना करीत आहें. मला पितृकुळांतून पतिकुलाप्रत न्यावें.२ ही मी वधू या आहुती द्वारा ईश्वराची प्रार्थना करितों कीं, माझा पति चिरकाल राहो. आह्मी उभयतां पूर्णायुषी व्हावें, आणि माझे सर्व आप्त उत्तम स्थितींत असावे. ३ या आहुती द्वारा ईश्वराची प्रार्थना करितों कीं, माझ्या पतीचें वैभव वृद्धिंगत होवो; आह्मां उभयतांचीं अंतःकरणें परस्पर अनकूल व मिळून राहोत. ४६ सर०) या वधूला ज्ञान व सौभाग्य प्राप्त होवो; ज्याणें सर्व भूतमात्र सहित जग निर्मिलें अशा परमात्म्याची मी उत्तम स्तोत्रांनीं प्रार्थना करितों. या स्त्रीला उत्तम यश प्राप्त होवो.-तुभ्य०इ०२)१ही स्त्री ईश्वर कृपेनें मज पती सह नांदो. व इच्या ठायीं उत्तम संतति होवो.२ ह्या कन्येनें पितृ गृहाहून पति गृहीं जाण्याकरितां तीन दिवसपर्यंत क्षार व लवण रहित भोजनानें व ब्रह्मचर्य वृत्तीनें राहाण्याची दीक्षा घेतली आहे. हे सुंदरी! उदकाप्रमाणें आह्मी परस्पर सदा भेदशून्य (एकत्र) रहावें. व ईश्वर कृपेनें आमच्या दुष्ट शत्रूंचा नाश व्हावा.-भगा०) सर्वेश्वर्यवान् परमात्मा मला प्राप्त होवो. ४७ प्रत्वा०) हे वधू! ईश्वर कृपेनें संसारीक दुःख बंधन पाशापासून त्वां सुटावें. व संतान हेत्वर्थ पतीसह त्वां सुखानें वास करावा. हे वधू! सर्वेश्वर्यवान् जगदात्मा तुला पितृ कुलांतून नेऊन भर्तृ कुलांत बद्ध करो-

जोडो. व सुपुत्र व सौभाग्य युक्त करो. –इष० इ० ७) हे सुंदरी ! विश्व व्यापक परमात्मा तुला ऐश्वर्यवान्, पराक्रमी, निरोगी, सदृढ, ज्ञानी, प्रीतिवर्द्धक, सद्धर्म पुत्रवती, अशी करो; व योग्य ऋतुकालिन सुखोत्पत्ति, व द्वेष व वैर भाव सोडून शुद्ध मित्रत्वानें राहाण्याची सद्बुद्धि देवो. तसेंच विवाह संबंधी सर्व प्रतिज्ञा पूर्ण करण्यास तुला मजशीं युक्त व अनुकूल करो. ईश्वर कृपेनें आह्मांस संतति होऊन त्या संततीसह आह्मी पूर्णायुषी व आमरणान्त आनंदी असावें. ४८ आपो० इ. ४) १ हे जगद्व्यापक ! आह्मांला सुखदायक व्हा. आह्मांला अन्न, महद्भाग्य, उत्तम दृष्टि व ज्ञान द्या. २ जशी माता मुलाला प्रीतीनें स्तनपान करिते, तद्वत् आपण आह्मांला अन्नादि उत्तम रस प्राप्त करा. ३ व उत्तम रस उत्पन्न करून त्यानें आह्मांस शीघ्र तृप्त करा. ४ आपण मला कल्याण, शांति व आरोग्य कारक व्हा. ४९ तच्चक्षु०) सर्व प्रकाशक, सनातन परमात्म्यानें सूर्यादि केलेले पदार्थ आह्मी त्याच्या प्रसादानें १०० वर्षेपर्यंत जीवंत राहून पाहावे. वाचा, श्रोत्रादि ज्ञानेंद्रियें हीं आमरणान्त उत्तम स्थितींत असावीं. दैन्यपणा आह्मांला न येवो.–मम० ) हे [ स्त्री ] ईश्वर कृपेनें गृहाश्रम संबंधी योग्य धर्मोक्त कृत्यांत तुझें ध्यान लागावें. माझ्या चित्तास अनुकूल असें तुझें चित्त सदा स्थिर रहावें. माझें न्यायी वचन एकाग्र मनानें ऐकून पाळावें. ईश्वर कृपेनें तुझ्या माझ्या गांठी पडल्या आहेत; तस्मात् आह्मी एकत्र एक मनानें यथायोग्य व्यवहार करावा. व्यभिचार किंवा अप्रिय आचरण करूं नये.–सुमं० ) हे प्रेक्षकजन ! तुह्मी एकत्र होऊन या विवाहित वधूला मंगलकारिणी मानून सौभाग्यदायक आशीर्वाद द्यावा. व नंतर गृहीं जावें.

५० लेखा० इ. ६) हे स्त्री! तुझे हस्त, हस्तांच्या रेषा, नेत्र, शरीरकांति, केश, दांत व तदंतरस्थ भाग, मांडी, जांघ, कमर, संधिभाग इत्यादि तुझ्या शरीराचे सर्व अवयव व तद्वत् स्वभाव, गुण, भाषण, हास्य इत्यादि मनसीक धर्म यांत व्यंगता किंवा विशेषता असली, तर ती या आहुती द्वारा ईश्वरोपासनेनें नाहींशी होऊन शरीर सदृढ व सतेज आणि मन विचारी व सद्धर्म प्रेरक होवो. ५१ ध्रुव०) ध्रुव नक्षत्रा-प्रमाणें मी पतीच्या ठायीं अचल–स्थीर राहीन. –अरु०) अरुंधती प्रमाणें मी पतीच्या ठायीं बद्ध राहीन.–ध्रुवा०) हे प्रार्थ्यमान देव! ज्या प्रमाणें हें आकाश, ही पृथिवी, हें दृश्य विश्व, हे पर्वत इत्यादि सर्व ध्रुव–स्थीर आहेत, तद्वत् ही स्त्री पतिगृहीं स्थीर राहो. ईश्वर कृपेनें तूं मला समर्पित झा-लेली माझ्या ठायीं स्थीर राहावी. व मजसह पूर्णायुषी व संततियुक्त व्हावी. ५३ अन्न० इ. ३) १ हे वधू! तुझें मन आणि हृदय या अन्नरूप पाशानें व सत्यरूप गांठीनें बद्ध होऊन मला सदा वश व्हावें. २ आह्मां दोघांचें हृदय एकरूप होवोः अर्थात् माझें मन तुझ्या ठायीं व तुझें मन माझ्या ठायीं लीन होवो. ३ तुझें आयुष्य अन्नरूप पाशानें बद्ध होवो. ५४ पूषा० इ. २) १ हे वधू! सर्व पालक परमात्मा तुला तुझ्या पति गृहीं सुखरूप नेओ. तूं पतीला वश होऊन गृह स्वा-मिणी, कार्यकर्ती, मंगलदायक व जितेंद्रिय हो. २ या रथांतून मंगलकारिणी अशी पतिगृहीं जाऊन पतीला सुख दायक हो ५५ इहप्रियं०) हे स्त्री! पतिगृहीं वास करून संतति सं-पत्तीचें प्रिय व उत्तम सुख ईश्वर कृपेनें तुला प्राप्त होवो. गृह्य कृत्यें करण्यास तूं सदा जागृत, तत्पर, व निरालस्य हो. शरीर व अंतःकरण सदा शुद्ध ठेवून अत्यंत प्रिय, सु-

भाषिणी हो. —इह०) परमात्म्याचे प्रसादानें या गृहीं उत्तम संतति, संपत्ति, सद्धर्मानुष्ठान व परोपकार हे सर्व प्रकार असावेत. ५६ इह० इ. ८) हे वधू! या गृहीं तुला ईश्वर धैर्य, ज्ञान, आत्म निग्रह, उत्तम सुख, आनंद वृत्ति हीं देवो. व तूं मजशीं सदा प्रसन्न मनानें रममाण हो. —आनः० इ.४) १ हे प्रजापते! आह्मांला दीर्घायुषी, शूर व सद्गुणी संतति देऊन हा आश्रम सदा आनंद, सुख, व ईश्वर भक्ति यांहीं युक्त करा. आपल्या कृपेनें ही स्त्री मला प्राप्त झाली आहे. ही सदा मंगल कारिणी होऊन संतति संपत्ति व तज्जन्य सुखोत्पत्ति हीं प्राप्त होवोत. २ (पृष्ठ ३४). ३ हे भगवन् या विवाहित स्त्रीला सौभाग्यवती व पुत्रवती करा. इजला एकाहून अधिक पुत्र व पति सुख आमरणान्त प्राप्त होवो. ४ हे स्त्री तूं अंतःकरणपूर्वक मोठ्या आनंदानें व उत्सुकतेनें आपला सासरा, सासू, दीर, नणंद, यांला नम्र असून सदाचरणानें प्रसन्न ठेवावें.–समं० (पृष्ठ ३४)—अहं०) मी आपल्याला वंदन करितों.- स्वस्ति०) आपण आशीर्वाद द्यावा. ५८ अश्म०) ही वाहती नदी ईश्वर कृपेनें आह्मी आमच्या मित्रासह उल्लंघून पार पडो. दुष्टांचा नाश होऊन सुख प्राप्ति होवो.—जीवं०) पितृगृह वियोग जन्य दुःख ईश्वर कृपेनें या सुलक्षण वधूला न होवो व इला सर्व प्रकारें सुख प्राप्त होवो. ५९ मा०) हे भगवन्! दुष्ट लोक रस्त्यांत आह्मांला प्राप्त न होवोत, व ते दुर्गम मार्गाप्रत जाऊन नष्ट होवोत. ६३ अग्ने०इ ५) हे स्वयंप्रकाशक, विघ्ननाशक, सर्वशक्तिमान, शांतिस्वरूप, श्रेष्ठ परमात्मन्! आपण विद्वान सद्धर्मी जनांचे क्लेश परिहार करते आहां. मी आपणास अनन्य भावें शरण असून प्रार्थना करितों कीं, या स्त्रीच्या ठायीं सौभाग्याना

पति वियोगाचा, वांझपणाचा किंवा आधिव्याधीचा दोष असला तर तो नाहींसा करून ही स्त्री शारीरीक, मानसीक, व पारमार्थिक सुखास्पद करा. ६५ आदि० इ. ६) हे जगत्कर्ता! गर्भ सूर्यासारखा तेजस्वी करा, त्याला अमृततुल्य दुग्ध उत्पन्न करा. हजारांत एक असा धीट व लावण्यरूप करा. त्याचीं सर्व दुःखें हरण करा. व त्याची सुख पूर्वक वृद्धि करून त्याला शतायुषी करा. हे सर्व प्रेरक शोभनीय ईश्वर! तिहीं लोकीं असलेल्या शत्रूंपासून आमचें संरक्षण करा. आमच्या डोळ्यांला व शरीराला तेज द्या, कीं जेणें करून आह्मी सम्यक् दृष्टे होऊन आपल्याला पहाण्यास योग्य होऊं. ६७ विष्णु० इ. ७) जगंनियंता परमात्मा हे स्त्रिये! गर्भ धारणार्थ योनीला समर्थ करून तुझ्या ठायीं गर्भ धारणा करो. व तो गर्भ सौंदर्यादि गुणांनीं युक्त करो. हे प्रिय पत्नि! ईश्वर कृपेनें तूं गर्भ धारण कर, उत्तम पुष्पमाला युक्त प्राण व अपान वायु, परमात्मा तुझ्या गर्भाला धारण करो. तुझ्या ठायीं गर्भ धारणा होऊन गर्भाची वृद्धि सुख पूर्वक होवो; व दहा महित्याचे पूर्वीं तो पतन न होवो अशी कृपा ईश्वर करो. जशी ही पृथ्वी सर्व भूतमात्र, वनस्पति, पर्वत व सृष्ट पदार्थ धारण करिते, तद्वत् तुझा गर्भ स्थिर होवो व १० व्या महिन्यांत सुखरूप प्रसवो. ६८ यत्ते० ) हे सद्गुणी स्त्री! तुझ्या ठायीं गुणवान् पुत्र स्थिर होवो. व त्यासह आह्मांला ईश्वर पूर्णायुषी करो. ७० प्रात० इ. ६) शब्दार्थः हवामहे—आव्हान करितों. भगं—ऐश्वर्यवानाला. नर्य—सत्वशील. सुपोष—ऐश्वर्य. अर्यः—श्रेष्ठ. पाहि—संरक्षण कर. ऊर्ज—तेज. मोदमान आनंदी. एमि प्राप्त व्हावें. उपहूता, अजावयः—

अनुकूल प्राप्त व्हावा. कीलाल–उत्तम रस. शिवं पारमार्थिक सुख. शग्म–संसारिक सुख. शंयोः–परोपकारार्थ. ७१ शंनो०) हे आप–(आप्लृव्याप्तौ) हे सर्व व्यापक प्रकाशक! आमचें कल्याण करा. आणि आह्मांस सदा सुख व आनंद वृत्तींत ठेवा. ७२ भूः० इ. ८) महः–सर्वश्रेष्ठ, जनः–जगन्नियंता, तपः पूर्णज्ञान स्वरूप, सत्यं–अविनाशी असा परमात्मा आमचा सर्व देह पवित्र करो. ७३ ऋतं० इ. ३) हे परमात्मन् आपण कसे आहां! तर प्रथमारंभीं ज्ञानमय सामर्थ्यानें सहज स्वभावें करून जगताचें स्थूल व सूक्ष्म कारण, व ज्ञान निर्मिलें. नंतर रात्र, समुद्र, महा समुद्र; पुढें अहोरात्री, सूर्य, चंद्र, द्युलोक व तदनंतर पृथिवी, अंतरिक्ष व आकाश हीं निर्माण केलीं. ७४ प्राची० इ. ६) पूर्व दिशाधिपति प्रकाश स्वरूपाला "मी वारंवार नमन करितों. तो शत्रूपासून आमचें संरक्षण करो" । दक्षिणाधिपति पूर्ण ऐश्वर्यवान् ज्ञान स्वरूपाला० । पश्चिमाधिपति सर्वोत्तम प्राण स्वरूपाला० । उत्तराधिपति शांति स्वरूपाला० । अधराधिपति विश्व स्वरूपाला० । ऊर्ध्वाधिपति जीवन स्वरूपाला० । –जात० इ. ६ ) १ हे सर्वज्ञ न्यायकारिन्! आपण शत्रूंचा निःपात करणारे आहां. जशी अति दुर्धर नदी किंवा समुद्र पार होण्यासाठीं नौका असते तद्वत् आह्मांला अनेक दुःसह दुःखांपासून आपण पार पाडा. २ हे दुःख निवारक, विद्वान हृदय प्रकाशक! आमचें हृदय ज्ञानानें प्रकाशित करा. ३ हे जगत् प्रकाशक! विश्व विद्या प्राप्त होण्याकरितां आह्मी आपली उपासना करितों. ४ हे प्रकाश स्वरूप! आह्मांला सत्य ज्ञानप्राप्त होवो. ५ ( पृष्ठ ४९). ६ सर्व व्यापक, परब्रह्म, ज्ञानसागर परमात्म्याला अनन्य भावें करून मी शर-

ण आहें. ७५ तत्स० ) जगत्कर्ता, ऐश्वर्य दाता, सर्व प्रकाशक, सर्व ग्राह्य, विज्ञान स्वरूप, सर्व व्यापक असा जो परमात्मा त्या परमात्म्याचें आह्मीं प्रेम भक्तीनें, अनन्य भावानें व दृढ विश्वासानें आमच्या अंतःकरणांत ध्यान करितों. तो परमात्मा आमच्या बुद्धीला—मनोवृत्तीला परोपकार व ईश्वर भक्त्यादि श्रेष्ठ कार्मे करण्यास प्रवर्त्तवो. ७६ सूर्यो० ) चराचरात्मा, स्वयंप्रकाशक, प्राण धारक, प्रीति कारिन् परमात्मा आह्मांला प्राप्त होऊन ज्ञानादि ऐश्वर्य देओ. ७७—८१ यांतील आहुतीच्या वगैरे मंत्रांतील शब्द ईश्वर वाचक असून त्यांचा अर्थ ईश्वर प्राप्त होवो असा जाणावा. ८४ पुमा० इ. २ ) हे स्त्रिये ! प्राण व अपान, पृथ्वी व आकाश, अग्नि व वायु हे जसे पुरुष गुण युक्त आहेत, तद्वत्हि तुझ्या उदरीं ईश्वर कृपेनें पुरुष रूप गर्भ—पुत्र प्राप्त होवो. व त्याच्या मागूनहि दुसरा पुत्र होवो.—आ ते० ) हे स्त्री तुझ्या उदरीं पुत्र रूप गर्भ होऊन, भात्यांत जसे बाण स्थिर असतात, तद्वत् स्थिर राहो, व दहा महिन्या अन्तीं शूर, वीरादि गुणयुक्त उत्पन्न होवो.—यत्ते० ) हे सौंदर्यादि गुणयुक्त स्त्रिये ! तुझ्या उदरीं सद्गुणी व ईश्वर भक्त पुत्र होवो. व पुत्र विरह जन्य दुःख तुला कधीं प्राप्त न होवो. ८५ हिर० ) ही सकल सृष्टि उत्पन्न होण्याचे पूर्वी ज्ञानस्वरूप परमात्मा स्वसिद्ध एकच होता व तोच पृथिवी, सूर्य चंद्रादि सकल सृष्टीचा कर्ता व धनी होय. त्याचें आह्मीं अनन्य भावें ध्यान करावें. जल व पृथिवी यां पासून झालेल्या वनस्पतीचा जो रस अर्थात् वीर्य त्याच्या योगानें मानवाची वगैरे विचित्र रूप व गुणयुक्त गर्भ धारणा व उत्पत्ति होते; [ तस्मात् या गर्भाचें धारण व पोषण तो जगदात्मा अवश्य करो व उत्तम गु-

णयुक्त गर्भ उत्पन्न होवो, ]-सुप०) हे जगद्धारक परमात्मन् ! आपण सौंदर्य स्वरूप, सर्व श्रेष्ठ, सर्वांतर्गत आत्मा व अंतःकरण, वेद अर्थात् ज्ञानस्वरूप आपणच आहां: [ आपण हा गर्भ सौंदर्यादि गुणांनीं युक्त करा] ८८ धाता०) जगद्धारक परमात्मा आह्मांला उत्तम मति व बुध्यादि गुणयुक्त पुत्र देओ; त्या परमात्म्याचें आह्मीं, हे सौभाग्य स्त्रिये, ध्यान करावें. जगत्कर्ता सर्वांस पूजनीय आहे. तो सर्व पूज्य व आव्हनीय परमात्मा आमची स्तुति व प्रार्थना ऐको; उत्तम मति व बोध देओ; गर्भास प्राण युक्त करो; आमची उपासना दृढ करून ठेवो. व महान् विद्वान्, संपत्तिमान् प्रशस्य, शूर असा पुत्र देओ. हे परमात्मन् ! ज्या प्रसादानें सौंदर्य व सुमति व धन आपण सज्जनांला देतां, त्या प्रसादानें व प्रसन्न मनानें आज आह्मांला सौभाग्य प्राप्त करावें. व त्या परमात्म्याच्या कृपेनें आमची संतति ( पुत्र पौत्रादि ) सुख पूर्वक शोभायमान होवो. ५-६-७ या मंत्रांसारखे दुसरे मंत्र मागें असून त्यांचा अर्थः " हे ईश्वर ! सद्गुणी, श्रेठ, स्वरूपवान असा पुत्र १० व्या महिन्यांत प्रसवो " । ८९ सुमि० इ. ७) हे परमात्मन् ! प्राण, जल, औषधी, आदि सर्व सृष्ट पदार्थ आह्मांला सुखदायक होवोत; व आमच्या दुष्टांला दुःखदायक होवोत—जेणें करून ते दुष्ट नष्ट होतील. सर्व श्रेठ, जगत् कर्ता, सर्वज्ञ, विश्वपति ज्याचें विद्वान् लोक निरंतर ध्यान करितात, तो परमात्मा या गर्भाचें संरक्षण करो व सद्गुण व सद्बुद्धि देओ. या स्त्रीला उत्तम संतति व संपत्ति प्राप्त होवो ज्या सामर्थ्यानें ईश्वर पृथ्वीची सीमा करितो, त्या सामर्थ्यानें या स्त्रीला सौभाग्य, पुत्र, पौत्र, धन, धान्यादिकांची प्राप्ति व्हावी.

आम्हीं पुत्र पौत्रादि सह मरण काल पर्यंत सुखी असावें. ९२ या० २ ) हे द्योतमान्, इष्ट फलदायी प्रभो ! शुभ प्राप्त्यर्थ आहुती द्वारा मी आपली अर्चना करितों. पति हा स्त्रीमध्यें गर्भ धारण करितो. तस्मात् त्याणें प्रसव कालीं प्रसव स्थानाहून दूर रहावें. ९३ एज० ) हे परमात्मन् ! ज्या प्रमाणें वायु व समुद्र हळू हळू चलन होतात, तद्वत् हा गर्भ १० महिने पर्यंत गर्भाशयांत राहून नंतर पूर्ण गर्भ, वेष्टन सहीत सुखरूप पणें बाहेर येवो –अवैतु० ) जगन्नियन्ता प्रभु इचें आमरणान्त संरक्षण करो. –प्र ते० ४ ) हे बालक ! तुला मध व घृत प्रथम प्राशन करवितों. जगदुत्पादक परमात्म्याच्या कृपेनें तुला ज्ञान व धन धान्यादि उत्तम पदार्थ प्राप्त होवोत. परमात्मा तुला सदा संरक्षो. १०० वर्षे जीवन्त राखो. हे बालक ईश्वर तुला वेदाध्ययनार्थ तीक्ष्ण व शीघ्र बुद्धि देओ. प्राणापान, व सूर्य चंद्रादिकांला माळे प्रमाणें, धारण करणारे दोन वायु जे अश्विन देव ते तुला उत्तम बुद्धि देओत. पृथिव्यादि तिनी लोकांचें ऐश्वर्य तुला प्राप्त होवो. अत्यन्त श्रेष्ठ बुद्धि व धन प्राप्त होण्याकारतां, न्यायकारी, अचिंत्य शक्तिमान् परमात्म्याची मी प्रार्थना करितों. ९४ इय० ) हें अन्न, आयुष्य व प्रज्ञावर्धक, व प्राण धारक असें होवो. अग्नि० इ. ७ ) वनस्पती पासून अग्नि, औषधीपासून चंद्र, ब्राह्मणापासून वेदामृत, सत्य विद्येपासून विद्वान, सत्यव्रता पासून ऋषि, सत्य ज्ञानानें पितर, धना पासून यज्ञ, जला पासून जीवित्व, नद्या पासून समुद्र, हे सर्व जसे दीर्घायु असतात तद्वत् हे बालक ! त्वां ईश्वर कृपेनें दीर्घायुषी व्हावें. ९५ इंद्र० २) हे इंद्र, सर्वैश्वर्यवान् भगवन् ! उत्तम धन, बल, सौभाग्य, ज्ञान, शरीर

आरोग्य व मधुर वाचा व चांगले दिवस आह्मांला प्राप्त होवोत. हे स्तुति प्रिय! आह्मांला पुष्कळ धन, १०० वर्षे आयुष्य, व वीर सद्गुणी पुत्र, प्राप्त करा. —त्र्यायु०) प्राणादि अंतःकरण, चक्षुरादि इंद्रियें हीं ३०० वर्षे सदृढ राहोत. —वेदते०) हे बालक! मजवर त्वां आत्मवत् प्रीति ठेवावी.— इडासि०) हे सद्गुणी वीर स्त्री! तूं प्रिय, व वीरादि गुणयुक्त बालक प्रसवणारी आहेस. तूं ईश्वर कृपेनें सदैव पति व सद्गुणी पुत्र युक्त होऊन सुखानें वास करावा. —इम० २) ईश्वर कृपेनें निर्माण झालेलें हें उत्कृष्ट रस युक्त दुग्ध, हे बालक त्वां प्राशन करावें. हें दुग्ध तुला मधुर व पुष्कळ प्राप्त होवो; व त्या पासून तुझें ज्ञान, शक्ति, व आरोग्यता वाढो. ९६ आपो०) बालकासह बाळंतीचें सर्व प्रकारें ईश्वर कल्याण करो.—षंडा०) षंडादि दोष व अनेक अरिष्टें हीं एथून नष्ट होवोत. ९९ को०) हे बालक! तुझें नांव काय? तूं कसा आहेस?—पूर्णायुषी किंवा अल्पायुषी? तुला ठाऊक नाहीं; तर ईश्वर कृपेनें तूं पूर्णायुषी हो व सौर मासादि कालमानानें आयुष्य क्रमण कर. तुझें नांव अमुक—. १०० सत्वा०) परमात्मा तुझी आयुष्य वृद्धि करो. दिवस, रात्र, पक्ष, मास, ऋतु, या पासून एक वर्ष पर्यंत, एक वर्षा पासून पुढें १।२।३ या प्रमाणें १०० वर्षे अर्थात् पूर्णायुष्य तुला प्राप्त होवो. व तूं अमुक—नांवानें प्रसिद्ध हो. १०२ यते०) १—२ ईश्वर कृपेनें एथें पुत्र संबंधी शोकादिक प्राप्त न होवो. ३ ईश्वर या बालकाचें कल्याण करो. व माता जिवन्त असतां मृत्यु न येवो.—१०५ देवीं० २) प्राणाधिपति परमात्मा उत्तम वाचा व रस भरीत अन्न व वीरादि गुण युक्त संतति आह्मांला प्राप्त करो. १०६ प्राणे०) ईश्वर

कृपेनें अन्न, सुगंध, रूप, यश, व ज्ञानेंद्रियें हीं उत्तम प्रकारें प्राप्त होवोत.–अन्न०) हे अन्नपते परमेश्वर! आह्मांला निरोगी व आरोग्य कारक, पराक्रम व पुष्टिदायक अन्न द्या. १०९–१११ पृष्ठांतील मंत्र सोपे असून त्यांचा साधारण अर्थ "हे जगच्चालक परमात्मन्! या बालकाचें सर्व प्रकारें कल्याण करावें." याला कोणती इजा न होवो. याचें आयुष्य कमीं करूं नये. याला पूर्णायुषी करावा व आह्मा सर्वांला उत्तम तेज व अन्न द्यावें" ११३ भद्रं० २) हे परमात्मन् आह्मी सर्व लोकांनीं कानांनीं चांगलें ऐकावें; डोळ्यांनीं चांगलें पहावें; दृढ व एकाग्र चित्तानें ईश्वराची आराधना करावी; व विद्वान, वीर, श्रेष्ठ अशा लोकांचें आयुष्य व गुण आह्मांला प्राप्त होवोत. ११६ येन०) स्वयं प्रकाशक परमात्म्यानें तेजोरूप वस्त्र जसें सूर्याला दिलें आहे, व अमृत–मोक्ष सर्व जगांतील ज्ञानी जनांला योजिला आहे, तद्वत् तो परमात्मा तुला वस्त्र ,धारण करो. व दीर्घायुषी, बलवान व विद्वान करो. –यज्ञो०) सच्चिदानंद स्वरूप, सर्वज्ञ, परम पवित्र जो परमात्मा त्याला प्रथम प्रार्थून वेदादि विद्या व परमेश्वर ज्ञान प्राप्त्यर्थ यज्ञोपवीत धारण करितों. ईश्वर कृपेनें दीर्घ आयुष्य, सद्गुण, उत्तम तेज, सुख व बल प्राप्त होवो. हे शिष्य! त्वां ईश्वराठायीं प्रेम भक्ति ठेवावी; व ज्ञान प्राप्ति करून घ्यावी; या करितां मी तुला यज्ञोपवीत युक्त करितों. ११७ अग्ने०) हे व्रतपते परमात्मन्! मी ब्रह्मचर्य व्रत धारण करितों. तें आचरण्या करितां मला कृपा करून समर्थ करा. ब्रह्मज्ञान प्राप्त्यर्थ हें व्रत मी धारण केलें आहे. त्या प्रमाणें व्रताचें फल मला प्राप्त होवो, अशी आपणाकडे प्रार्थना आहे. ११८ तत्स०)

उत्तम भोग्य, आरोग्य कारक व रोग नाशक असें अन्न जगत्कर्त्याच्या प्रसादानें आह्मांला प्राप्त होवो. -देव०) हे बालक! मी जो तुझा हस्त ग्रहण केला आहे, तो परमात्म्यानेंच केला आहे असें समज. परमात्मा तुझें कल्याण करो. ११९ युवा०) विद्वान सद्धर्मी लोक, स्वपर कल्याण करणारे होत असतात. तद्वत् जगत्कर्त्याच्या प्रसादानें त्वां व्हावें. १२० तं०) पंडित जन अशा विद्वानांला मोठ्या प्रीतीनें मान देऊन त्यांचा योग्य आदर सत्कार करितात, [तद्वत् त्वां व्हावें]. -मम०) [हे शिष्य] तुझें चित्त माझ्या चित्तीं लागो. त्वां मला सदा अनुकूल राहावें. मी सांगेन तें एकाग्र मनानें व आवडीनें त्वां ऐकावें. मीहि तुझ्याकडे आपलें मन लावीन. श्रेष्ठ परमात्मा तुझें मन्न मजकडे लावो. -कस्य० २) परमेश्वराचा तूं ब्रह्मचारी आहेस. तो तुझें कल्याण करो. त्याच्या कृपेनें जल, औषधि, स्वर्ग, पृथिवी, विद्वान्, श्रेष्ठ लोक यांचें ज्ञान व सद्गुण तुला प्राप्त होवोत व सर्व अरिष्टें नष्ट होवोत. १२३ अग्ने०) हे सर्व पूज्य परब्रह्म! आपण सर्व कीर्तिमान व ज्ञानस्वरूप आहां. तद्वत् मला आपल्या कृपेनें कीर्तिमान व ज्ञानी करा. जसें आपण सर्व ऐकतां तद्वत् मला यथार्थ सद्गोष्टी व सन्नीति ऐकवा. आपण जसे विद्वानांचे व यज्ञाचे स्वामी-अधिपति आहां तद्वत् मला मनुष्याचा व वेदादि सद्विद्यांचा रक्षक करा.- अग्नये०) हे परमात्मन! काष्ठानें जसा अग्नि प्रदीप्त होतो, तद्वत् आपल्या आशीर्वादानें आयुष्य, बुद्धि, ज्ञान, कृतज्ञता, ईश्वर भक्ति, तेज, संतति, संपत्ति, व ब्रह्म विद्या हीं माझ्या ठायीं प्रकाशीत करा. माझा आचार्य व मी चिरंजीव, पुत्रवान व बुद्धिमान व्हावें आणि निरुपद्रवी, परोपकारी, दयाळू,

सत्यप्रिय, यशस्वी, तेजस्वी व अन्नादि उत्तम रस सेवन करणारा असा मी व्हावा. —तनू० इ. ७) १ हे परमात्मन्! आपण सर्व रक्षक आहां; तर माझें संरक्षण करा. २ आपण आयुष्य देणारे आहां; तर मला पूर्णायुष्य द्या. ३ आपण तेज व विद्या देणारे आहां;—तर मला तेज व विद्या द्या. ४ माझ्या ठायीं मानसीक व शारीरिक जें जें न्यूनत्व (कमी) असेल तें आपण पूर्ण करावें. ५—७ मला शीघ्र विद्या ग्रहण करण्याची बुद्धि द्या.—१२४ वाक्०) हे परमात्मन्! आपल्या कृपेनें माझें शरीर, वाचा, प्राण, कर्ण, नेत्र, यश, बल, बुद्धि, विद्या, कीर्ति हीं सर्व मला पूर्णपणें प्राप्त होवोत. —मयि०) सर्व पूज्य, ज्ञानस्वरूप परमात्मा माझ्या ठायीं शीघ्र विद्या ग्रहण करणारी बुद्धि, उत्तम गुण, उत्तम तेज हीं धारण व स्थिर करो. हे परमात्मन्! मी तेजस्वी, विद्वान, व ज्ञानरूप रस ग्रहण करण्यास उत्सुक व आनंदी असा व्हावा. अशी आपणाकडे प्रार्थना आहे. १२५ इयं०) ब्रह्मचर्य, सुशिक्षा व सर्व विद्या प्राप्त व्हाव्या; सर्व दुष्टता, कुशिक्षा व दुर्गुण टाकावे; प्राण व अपान पूर्ण पणें प्राप्त व्हावे;—अर्थात् दुःख रहित आयुष्य वाढावें, व सौभाग्य वृद्धि व्हावी, या हेतूनें ही मेखला तुला धारण केली आहे. तर तो हेतु ईश्वर कृपेनें सिद्धीस जावो. १२६ योमे०) पूर्णायुष, ब्रह्मज्ञान व तेज, व उत्तम गुण प्राप्त व्हावे या हेतूनें हा दंड धारण करितों; तर तो हेतु ईश्वरानुग्रहानें सिद्धीस जावो. १२८ भवान्०) भवान्, भवती=आपण, ददातु=द्यावी,=आपण भिक्षा द्यावी. १३७ उद्यन्०) सर्वैश्वर्यवान् सर्वांतर्यामी परमात्मा मला प्राप्त होऊन माझे (आप्त आहे) व मला सर्व काल सर्व प्रकारें संरक्षण करो. धन, धान्य, तेज व ज्ञान हीं सहस्र पटीनें देवो.

—अन्ना०) शांतिस्वरूप परमेश्वर मला उत्तम अन्न, यश, ऐश्वर्य, शुद्धांतःकरण प्राप्त करो.—प्राणा०) हे जगदात्मन्! माझे नेत्र, कर्ण, प्राण, इंद्रियें यांची तृप्ति करावी. १३८ परि०) ईश्वर कृपेनें मी यशस्वी, दीर्घायुषी व निरोगी असा व्हावा. व उत्तम सद्गुणी स्त्री, व संपत्ति यांची मला प्राप्ती व्हावी.—या०२) श्रेष्ठ लोकांप्रमाणें उत्तम प्रकारचें यश मला प्राप्त व्हावें.—बृह०) हे श्रेष्ठ परमात्मन्! आपण मला पाप कर्मापासून भिन्न ठेवावें, आणि तेज व यश व कीर्ति यांहीं युक्त करावें.

## ॥ ॐ नमः शिवाय. ॥

## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | पंक्ति. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १७ | २६ | माश्चि | मायश्चि |
| १९ | १५–१७ | शुधी–तत्वा | श्रुधी तत्त्वा |
| २० | ६ | हिं ᳲ | हि ᳲ |
| २७ | ४ | अमू | अमु |
| ३० | १० | सं ᳲ | स ᳲ |
| ९९ | ६ | मास | मासं |
| १०६ | २३ | उर्जे | ऊर्जे |
| ११३ | १७ | समरे | समने |
| १२१ | २ | भुतेभ्यः | भूतेभ्यः |
| १३ | २४ | विक्रमस्व ॥ | विक्रमस्व ॥ हे मंत्र जपावे. |
| २२ | ११ | विषुव वृत्ताच्या उत्तरेस असतो, | मकर वृत्ताहून उत्तरेस वळतो, |
| ३३ | २१ | भागीं | भागीं एक उदक पूर्ण कलश सन्निध घेऊन, |
| १३२ | १६ | [illegible] | |